
# कालसमुद्रांतील रत्नें

६१५

लेखक

बॅ. गो. वि. देशमुख.

५२
म. ग्रं. सं. ठाणे
…य चरित्र
…नं. ६११२



REFBK-0007788

…त्नकरंडक २ रा

जयश्री प्रकाशन, धनतोली. नागपूर

जयश्री प्रकाशन ३

# कालसमुद्रांतील रत्नें

## रत्नकरण्डक २ रा

९०१५२
सं. च
८५५
७५०७२१५५

लेखक

बॅ. गो. वि. देशमुख

प्रस्तावना लेखक

डॉ. शं. दा. पेंडसे,
एम्. ए., एम्. ओ. एल्.
नागपूर.

संग्रहालय ठाणे
६६८८
दा. क.
(स्थळ प्रत)

एकमेव विक्रेते

वीणा प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर.

REFBK-0007788

सप्टेंबर ] [ १९५२

★ ★ ★

प्र का श क

श्री. वि. गंधे, एम्. ए., डी. पी. इ.

ज य श्री प्र का श न

ध न तो ली, ना ग पू र.

★ ★ ★

स र्व ह क्क ले ख का क डे

★ ★ ★

पुस्तकें **वीणा प्रकाशन**, सीताबर्डी,
नागपूर व प्रकाशाकाकडे मिळतील.

★ ★ ★

मु द्र क

श्री. वि. गंधे, एम्. ए., डी. पी. इ.

प्र दी प मु द्र णा ल य

ध न तो ली, ना ग पू र.

★ ★ ★

★ ★ ★

ज्यांनी आपल्या अगाध विद्वत्तेनं, दृढ निश्चयानं, अतुल धैर्यानं व निःस्वार्थीपणानं अन्यायी, अनियंत्रित व लोकहितविरोधी सरकारशीं निकरानं झगडून व प्रसंगानुसार तुरुंगयात्राही आनंदानं पत्करून खऱ्या देशभक्तीचा धडा घालून दिला, ज्यांनी 'स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच' हा मंत्र जनतेला देऊन तिचा स्वाभिमान व आत्मविश्वास जागृत केला व स्वातंत्र्याचा पाया घातला, ज्यांनी 'गीतारहस्य' लिहून तत्वज्ञानाचा निष्काम कर्मयोगाचा खरा मार्ग दाखवून दिला त्या **युगप्रवर्तक लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांना** 'कालसमुद्रांतील रत्नां'चा हा करण्डक कृतज्ञतापूर्वक अर्पण करतों.

**गो. वि. देशमुख**

★ ★ ★

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | १ | ग्रंथकर्त्याचे दोन शब्द | |
| | २ | प्रस्तावना | १ |
| | ३ | पुरस्कार | १५ |
| रत्नमंजुषा | १ | हातची गेलेली शिकार | २८ |
| ,, | २ | सुदर्शन चक्र | ४८ |
| ,, | ३ | स्वराज पार्टी | ६८ |
| ,, | ४ | प्रतिसहकार पक्ष | ९१ |
| ,, | ५ | नागपूरची हिंदुसभा | १०३ |
| ,, | ६ | लोहपुरुष | १४८ |
| ,, | ७ | इंद्रधनुष्य | १६४ |
| ,, | ८ | मी | १९९ |

# ग्रंथकर्त्याचे दोन शब्द

'कालसमुद्रांतील रत्नें' लिहितांना माझ्यासमोर काय ध्येय होतें तें मी पहिल्या करण्डकाच्या प्रस्तावनेंत असें सांगितलें आहे: 'अथ'पासून 'इति'-पर्यंत सविस्तर व तपशीलवार आत्मचरित्र न लिहितां मनोवेधक व बोध घेण्यासारकाच इतिहास व गोष्टी थोडक्यांत लिहिण्याचें ठरविलें.' ह्या करण्डकांतही मजकूर लिहितांना मी तेंच ध्येय समोर ठेविलें आहे. शिवाय कै. प्रो. श्री. व्यं. पुणतांबेकर यांनी माझ्या अभिनंदनार्थ पाठविलेल्या आपल्या पत्रांत केलेल्या सूचनेचाही स्वीकार केला आहे, पण अल्प प्रमाणावर. ते म्हणतात 'नव्या आन्दोलनाच्या अगोदर महाराष्ट्र समाजाच्या भावना, राहणी, आचार, विचार व्यवहार इत्यादि संबंधी विस्तृत माहिती आली असती तर प्रांताच्या सामाजिक व आर्थिक इतिहासाच्या दृष्टिने उपयोग झाला असता.' ग्रंथ अवजड होण्याच्या भीतीने व कागदाचा दुष्काळ म्हणून विस्तृत माहिती देणें शक्य झालें नाही. जर मी कांही केलेंच असेल तर डॉ. शं. दा. पेंडसे ह्यांनी माझा हा करण्डक साडेतीनशें पानांचा होईल म्हटल्या बरोबर शंभर छापील पानांचा मजकूर त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेच्या गाभ्यास धक्का न पोचवितां कमी केला.

त्याच प्रमाणे हेंही कबूल करणें भाग आहे की महाराष्ट्राचा इतिहास प्रो. पुणतांबेकर यांच्या सूचनेबरहुकूम, लिहिण्याचें काम माझ्या सारख्याला अशक्य आहे. तें काम माझ्यापेक्षा जास्त विद्वान, अभ्यासू व उद्योगी माणसाचें आहे. तें त्यांच्या सारख्या विद्वान माणसाच्या नव्हे त्यांच्या हातूनच होण्यासारखें होतें. त्यांची महाराष्ट्रासंबंधीची कळकळ ज्यांनी त्यांचीं व्याख्यानें ऐकलीं असतील किंवा ज्यांना त्यांच्याशीं बोलण्याचे प्रसंग आले असतील त्यांना परिचित आहेच. तेव्हा त्यांच्या हातून महाराष्ट्राचा उत्तम इतिहास लिहिला गेला असता ह्यांत बिलकूल संशय नाही.

लेखकाच्या अंतर्मनाचे दर्शन घडविणारे प्रसंग लिहिण्याची कांही जणांनी केलेली सूचनाही अमलांत आणली आहे. पण थोड्या प्रमाणानं.

आता आभार मानण्याचें माझें कर्तव्य करून मी आटोपतें घेतों. डॉ. शं. दा. पेंडसे, एम. ए., एम. ओ. एल, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष ह्यांनी आपला अध्यापकाचा व्यवसाय सांभाळून, अनेक ग्रंथकर्त्यांचा त्यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहून देण्याचा आग्रह होता तो पूर्ण करून, आपला लेखन व्यवसाय सांभाळून, प्रकृति ठीक नसतांही माझ्या आग्रहाला मान देऊन प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. प्रस्तावना फारच उत्तम वठली आहे हे कोणाही वाचकाला दिसून येईल. त्याच प्रमाणे श्री. बाबासाहेब खापर्डे, मध्यप्रदेश असेंबलीचे माजी सभासद व माजी मंत्रि ह्यांनी ग्रंथाला जो पुरस्कार लिहून दिला आहे त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तो पुरस्कारही वाचनीय आहे. राहतां राहिले श्री. पुरूषोत्तम दि. ढवळे, महाराष्ट्राचे सपांदक व श्री. वर्णेकर, राष्ट्रशक्तिचे सपांदक. ह्यानी त्यांच्याजवळ असलेले ब्लाक्स ह्या पुस्तकांत छापण्यास दिलेत, तसेच जयश्री प्रकाशनाचे संचालक प्रा. श्री. वि. गंधे यांनी प्रकाशनाचें कार्य स्वीकारून पुस्तक प्रकाशित केलें याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे.

धनतोली
**नागपूर**

**गो. वि. देशमुख**

# प्रस्तावना

नागपूरचे सुप्रसिद्ध देशभक्त बॅरिस्टर गोविंदराव देशमुख यांनी "कालसमुद्रांतील रत्नांचा" पहिला करंडक दोन वर्षांपूर्वी जनतेला अर्पण केला. आज ते तशाच तेजस्वी रत्नांचा दुसरा करंडक जनतेला अर्पण करीत आहेत ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय.

इंग्लंडमधून बॅरिस्टर होऊन आल्यानंतर श्री. गोविंदराव उर्फ भाऊजी देशमुख हे १९१० साली नागपूरच्या टिळक पक्षीय राष्ट्रीय मंडळाला मिळाले. तेव्हापासून १९४५ पर्यंत या प्रांताच्या आणि या देशाच्या जीवनाशीं ते अखंड संबद्ध होते. तीन तपांच्या या दीर्घ कालावधीत, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांत ज्या महत्वाच्या घटना घडल्या त्यापैकी १९२० पर्यंत घडलेल्या घटनांचें वर्णन त्यांनी पहिल्या करंडकांत केलें आहे. १९२१ ते १९३५ पर्यंतच्या काळांतील महत्वाच्या घटनांचा सुरस वृत्तान्त प्रस्तुत दुसऱ्या करंडकांत वाचकांना आढळेल.

या देशाच्या राजकीय इतिहासांत १९२१ साल फार महत्वाचें आहे. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली या देशांत असहकारितेच्या अभिनव आणि प्रचंड आंदोलनाला या वर्षी प्रारंभ झाला व कॉलेजें, कोर्टें आणि कौन्सिलें यावरील बहिष्काराच्या चळवळीमुळे हा देश तळापासून ढवळून निघाला.

असहकारितेच्या या झंझावाताने हिंदी लोकसागरावर जें प्रचंड वादळ झालें त्याचें सुरेख वर्णन या करंडकाच्या पहिल्या मंजुषेंत भाऊजींनी केलें आहे. हा सर्व वृत्तान्त, समुद्रावर स्वतः अनुभविलेल्या वादळाच्या वर्णनाने प्रकरणाला प्रारंभ करून भाऊजींनी समग्र सांगितला आहे.

भाऊजीनी राष्ट्रीय मंडळाच्या ठरावाप्रमाणे वकीली सोडली होती. तथापि महात्मा गांधींच्या अनुज्ञेने दारूच्या दुकानावर पिकेटिंग करणाऱ्या स्वयंसेवकांचा कोर्टांत बचाव ते करीत असत. कॉलेजें व कौन्सिलें यांचा बहिष्कार, कांही काळ, थोड्या बहुत प्रमाणांत जसा यशस्वी झाला तसा

कोर्टावरील बहिष्कार यशस्वी झाला नाही. कारण खाजगी पंचायतीकडे लोक, भांडणें नेईनात.

ही चळवळ चालू असतां ड्युक आफ कॅनॉट व नंतर प्रिन्स ऑफ वेल्स यांना हिंदुस्थानांत आणण्यांत आले, त्यांच्या स्वागतावर सर्वत्र कडकडीत बहिष्कार पडला. कलकत्त्यांत युवराजाच्या स्वागतावर बहिष्कार पडूं नये म्हणून लॉर्ड रीडिंग साहेबांनी देशबंधु दास यांच्याशीं बोलणें सुरू केलें. प्रांतिक स्वायत्तता तावडतोब देण्याचा करार दोघांत झाला व तो महात्मा गांधींना कळविण्यांत आला. पण मौ. महम्मद अली व मौ. शौकत अली यांच्या सुटकेची अट महात्मा गांधींनी घातल्यामुळे ही तडजोड मोडली व 'हातची शिकार गेली.' ही नवीन महत्वाची माहिती या प्रकरणांत भाऊजींनी दिली आहे.

पुढे १९२२ चा बार्डोलीचा संकल्पित सामुदायिक सत्याग्रह चौरी-चुऱ्याच्या दंग्यामुळे महात्मा गांधींनी एकाएकी रहित केला. स्वतः त्यांच्या-वर खटला होऊन ते तुरुंगांत गेले. त्यामुळे असहकारितेची चळवळ थंडाव-लेली पाहून बॅरिस्टर दास व नेहरू यांनीं स्वराज्यपक्ष काढला. नागपूरची राष्ट्रीय पक्षाची बॅरिस्टर अभ्यंकर, डॉ. खरे, डॉ. मुंजे, बॅरिस्टर भाऊजी देशमुख, डॉ. परांजपे, डॉ. चोळकर ही सर्व मंडळी या पक्षाला मिळाली. कौन्सिलवर बहिष्कार न घालतां, तेथे निवडून जाऊन सरकारी कामाला विरोध करण्याचा उद्देश स्वराज्य पक्षाने जाहीर केला व या प्रांतांतील कौन्सिलमध्ये त्या पक्षाच उम्मेदवार बहुसंख्येने निवडून आले. पण त्यामुळे एक नवीनच अडचण उत्पन्न झाली. लोकहितकारक अशा योजनांना सुद्धा विरोध करणें, पक्षाच्या धोरणामुळे अवश्य झालें. त्यामुळे सरकारला ब्राह्मण, ब्राह्मणेतर वाद उत्पन्न करणें शक्य झालें व खुद्द पक्षांतहि या सरकार विरोधाच्या धोरणाबद्दल मतभेद उत्पन्न होऊन प्रतिसहकार पक्ष निर्माण झाला. डॉ. मुंजे यांनी स्वराज्य पक्षाचा व कौन्सिलमधील जागेचा राजी-नामा दिला. भाऊजींनी राजीनामा दिला नाही पण कौन्सिलाची तीन वर्षांची मुदत संपल्यानंतर, स्वराज्य पक्षाचें लोकहितकारक बिलांनाहि विरोध करण्याचें धोरण योग्य नाहीं असें जाहीर रीतीने प्रतिपादन करून

१९२६ च्या निवडणुकीमध्ये ते प्रांतिक कौन्सिलाकरितां प्रतिसहकार पक्षातर्फे उभे राहिले पण निवडून येऊं शकले नाहीत. मध्यवर्ती असेंब्लित बॅ. अभ्यंकराचा पराभव करून डॉ मुंजे निवडून आले.

मध्यंतरीच्या काळांत कौन्सिल बहिष्कारवादी कट्टर मंडळींनी नागपुरांत झेंडा-सत्याग्रह केला, व कौन्सिलांतील लोकांच्या सहाय्यामुळे तो यशस्वी झाला. स्वराज्य पक्षाच्या इतिहासांत गाजलेलें तांबे प्रकरण याच काळांत झालें. श्री. काकासाहेब तांबे यांनी होम मेम्बरची जागा स्वीकारल्यामुळे त्यांचा निषेध करण्याकरितां टिळक विद्यालयांत प्रांतांतील स्वराज्य पक्षियांची सभा झाली. तींत पं. मोतीलाल नेहरूंचें सुप्रसिद्ध भाषण झालें. "तांबे का तो सुन्ना हुआ लेकिन सुन्ना हो गया खाक" हें त्यांचें वाक्य पुढे अनेक वर्षे लोकांच्या स्मृतींत राहिलें. बॅ. अभ्यंकर यांनी निषेधाचा ठराव मांडला व बॅ. राव यांनी त्याला दुजोरा दिला. पुढें बॅ. राव यांनी कांही वर्षानंतर श्री. तांबे यांच्या प्रमाणेच होम मेम्बर व कांही काळ गवर्नर पदाचाही उपभोग घेतला हें प्रसिद्धच आहे. यालाच राजकारण म्हणतात !!

टिळक विद्यालयांतील या ऐतिहासिक सभेचे अध्यक्ष भाऊजी असल्यामुळे या प्रसंगाचें त्यांनी केलेलें वर्णन वाचनीय व मनोरंजक झालें आहे.

डॉ. चोळकर हे नगर कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष असून प्रतिसहकार पक्षाचे चिटणीस झाले म्हणून त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव आणण्याकरितां टाऊन हॉलमध्ये भरलेल्या सभेंत जी दंगल झाली तिचे वर्णनही गमतीदार आहे.

१९२७--२८ मध्ये सरदार पटेल यांच्या नेतृत्वाखाली बार्डोलीची सुप्रसिद्ध करबंदीची चळवळ झाली. या चळवळींत जप्तीचें सामान लपवून ठेवण्यांत येत असल्यामुळे साधनांच्या शुचितेपेक्षा साध्याच्या शुचितेकडे अधिक लक्ष कसें दिलें गेलें तें भाऊजींनी दाखविलें आहे व १९३१ च्या मीठ व जंगल सत्याग्रहानंतर १९३५ सालीं कौन्सिल प्रवेशाबाबत स्वराज्यपक्षाला मान्यता देऊन काँग्रेस शेवटीं टिळकांच्या धोरणावर कशी आली तें सयुक्तिक रीतीने त्यांनी पटवून दिलें आहे.

या पंधरा वर्षांच्या राजकारणांत, भाऊजींचीं भूमिका बुद्धिवादी प्रामाणिक राजकारणी पुरुषाची होती. राष्ट्रीय मंडळाच्या आदेशानुसार वकीली सोडून असहकारितेच्या आंदोलनांत ते सामील झाले. कौन्सिलवरील बहिष्कार निरर्थक आहे असें आढळून आल्यावर ते बॅ. अभ्यंकराबरोबर दास नेहरूंच्या स्वराज्य पक्षांत गेले. त्या पक्षाचें बहुमत असलेल्या कौन्सिलांतही लोकहितकारक बिलांना विरोध करणें अनिष्ट आहे असें त्यांच्या विवेकी बुद्धीला जेव्हा वाटलें तेव्हा ते प्रतिसहकार पक्षाला मिळाले. बॅ. अभ्यंकर त्यांचे प्रिय मित्र होते. पण हें मित्रत्व भाऊजींना आपल्या बुद्धीला पटलेल्या कर्तव्याच्या आड येऊं दिलें नाही. पुढे "मिळेल तें घेऊन अधिक मिळविण्याकरितां लढा" या टिळकांच्या राजकीय धोरणांतील पहिलाच भाग प्रतिसहकार पक्षाने स्वीकारला व दुसऱ्या भागाकडे दुर्लक्ष केलें असें जेव्हा त्याना आढळले तेव्हा हा पक्षही त्यांनी सोडून दिला. कारण आंधळ्या पक्षनिष्ठेपेक्षा बुद्धीशी प्रतारणा न करणारी सत्यनिष्ठा त्यांना अधिक प्रिय होती.

या पंधरा वर्षांतील राजकारणापेक्षाहि या काळांत भाऊजींनी केलेलें विधायक कार्य फार महत्त्वाचें आहे. भावनावश होऊन कांहीतरी तात्पुरतें भडक काम करण्यापेक्षा, सूक्ष्म बुद्धीने समाजांतील दोषांचें व उणीवांचें निरीक्षण करून त्या नाहीशा करण्याकरितां शांतपणें विधायक कार्य करण्याकडेच त्यांची प्रवृत्ती आहे असें स्पष्ट दिसतें. आपला समाज दुबळा व असंघटित आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आल्यानंतर या दिशेने विधायक कार्य करण्यास त्यांनी प्रारंभ केला. असहकारितेची चळवळ मंदावल्यानंतर, त्यांनी जस्टिस बोस यांच्या बॉयस्काऊटच्या चळवळींत भाग घेतला. पण बॉयस्काऊटची शपथ व ध्वज बदलण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी न झाल्यामुळे या चळवळीशीं संबंध त्यांनी सोडला. लहानपणी स्वतः आखाडा पिसून कुस्ती, लाठी, काठी इत्यादि आत्मसंरक्षणाचीं साधनें त्यांनी आत्मसात केली होती. या व्यायामाचा प्रसार सुशिक्षितांमध्ये व्हावा म्हणून काढलेल्या नागपूर व्यायामशाळेचे ते अध्यक्ष होते. अनेक आखाड्यांत लहानपणी कुस्त्या खेळल्यामुळे पेहलवान मंडळींची व सर्व आखाड्यांची संघटना करावी व त्यांच्या आपआपसांत होणाऱ्या मारामाऱ्या बंद कराव्या म्हणून उदारामजी पेहलवान

यांच्या मदतीनें त्यांनी टाऊनहॉलमध्यें एक सभा बोलावली व 'सद्वर्तनाने वागून पहिलवानांनी आपल्या कलेचा सुशिक्षितांत प्रसार केला आणि आपली शक्ति देशकार्यांत लाविली तर त्यांचा दर्जा वाढेल' असें त्यांना सांगितलें. त्यानंतर मध्यप्रांत वऱ्हाड प्रांतिक खेळांचे सामने मोठ्या प्रमाणावर नागपुरास त्यांनी घडवून आणले. व त्यांवर लेख लिहून "आपला धर्म, आपले देशबांधव व त्यांची मालमत्ता यांच्या रक्षणार्थ प्रांतांतील तरुण माणसें प्रसंग पडेल तेव्हा लढण्यास तयार झालीं तर नागपूर-वऱ्हाडांतील मर्दानी सामने सुरू झाल्याचें सार्थक होईल" असा, हे सामने घडवून आणण्यांतील आपला हेतु स्पष्ट केला. कारण हिंदु समाजाने आत्मरक्षणार्थ संघटित व सिद्ध व्हावे अशी स्फोटक परिस्थिति त्यावेळीं निर्माण होऊं लागली होती.

या देशांतील मुसलमान समाज अल्पसंख्य असला तरी आक्रमक, धर्मवेडा, संघटित व संधिसाधु असा आहे. या समाजाला आपल्याकडे वळवून घेण्याकरितां, ब्रिटिश राज्यकर्ते व कॉंग्रेस यांच्यांत जी शर्यत चालू झाली तिच्यांतून शेवटीं पाकिस्तान निर्माण झालें. हिंदुसमाजाच्या अनेक शतकांच्या सनातनी, प्रगतिपराङ्मुख, विस्कळीत आणि उदारपणाखाली झाकलेल्या बावळट वृत्तीमुळेच या देशांतील मुसलमान समाजाचा प्रश्न उत्पन्न झाला व तो आजपर्यंत त्यांना सोडवितां आला नाही. असहकारितेच्या चळवळींत मुसलमानांना आपल्याकडे वळविण्याकरितां या देशाबाहेरील खिलापतीची या देशाच्या स्वराज्याशीं सांगड घालण्यांत आली. त्यामुळे हिंदुमुसलमानाचा प्रश्न सुटण्याऐवजीं अधिक कठिण झाला. हिंदूपेक्षा आपण वेगळे आहों ही भावना त्यांच्यांत अधिक तीव्र झाली व आपल्या मदतीकरितां हिंदू आपल्या दाढ्या धरीत आहेत हे पाहून ते शेफारून गेले. नागपुरांत एका नवीन बांधलेल्या मशिदीवरून गणपतीची सवाय मिरवणूक नेतां कामा नये असा आग्रह १९२३ सालीं मुसलमानांनीं धरिला. प्रकरण कोर्टांत गेलें. तेव्हा हिंदूतर्फे भाऊजी व ज्यांचा गणपती होता त्यांच्या तर्फेचा आणखी एक गृहस्थ एवढेच हजर होते. बाकीच्या मोहल्यांतील गणपति ज्यांचे होते त्यांना या मोहल्यांतील गणपतीची काय पर्वा ? मुसलमान मात्र शेकडो लोकांच्या जमावाने डी. सी. कडे गेले व शेवटीं शांतता भंग होईल म्हणून निकाल मुसलमानांच्या

बाजूने दिला गेला. पुढे मारोतीच्या देवळांतील काकड आरतीही बंद केली पाहिजे असा मुसलमानांनी आग्रह धरिला. डॉ. मुंजे हे त्या वेळीं कॉंग्रेस कमिटीचे व खिलापत स्वराज्य पार्टीचे सेक्रेटरी असल्यामुळे, काकड आरतीच्या वेळीं निदान 'टाळ' तरी वाजवूं द्या अशी त्यांनी मुसलमानांची विनवणी केली. तिचाही उपयोग झाला नाही. शेवटीं हिंदूंनी सत्याग्रह केला. व दिंडी वाजत नेली. मुसलमानांच्या या धोरणामुळे त्यांच्यावर हिंदूनी बहिष्कार टाकला. तो न मानणारे कांही सुशिक्षित हिंदु निघालेच. शेवटीं व्यापारी लोकांचें विशेषतः हुंडीचा व्यवहार करणाऱ्यांचें नुकसान होऊं लागल्यामुळे हा बहिष्कार उठविला गेला.

या परिस्थितींत हिंदूंना संघटित करण्याकरितां १९२३ सालीं डॉ. मुंजे यांनी हिंदुसभेची स्थापना केली व भाऊजी देशमुख, डॉ. परांजपे वगैरे पुढारी तिचे सभासद झाले. हिंदूंना संघटित करून आत्मसंरक्षणक्षम बनविणें म्हणजे देशद्रोह ही विचित्र कल्पना त्यावेळीं कांग्रेसमध्ये रूढ झाली नव्हती. त्यामुळें कांग्रेसचे सभासद राहूनही हिंदुसभेचें कार्य करतां येत असे. हिंदु-सभेची स्थापना झाल्यावर मुसलमानांनी देवळांत मांस टाकणें, मारामाऱ्या व दंगे सुरू केले. म्हणून हिंदू स्वयंसेवकांची संघटना तयार करून त्यांची छावणी उदारामजी पहेलवान यांजकडे ठेवण्यांत आली. या स्वयंसेवकांचे कप्तान भाऊजी देशमुख होते. कोर्टांत त्यांच्यावरील खटले चालविणाऱ्या संरक्षण समितीचेही तेच अध्यक्ष होते. यावरून त्या कठीण परिस्थितींत भाऊजींनी केलेल्या कार्याचें महत्व लक्षांत येईल. या प्रसंगीं संरक्षणाचें कार्य, व्यायाम शाळा व आखाडेवाल्यांनी केलें पण प्रत्येक मोहोल्याने आपल्या रक्षणाची व्यवस्था या नंतर केली पाहिजे असें भाऊजींनी सांगितलें. डॉ. हेडगेवार यांनी हिंदुसमाजाची एकंदर दुरवस्था पाहून १९२५ मध्ये रा. स्व. संघाची स्थापना केली. मुसलमानांनी १९२७ मध्ये पुनः दंगा करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीं संघटित झालेल्या हिंदूंनी त्यांना अशी अद्दल घडविली कीं त्यानंतर नागपुरांत पुनः हिंदुमुसलमानांचा दंगा झाला नाही. या सर्व घटनांच्या सविस्तर वर्णनामुळे 'नागपूर हिंदुसभा' हें प्रदीर्घ प्रकरण अत्यंत वाचनीय झालें आहे.

'लोहपुरुष' या प्रकरणांत डॉ. हेडगेवार व त्यांनी स्थापन केलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचें वर्णन केलें आहे. तें वाचलें म्हणजे डॉ. हेडगेवार यांना दिलेली 'लोहपुरुष' ही पदवी व संघाला दिलेली वटवृक्षाची उपमा अगदी सार्थ वाटतात. बॅ. भाऊजी देशमुख व डॉ. हेडगेवार यांच्या वृत्तींत बरेंच साम्य आहे. इंग्लंडमध्ये असतांना भाऊजींची, सेनापति बापट यांना बॅ. सावरकरांशीं ओळख करून दिली होती. डॉ. हेडगेवार कलकत्त्यांत असतांना त्यांच्याही तेथील क्रांतिकारकांशीं ओळखी झाल्या होत्या. त्या वेळीं तेथे शिकत असलेले श्री दामुअण्णा देशमुख हे क्रांतिकारकांना द्रव्य सहाय्यही करीत. पण हिंदुसमाजाच्या उद्धाराचें कार्य क्रांतीने होण्यासारखें नसून त्या करितां सतत, शांतपणें विधायक कार्य करण्याची आवश्यकता आहे असें भाऊजी प्रमाणेच डॉ. हेडगेवार यांनाही पटलें असावें. त्यामुळे 'लोहपुरुष' हें प्रकरण भाऊजींनी विशेष आत्मीयतेने लिहून संघावरील अनेक आक्षेपांचें खंडन केलें आहे व कांही उपयुक्त सूचनाहि केल्या आहेत

हिंदुसमाजाच्या उद्धाराकरितां डॉ. हेडगेवार यांनी आपल्या जीवनाचा अक्षरशः यज्ञ केला. स्वतः आजन्म ब्रह्मचारी राहून, रा. स्व. संघाची स्थापना करून त्याचा प्रसार करण्याकरितां आयुष्याचा क्षण नि क्षण त्यांनी बुद्धया वेचला. त्यांचें लोकसंग्रहाचें कौशल्य अपूर्व होतें. संघाचा प्रसार होण्यांत अडचणी येऊं नयेत म्हणून संघ ही संस्था त्यांनी पक्षातीत व राजकारणापासून अलिप्त ठेवली आणि 'सर्वेषाम अविरोधेन', काम केलें. त्यांनी स्वतः कांग्रेसच्या चळवळींत तुरुंगवास केला होता. हिंदुसभेमध्येही ते भाग घेत. पण संघ ही संस्था या दोन्ही पक्षापासून त्यांनी अलिप्त ठेविली होती. त्यांत त्यांचें दूरदर्शित्व आणि विधायक कार्य करण्याची तळमळ दिसून येते. संपूर्ण हिंदु समाजाची पायाशुद्ध संघटना करणाऱ्या संस्थेने त्या समाजांतील जातिभेद व पक्षभेद यांच्यापासून अलिप्त राहणें अवश्यच होतें. डॉ. हेडगेवारांचें हें धोरण कायम ठेवण्याची महत्वाची सूचना भाऊजींनी केली आहे.

आपल्या त्यागाने आणि तळमळीने सर्वांचीं मनें ओढून घेणारे डॉ. हेडगेवार आतां गेले असले तरी 'प्रदीपितो दीप इव प्रदीपात्' या न्यायाने

आजन्म ब्रह्मचारी राहून संघाचे कार्य करणारे, निर्व्यसनी, प्रसिद्धिपराङ्मुख, बुद्धिमान, चारित्र्यसंपन्न व त्यागी असे शेकडो तरुण त्यांनी निर्माण केले आहेत. अत्यंत निराशामय परिस्थितींत शांतपणें सर्व भरत--खंडांत संघाचें कार्य अखंडपणें करीत असणारे हे तरुण भारतमातेच्या कंठांतील अमूल्य रत्नें आहेत. सत्ता, संपत्ति आणि प्रसिद्धि यांवर पाणी सोडून हिंदु जातीची सेवा करणाऱ्या या तरुणांचा उपयोग करून घेण्याऐवजीं, नसत्या संशयाने या देशांतील सत्ताधाऱ्यांनी त्यांच्याकडे पाहावें ही दुर्दैवाची गोष्ट होय. हिंदु जातीच्या उद्धाराच्या या कार्याला बहुसंख्य हिंदूकडूनच विरोध व्हावा या पेक्षा अधिक मोठे दैवदुर्विलसित कोणतें असणार ? ' ज्याचें करावयाला जावें, बरें तो म्हणतो माझेंच खरें ' अशी परिस्थिति या विषयी सांप्रत निर्माण झाली आहे.

हिंदुसमाजाचे दोष भाऊजींनी स्पष्टपणें सांगितले आहेत व उपाय योजनाही सुचविल्या आहेत. हिंदुसमाज हा अत्यंत फुटीर वृत्तीचा समाज आहे. नाना जाति, पक्ष, पंथ, संप्रदाय यांनी तो सहस्रधा विभागला गेला आहे. याकरितां जातिभेद नष्ट करून, पोट जातीमध्ये विवाह त्वरीत झाले पाहिजेत. अस्पृश्यतेमुळे परधर्मांत लोक जातात. ती नष्ट केली पाहिजे. परधर्मातील लोक शुद्ध करून परत स्वधर्मांत घेतले पाहिजेत. अनाथालयें काढलीं पाहिजेत. विधवाश्रम स्थापन केले पाहिजेत. स्त्रियांना वारसा हक्क दिले गेले पाहिजेत. त्याचप्रमाणे पुनर्विवाह आणि प्रौढविवाह सुरू झाले पाहिजेत. सुशिक्षितांनी अशिक्षितांत मिसळलें पाहिजे. हिंदु समाजाला आत्मसंरक्षणक्षम बनविलें पाहिजे व त्या करितां आखाडे, व्यायाम शाळा सर्वत्र निघाल्या पाहिजेत. प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेंत शारीरिक शिक्षण आवश्यक केलें पाहिजे आणि लष्करी शिक्षण जितक्या अधिक लोकांना घेतां येईल तितक्यांनी घेतलें पाहिजे. कारण शक्तिनें मिळतीं राज्यें। युक्तिनें यत्न होतसे। शक्ति युक्ति जये ठायीं। तेथें श्रीमंत धावती॥ या रामदासी सिद्धान्तावर भाऊजींचा विश्वास आहे. म्हणून चरख्यापेक्षा सुदर्शन चक्रावर त्यांचें अधिक प्रेम आहे. "शांतीच्या उपदेशाच्या बळावर या जगांतील सर्वच धकाधकीचा मामला जिंकूं अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. कारण असें कोणी

ना पाहिलें ना ऐकिलें!" पहिल्या करंडकांतच भाऊजींनी हे मार्मिक उद्गार काढले आहेत. राष्ट्राची इभ्रत लढाऊ वृत्तीमुळे वाढते असें त्यांचें निश्चित मत आहे. "वाटाघाटीच्या सर्व गोष्टी सामोपचाराने मिटतील अशी आशा करणें म्हणजे मृगजळाच्या पाठीमागे लागणें आहे." "राज्यशकट चालविणें निव्वळ शांति-पाठाने व सामोपचाराने तर अगदींच अशक्य." ज्याला राज्य करावयाचें आहे त्याला शक्तीचा उपयोग करणें अवश्य आहे. अर्थात शक्तीचा उपयोग चांगल्याच कामाकरितां केला पाहिजे" हे त्यांचे आवडते सिद्धान्त या करंड-कांतही त्यांनी सांगितले आहेत.

हिंसा अहिंसेविषयीं मार्मिक चर्चा, खेड्यांतील लोकांनी एका बकरी खाणाऱ्या अजगराला प्रथम जिवंत सोडला व नंतर मारला त्या प्रसगाने केली आहे. खेडुतांनी आपआपसांत केलेली या विषयींची चर्चा त्यांच्याच भाषेंत दिल्यामुळे चटकदार झाली आहे.

एकाला मारण्याने अनेकांचे जीव जेथे वाचत असतील तेथे हिंसेतूनच अहिंसा कशी निर्माण होते याचें सयुक्तिक विवेचन भाऊजींनी केलें आहे. किंबहुना 'प्रथम दुष्टाचा संहार केल्यावांचून साधूंचें रक्षण करतांच येणार नाही' असें त्यांचें ठाम मत आहे.

आपल्या वेदान्ताचें यथार्थ स्वरुप भाऊजींनी आकलन केलें असल्यामुळे 'या वेदान्ताने लोकांना नेभळें बनविलें' हें म्हणणें त्यांना मान्य नाही. "आपल्या तत्वज्ञानाची शिकवण आत्मयज्ञाची--ऐहिक सुखाचा सन्यास करण्याची आहे. 'त्याचा परिणाम असा झाला पाहिजे की लोकांत त्यागवृत्ति उत्पन्न होऊन, समाजाच्या सेवेसाठी लोकसंग्रह करण्याची स्फूर्ति त्याना झाली पाहिजे. पण हिंदुतत्वज्ञानाची ही उज्वल शिकवण कुठे आणि त्याचा वारसदार जो हिंदुसमाज त्याची स्वार्थलोलुप हीन मनोवृत्ति कुठे" अशा स्पष्ट शद्बांनी, आपल्या नादानपणाचें खापर वेदान्तावर फोडणाऱ्या लोकांना, भाऊजींनी चोख उत्तर दिलें आहे. आपल्या वेदान्ताकडे पाहण्याची भाऊजींची ही विशुद्ध शास्त्रीय दृष्टि निःसंशय अभिनंदनीय आहे. कारण आधुनिक सुशिक्षितांत ती क्वचितच आढळते.

हिंदुमधील साहसाची–धाडसाची वृत्ति नष्ट झाली याचें कारण मांसाशनचा अभाव असें कित्येक म्हणतात तेंही भाऊजीना मान्य नाही. मांसाहारी लोकांपैकी बहुतेक लोक, बंदुकीचा पहिला बार निघतांच पळ काढण्याइतके शूर असतात. उलट मांसाहार न करणाऱ्या लोकांत शौर्याने झुंजणारे निपजूं शकतात. साहसाचा अभाव हा मनाचा रोग आहे. शरीराचा नव्हे. पारतंत्र्यामुळे तो उत्पन्न होऊन वाढला. जिवावर उदार होऊन साहसाची व धाडसाची कामें करण्याची वृत्ति निर्माण व्हावी म्हणून ब्रह्मचर्याश्रमाचें आणि देशसेवाकरितां यावी म्हणून सन्यासाश्रमाचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे असें भाऊजींचें मत आहे.

आपल्या समाजाची आर्थिक स्थिति सुधारावी म्हणून स्वदेशी उद्योगधंदे निघून भरभराटीस येणें अवश्य असल्यामुळे स्वदेशी मालाचीं मोठमोठीं प्रदर्शनें भाऊजींनी भरविलीं आणि शेतकरी परिषदांच्या अध्यक्षस्थानावरून शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी भाषणेंही केलीं. पण त्यांच्या राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतील कार्यापेक्षा "एखाद्या किल्ल्याच्या तटाला भगदाडें पडावीं" अशी स्थिती झालेल्या हिंदुसमाजाच्या उन्नतिकरितां त्यांनी जें विधायक कार्य केलें त्याचा ठसा वाचकाच्या मनावर अधिक उमटेल असें वाटते.

या करंडकांतील "मी" हें शेवटचें प्रकरण जितकें मनोरंजक तितकेंच उद्बोधक झालें आहे. एका संपन्न घराण्यांत जन्माला येऊनही, चारही देशमुख बंधु, मनाने उदार, सुविद्य, सुसंस्कृत, प्रेमळ आणि देशहितेच्छु झाले व त्यांतील गोविंद–गोपाळाच्या जोडीने तर परदेशांत विद्या संपादन करून देशाच्या राजकारणांत भाग घेतला. याला कोणतें कौटुंबिक आणि शालेय शिक्षण कारणीभूत झालें असेल ही वाचकांची जिज्ञासा या प्रकरणामुळे पूर्ण होते. जुन्या कुटुंब पद्धतीच्या रमणीय पार्श्वभूमिवर, करारी, प्रेमळ आणि निष्ठावान व्यक्ति वावरताना या प्रकरणांत आढळतात. देशमुख बंधूंचें चुलते दादाजी, वडील तात्याजी, मातुःश्री दादीबाई आणि शिक्षक श्री. पंधे व कै. केशवराव जोशी या सर्वांचा हातभार देशमुख बंधूंच्या मनाच्या व बुद्धीच्या घडणास लागलेला आहे. या सर्वांचीं व्यक्तिचित्रें भाऊजींनी सहजासहजी, परंतु हुबेहुब वर्णिलीं आहेत. दादाजी वृत्तीने धर्मशील, शांत, उदार व आतिथ्यशील होते. गजानन हें त्यांचें आराध्य दैवत होतें. मध्यान्हसंध्येच्या

१०१४८ अनुक्रम ... ५ ... ८६५ २५।१२।४

वेळीं ते स्वतः त्याची पूजा करीत. गणपत्युत्सव दहा दिवस चाले. वाढोण्याच्या देशमुखांच्या कुलाला विद्येचें जें वरदान मिळालें आहे व पुढील पिढींतील मुलें-मुलीही सुविद्य आणि सुसंस्कृत झाली आहेत यांचें कारण दादाजींची ही गजाननाची उपासना असेल काय ? असें भाविकाला क्षणभर वाटल्यावांचून राहणार नाही. दादाजी मनाने अत्यंत दयाळू असत. निरूपद्रवी प्राण्यांची हिंसा त्यांना आवडत नसे एवढेंच नव्हे तर बैलांना तुतारीने टोचणेंही त्यांना पसंत नसे. भाऊजींना दांडलांनी एकदां हट्ट केल्याबद्दल खूप मार दिल्याचें त्यांना कळलें. तेव्हा पोराला मारल्यामुळे त्यांनी तात्याजींशी असहकार पुकारला. मुलांना मारणार नाही असें तात्याजींनी कबूल केल्यावरच तो संपला. तात्याजी वृत्तीने जरा कडक असत. मुलांना त्यांचा फार धाक असे व त्याचाही मुलांना वळण लावण्याचे कामी फार उपयोग झालेला दिसतो. म्हणूनच "धाक बडी चीज है" असें भाऊजींनी म्हटलें आहे. तात्याजी राष्ट्रीय सभेला नियमाने जात. देशभक्तीचें बाळकडू तात्याजींनी मुलांना दिलें. मातुःश्री दादीबाई प्रेमळपणाची मूर्ति होती. आपल्या मुलाप्रमाणेच मुलांच्या मित्रांनाही दादीबाई व तात्याजी मायेने वागवीत. मित्रांना शक्य तितकें साहाय्य करण्याची वृत्ति मातापित्यांकडून मुलांमध्ये आलेली आहे. तात्याजींनी पेरलेलें मुलांच्या मनातील देशभक्तीचें बीज कै. केशवराव जोशी नील सिटीस्कूलचे हेडमास्तर यांनी वाढीला लावलें आणि वर्धेच्या श्री. पंधे हेडमास्तरांच्या ड्रीलने उत्पन्न झालेली शारिरिक शिक्षणाची आवड नागपुरांत शाळेबाहेर अखंड चालणाऱ्या मारामाऱ्यांनी वाढीला लागली. कै. बाबूराव परांजपे व कै. भय्याजी तांबडे हे भाऊजींचे मारपिटींतले साथी असत व एकदा मारपीट जमली की घरांतून लाठ्या वगैरे साहित्य पुरविण्याचें काम लहान दामुअण्णा हौसेने करीत. भाऊजी त्यांचे बंधु डॉ. गोपाळराव देशमुख, भय्याजी तांबडे, विश्वनाथराव नवाथे, कै. बाबूराव परांजपे व कै. बाळु भोंसले या सर्वांनाच कुस्ती, लाठी काठी येत असे. एका गाण्याला जात असतां झालेल्या मारामारीचें मजेदार वर्णन या खंडांत भाऊजींनी केलें आहे. तें सुरस वर्णन वाचून त्या वेळच्या मर्दानी वातावरणाची कल्पना येते. भाऊजी स्वतः उत्कृष्ट व्यायाम विशारद असल्यामुळे या व मागील करंडकांत व्यायाम विषयक परिभाषा भरपूर आली

आहे. 'कंदाच्या मानानें' 'मारपीट जमली' 'मुलामीची कुस्ती' 'मद व कस' 'तुटलेले पहेलवान तगडे होणार', 'एका लंगोटावर अनेक कुस्त्या खेळणें', 'हात मिळविणें' 'तडफ' 'डावाची हुलकावणा' 'गळ खोडा' 'पलटी खाणें' 'कीर बोलणें' 'पहेलवान कटला', 'गर्दनीवर कसून कसोटा मारला' 'पट्ट्याच घर' 'चौमुखा' 'बेली फेकी' इत्यादि कितीतरी वाक्प्रचार व शब्द या व मागील करंडकांत आले आहेत. हल्लीच्या पिढींतील किती सुशिक्षितांना ते समजतील याचीच शंका वाटते. भाषेंतून हे शब्द जात चालले आहेत. जीवनाच्या ज्या क्षेत्रांत लोक दरिद्री होतात त्या क्षेत्रांतील भाषाहि दरिद्री होते. याचें हें उदाहरण आहे.

भाऊजींच्या पुस्तकांतील सर्व वातावरण मर्दानी आणि लढाऊ आहे. आपल्या पूर्वजांनी, निजामाला पाणी पाजणाऱ्या खर्ड्याच्या लढाईंत पराक्रम गाजविला आहे ही स्मृति सदैव बाळगणारे देशमुख बंधु मर्दानी मराठी बाण्याचे देशभक्त व्हावे हें अगदी स्वाभाविक आहे. परदेशांतून आल्यावर गोविंद-गोपाळाची जोडी टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाला मिळाली याचेंही हेंच कारण आहे. या अनुवंशिक वृत्तीचा परिपोष करणारें शिक्षण सुदैवाने त्यांना मिळालें. लहानपणी त्यांच्या वाचनांत धनुर्धारी यांची 'जवान मर्द मराठे गडी' 'जवान मर्द ब्राह्मण भाई' हीं चरित्रें, आपटे यांच्या 'उष-काल', 'केवळ स्वराज्यासाठी, 'पण लक्षांत कोण घेतो' इत्यादि करमणुकींतून प्रसिद्ध होणाऱ्या ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्या आणि वैद्य यांची श्रीकृष्ण व श्री रामाचीं चरित्रें अशीं पुस्तकें आलीं ही गोष्टही महत्वाची आहे. कोणत्या वयांत मुलांच्या हातीं कोणतीं पुस्तकें यावीं हें यावरून लक्षांत येईल.

देशमुख बंधूंची मातृ-पितृ भक्ति आदरणीय आणि अनुकरणीय आहे. वडिलांच्या धाकांत व आईच्या प्रेमांत ते वाढले. दोघांबद्दल त्याना पराकाष्ठेचा आदर व प्रेम वाटे. असे आईबाप परमभाग्याने आपणास मिळाले ही जाणीव त्यांनी सदैव बाळगली. नागपुरास या मुलांच्या शिक्षणाकडे त्यांच्या आईनेच लक्ष दिलें ",आम्हा भावापैकी कोणीही आईची अवज्ञा केली नाही-तिने सांगितलेलें कोणतेंही काम करण्यांत अळंटळंपणा केला नाही" असें भाऊजींनी लिहिलें आहे. अलिकडील किती मुलें असें सांगूं शकतील ?

मातृपितृभक्तीप्रमाणेच देशमुख बंधूंची टिळक भक्ति पाहून वाचकाचे डोळे ओलावतात. टिळकांना १९०८ सालीं सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर तिच्या निषेधाची लंडनमध्ये जी सभा झाली त्या सभेंतील, प्रमुख वक्ते भाऊजी होते. नंतर प्रीव्ही कौन्सिलपुढे या शिक्षेवर अपील करण्याकरितां ना. खापर्डे लंडनला गेले. तेव्हांही भाऊजींनी त्यांना मदत केली. नागपुरास स्वराज्य संघाच्या दौऱ्यावर टिळक आले तेव्हा आजारी पडल्यामुळे त्यांच्या खोलीवर पहारा करण्याचेंही काम भाऊजींनी केलें. टिळक मुंबईस आले म्हणजे डॉ. गोपाळराव त्यांची 'डीडियां' मोटर टिळकांच्या दिमतीस असे. पुढे ही मोटर त्यांनी नागपुरास पाठविली कारण वडील आणि टिळक या मोटरमध्ये बसले असल्यामुळे ती विकावयाची नाही असें त्यांनी ठरविलें होते. दामुअण्णा तर टिळकांच्या मुंबईच्या मुक्कामांत व इतरत्रही टिळकांचे शरीर संरक्षकच असत. "टिळकांवर त्यांची पराकाष्टेची भक्ति सदा हंसतमुख असणारे दामुअण्णा. तर टिळकांबद्दल जर कोणी अद्वातद्वा बोललें तर नुसते गरमच होत नाहींत तर नृसिंहावतार धारण करतात" असें लो. ना. अणे यांनी लिहिलें आहे तें अगदी खरें आहे.

भाऊजींनी १९१० सालीं बॅरिस्टरी नागपूर येथे सुरू केली तेव्हा केवळ १० च वर्षांनंतर ती सोडावी लागणार आहे व आपल्या आयुष्याला कांही वेगळेंच वळण लागणार आहे अशी त्यांनाही कल्पना नसेल आणि आज गतायुष्याचें सिंहावलोकन करताना ते जरा चकितच होत असतील. बॅरिस्टरींत त्यांना भरपूर पैसे मिळे तथापि त्यांनी या बाबतींत केलेले तीन नियम त्यांच्या वृत्तीचें वैशिष्टय दाखवितात. १ राजद्रोहाचे खटले आणि २ खुनाचा आरोप आलेले गरीब मनुष्यांचे खटले फुकट चालविणें आणि ३ स्त्रियांविरुद्ध खटला कधीहि न घेणें हे ते तीन नियम होत. तिसरा नियम तर त्यांचे प्रियमित्र बॅ. अभ्यंकर यांच्या करितांहि त्यांनी मोडला नाही.

असहकारितेच्या चळवळींत बॅरिस्टरी सोडल्यानंतर प्राप्ति कमी झाल्यामुळे पूर्वीची नबाबी रहाणी त्यांना बदलावी लागली. तथापि त्यांत त्यांनी खेद मानला नाही. लाला लजपतराय, जोसेफ बॅप्टिस्टा, देशबंधु दास, मोतीलाल नेहरू, सर प्रफुल्लचंद्र रे, सुभाषचंद्र बोस वगैरे राष्ट्रीय पुढारी

नागपुरास त्यांच्याकडेच उतरत. त्यामुळे होणारी दगदग व खर्च त्यांनी आनंदाने सोसले.

इंग्लंडमध्ये राहूनही भाऊजींना कसलेंहि व्यसन नाही. सिगार, सिगारेटही ते पीत नाहीत. मग मद्याचें आणि इतर व्यसनांचें नांव कशाला? लोकसेवा हेंच त्यांचें व्यसन आहे. त्यांची सत्यप्रीति, मित्रप्रेम, निर्लोभिता, निर्व्यसनिता, निरलसता, व्यायामाविषयी आणि मर्दानी व मैदानी खेळांविषयी आवड, स्वार्थत्यागपूर्व शांतपणें विधायक लोकसेवा करण्याची प्रवृत्ति आणि हिंदुस्थान व हिंदुजाति पुनः शूर व वैभवसंपन्न झालेली पहावी अशी तळमळ, इत्यादि गुण--रत्नें या रत्नकरंडकांत वाचकांना आढळतील व आनंदित करतील. या रत्नमंजूषा वाचकांना उपलब्ध करून देऊन आपल्या तीन तपांच्या सार्वजनिक जीवनांतील अनुभव व त्यांच्या आधाराने परिपक्व झालेले आपले देशहितकारक सिद्धान्त, पुढील पिढ्यांच्या मार्गदर्शनाकरितां भाऊजींनी सांगितले आहेत. साठी उलटून गेल्यावरहि त्यांनी वाङ्मयरूपाने ही एक महत्वाची लोकसेवाच चालविली आहे. त्यांच्यासारख्या वयोवृद्ध देशभक्ताने लिहिलेल्या व अकृत्रिम भाषाशैलीमुळे सहज मनोहर झालेल्या आत्मवृत्ताच्या या दुसऱ्या करंडकाला प्रस्तावना लिहिणें हा मोठा मान आहे. तो दिल्याबद्दल भाऊजींचे आभार मानून व "हें पुस्तक प्रत्येक तरुण विद्यार्थ्याने व विद्यार्थिनीने एकदा अवश्य वाचावें. ज्याच्या योगाने तरुणांतील सुप्तसद्गुण जागृत होऊं शकतात व त्यांच्यांतील उदारवृत्ति उचंबळून येऊं शकतात असे प्रसंग या पुस्तकांत आहेत" हे लो. ना. अणे यांनी पहिल्या करंडकाच्या प्रस्तावनेंत काढलेले उद्गार याहि करंडकाविषयीं तितकेच सार्थ असल्यामुळे उधृत करून, ही लांबविलेली प्रस्तावना संपवितों.

एप्रिल १९५१
नागपूर

**शं. दा. पेंडसे**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्र.

# पुरस्कार

श्रीमान गोविंदराव उर्फ भाऊजी देशमुख यांनी लिहिलेले " **काल समुद्रांतील रत्नें** " खंड दुसरा साग्र मननपूर्वक वाचलें. प्रस्तुत पुस्तकांत वर्णन केलेल्या पुष्कळ किंवा बहुतेक प्रसंगांशीं व व्यक्तींशीं माझा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बराच संपर्क आल्यामुळे व कांही व्यक्तींशीं तर घनिष्ट संबंध आल्यामुळे व पुष्कळ प्रसंगीं व पुष्कळ काळ एकत्र काम केलें असल्याकारणाने हें पुस्तक वाचीत असतांना गतायुष्यांतून पुन्हा एकदा आपण प्रवास करीत आहों असें वाटलें. सर्व प्रसंगाचीं वर्णनें पाल्हाळ न लावतां थोडक्यात व हृदयस्पर्शी अशीं आहेत त्यामुळे पुस्तकास अवीट गोडी आली आहे व "दिल" खुलें करून लिहिलें असल्यामुळे केवळ औपचारिक परंपरेची अवास्तव जिल्हई कोठे आढळली नाही. थेट नागपुरी मायभाषा वापरली आहे व विचार प्रकट करतांना, शब्द निवडतांना व वाक्यें रचतांना जो मनाचा मोकळेपणा व ओघ साधला आहे त्यांत कोणाचेंहि अनुकरण नसून अनुकरणीय आहे. पुण्याच्या खोड्यांतून सरस्वतीला सोडवल्याचें भाऊजींनी पुण्य संपादिलें आहे व सारस्वताला एक सरळ साधें वळण लावल्याचें त्यांस श्रेय मिळेल असा भरंवसा वाटतो

भाऊजींचा व माझा संबंध फार दिवसांचा. त्यावरून मला दिसून आलें व वाटतें तें असें कीं भाऊजींच्या स्वयंस्फूर्त व कणखर देशाभिमानास व्यक्त होण्यास कांही काल कॉंग्रेसमध्ये अवसर मिळाला तरी ते जातिवंत "कॉंग्रेसमन" नाहीत. कॉंग्रेसमध्ये स्वतःस पचवून घेण्याचे त्यांनी मनापासून यत्न केले पण ते साधले नाहीत. त्यांना कॉंग्रेसच्या कार्यपद्धतीशीं कधी समरस होता आलें नाही व कॉंग्रेसला त्यांना पचवतां आले नाही. आपल्या देहांत "foreign body" अननुकूल द्रव्य गेलें म्हणजे तें जसे उभरतें त्याप्रमाणे ते कॉंग्रेसला उभरले व शेवटी बाहेर पडले. शेवटच्या "मी" प्रकरणांत त्यांनी दिलेली आपल्या जीवनक्रमाची चर्चा फार उद्बोधक आहे व तीमुळे माझ्यावरील विधानास पुष्टीच मिळेल.

तालमीचा "शौक" शरीर कमावण्याची हौस, मारामारीचा हव्यास दंडेलीचा आनंद, परकीय तेवढ्याचा द्वेष आणि टिळकांच्या राजकारणाचा मनांत मुरलेला अभिमान ह्या सर्वांची आणि "नॉनव्हायओलेन्स"ची संगती मारून मुटकून दबाव घालून कितीहि केली तरी ती किती टिकणार ? आणि उपास तापासांचे कार्यक्रम किती दिवस अशा स्वभावाला मानवणार ? भाऊजी सारख्या कणखर वृत्तीची व शुद्ध जीवनाची सचोटीचीं माणसें कॉंग्रेसला लाभली हें तिचें सुदैव असलें तरी कॉंग्रेस त्यांना आत्मसात करू शकली नाही हें तिचें दुर्दैव आहे व ते अनेक दिशांनी आज देशाला भोवत आहे.

जे दिवशीं लोकमान्य दिवंगत झाले त्याच दिवशीं नॉन कोऑपरेशन उद्घोषित झालें व गांधीजींचा तारा क्षितिजावर चमकला. हें जगप्रसिद्धच आहे. १९२० सप्टेंबरमध्ये कलकत्त्यास कसून विरोध झाला तरी नॉन को. चा ठराव कॉंग्रेसमध्ये पास झाला. त्याच सालीं डिसेंबरच्या वार्षिक बैठकींत तो कॉंग्रेसने खुंटा हलवून बळकट केला. १९२१ साल उजाडलें. विद्यार्थ्यांनी प्रचंड चळवळ केली. देशभर धुमाकूळ सुरू झाला. दे. बं. दास यांनी कलकत्ता पेटवला. हें चालू असतां गांधीजींनी मे महिन्यांत व्हाइसरॉय रीडिंग यांच्या सिमला येथे अनेक दिवस भेटी घेतल्या व गुपित खलबतांतून अली बंधूंच्या जाहीर माफीचा प्रसव झाला. त्याने देशास मोठा हादरा बसला. १९२१ सालच्या कौन्सिल निवडणुकीवर बहिष्कार पडला आणि इतरांचे काय सांगावें पण आमच्या प्रांतांत फगवा चांभार, दादू न्हावी जयखाला सईस अशी नररत्नांनी कौंसिलच्या जागा सुशोभित केल्या. "भूयिष्ठमासीदपुमेय कांतिः मयूरपृष्ठाश्रयिणा गुहेन" त्याच सालीं जुलईत टिळक फंडांत एक कोटीवर रुपये जमा झाल्याचें गांधीजींनी मुंबईस जाहीर केले. त्याच महिन्यांत इंग्लंडचा राजपुत्र हिंदुस्थानात येण्याचें जाहीर झालें व त्यायोगे बायकॉटला एक छान नवा विषय मिळाला. देशभर विचारांचे झंजावात वाहिले आणि भावनांच्या वादळाने उडवलेल्या धुळीने डोळे धुंद झाले असतां तशाहि अवस्थेंत चाललें आहे हें हितावह नाही असें कांही दूरद्रष्टयांस दिसले. कौंसिल बहिष्काराने देशाचें अहित झालें, विद्यार्थी बेलगाम झाले व कायदेभंग आपल्याच अंगावर मागेपुढे वार करील असें मोतीलाल नेहरू, दे. बं. दास, सरदार पटेल यांसारखे धुरीण

मुत्सद्दी बोलूं लागले. परिणाम असा झाला कीं कांग्रेसच्या कार्यप्रणालींत (प्रोग्रॅम) कांही फरक व फेरफार आवश्यक आहे काय याचा विचार करण्याकरता एक कमेटी नेमली व तिने १९२२ आक्टोबरमध्ये आपला अहवाल सादर केला. त्याचा इत्यर्थ असा होता कीं कौंसिलचा बहिष्कार व इतर बहिष्कार होते त्या पद्धताने चालवणें राष्ट्रास अपायकारक होईल. तथापि मुसलमानांच्या धर्मभावनांची जोपासना करण्याकरितां कौं. बायकॉट कायम ठेवावा."The most important objection against the entry into Councils is the ' Fatwa " which is taken to be quite sufficient for the rejection of any agreement to the Country." हा Khilafat Enquiry Committee च्या अहवालांतील उतारा आहे. Civil Disobedience Committee ने थोडा अधिक साविस्तर अहवाल केला. नॉनकोऑपरेशनचें गाडे फार खडखडत चालतें. असेंच ओढल्यास मोडेल. थोडें ऑगण हवें प्रोग्रॅम बदला असा त्याचा सारांश होता. हें रिपोर्ट प्रसिद्ध झाल्याबरोबर लगेच दे. बं. दास यांनी आपलें मत प्रसिद्ध केलें. ते म्हणाले--The persons who adorn the Council chambers are not the true representatives of the people. But-these Councils are still there--boycott the Councils more effectively from within. १९२३ साली सप्टेंबरमध्ये दिल्लीला अबुल कलाम आजाद याचे अध्यक्षतेखाली कॉंग्रेसचा जादा बैटक झाली. तेथे असा ठराव झाला कीं "---Such Congressmen as have no religious or other conscientious objection against entering the Legislature are at liberty to stand as candidates--" या नंतर १९२३ च्या प्रारंभा दे. बं. दास यांनी आपण नवी पार्टी काढणार असा जाहिरनामा काढला व त्याप्रमाणे त्यांनी हिंदुस्थानभर दौरे करून काम सुरू केलें. १९२३ अखेर ज्या निवडणुकी झाल्या त्यांत मी आणि भाऊजी नागपुर कौंसिलांत शिरलों. व १९२४ सालीं सी. पी. ने दिग्विजय जाहीर केला. सर्व प्रांतांमध्ये आमच्या प्रांतांत "कॉंग्रेसांतर्गत" स्वराज्यपार्टीच्या कौंसिलांत गेलेल्या सभासदांची संख्या अधिक होती. व " boycott from within" चा प्रयोग आमच्या प्रांतीं करण्याचें ठरलें. १९२४ सालीं जून मध्ये अहमदाबाद येथे जी ऑल इं. कॉं. कमेटीची सभा झाली त्यांत स्वराज्य

पार्टीला खो देण्याचा गांधीजींनी यत्न केला पण साश्रु नयनांनी त्यांना माघार घ्यावी लागली. त्याच सालीं ऑगस्टमध्ये कलकत्त्यास जी स्वराज्य-पार्टीची सभा झाली तिचा उत्साह अपूर्व होता. येथे दे. बं. दास यांनी आमच्या सी. पी. प्रांताचा आपल्या अध्यक्षीय भाषणांत फार अभिमानाने उल्लेख केला. पण या कथेचा धागा येथेच सोडला पाहिजे. स्वराज्य पार्टीची आवश्यकता गांधींच्या अव्यवहार्य कार्यक्रमामुळे कशी उत्पन्न झाली व ती अव्यवहार्यता काढून टाकण्याचा जो व्यवहार झाला तो निर्लेप न होता परिस्थितीकडे लक्ष देऊन कसा धरसोडीचा करावा लागला व शेवटीं आंगाला आला याचा इतिहास जसा मनोरंजक तसा बोधप्रदहि आहे पण तो एक ग्रंथ लिहून सांगावा लागेल. या प्रास्ताविक लेखांत तें शक्य नाही. येथे एवढेंच नमूद करून ठेवावेंसे वाटते की श्री बापुजी अणे, तपस्वी बाबासाहेब व माझ्या समजाप्रमाणें खुद्द डॉ. मुंजे हे या प्रयोगाच्या--निदान तो आमच्या प्रांतीं होण्याच्या विरुद्ध होते. परंतु या प्रयोगाच्या प्रारंभीं जो एक हृदयद्रावक प्रसंग घडला तो वाचकांस चिरस्मरणीय वाटेल असें वाटतें म्हणून सांगतों.

त्या काळीं राजकीय चळवळींचे व बैठकींचें भाऊजींचा सिव्हिल लाइन्स मधला बंगला हें माहेरघर होतें. १९२३ च्या निवडणुकींत आमच्या प्रांतीं स्वराज्य पार्टीस अभूतपूर्व यश मिळालें. १९२४ च्या जानेवारी १५ तारखेस नागपुरास प्रांतिक विधीमंडळाचें नव्या निवडणुकीचें पहिलें अधिवेशन बोलावल्या गेलें. आम्ही सर्वजण नागपुरास जमलों. "नॉन्कोऑपरेशन फ्रॉम विदिन्" यशस्वी करून दाखविण्याची सर्व हिंदुस्थानांत ही पहिली सुवर्णसंधि होती. तेव्हा मार्गदर्शनाकरितां दे. बं. चितरंजनदास--पार्टीचे जनक व नेते-आणि श्री मोतीलाल नेहरू तातडीनें नागपुरास आले. भाऊजींच्या बंगल्यांत सकाळीं सभा भरली. सभासदस्य होतेच पण तमाशगीरहि पुष्कळ जमले. गोष्ट काल घडल्यासारखी स्पष्ट व साग्र आठवते. मी दासबंधूंच्या जवळच बसलों होतों. एका मुकद्दम्यांत त्यांच्या समागमें बरेच दिवस काम केलें असल्यामुळे परिचय दाट झाला होता व त्याला स्नेहाचें स्वरूप आलें होते. त्यांच्या कुटुंबास मी काकीमा म्हणत असे. दासबाबूंनी मला म्हटलें तुमच्या काकीमाला मी सुखरूप येथे पोहोचल्याची तार करा. असें म्हणून त्यांनी खिशांतून एक पांच

रुपयांची नोट काढली व तारेचा खर्च म्हणून माझ्या समोर केली. पैशांची गरज नाही मी तार करतों असें म्हणून मी उठलों तेव्हा "बाबूजी" नी माझ्याकडे फार गंभीर खोल अर्थपूर्ण दृष्टीने पाहिलें व हळूच सावकाश म्हणाले "Even this is worth keeping." त्यांनी नोट खिशांत परत घातली व तें दृश्य पाहून मला गहिवर आला व डोळयां अश्रू आले ते लपवण्याकरिता मी घाईने निघून गेलों. त्यांच्या शद्बांचा अर्थ समजला. त्या शद्बांनी माझ्या काळजाचा ठाव पाहिला. दर-महा चाळीस हजार पन्नास हजार रुपये मिळवणारा महापुरुष-ज्याने आपल्या दातृत्वाने क्रांतिकारक बंगाल पोसला, ज्याच्या घरीं रोज दोनशें अडीचशें माणूस जेवीत असे व ज्याच्या दारापुढून कुणी कधी उपाशी गेला नाही, ज्याच्या घरीं अतृप्त याचक दिसला नाही आणि वाऱ्यावरच्या धुळीसारखा ज्याने पैसा विखुरला त्याला पांच रुपये वाचले म्हणून समाधानाचा-खेदाचा-उसासा टाकावा लागला. घरीं चिमणी रडली तर दाणा नाही अशी स्थिति आली. "नॉन्‌कोऑपरेशन्" ! त्यापायी बाबूजी मेले असें माझें निश्चित मत आहे. दास बाबू अधिक जगले असते तर नेताजी सुभाष प्रमाणे त्यांनी अतुल पराक्रम केला असता व देश उचलून धरला असता पण अंधारात छाया विरतात त्याप्रमाणे भूतकाळांत या आशा निमाल्या. देवास हेंच मंजूर होतें म्हणायचें व समाधान मानायचें !

भाऊजींना गांधीजींच्या उपासतापासाचें तंत्र कधी पटलें नाही अशी माझी समजूत आहे. या पुस्तकांतील मजकुरावरूनहि तसेंच वाटतें. उपास तापासांचा त्रागा करून दुसऱ्याला त्याच्या इच्छेविरुद्ध वागायला भाग पाडणें हें अहिंसेला धरून नाही, त्यांत हिंसा आहे हें गांधीजींनी राजकोट प्रकरणीं कबूल केलें. परंतु याच शस्त्राचा उपयोग करून त्यांनी "पूना पॅक्ट" घडवून आणला व बंगालचें अहित केलें व गांधीजींच्या आग्रहास बळी पडणारे भीमाचें अवसान आणणारे वीर जन्मभर पश्चातापाच्या गर्तेत बुडाले. पापपुण्याविषयींच्या व आत्मशुद्धीसंबंधाच्या धार्मिक कल्पना राजकारणांत आणून गांधीजींनी जो प्रयोग केला तो देशाच्या हिताच्या दृष्टीने यशस्वी ठरला नाही. नीतिदृष्ट्या वैय्यक्तिक धर्म राष्ट्राला लागूं करणें चुकीचें आहे असेंहि मला वाटतें. गांधीजींनी कोणकोणत्या निमित्ताने किती उपास केले व प्रत्येक वेळीं

त्याचे काय परिणाम झाले याचा क्रमवार इतिहास मनोरंजक व बोधप्रद होईल. पण तसा यत्न करण्याचें हें स्थल नाही. मला येथे एवढेंच म्हणावयाचें आहे कीं ग्रंथकर्त्यानें या संबंधीं व्यक्त केलेले विचार मला यथार्थ वाटतात व संमत आहेत.

गांधीजींनी येरवड्याच्या जेलमध्ये १९३२ सालीं सप्टेंबर २० तारखेस आमरण उपोषण सुरू केलें ते ६ दिवसानंतर २६ तारखेस अंबेडकरांचा प्रसिद्ध पूना पॅक्ट झाल्यानंतर सोडलें. त्यानंतर त्याच वर्षी डिसेंबरमध्ये रत्नागिरी तुरुंगांत प्राध्यापक पटवर्धनांना सरकार पायखाने साफ करण्यास परवानगी देईना म्हणून उपास सुरू केला पण सरकारचें करणें बरोबर आहे असें नंतर त्याचें मत झाल्यामुळे त्यांनी उपास सोडलाच पण पटवर्धनालाहि उपास सोडायला लावला. नंतर १९३३ सालीं हरिजनांच्या उद्धारार्थ व आत्मशुध्द्यर्थ २१ दिवसांचा उपास ८ मे रोजीं सुरू केला. आपल्या खेरीज दुसऱ्या कोणास हें उपासाचें तंत्र समजत नाही तेव्हा इतर कोणी उपास करूं नये असें जाहीर केलें व नॉनव्हायओलेंट नॉनकोऑपरेशनची चळवळ एक महिना बंद केली. तेच दिवशीं गांधीजींची येरवड्याच्या तुरुंगातून सुटका झाली व ते "पर्णकुटी" राजमहालांत येरवडा टेकडीवर रहायला गेले. हा उपास ता. २९ मेला ठरलेले २१ दिवस संपून आत्मशुद्धीचें व हरिजनांच्या उद्धारार्थ केलेलें प्रायश्चित्त संपल्यावर सोडण्यांत आला. या उपासांचें विगतवार वृत्तांत फार मनोरंजक आहेत. राजगोपालाचार्यांनी पाकिस्थानची मसलत करून त्याला गांधीजींची सम्मती येरवड्याच्या उपासांतच मिळवली. अफगाणीस्थानने हिंदुस्थानावर मोहीम करण्यास तारेने पूर्वी संमती दिलीच होती. ही तार गांधीजींच्या सहीनिशी महम्मद अलीने अनेकांस दाखविली हें सर्वश्रुतच आहे. निझामचें हिंदुस्थानवर स्वामित्व झालें तर त्याला मी सोळा आणे स्वराज्य म्हणेन ही गांधीजींची घोषणा जगजाहीर आहे. या सर्व गोष्टींना त्यांच्या मनोरचनेची कल्पना असल्यावाचून संगती लावतां येत नाही. पण ह्या घटना घटकाभर दृष्टीआड केल्या तरी देशाला स्वातंत्र्य उपासतापास व जेलखोरीमुळे आलें नाही हें आंधळ्यालाहि दिसण्यासारखें आहे. महायुद्धें झालीं नसतीं, दुसऱ्या महायुद्धाने ब्रिटिश साम्राज्य कर्जबाजारी व खिळखिळे झालें नसतें व

या मातृभूमीचे सुपुत्र नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सैन्याचें धुरीणत्व पत्करून हिंदुस्थानवर चढाई केली नसती तर नॉनव्हायवोलेन्सच्या गारठ्याने हिंदुस्थान थिजला असता व चेतनाहीन निर्जीव झाला असता. सीलोन व बर्माने कोणते उपासतांपासाचें पुण्य जोडलें म्हणून त्यांना स्वातंत्र्य मिळालें? ब्रिटांशाची जागतिक सत्ता शिथिल होऊन मोडकळीस आली असतां लंगड्या गायांनी शिंगें हलवलीं म्हणून स्वराज्य मिळालें नाही. नेताजीच्या तरवारीने व दर्यावर्दी लोकांच्या बंडाने स्वराज्याची कवाटें उघडलीं. मंत्रघोषाने व बिरुदवाक्यें ओरडल्याने नाही. कांही कॉंग्रेसचे कट्टर पक्षपाती आज हे कबूल करतात. पण हेच बोलल्याबद्दल आम्हीं हिंदुसभावादी शिव्यांचे धनी झालों. आज स्वराज्याची ही दुर्गती आहे कारण ज्यांनी ते मिळवलें नाही त्यांच्या तें हातीं सापडलें. ज्यांनी अंदमानाचें खडतर कष्ट भोगले, जे फासावर चढले, ज्यांनी छातीचा कोट करून बंदुकीच्या गोळ्या झेलल्या आणि ज्यांनी रणांगणावर धारातीर्थी देह वाहिले ते मागे पडले–विसरल्या गेले. त्यांचें स्मरण झालें म्हणजे "दुःखानि सद्बंधुवियोगजानि स्त्रोतस्सहस्त्रैरिव संप्लवन्ते" असे वाटतें. असो ज्यांनी हें घडवून आणलें त्यांचे तरी काय झालें? "ईदृशानां विपाकोऽपि जायसे परमाद्भुतः."

भाउजींच्या या पुस्तकात "नॅशनॅलिस्ट" पार्टीचा उल्लेख आला आहे. त्या संबंधीं चार शब्द लिहिणें अवश्य आहे कारण या पार्टीचा व माझा बराच निकटचा संबंध होता. मध्यप्रदेशाच्या विधानसभेंत मी अजमासे वीस वर्षें अव्याहत त्या सभेंतील "नॅशनॅलिस्ट" पार्टीचा अध्यक्ष होतों. एकच नांव घेतल्या गेलें हा योगायोग विलक्षण होता.

१९३२ सालीं कम्यूनल अवार्ड जाहीर झालें हें वर दिलेंच आहे. गांधीजींना इंग्लंडमध्ये राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या वेळीं जिनाच्या हट्टास साथ दिल्यामुळे व ब्रिटिश गव्हरमेंटने वरून साळसूदपणा दाखवून आतून मुसलमानांस उत्तेजन देऊन त्यांचा हक्कांच्या लीलावांत भाव वाढविल्यामुळे हें कम्यूनल अवॉर्ड आलें. आम्हांला आपसात एकजूट करता येत नाही तुम्ही निकाल द्याल तो या बाबतींत आम्ही मान्य करूं अशी मायनॉरिटी कमेटींतील गटागटांनी इंग्लंडच्या पंतप्रधानाला लेखी कबूली दिली. एवंगुणविशिष्ट अवॉर्ड आल्यावर हिंदुस्थानांत त्या संबंधीचा चोहिकडे वर्तमानपत्रांतून व

जनतेकडून तीव्र निषेध झाला. गांधीजींनी हें शांत मनानें व तीक्ष्ण डोळ्यांनी पाहिलें. अवॉर्ड न पतकरावें तर इंग्लंडमध्ये अप्रतिष्ठा होण्याचा फार संभव आणि पतकरावें तर येथे हा भयंकर जनक्षोभ. ह्या कात्रींतून सुटण्याची त्यांनी अशी नामी युक्ति काढली कीं अवॉर्ड स्वीकारूहि नये व त्यागूहि नये. आणि असा दुरंगी विचित्र ठराव गांधीजींच्या आहारीं जाऊन कॉंग्रेसने केला. मध्यंतर कॉंग्रेसमध्ये निवडणुकी नवीन घटनेप्रमाणे लढवाव्या कीं न लढवाव्या या संबंधीं कडाक्याचा देशभर वाद होऊन निवडणुकी लढवाव्या असें अखिल भारतीय कॉ. समितानें ठरवलें. गांधीजी विरुद्धच होते ते शेवटपर्यंत तसेच राहिले व हा कौंसिलें लढविण्याचा निर्णय त्यांच्या मनाविरुद्धच होता. ह्या हिसकाहिसकींत तो निर्णय रामायस्वस्थि रावणायस्वस्थि असा डौलदार दुटप्पी झाला. गांधीजी कौंसीलांत जाण्याच्या विरुद्ध राहिले कारण मुसलमान विरूद्ध होते व मुसलमान विरूद्ध होते कारण त्याच्या मौलवींनी "फतवा" काढला होता कीं कौंसिलांत जाणें हराम आहे. हा फतवा गांधीजींच्या कारवाईचें फळ होतें. मुसलमानांना राष्ट्रहितापेक्षा फतवा अधिक मान्य होता व गांधीजींना इतरांपेक्षा मुसलमान अधिक धार्जिणा होता. तेव्हा निवडणुकींचे दुसरें काय व्हावें? "The Congress as a whole never adapted Council Entry as its programme. But it permitted (in the Congress Session at Bombay) those of its members who believed in the utility and efficacy of the legislative programme to form themselves into a Parliamentary party and fight the elections—" या निर्णयानुसार जे Election Board नेमल्या गेले त्यावर महामना मदनमोहन मालवील व श्री बापुजी अणे होते.

कॉंग्रेसने ज्यावेळीं वर निर्दिष्ट केलेला तृतीय पंथी व तृतीय प्रकृती न स्वीकार न त्याग असा अवार्ड संबंधीं ठराव केला तेव्हा मालवीयजी व अणे यांनी इलेक्शन बोर्डावरील आपल्या जागांचें त्यागपत्र दिलें. या त्यागपत्राचा जुलई महिन्यांत बनारस येथे जी ऑ. इं. कॉ. कमेटीची व इलेक्शन बोर्डाची संयुक्त सभा झाली त्या सभेंत विचार करण्यांत आला. And the Working Committee regretfully decided that it could not, consistently with its attitude towards the C. Award alter the said

resolution " मालवीयजी व अणे यांचें अर्थातच त्यागपत्र संमत झालें. या त्यागपत्राच्या समर्थनार्थ त्यांनी उभयतांनी काँग्रेस कमेटीला एक उभयतांच्या सहीचें गुप्त पत्र लिहिलें होतें. (तें पुढे प्रसिद्ध झालें ) त्यात त्यांनी आपल्या त्यागपत्राचें कारण दिलें होतें तें त्यांच्याच शब्दांत देतों:—

The effect of the attitude taken up by the Working Committee is that a nationalist who will be elected on the Congress ticket as a member of the Legislature will be bound to abstain from voting against the Communal Award... The result will be that while... the proposed legislation will include Communal decision as tearing agitation will be carried on throughout the country but there will be no such propaganda by Congress against the Communal Award and the impression will gain ground that the Communal Award has been accepted by the Congress and therefore by the Hindus and the Sikhs- कोणाहि शहाण्या राजकारणी मनुष्यास हें सारखेंच होतें. पण काँग्रेस !

मालवीयजी व अणे यांचें त्यागपत्र संमत झाल्यावर लगेच ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत बनारसहूनच त्यांनी नवीन "नॅशनॅलिस्ट पार्टी"ची घोषणा प्रसिद्ध केली. त्याच महिन्याच्या म्हणजे ऑगस्टच्या अखेर कलकत्त्यास नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्स झाली व तेथेंही नवी पार्टी घोषित झाली. प्रफुल्लचंद्र रे या प्रसंगी म्हणाले The Nationalist Party...... by its uncompromising rejection of week-kneed compromises purge the Congress of all wavering and half hearted tacties अशी या पार्टीची "जन्मकथा" आहे.

याच ओघांत एक अत्यंत महत्वाची गोष्ट येथे नमूद करणें क्रमप्राप्त व इष्ट आहे. ती अशी. मालवीयजी व अणे यांनी जुलई अखेर त्यांचें इलेक्शन बोर्डाचें त्यागपत्र संमत झाल्यावर बनारसहूनच ऑगस्टच्या ४ तारखेला आपलें नवीन पार्टीचें घोषणापत्र काढलें. हें वर आलेच आहे. योग असा कीं नेमके याच तारखेस म्ह. ४ ऑगस्टला भाई परमानंद (लाहोर) यांनी एक पत्र प्रसिद्ध केलें. त्या पत्रात त्यांनी गांधीजीशीं या कम्यूनल अवॉर्डच्या

विषयांत जो पत्रव्यवहार केला होता त्याचा त्यांनी आढावा दिला होता. Showing the responsibility of Gandhiji himself in what happened त्या लेखात भाईजी म्हणतात, But for Mahatma Gandhi, the decision ( of the Working Committee regarding the Congress attitude towards the Award ) would have been entirely different. Gandhiji alone is responsible for this resolution and its consequences. जिनांचें असें म्हणणें होतें कीं हिंदूंना हा अवार्ड मान्य करावा जिनांना अर्थात अवार्ड मान्यच होतें कारण त्यांना त्यात त्यांच्या अपेक्षेपेक्षाहि जास्त मिळालें होतें. त्याकाळच्या रिपोर्टरानें लिहिलें आहे कीं The Muslims have moved from trench to trench, always advancing never retreating or giving way. ...The Communal Award seems to have carried their ftont line beyond their wildest expectations— They now find two of the fairest Provinces laid low at their feet--Punjab and Bengal. एप्रिलमध्ये भाऊजींनी गांधीजींना पत्र लिहून स्पष्टच विचारलें होतें कीं आम्ही असें ऐकतो की कम्यूनल अवार्ड पतकरा असा जिना तुम्हाला आग्रह करीत आहे तर ही गोष्ट खरी आहे काय? या भाऊजींच्या पत्रांतील प्रश्नाला गांधीजींनी पाटण्याहून मेच्या १० तारखेस उत्तर दिलें. ते म्हणतात I do feel that Communal Award can never be settled except by an agreement and the agreement is impossible without large heartedness on our part. आत्मघाता पलीकडे औदार्याची "large heartedness" ची सीमा जाऊं शकते? येथे एका जुन्या कथेची आठवण होते. संत तुकाराम म्हणतात, "वाघें उपदेशिला कोल्हा, सुखें खाऊ देरे मला" जिना म्हणाले 'अवार्ड पतकरा' गांधीजी म्हणाले "बरे माझ्या सख्या, सख्या म्हटल्याचा राग नाहीना येत! नाहीतर म्हणशील ते म्हणतो. असें झालें. इति ह आस.

श्री भाऊजींना आमच्या "C. P. Berar" कौंसिलचा उल्लेख केला आहे. त्या संबंधी चार शब्द लिहिणें अप्रस्तुत होणार नाही. १९२४ मध्ये स्वराज्य पार्टीचा देशभर फार मोठा विजय झाला. आमच्या कौंसिलांत

जितकें बहुमत झालें तितकें इतरत्र कोठेच नव्हतें. त्यामुळे आतून सरकारला विरोध करण्याचा प्रयोग आमच्याकडून करविल्या गेला. श्री मोतिलाल नेहरू व दास नागपुरास त्या करता आले होते. पहिल्या जानेवारीच्या बैठकींतच मिनिस्टरांचे विरुद्ध अविश्वासाचा ठराव पास केला. दुसऱ्यो म्ह. मार्चच्या बैठकींत मिनिस्टरांची व राखीव खात्यांचीं बिलें नामंजूर केलीं. सर्व बजेट फेटाळलें. पण याच बैठकींत असें दिसून आलें की सरकारी कामात डोळे मिटून सर्रास अडथळा आणणें शक्य असलें तरी हितावह नाही. याच बैठकींत पेच पडला. सरकारने सी. पी. सेटलमेंट बिल आणलें. तें फेटाळावें तर लोकांचें आपणच अहित केलें असें होतें. बिलाचा विचार करून सरकारशीं सहकार्य करावें तर पार्टीच्या ब्रीदाविरुद्ध वर्तन होतें. या बिलापुरता तात्पुरता प्रसंग टाळतां आला व बिल विचारांत न घेतां लांबणीवर टाकलें व पुढल्या बैठकीस घ्यावें असें ठरविलें. पण आतूनहि सर्वच बाबतींत विरोध करणें कसें व्यवहार्य नाही हें अनुभवास आलें. त्यातून बरार कमेटीपुढे बरार लँड रेव्हेन्यू बिल आम्ही आणणार आहों, तुम्ही त्या बिलाचा विचार करण्यास साह्य द्याल कीं नाही असें वऱ्हाडच्या सभासदांस विचारण्यांत आलें व आम्ही वऱ्हाडकरांनी सरकारास असें कळविलें कीं सी. पी. च्या सभासदांस ज्यांत हित वाटतें त्यात त्यांना साह्य करणें आमचें कर्तव्य आहे. त्या प्रमाणे टेनन्सी बिलावर ते म्हणतील त्या प्रमाणे आम्ही कौंसिलांत मतें देऊ. पण वऱ्हाडची बेरार कमेटी व वऱ्हाडचा प्रश्न स्वतंत्र आहे. आम्ही बरार लँड रेव्हिन्यू बिलाचा त्या कमेटींत उहापोह व विचार करूं व जनतेच्या हिताचें रक्षण करूं. त्यामुळे वऱ्हाड आपलें साधून घेत आहे. पण आपण खोड्यांत अडकलों असें सी. पी च्या सभासदांस वाटल्यावाचून राहिलें नाही व कुरबुरीस प्रारंभ झाला. त्याचें पुढ हळू हळू भांडणांत रूपांतर झालें व वैमनस्यापर्यंत मजल गेली. तो इतिहास निखालस निराळा आहे. पण सांगण्याचें तात्पर्य असें कीं स्वराज्य-पार्टीने वर्षानुवर्षें काम करून असें सिद्ध केलें कीं सरकारास प्रसंगोपात साह्य व अन्यप्रसंगी विरोध करून जनतेचें हित करतां येतें. किंबहुना ह्या परिस्थितिमध्ये जनहिताचा हाच एकमेव मार्ग होता. त्यामुळे बाहेर राहिलेल्या कॉंग्रेसवाल्यांची कुचंबणा झाली व त्यांचा बाजारभाव फार उतरला. हें त्यांस दिसून आलेंहि

आणि आपणहि कौंसिलांत शिरलें पाहिजे असें म्हणणारा एक प्रबल पक्ष त्यांच्यांत उत्पन्न झाला. गांधीजीस हें अनिष्ट वाटलें. कौंसिल बहिष्कार ही त्यांची "पॉलिसी" नव्हती. हें त्याचें ब्रीद होतें. मुसलमानांचा फतवाहि तसाच होता. त्या फतव्याचा व या ब्रीदाचा सोयर संबंध होता असें वाटतें.

शिवाय स्वराजिष्ट कारकीर्दीचा असा फायदा झाला की... "The adverse note during the Swarajist days...... deprived them (Govt) of their fond delusion of a cheap delight in proclaiming to the world that in all their measures...... they had a backing of their constituted Legislatures." याहि मुळे कॉंग्रेसच्या "नो चेंजर्स"चें स्थान डळमळलें व आपलें चुकतें असें त्यांचें त्यासच वाटूं लागलें. तेव्हा वर नमूद केल्या प्रमाणे A. I. C. C. ने ज्यांना विधान सभांतून जायचें असेल त्यांच्याकरता बंदीच्या दाराचें एक पाखें उघडें केलें. एक पार्लमेंटरी पार्टी व बोर्ड तयार झालें. पुढे मिनिस्ट्री घेतली वगैरे. पण या धरसोडीचा दुहेरी अनिष्ट परिणाम झाला. कॉंग्रेस या बाबीपुरती तरी चौखुर उधळली व आपल्या चुचकारण्याला किंवा चाबकाला मानीत नाही असें गांधीजींस दिसलें तेव्हा त्यांनी मुंबईच्या बैठकींत आपण कॉंग्रेस सोडल्याचें जाहीर केलें. आणि दुसरें असें झालें कीं कॉंग्रेसचा कम्यूनल अवार्ड संबंधीचा "ना पसंत ना नापसंत" ठराव कायमच असल्यामुळे कौंसिलांत कॉंग्रेसतर्फे जाणारांची अवार्डसंबंधी "मुस्कटदाबी" झाली. "मुस्कटदाबी" हा शब्द थोडा ग्राम्य असला तरी फार अर्थपूर्ण आहे. खरोखरी जनहिताकरता आम्ही कौंसिलात जातों म्हणत असतांनाच अवार्डच्या मर्मस्पर्शी व ज्यांत राष्ट्राचा कायमचा जगण्या मरण्याचा प्रश्न होता त्या बाबतीत मुग्ध राहण्याची शपथ घेऊन व प्रतिज्ञा करून हे नॉनव्हायवोलेंट सज्जन हत्यारें पातारें घरीं ठेऊन रणांगणावर गेले. त्याचे परिणाम आज आपण भोगीतच आहों. सत्ता हातीं आल्यावर शपथा विसरल्या. वेळी अवेळी प्रतिपक्षाचे वार चुकविण्यासाठी गांधीजींच्या नांवाची ढाल पुढे करणारांनी जनतेवर गोळीबार केले. ज्या प्रेस ॲक्टला शिव्या देता देता घसा कोरडा केला त्याच ॲक्टाचा उपयोग केला. चरक्याची तरफदारी केल्याबद्दल श्री टी. प्रकाशमूला प्रायश्चित्त करावें लागलें; व सत्ता हातची सुटूं नये म्हणून अनाचार व दुराचार केले. गांधीजींच्या

काँग्रेसचें नाम मात्र शिल्लक आहे व काँग्रेसचा कारभार असाच पुढे चालल्यास, -आणि चालणार असें दिसतें-सोशिआलिस्ट व कम्युनिस्ट पक्ष बळावतील. पुढे काय होईल ? हरी जाणे !

श्री. भाऊजींनी लिहिलेलें हें पुस्तक मला चिरस्मरणीय वाटतें. लेखनाच्या क्षेत्रांत त्यांनी नवीन पाऊलवाट पाडली यात संशय नाही. होतकरू तरुणांना यांत पुष्कळ घेण्यासारखें व अनुकरणीय आहे. इतरांप्रमाणे विचार-स्वातंत्र्याचें व स्वाभिमानाचें गाठोडें त्यांनी स्वार्थाच्या खुंटीस अडकविलें असतें तर त्यांच्याही पदरीं भोपळा ना आवळा कांहीतरी आलेंच असतें. देशाच्या गरजेकडे पाहून त्यांनी मायभूमीच्या हाकेला ओ दिली व मला वाटते स्वतःच्या मूळ स्वभावाला थोडी संयमाने मुरड घालून आत्यंतिक स्वार्थत्याग करून दाखविला. आणि हें सर्व ढोल पिटल्या वाचून व गाजावाजा केल्यावाचून केलें. विषम स्थितींत आनंद मानला पण मन मळूं दिलें नाही. आणि काँग्रेस जेथे चुकते असें त्यांस दिसलें तेथे निर्भयपणे व निर्लोभपणे स्पष्ट बोलून त्याचे परिणाम स्वस्थचित्ताने सहन केले. " तुल्य निंदास्तुतिर्मौनी संतुष्टे येनकेन चित " हें भगवंतांचें वचन त्यांच्या ठिकाणीं सार्थ वाटते. माझें मन मला असें सांगतें कीं त्यांनी आयुष्य देशाच्या कामीं लावलें; काँग्रेसच्या नाही. काँग्रेस लोभी होऊन अकार्याला प्रवृत्त झाली व गांधीजींना जेव्हा " दुष्टाश्वा इव सारथेः " ती सरळ मार्गाने ठेवतां येईना ते दिवशीं भाऊजींनी पाय काढता घेतला. आज ते काँग्रेसचे अभिमानी आहेत कीं नाही मला ठाऊक नाही. पण या पुस्तकाच्या अंतरंगावरून नसण्याचा संभव वाटतो. असो.

हें पुस्तक वाचून सुचले त्याच क्रमाने मी हे विचार लिहून काढले. त्यास अधिक उणें असल्यास वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

**अमरावती**
**२९ नोव्हेंबर १९५२** }

**बा. ग. खापर्डे**

# हातची गेलेली शिकार

## अरबी समुद्रांतील वादळ

"हे सर्वशक्तिमान परमेश्वरा ह्या तुफानी समुद्रापासून माझं रक्षण कर" अशी 'बाल्डुइनो' आगबोटीच्या डेकवरील माझ्या शेजारीं असलेला एक प्रवासी परमेश्वराची प्रार्थना करूं लागला.

ही सकाळची सरासरी १०–११ वाजण्याची वेळ असेल. आगबोट अरबी समुद्रांतून जोराने पाणी कापत कापत एडनकडून मुंबईकडे जात होती. दक्षिणेकडील क्षितिजाकडून एका पाठीमागून एक मोठाल्या लाटा समोरच्या लाटेला ढकलत ढकलत व विराट स्वरूप धारण करून जहाजावर एक सारख्या आदळत होत्या. केव्हा केव्हा तर लाट येवढी मोठी येई कीं ती जहाजावर आपटल्यानंतर तिच्या फेसाळलेल्या पाण्याने आमचा उतारूंचा डेक सुद्धा धुवून जाई. अशा ह्या खवळलेल्या समुद्रांत आगबोट बरीच जोराचे हेलकावे खाऊं लागली. बरेचसे उतारू त्यांना आगबोटीच्या ह्या हेलकाव्यांनी अस्वस्थ केल्यामुळे आपआपल्या 'केबिन' मधील 'बर्थ'वर जाऊन पडले होते.

ईश्वराची प्रार्थना करणारा तो प्रवासी मला म्हणाला. "हा कालचा दीन व थंड असलेला सागर आज फार बंडखोर बनला आहे. केवढा फरक हा!"

मीः- समुद्रानं जरी आज सकाळीं हे भयंकर स्वरूप धारण केलेलें असलें तरी त्याची पूर्व सूचना जहाजांवरील खलाशी लोकांना काल सायंकाळी लागली नव्हती असं नाहीं. काल सायंकाळी सूर्यास्ताकडे मी बराच वेळ पहात होतों. सूर्य क्षितिजाखाली गेला होता. क्षितिजावरील आकाशाचा कांही भाग लाल भडक झाला होता. व त्याचा पट्टा दक्षिणेकडे कांही दूरवर पसरला होता. ह्या तांबड्या आकाशाच्या अलीकडे कांही दूरवर नारिंगी व चकाकणारे असे

पिवळसर मेघ होते व त्यांच्याहि अलीकडे काळे ढग डोक्यावर लोंबकळत होते. अशा ह्या दृश्याकडे मी पहात असतांना माझ्याजवळ एक खलाशी येऊन म्हणाला. हे जें दृश्य आपण पहातां आहा हें कशाचें निदर्शक आहे आपणास माहित आहे?

मी:- नाहीं.

खलाशी:- आम्ही खलाशी, आकाश ह्या तऱ्हेचें मेघाच्छादित असलं कीं कांही तासांनी वादळ होणार असं समजतों. त्यांतही ह्या लाल अभ्रांना जास्त महत्व देतों. मला वाटतं उद्यां आपणाला वादळांतून प्रवास करावा लागणार आहे. तुम्हाला समुद्र लागतो का?

मी:- माझ्या संबंधी चौकशी केलीस ह्या बद्दल मी तुझा आभारी आहे. मी असल्या भयंकर वादळांतून आगबोटीनं प्रवास केला आहे. वादळ असें कीं आगबोट खूप हालते आहे. डेक लाटांनी धुवून जातो आहे. पाऊस चांगलाच पडतो आहे. वारा सोसाट्याचा वाहतो आहे. पण मला त्या पासून कांहीही त्रास झाला नाही.

खलाशी डेकवरील त्याला कांही सामान गोळा करावयाच होतं तें गोळा करून निघून गेला तेव्हां हे वादळ एका एकी आलं अस तुम्हा आम्हास वाटतं. पण जाणत्यांना ह्या वादळाचा अंदाज आगाऊच लागतो व ते आपल्या बंदोबस्तात असतात. संकटें हीं अशीच आकस्मिक येतात. त्यांना तोंड देण्याची माणसांची तयारी पाहिजे.

तो:- ह्या संकटांतून मी कसा काय पार पडीन परमेश्वर जाणे! मला तर कांही सुचत नाही.

मी:- कंबर खचूं देऊं नका. असं करून कसं चालेल. संकट टाळतां तर येतच नाही. संकटापासून दूर कुठे पळून जाऊं शकत नाही. ह्या बोटीवरच रहावं लागणार आहे. येईल त्या प्रसंगाशीं मुकाबला करावा म्हणून तर म्हटलं आहे ' आलीया भोगाशीं असावे सादर । देवावरी भार घालूनियां ॥ हिम्मत धरा. हिम्मत धरलीत तर ह्या संकटावर अर्धी अधिक मात केली असं समजा.

त्या गृहस्थाशीं बोलणं संपल्यानंतर मी त्या सागराच्या उंच उंच लाटाकडे डेकच्या कठड्याशीं उभा राहून पहात होतों. इतक्यात धाडकन आवाज ऐकूं आला व डेकवर लगेच पाणीच पाणी दिसलें. माझा सोबती ' डोकं फिरल्या सारखं होतं, जीव मळमळतो, ओकाऱ्या येऊं पहातात, घबराट सुटली आहे ' असं म्हणून आपल्या केबिनकडे गेला. कांही वेळानं १०–१५ मिनीटाच्या आंत डेकवर एक सुद्धां उतारू राहिला नाहीं. मी मात्र ह्या तुफानी अरबी समुद्राची व त्याच्या पाठीशीं असलेल्या हिंदी महासागराची ह्या बोटीशीं चाललेली जंगी लढत बरेच तास पहात राहिलों. आगबोट ह्या वादळांतून सही सलामत अशी तीन चार दिवसांनी मुंबईस येऊन पोंचली.

## खवळलेला हिंदी लोकसमुद्र

अगदी अशाच तऱ्हेचा प्रकार, असेंच दृश्य समुद्रांत नव्हे तर जमिनीवर एका तपानंतर ह्या हिंदुस्थान देशांत मला पहावयास मिळालं. १९२१ साल होतं तें. राजकीय क्षितिजाच्या अलीकडे लो. टिळक व डॉ. बिझांट ह्यांच्या होमरूल चळवळीचे, रौलट ॲक्टच्या विरुद्ध केलेल्या चळवळीचे, डॉ बिझांट बाईने केलेल्या कायदेभंगाचे असे अनेक लहान मोठे मेघ ठिकठिकाणीं पसरलेले होते व राजकीय क्षितिजावर आरक्त असें जालीयनवाला बागेचें हत्याकांड पुढे येणाऱ्या वादळाचें सूचक होतें. असहकारितेच्या झंझावातानें हिंदीलोकसमुद्राला खवळून सोडलें होतें. शांत व दीन हिंदी लोकांच्या मनोवृत्ति भयंकर क्षुब्ध झाल्या होत्या. हिंदी सरकारच्या जवळ जवळ दिडशें वर्षं सुरळीत चाललेल्या राज्यनौकेला धडक्या देऊन ती खिळखिळीत करण्याच्या मार्गाला ह्या लागल्या होत्या. नौका हाकणाऱ्या तज्ञाचं मन गुंग करून टाकण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. सरकारी नौकेला ज्यांनी मजबुती आली होती अशा मजबुत बंधनांवर मारा सुरू झाला. सरकारची कायदेमंडळें, सरकारी शाळा, सरकारी पदव्या, ऑनररी म्याजिस्ट्रेटी, सरकारी कोर्ट, दारूचे सरकारी हरोस, ब्रिटिशांशीं होणारा व्यापार, सरकारने बसवलेले कर, सरकारची इभ्रत ह्या सर्वांवरच थोडाबहुत लोकक्षोभाचा परिणाम होऊं लागला.

## सैतानी सरकार

महात्मा गांधी यांनी हिंदी सरकारला ( Government of India ) सैतानी सरकार बेडरपणे म्हणायला सुरवात केली. त्या सरकारची इतक्या वर्षांची इभ्रत एका क्षणांत धुळीस मिळविळी. त्या सरकारविषयी असलेली लोकांची भीति नाहीशी झाली. " सैतानी सरकार " ( Satanic Government) हा शब्दप्रयोग जो तो वक्ता, खेडवळ मनुष्य सुद्धा, आपल्या भाषणांत बिनधोक वापरूं लागला. सरकारला महात्माजींनी " सैतानी सरकार " ह्या पदवीचा अहेर केल्यावर त्यांच्या विरुद्ध कांहीच कारवाई सरकारने केली नाही. जें सरकार " वंदेमातरम् " कोणी म्हटलें तर त्याचा लचका तोडण्यास नेहमीं तयार असे, " स्वराज्य " म्हटलें तर अंगावर वस्कन धावून जाई, ज्या सरकारने लोकमान्य टिळकांना, महात्मा गांधींनी सरकार संबंधीं भाषा वापरली ह्या भाषेपेक्षा कमी कडक भाषा वापरली तरी तुरुंग दाखवले तें सरकार महात्मा गांधी विरुद्ध कांहीच करीत नाही म्हणजे काय ! लोकांस आश्चर्य कां वाटूं नये ? त्यांची हिम्मत कां वाढूं नये ? असहकारितेच्या ठरावाचा पुरस्कार जाराने कां होऊं नये ? झालाच पाहिजे व तसा तो होऊं लागला.

## बहिष्काराचा पहिला बळी

जे ऑनररी म्याजिस्ट्रेट खेड्यांत राहात होते त्यांच्यावर खेड्यांतील लोकांनी सामाजिक बहिष्काराचें शस्त्र उगारलें. बहिष्कार टाकतांना ब्राम्हण ब्राम्हणेतर प्रश्नाचा जरा सुद्धा गंध नव्हता. नागपूर जिल्हयांतील एका मोठ्या श्रीमंत मालगुजार व सावकार ब्राम्हणेतर म्याजिस्ट्रेटच्या घरची गोष्ट. खेड्यांतील लोकांनी त्यांना म्याजिस्ट्रेटी सोडा म्हणून म्हटलं. त्यांनी तें मनावर घेतलं नाही. राहिले आपल्याच तोऱ्यांत. मग काय लोक हात धुवून त्यांच्या पाठीस लागले. मालगुजाराच्या वाड्यांत रोज सडासारवण सूर्य निघण्याच्या पूर्वी उरकायचं, गोठ्यांतील गाई व आंगणांतल्या खुंट्यांशीं बांधलेल्या म्हशी सकाळींसच दूध काढल्यानंतर लवकरच मोकळ्या होत. स्त्री पुरुष, नोकर चाकर आप आपल्या कामाला लागत. पण ह्याच म्याजिट्रेटला म्याजिस्ट्रेटी सोडा नाहीतर पश्चाताप पावाल असा जो निर्वाणीचा खलिता गेला त्याची

त्यांनी किंचितही पर्वा केली नाही म्हणून लोकांनी म्याजिट्रेट साहेबास धडा शिकवायचा निश्चय केला. घरचीं कामें कुणबी, तेली, माळी, कोणत्याही जातीचा मनुष्य करीना. म्याजिस्ट्रेट साहेबांना समज दिल्यानंतर दोन तीन दिवसांनी दिसून आलं कीं म्हालीहि गांवकऱ्यांच्या कटांत सामील झाला. तो ह्यांची हजामत करीना. हजामती अर्ध्या करूनच म्हाली पळून गेल्याच्या घटना घडून येऊं लागल्या होत्या. त्यांच्या त्या केविलवाणी स्थितीची कल्पना करणें कठीण आहे. ते म्याजिस्ट्रेट बिचारे जुन्या जमान्याचे व म्हातारेही. ज्याचा धंदा त्यांनीच, ज्याचं जें काम तें त्यानेच केलं पाहिजे अशा मताचे. हजामत करायची तर ती म्हाल्याकडूनच; स्वतः केली तर जात बिघडेल. मग खेड्यांत राहणाऱ्या ह्या म्हाताऱ्या म्याजिस्ट्रेट्स त्यांच्यावर ह्या नानको-आपरेशनच्या दिवसांत न्हाव्यांनी एका एकी आणलेल्या प्रसंगांतून सोडवणार कोण? त्याना मग एखाद्या मोठ्या शहरीं तो विद्रूप झालेला चेहरा उपरण्याने लपवून आपल्या स्नेह्याच्या घरीं जावं लागे व तिथे मग कोण्यातरी न्हाव्याची अजीजी स्नेह्याच्या मार्फत करुन हजामत करवून घेऊन परत गावीं यावं लागे. अखेरीस हे श्रीमंत ब्राम्हणेतर म्याजिस्ट्रेट म्याजिस्ट्रेटी सोडून ह्या सर्व पिच-कार्टीतून मोकळे झाले.

## भिक्षुकाने ब्राम्हण म्याजिस्ट्रेटला हात दाखवला

असहकारितेच्या सामाजिक बहिष्कारामुळे खेड्यांतील म्याजिस्ट्रेटच्या जीवाची अनेक दृष्टीने कुचंबणा होई. ह्याच असहकारितेच्या धामधुमीच्या काळांत वर्धा जिल्ह्यांतील एका खेड्यांतील एका ब्राम्हण म्याजिस्ट्रेटच्या इथं होतं श्राद्ध. गाव मोठं. गावांत ब्राम्हणही पुष्कळ. दरवर्षीच्या नियमास अनुसरुन हे म्याजिस्ट्रेट कांही भिक्षुकांना श्राद्धकर्म करण्याचं व जेवणाचं आमंत्रण देण्यास गेले. त्यांच्या पैकी बऱ्याच जणांनी आम्ही येत नाही. तुम्ही म्याजिस्ट्रेटी सोडाल तर येतों असं सांगितलं. '' हे म्याजिस्ट्रेट, हो ' नाही ' कांहीच बोलले नाहीत. त्यांना वाटलं मुत्सद्दीपणाचं मौन धारण केल्यानं आपलं काम निभून जाईल. एका बिलंदर भिक्षुकाने त्यांना म्हटल '' मी येतों. हे नाहीत तर नाही. यांच्यावाचून काय अडतं. मी दहा बारा

अनुक्रम १०७.५२ दि. २५/१२/५५

ब्राम्हण घेऊन येतों." म्याजिस्ट्रेटला आनंद झाला. त्याला वाटलं बरी जिरली ह्या बाकीच्या भिक्षुकांची.

म्याजिस्ट्रेटनं घरीं येऊन श्राद्धाची – धर्मकर्माची सर्व तयारी केली. त्याच प्रमाणे दहाबारा ब्राम्हणांची जेवण्याची-लाडुखिरीची-तयारी केली; व त्या भिक्षुकाची आतुरतेने वाट पहात बसला. माध्यान्हीची वेळ. भिक्षुकानं दिलेली वेळ टळली. तास झाला. दोन तास झाले. त्या भिक्षुकाचा पत्ता नाही. भिक्षुकांकडे नोकर पाठवला. नोकरानं निरोप आणला ब्राम्हण घरीं नाही. म्याजिस्ट्रेट साहेबाचा धीर सुटला. त्यांना मग उमगून आलं कीं ह्या ब्राम्हणानं आपल्या हातावर तुरी दिल्या. मग त्यांनी दुःखीं अंतःकरणानं जेवायचीं पानं मांडून आपल्या नोकरा चाकरांना जेवायला हाका मारल्या. नोकरांना वाटलं ब्राम्हणाच्या घरीं ब्राम्हण आले नाहीत तेव्हा आहे तरी काय ? ह्या ब्राम्हण म्याजिस्ट्रेटवर कांही विटाळ असेल व आपण जेवलों तर बाटून जाऊं. त्यांनीही पानावर बसायला नकार दिला. म्याजिस्ट्रेट साहेबांनी कपाळावर हात मारला व अखेरीस तें सर्व सुग्रास अन्न गाईंना खाऊं घातलं.

पूर्वजाच्या आत्म्याला पिंडदान धार्मीक विधी करुन करतां आला नाही असा त्या वृद्ध म्याजिस्ट्रेटवरचा हा पहिलाच प्रसंग. श्राद्ध करून आपण आपल्या पितरांना व पूर्वजांना संतुष्ट करतो अशी त्याची भावना. मृतांचे आत्मे अस्तित्वांत असूं शकतात कां ह्याबद्दल हल्लीच्या तरुण सुशिक्षित पिढीस संशय असेल. पण ते असूं शकतात-आहेत ह्या बाबतींत सनातनी ब्राम्हणांचा विश्वास व मांत्रिकांचीही. हल्लीच्या तरुण पिढीचा - थिआसफीस्ट्स सोडून-ज्या अर्थी श्राद्ध ह्या गोष्टीवर विश्वास नाही त्या अर्थी त्या काळच्या वृद्ध माणसांच्या भावनांची त्यांना कल्पनाही करतां येणार नाही. ज्या काळाच्या पिढींतील लोकांच्या प्रातःस्मरणाला सेफ्टी रेझर, पावडर व चहापासून सुरवात होते, त्यांना पुण्यश्लोकांच्या, पवित्र नद्यांच्या, जे चिरंजीव आहेत त्यांच्या, सतींच्या प्रातःस्मरण करणाऱ्यांच्या भावनांचा ठाव कसा घेतां येणार ! सनातनी लोकांच्या दृष्टीनं श्राद्ध म्हणजे केवढी महत्वाची धार्मीक बाब !! आणि हे ज्या भिक्षुकांना समजत होतं त्यांनीच त्या दिवशीं घोटाळा उत्पन्न केला. म्याजिस्ट्रेट साहेबांनी नंतर थोड्याच दिवसांनी म्याजिस्ट्रेटी सोडली.

कारितेच्या सामाजिक बहिष्काराविरुद्ध हाच एक बचावाचा मार्ग होता. पाण्यांत राहून माशांशीं वैर कसं जमणार! गावकऱ्याविरुद्ध जाऊन कसं चालेल! नाक मुठींत धरून शरण गेले बिचारे म्याजिस्ट्रेट!

**पगारी म्याजिस्ट्रेट**

सरकारी नोकरांचेही खेड्यांत गेले तर कमी हाल होत होते असं नाहीं. त्यांचीही मोठी केविलवाणी स्थिति झाली होती. त्यांच्या इभ्रतीस धक्का पोंचला होता. १९२१ सालापूर्वी दौऱ्यावर हे लोक निघायचे म्हणजे खाण्याच्या पदार्थांची त्यांची चांगली चंगळ चाले. खाण्याचे सर्व पदार्थ फुकट. त्यांच्या इतमामाकरिता बाजा खाटाही फुकट. त्यांचे तंबुहि ठोकल्या जात फुकट. असं हे सर्व फुकटा फाकट चाले आणि साहिबांच्या ह्या दौऱ्याची आंच मालगुजार व कास्तकार दोघांनाही पोचत होती. गाड्या, बैल, माणसं बिगारीनं धरले जात. त्यांच्या घरचं किंवा शेतीचं काम मग तसच पडून राह्यलं तरी त्याची ह्यांना काय पर्वा? हाक ना बोंब. असा हा ह्या सरकारी आफीसरांचा दरारा! पण असहकारितेच्या चळवळीनं हा सर्व मनु पालटला. फुकटा फाकटीची सरभराई तर राहूंच द्या पण भरपूर पैसे देऊनही ह्यांना कोणी कोणतीही वस्तु भाड्याने देईना की विकीना. ठिकठिकाणीं प्रांतांत बिगारी विरूद्ध चळवळ खूप जोराने सुरू झाली व मग ह्या आफीसरांना कोणीही विचारीनासे झाले. येवढ्यावरच थांबतं तरी त्यांनी देवाला नवस केला असता. पण येवढ्यावर कुठलं थांबायला. त्यांची मानहानी होऊं लागली. हे सरकारी नोकर सार्वजनिक सभांचे किंवा परिषदांचे रिपोर्टस् घेण्यास जात तेव्हा त्यांना ह्या खेडुतांचा चुनल्या शब्दांत अहेर मिळे व त्यांना निमूटपणे त्या शिव्या ऐकून घ्याव्या लागत.

कॉंग्रेस कमिट्यातर्फे राजकीय परिषदा ठिकठिकाणीं भरूं लागल्या. लोकांची हिम्मत दिवसें दिवस वाढत गेली. हिंदु मुसलमान दोन्हीही जमातींचे लोक ह्या परिषदांत भाग घेऊं लागले. दोन्ही जमातींनी भाग घेण्यासारखे जिव्हाळ्याचे प्रश्न ह्या परिषदांतून चर्चिले जात. अमृतसर येथील जालियनवाला बागेंतील हत्याकांड, जनरल डायरने केलेली अमानुष – चेंगीजखानाला किंवा तैमुरलंगाला लाजविणारी माणसांची – कत्तल, खिलाफतचा प्रश्न व स्वराज्य ह्या संबंधी परिषदांतून कळकळीची, जळजळीत व उत्तेजक अशीं भाषणें होत.

खादी, अस्पृश्यता निवारण, परदेशी मालावर बहिष्कार, दारुवर बहिष्कार, व कर न देण्याचा लढा इत्यादि विषयावर भाषणें तर होतच व ठरावही पास होतच होते. पण लोकांना चेतवणारे विषय, जालीयनवाला बाग मधील कत्तल व स्वराज्य हे होते.

## सरकारची नाजुक परिस्थिती

ह्या धामधुमीच्या काळांत सरकारची स्थितीही जरा नाजुक झाली होती. रौलट ॲक्टमुळे व अमृतसर येथील जालीयनवाला बागेंतील मशीनगनच्या मारांनी केलेल्या माणसांच्या क्रूर कत्तलीमुळे हिंदुमुसलमानांतील नेमस्त माणसांची सहानुभुति ते गमावून बसले होते. जनरल डायरच्या राक्षसी कृत्यामुळे विलायतेंत सुद्धा हिंदुस्थान सरकारवर पार्लमेंटमध्ये व वर्तमानपत्रांत कडक टीका थोड्या प्रमाणावर कां होईना होऊं लागली होती. खिलाफतच्या प्रश्नामुळे हिंदुस्थानांतील मुसलमान समाजाची सहानुभूति गमावण्याचा प्रसंग आला होता. ह्या सर्व गोष्टांचा परिणाम असा झाला कीं हिंदु, मुसलमान, पार्शी वगैरे लोकांचा नेमस्तपक्ष जरी कांग्रेसच्या आंदोलनांत सामील झाला नाही तरी तो उदासीन राहिला. सरकारचा एकच एक आधार गेला. असहकारितेच्या कार्यक्रमाबद्दल सरकारला व नेमस्त पक्षाच्या लोकांना वाटे कीं हा कार्यक्रम अव्यवहारिक आहे ह्या बद्दल लोकांची खात्री होईल; आणि पेटलेली ही होळी आपोआप थंडी होईल. मध्यप्रांतांत व वऱ्हाडांत राजद्रोहाच्या खटल्यांचें शस्त्र बेताबातानेच उपयोगांत आणल्या जाऊं लागलें. दारुवरील बहिष्कारामुळे दारुदुकानावर जें निरोधन जोराने सुरू झालें होतें त्यांतून उत्पन्न झालेल्या खटल्यावरच विशेष जोर दिल्या जात होता. कारण दारूचा हर्रास बंद झाला कीं मग सरकारवर शेकणार. दारूचे हर्रास बंद झाले तर सरकारी खजिन्यांत पैसा कोठून येणार आणि सरकारी खजिना जर रिकामा तर सरकार आपला खर्च कसा चालवणार? सरकारचा दाना रसद बंद होणार व मग सरकारच्या कंठीं प्राण येणार!

सन १९२२ च्या सुरवातीनंतर थोडे दिवसपर्यंत कांग्रेसवाल्यांचें असहकारितेचें आंदोलन खूप जोरांत व सरकारची दडपशाही त्या मानाने व पूर्वीच्या मानाने तर फारच बेताची. लोकांच्या हिंमतीची दिवसें दिवस

चढती कमान. व्याख्यानबाजी पुरताच लोकांचा उत्साह व बेडरपणा राहिला नव्हता तर त्यांनी तो कृतींतही आणायला सुरवात केली होती. दारूबंदीची चळवळ खूप फोफावली होती. स्वयंसेवकांचें दारूच्या गुत्त्यावर पिकेटींग (निरोधन) सुरू झालें होतें. ह्या निरोधन करणाऱ्यामध्ये केव्हा केव्हा स्थानिक डॉक्टर व वकीली सोडलेले पुढारीही असत. त्यांना आरोपी म्हणून गोवण्यांत येई. वऱ्हाडांत या चळवळीबरोबरच विगारबंद करण्याची जोराची चळवळ सुरु होती. त्या बाबदही चांगल्या चांगल्या वकीलावर तिकडे खटले होऊं लागले होते. कोर्टांत बचाव करावयाचा नाही असें कांग्रेस-वाल्यांनी ठरवल्यानंतर सरकारला कांग्रेस कार्यकर्त्यांना जेलांत डांबणें फारच सोपें झालें होतें. सुंठीवाचून खोकला गेला म्हणून सरकारला फार आनंद होऊं लागला होता. पण कांही दिवसांनी महात्माजींचे अनुमतीने त्यांनी घातलेल्या मर्यादेंत कांग्रेस कार्यकर्त्यांचा बचाव केल्या जाऊं लागला. तेच कांग्रेस कार्यकर्ते, कोर्टांतून बचाव करून सुटल्यानंतर, फिरून आंदोलन करूं लागले. कांग्रेसचें काम दुप्पट उत्साहानें होऊं लागलें. कांग्रेसच्या कार्यक्रमाने प्रांतांत पेट घेतला.

## सरकारी शाळा व कॉलेजेंवरील बहिष्काराची धुगधुगी

अप्तहकारितेचं वातावरण गरमागरम होतं. त्याच वेळेला सरकारी शाळा व कॉलेजें यावर बहिष्कार टाकण्याचे प्रयत्न सुरू झाले. विद्यार्थ्यांनी सरकारी शाळा व कॉलेजें सोडावीं म्हणून सभा होऊं लागल्या. अशाच एका नागपुरांतील सभेचे अध्यक्ष सार्वजनिक कार्यांत उत्साहपूर्वक तन मन धन खर्ची घालणारे श्री. दामुअण्णा देशमुख, माझे सर्वांत धाकटे बंधु, होते. व प्रमुख व्याख्यात्यामध्ये जहाल देशभक्तीचे (आचार्य) दादा धर्माधिकारी होते. विद्यार्थ्यांना सरकारी शाळा व कॉलेजें सोडायला सांगायचं म्हणजे त्यांच्या शिक्षणाची कांही तरी सोय करायला पाहिजेच होती. राष्ट्रीय शाळा काढून आम्ही मुलांच्या शिक्षणाची सोय करतों, ती जबाबदारी आम्ही घ्यावयास तयार आहों हे विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या पालकांच्या नजरेस आणून देणं जरूर होतं. जबाबदार मनुष्याप्रमाणे ह्या पुढाऱ्यांना वागणें अवश्य होतें. नाहीतर मुलांच्या शिक्षणाची राखरांगोळी केली, त्यांच्या आयुष्याचें मातेरें

केलें अशीं बोलणीं खावीं लागलीं असतीं. म्हणून 'टिळक विद्यालयें' स्थापण्यांत आलीं. टिळक विद्यालयाचा खर्च चालविण्याकरिता पैशाची तरतूद करणें अवश्यच होतें. त्या कामाला हातभार श्री. दामुअण्णा व त्यांचे स्नेही दत्तोपंत परांजपे ह्यांनी लावला. ते त्या वेळीं कापसाचा व्यापार करीत होते. कापसाच्या दलालापासून, खरेदीदारापासून व कापूस विकणाऱ्यापासून जी काय देणगी मिळेल तिच्यावर विद्यालयाचा खर्च भागविण्याचे प्रयत्न सुरु झाले. सरकारला हें पहावल्या गेलें नाही. पैसे जबरदस्तीने गोळा करतां असा यांच्यावर आरोप आला. तेव्हा श्री दामुअण्णा व त्यांचे स्नेही ह्यांनी ह्या मंडळीजवळून पैसे न घेतां कापसाचा 'फत्रा' घेणें सुरू केलें; व तो कापूस विकून पैशाच्या रूपांत मदत होऊं लागली. पण लवकरच विद्यार्थ्यांच्या उत्साहाचा पूर ओरसला. विद्यार्थी कमी झाले व 'टिळक विद्यालय' कांही वर्षपर्यंत जेमतेम कथत कुथत, रडत खडत, रखडत रखडत चालूं लागलें व मग शेवटी ह्या विद्यालयाने राम म्हटला.

## कोर्टावरील बहिष्कार अर्धांतरीच राहिला

सर्व बहिष्कार – शाळेवर, कॉलेजवर, कौन्सिलवर, परदेशी मालावर व इतर - थोड्या बहुत प्रमाणांत सिद्धीस गेलेत. पण सिद्धीस गेला नाही कोर्टावरील बहिष्कार. कै. नारायणराव वैद्य वकील ह्यांनी वकीली सोडल्यानंतर दिवाणी दाव्यांचा निकाल करण्याकरिता एक पंचायतकोर्ट काढलें होतें. पण एक दोन मुकद्दम्याचे पलीकडे सबंध वर्षांत जास्त मुकद्दमे आले नाहीत. व जे आलेत त्यांच निकाल कोर्टातून नोंदून घ्यावे लागले. ह्या पंचायत कोर्टांत मुकद्दमे कां आले नाहीत? सरकारी कोर्टावर बहिष्कार कां पडला नाही? इतर बहिष्कार थोडे फार यशस्वी झालेत व हाच बहिष्कार तसा का यशस्वी झाला नाही? ज्या प्रचारकांनी, ज्या पुढाऱ्यांनी बाकीच्या बहिष्काराचा पुकारा केला व त्यांना जनतेनं साथ दिली त्याच पुढाऱ्यांनी कोर्टाच्या बहिष्काराचा पुकारा केला, मग जनतेनं साथ कां दिली नाही? जनतेनं ह्या बाबतींत पुढाऱ्यावरचा आपला विश्वास त्यांना साथ देऊन कां नाही व्यक्त केला? बहुजन समाजाच्या आर्थीक प्रश्नांचा ह्या बहिष्काराशीं संबंध होता. इतर बहिष्कारापैकीं प्रत्येक बहिष्कारामधे कोणा एखाद्या व्यक्तीचें किंवा

समूहाचें नुकसान होणार होतें. पदवीवाले व म्याजिस्ट्रेट यांच्यावरील बहिष्कारानं फार तर त्यांच्या सामाजिक दर्जाला धक्का पोचणार होता. आणि बहिष्कार टाकणाऱ्या बहुजन समाजाचं कांहीच नुकसान होणार नव्हतं. ' हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ' अशापैकीच प्रकार होता तो. पण कोर्टावर बहिष्कार म्हणजे आपले हक्क बजावून घेण्याचा परिणामकारक मार्ग बंद करून घेणें असंच सर्वांना वाटत होतं व तसं करणं म्हणचे आपल्या पायावर आपणच गोटा पाडून घेणं असा प्रकार होणार होता. आर्थिक नुकसान सहन करण्यास कोणीही तयार नव्हतें. कोर्टाची आवश्यकता, तेव्हा कोर्टांत काम चालविणाऱ्या वकीलाचीही गरजच. म्हणून वकील लोकांना ह्या असहकारितेच्या काळांत उपसर्ग पोचला नाही. जर वकील असहकारितेपासून म्हणचे कोर्टावरील बहिष्कारापासून एका गोष्टीला मुकले असतील तर ती एकच. कॉंग्रेसमध्ये सार्वजनिक कार्य करण्याच्या क्षेत्रांत त्यांना मज्जाव होता. ज्या वकीलांना आपलें सार्वजनिक काम करण्याचें कर्तव्य सुरुच ठेवावयाचें होतें त्यांना मात्र वकिली सोडणें भाग पडलें. स्वतःकरिता ह्या धंद्यामध्ये पैसे मिळवणें बंद झाले व त्यांना तंगीत दिवस काढावे लागले. पण ह्या परिस्थितीचा परिणाम त्यांनी आपल्या सार्वजनिक काम करण्याच्या प्रवृत्तीवर होऊं दिला नाही. व त्यांच्या पैकी पुष्कळांनी कांही वर्षे तरी सार्वजनिक काम करण्यांत चुकारतट्टूपणा केला नाही. कांहींनी लवकरच प्रॅक्टीस सुरू केली.

## कोर्ट बहिष्कार व कांही सखींचे टाल

कोर्टावरील बहिष्कार बहुजन समाजाला नको होता असं वर सांगितलंच आहे. पण तो पाहिजे होता उचल्यांना व स्वार्थी लोकांना. त्यांनी गुन्हा केला तरी त्यांच्यावर कोर्टाची कारवाई त्यांना नको होती. ह्या संबंधी ह्याच दिवसांतील स्वतः पाहिलेल्या गोष्टींपैकी एक दोन गोष्टींचा मी उल्लेख करतों. एक दिवस रामटेकचे पंडे मला नागपुरच्या एका म्याजिस्ट्रेटच्या कोर्टांत दिसले. त्यांना मी नमस्कार केला. त्यांनी विचारलं ' आपण कोर्टावर बहिष्कार टाकला आहेना ? ' मी म्हणालों ' होय. कॉंग्रेसच्या आज्ञेनुरूप. ' आरोपीच्या कठड्यांत उभा असलेला एक मनुष्य मला म्हणाला ' बॅरिस्टर साहेब मैने इनसे कहा कांग्रेस कहती है कोर्ट बायकाट करो, गांधीजी कहते है अदालत

मत जाव. लेकीन इनोंने गांधीजीका कहना नही माना और मुझे अदालतमें ले आये. आप भी इनको समजाईये. इनोंने अदालतमें नहीं आना चाहिये.' मी पंडे यांचेकडे वळून म्हणालों, 'हें काय लफडं आहे?' ते म्हणाले 'हा मनुष्य, जातीचा मुसलमान. रामटेकच्या यात्रेकरूंत मिसळून यात्रेकरूंचे पैसे खिशांतून लांबवले. पोलीसनं ह्याला धरून आणलं. माझी साक्ष आहे.' दुसरी गोष्ट सिव्हिल स्टेशन मधून एकदां शहरांत जात असतांना दिसून आली ती ही. एका टांगेवाल्याच्या महात्माजींच्या जयजयकाराला कांही मंडळी जोराजोरानें साथ देत होती महात्माजींचा जयजयकार खूप जोरानें सुरू होता. चौकशी अंती कळलं कीं टांगेवाल्यानें एका हाडाचं तेवढं उरलेल्या घोड्याच्या टांग्यांत तीन सवाऱ्या न बसवतां चार बसवून म्युनिसिपालीटीच्या नियमाचा भंग केला होता व एक पोलीस त्याला नाक्यावर व कोर्टांत घेऊन जाण्याचा विचार करीत होता. पोलिस म्हणाला 'तुमने कानूनके बरखिलाफ बात किया है. तुमको अब अदालत चलना पडेगा.' टांगेवाला म्हणाला 'अरे काहे का कानून. किसका कोर्ट? अब तो गांधीजीका राज है. तुमारे कोर्टपर बाइकॉट है. तुम और तुमारे सरकारको अब बाड बिस्तर लेके भागना पडेगा. बोलो गांधी महाराजकी जय.'' व लोक गांधी महाराजांचा जय जय कार करीत होते. आणि घोडा? 'राम' म्हणण्याच्या बेतांत होता. अशा तऱ्हेचं कायदेभंगाचं स्वरूप आंगलट येईल हें त्या वेळच्या नेमस्त लोकांनीं सांगितलं. 'अंदाधुंदी माजेल ह्या प्रकारानं' असं त्याचं म्हणणं. पण तिकडे कोणी लक्ष दिलं नाहीं. पण मग ज्या वेळेस हिंदी लोकांपैकींच लोक मंत्री झाले त्या वेळेस त्यांचे डोळे उघडले.

कायदेभंगाला हें असं भलतच स्वरूप आलं, कोर्ट बहिष्कारचा नवीनच अवतार झाला व ह्या अवताराचे भगतगणही नवीनच उत्पन्न झालेत. सुदैवानें ह्या भस्मासुराला लवकरच ५--६ महिन्यांतच मरण आलं.

## प्रिन्स ऑफ वेल्सला इरेस घातले

सन १९२१ सालाच्या मेपासून असहकारितेचं तुफानी वातावरण सुरू असतानाच डयुक ऑफ कॅनॉट हे हिंदुस्थानच्या नवीन सुधारणा संबंधी

(द्विदल पद्धती Diarchy संबंधी) घोषणा करण्याकरिता आले. त्यांच्या स्वागतावर कडक बहिष्कार पडला तर आश्चर्य करण्यासारखी गोष्ट नव्हती. ह्या वादळाचा जोर वाढत असतानाच नोव्हेंबरमधे प्रिन्स आफ वेल्स (आतांचे डयूक आफ वुईंडसर) हिंदुस्थानांत आले.

प्रिन्स आफ वेल्सला इथे आणण्यांत हिंदी सरकारचा वा त्यांना पाठविण्यांत विलायत सरकारचा असा डाव की हिंदुस्थानी लोक पूर्वापार आपल्या राजाबद्दल अत्यंत निष्ठा ठेवित आलेत. राजा म्हणजे विष्णूचा अवतार समजणारे हे लोक? प्रिन्स आफ वेल्स हिंदुस्थानांत आल्याबरोबर सर्व आंदोलन सोडून देऊन राजपुत्रास भेटावयास हजारोंनी येतील व हें वादळ मग आपोआपच शांत होईल. पण झालं भलतंच! गळ्यांत घोंगडं आलं!! ब्रिटिश व हिंदी सरकारांनी मनसुबे केलेत एका प्रकारचे व पांचा मुखी परमेश्वर असलेल्या जनतेन म्हणजे कांग्रेसनं ठरविलं निराळ्या प्रकारचं. कारण प्रिन्स आफ वेल्सनं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर ज्या दिवशीं पाय ठेवला तो दिवस कांग्रेसच्या आज्ञेनुसार हिंदुस्थानभर हरताळाचा दिवस पाळला गेला. बिचारा प्रिन्स आफ वेल्स कोणत्या मुहूर्तावर हिंदुस्थानांत यावयास निघाला कोणास ठाऊक! जिथे जिथे ज्या ज्या दिवशीं प्रिन्स आफ वेल्स गेला, तिथे तिथे त्या त्या दिवशीं लागोपाठ हरताळ पाळण्यांत आला. हरताळानं राजपुत्राचा पिच्छा पुरवला. प्रिन्स आफ वेल्स जाणाऱ्या मार्गावरील दुकानें बंद. रहदारी बंद. रस्ता ओसाड. मनुष्य फिरतांना दिसायचा नाही. असा अपशकुनच अपशकुन. प्रत्येक ठिकाणची कांग्रेस कमिटी प्रिन्स आफ वेल्स वरील बहिष्कार कडक रीतीनं घडवून आणण्यांत अत्यंत दक्ष असे. केव्हा केव्हा कांग्रेसची आज्ञा न पाळणाऱ्यावर हिंसात्मक हल्ले होत. नाही असं नाही. मुंबईत पारशी लोकांचे त्या दंग्यांत बरेच हाल झाले. महात्मा गांधींना ह्या दंग्यामुळे प्रायश्चित म्हणून उपवास करावा लागला.

## दासबाबू राजपुत्रावरील बहिष्कार उठवा

प्रिन्स आफ वेल्स कलकत्त्यासही जाणार होते. त्या वेळेस त्यांच्या स्वागतावर बहिष्कार पडूं नये म्हणून दे. दासबाबू यांच्याशीं त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड रीडींग ह्यांनी बंगालच्या गव्हर्नरामार्फत तडजोडीचं बोलणं सुरु

केलं. ह्या वेळेस सर तेजबहादुर सप्रू हे कार्यकारी मंडळाचे मेम्बर होते. कसंही करून प्रिन्स आफ वेल्सवरील बहिष्कार उठवून त्यांचा सत्कार केला जावा ही लार्ड रीडींगची इच्छा. कोणत्याही व्हाईसरायाच्या अमदानींत राजघराण्यांतील मनुष्यावर हिंदुस्थानांत बहिष्कार पडला नव्हता, त्याचा अपमान – बहिष्कार म्हणजे दुसरं काय अपमानच – झाला नव्हता व तो प्रसंग दुदैवानं ह्या राजपुत्रावर आला किंवा आणला ह्या बद्दल लार्ड रीडींगच्या मनाला तळमळ लागून गेली होती व कसंही करून प्रिन्स आफ वेल्सवरील बहिष्कार उठवून त्याचा सत्कार केल्या जावा ही लार्ड रीडींगची उत्कट इच्छा. कलकत्त्यास तडजोडीचं बोलणं सुरू असतांना सर तेजबहादुर सप्रू तिथे नव्हते. पण त्यांच्या बरोबर काम करणारे ( Colleague ) कार्यकारी मंडळाचे युरोपियन मेम्बर्स वाटाघाटीचे वेळेस कलकत्यांत होते. त्यांच्याकडून सर तेजबहादुर सप्रु यांना सिमल्यास तार गेली कीं तडजोड होण्याचा बराच संभव आहे तुम्ही या. सर तेजबहादुर खूप खूष होऊन जाऊन लगेच कलकत्त्यास जाण्यास निघाले. बहिष्कार उठवण्याची आशा व ती बातमी युरोपियन मेम्बर्सकडून तेव्हा त्यांना आनंद कां होणार नाही ? ते कलकत्त्यास जाऊन पोचले.

( लार्ड रीडींग व दे. दास बाबू ह्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्यासंबंधीचा मजकूर १९४२ चे अखेरी अखेरीस कांग्रेसच्या ‘ चलो जाव ’ च्या ठरावाची जोराची व गरमागरमीची चळवळ झाल्यानंतर कांही महिन्यांनी लो. बापुजी अणे एक्झिक्युटीव्ह कौन्सिलर असतांना त्यांचे दिल्ली येथील मानसींग रोडवरील बंगल्यावर सर तेजबहादुर सप्रू व ते जेवत असतांना सर तेजबहादुर ह्यांचे तोंडून मी व ५-६ सद्‌गृहस्थांनी ऐकली. देशांत असंतोष खूप माजला व वेळ आाणीबाणीची आली की सर तेजबहादुर सप्रू व डॉ. जयकर ह्यांचा मध्यस्थी ह्या नात्याने उपयोग होत असे. केव्हा सरकारला केव्हा कांग्रेसला यश मिळे; केव्हा अपयश.

समेटाचा मजकूर कालानुक्रमाला धरून मी जेव्हा तो ऐकला त्याच सालीं यावा असा प्रथम इरादा होता. पण नंतर ज्या सालीं ही गोष्ट घडली त्याच सालीं ती देणें योग्य होईल असें वाटलें म्हणून पाहिल्या करंडकांत १९२२

फेब्रुवारीचा अहवाल दिला तरी ह्या घटनेला योग्य ती सत्यकथावर आधारलेली पार्श्वभूमि निर्माण करण्याकरितां १९२१ सालाकडे जाणें भाग पडलें. )

### शिकार हातची गेली

प्रिन्स आफ वेल्सवरील बहिष्कार उठवण्याच्या बाबतींत जें तडजोडीचें बोलणें दे. दास यांच्याशीं सुरु झालें होतें त्याला महात्मा गांधींची सम्मति होती. वाटाघाटी काय चालत होत्या त्या संबंधी महात्माजींना सविस्तर वर्तमान कळविण्यांत येत असे. प्रांतिक स्वायत्तता देण्याचं कबूल केल्यास प्रिन्स आफ वेल्सवरील बहिष्कार उठवण्याचं ह्या तडजोडींत ठरलं. प्रांतिक स्वायत्तता देण्याची जबाबदारी लार्ड रीडींग ह्यांनी घेतली. त्या प्रमाणे महात्माजींना कळविण्यांत आलं. महात्माजींना ही तडजोड कबूल झाली पण त्यांनी त्या बरोबरच मौ. महमद अली व त्यांचे बंधु शौकत अली – हे त्यावेळस तुरुंगांत होते – ह्यांना सोडून द्यायला पाहिजे ही अट घातली. लार्ड रीडींग व त्यांच्या एक्झिक्युटीव्ह कौन्सिलर्सना ती अट मान्य झाली नाही व समेट मोडला. ' दास रीडींग ' हा जो एक ऐतिहासिक करार झाला असतां तो होऊं शकला नाही व प्रांतिक स्वायत्ततेची शिकार हातची गेली. जी प्रांतिक स्वायत्तता १९३५ च्या कायद्यान्वयें मिळाली व त्यानुरुप राज्यकारभार १९४६ पर्यंत चालला ती स्वायत्तता १९२१--२२ मधे मिळाली असती व देशाचं पाऊल त्या वेळपासूनच पुढे पडायला लागलं असतं. दोन व्यक्तींच्या सुटकेकरिता देशाची, कांही वर्षपर्यंत का होईना, हानी झाली. व्यक्ति मोठ्या की देश मोठा हा प्रश्न समोर उभा राहतो. महात्माजींनी मौ. महम्मद अली व मौ. शौकत अली ह्यांच्या सुटकेसंबंधीची अट सुरवातीसच लार्ड रीडींग व त्यांचे सल्लागार व दे. दास यांना कां कळविली नाही हे एक गूढच आहे. दोन्ही बाजूच्या अटी एकमेकांस मान्य झाल्यावर मग गांधीजींनीं ऐन वेळीं ही एक आणखी अट लादण्यांत त्यांचा काय मतलब होता असे विचार मनांत येतात.

### दे. दास यांची तुरुंगात रवानगी

दे. दास व लार्ड रीडींग ह्यांचें समेटाचें बोलणें फसल्यानंतर सरकारच्या दृष्टीनं प्रिन्स आफ वेल्सचा बहिष्कार सिद्धीस जाऊं नये, निदान त्याचा जोर

तरी खूपच कमी व्हावा ह्या करिता एकच मार्ग शिल्लक राहिला होता. तो म्हणजे बहिष्कार चळवळीचीं सर्व सूत्रें ज्याच्या हातांत त्या दे. दास बाबूंची प्रिन्स आफ वेल्स कलकत्त्यास जाण्याचे पूर्वी तुरूंगांत रवानगी करणें. तें त्यांनी केलं व दे. दासबाबूबरोबरच दासबाबूंचे प्रमुख कार्यकर्ते ह्यांनाही तुरूंगांत पाठविण्यांत आलं. पण सरकारच्या ह्या चालबाजीमुळे राजपुत्रावरील बहिष्कार थंड न होता आणखी पेटला. ठिकठिकाणीं बंडाळी सुरू झालीं व म्हणून प्रिन्स आफ वेल्सची स्वारी सरकारी गोषांतून ठिकठिकाणीं मिरवण्यांत येत होती.

## नागपुरांत प्रिन्स आफ वेल्सचा सत्कार पड्याआड

नागपुरांतही प्रिन्स आफ वेल्स आलेत. सरकारनेही त्यांच्या स्वागताची खूप तयारी केली. स्टेशन शृंगारलें. सीव्हील स्टेशनमधे कमानी उभारल्या. राजपुत्र जाण्याच्या रस्त्यानं लोक जमावेत म्हणून सरकारकडून प्रयत्नही करण्यांत आले. ह्या वेळच्या मध्यप्रांत सरकारची रचना (Constituted) अशी होती. गव्हर्नर सर फ्रयांक स्लाय आय्. सी. एस्. सर्व्हिसमधील गृहस्थ. त्यांनी ह्या प्रांतांत एस्. डी. ओ. च्या जागेपासून सुरवात केली होती. सर मोरोपंत जोशी एक नांवाजलेले अडव्होकेट व उदारमतवादी पक्षाचे (Liberal Party चे) ह्या प्रांतांतील शाखेचे एक प्रमुख आधारस्तंभ व सार्वजनिक कार्यकर्ते. ह्यांच्या बरोबर काम करणाऱ्या मिनिस्टर्स पैकी एक रा. ब. नारायणराव केळकर हे हुशार, अनुभवी व मेहनती मंत्री, दुसरे मंत्री शंकरराव चिटणवीस श्रीमान व जमीनदार गृहस्थ. हे दोघही उदारमतवादी (Liberal) पक्षाचे सभासद व Administration चा बराच अनुभव मिळविलेले. हिफाझत अली ह्या नांवाचे एक मुसलमान वकील तिसरे मंत्री व एक इंग्रज Executive Councillor. असं हे प्रांतिक सरकार. तनि उदारमतवादी पक्षाचे व राजकारणांत बरेच मुरलेले. सर मोरोपंत जोशी ह्यांच्याकडे (Law and order) खाते. ठिकठिकाणीं झालेल्या दंग्याच्या अनुभवावरून व प्रांतांतलि राजकीय वातावरण लक्षांत घेऊन मध्यप्रांत सरकारनं राजपुत्राला सीव्हील स्टेशनमधूनच गव्हर्नरच्या बंगल्यावर नेलं. प्रिन्स आफ वेल्सचा अडेजाव बडेजाव झाला नाही. त्याच प्रमाणं दंगेधोपेही

झाले नाहीत व नागपूरकरांनी महात्माजीवर उपवास करण्याचा प्रसंगही येऊं दिला नाही. दंगे धोपे होण्याजोगी परिस्थिति उत्पन्न झाली नाही ह्याचें बरेचसें श्रेय सर फ्रयांक स्लाय व उदारमतवादी पक्षाचे सभासद ह्यांना दिल्यास वावगें होणार नाही. इरेसच पेटते तर रक्तपात झाल्याशिवाय राहताना. प्रिन्स ऑफ वेल्सचा जो काय सत्कार व खानापिना, पार्ट्या, नाच, वगैरे झालेत ते सर्व तेलंखेडीच्या बगीचांतील बंगल्यांत.

## त्राहि भगवन्

सरकारच्या विरुद्ध लोकांची बहिष्काराची चळवळ खूप जोराने चाललीच होती. तिची आच सरकारला झोंबलीच होती. त्यानंतर प्रिन्स आफ वेल्सच्या नाकाला मिरच्या झोंबतील असा अपूर्व बहिष्कार. मग काय? सरकारी नोकर चवताळले, पिसाळले. त्यांनी गांधी टोपीवाल्यांचा व खादी वापरणेंवाल्यांचा चावा घेण्यास सुरवात केली. कांग्रेसवाल्यांचा अपमान करणें, गांधी टोपी पायाखाली तुडवणें विद्यार्थ्यांच्या बापास की जे सरकारी नोकरींत असतील त्यांना व पेन्शनरांना तंबी देणें, खोटे फौजदारी मुकदमे करणें, कांग्रेसवाल्या श्रीमंत जमीदारांचा इनकमट्याक्स अव्वाच्या सव्वा करणें, अशा अनेक रीतींने लोकांना घाईस आणण्याचा आरंभ केला. लोकांना त्रासून सोडवण्याचा क्रम जोराने सुरू ठेवला.

केव्हा केव्हा मोठ मोठ्या जहागीरदारांची मोठी केविलवाणी स्थिती होई. सरकारच्या बाजूस रहावें तर कॉंग्रेस स्वयंसेवकांकडून त्रास होई. ते बहिष्काराचें शस्त्र उपसून घरकामांत गावगाड्याच्या कामांत अडथळे उत्पन्न करीत. बरं कॉंग्रेसकडून रहावं तर सरकारचें पोलीस खातं व इनकमट्याक्स खातं सूड घेई. इकडे आड तिकडे विहीर अशी कितीतरीदां बिचाऱ्यांची स्थिती होई. भंडारा जिल्ह्यांतील एका श्रीमंत जहागीरदाराची स्थिती अगदी अशी झाली. 'त्राहि भगवन्' म्हणण्यापर्यंत त्याची पाळी आली होती. मात्र कॉंग्रेसवाल्यांची मनःस्थिती सरकारनं आरंभिलेल्या चेष्टांना दाद न देण्याइतकी खंबीर होती.

## बारडोलीचें सत्याग्रहाचें पहिलें युद्ध

काँग्रेसनं चालविलेल्या ह्या असहकारितेच्या चळवळीस एक सारखा ऊत येऊं लागला होता. ती अगदी कळसास पोचली आहे असं दिसतांच महात्मा गांधींनी १९२२ चे जानेवारींत गुजराथमध्ये बारडोलीस सामुदायिक सत्याग्रह करण्याचें ठरविलं. महात्मा गांधी ह्याच्या सत्याग्रहाच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणं त्यांनी व्हाईसरायला पत्र लिहिलं कीं "मी सामुदायिक सत्याग्रह



महात्मा गांधी

करण्याचं ठरवलं आहे." हा सत्याग्रह ( No tax Campaign ) 'कर न देण्याचा,' स्वराज्य मिळविण्याचा असहकारितेच्या कार्यक्रमापैकीच एक भाग होता. कोर्टावर बहिष्कार, परदेशी मालावर बहिष्कार, शाळावर बहिष्कार इत्यादि असहकारितेच्या प्रकारापैकीच हा एक प्रकार, एक वर्षाच्या आंत स्वराज्य मिळवून देण्याच्या कार्यक्रमापैकी होता. आम्हाला स्वराज्य नाहीतर तुम्हाल कर नाही. No Swaraj No tax.

महात्माजींच्या कर न देण्याच्या चळवळीचा पुकारा झाल्याबरोबर सबंध हिंदुस्थानांतील लोकांना वाटलं कीं कॉंग्रेस व सरकार यांच्या युद्धास आता रंग चढणार. ठिकठिकाणीं कॉंग्रेसवाल्यांनी ह्या युद्धास मदत करण्याचा चंग बांधला. ह्या प्रांतांतही भंडारा जिल्हा शेतकरी परिषद १९२२ चे फेब्रुवारी महिन्याचे पहिल्या आठवड्यांत माझ्या अध्यक्षतेखाली झाली. एक वर्षांत स्वराज्य मिळावयाचं होतं. सर्व तऱ्हेच्या बहिष्कारांनी कॉंग्रेसवाल्यांनी लढाईचा प्रचार करून लोकांना सरकारशीं लढाई करण्याला तयार केलें होतं. महात्माजींनी बारडोलीला हल्ल्याला सुरवात केली कीं सबंध हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं ह्याच तऱ्हेचे सरकारवर चढाईचे हल्ले होणार होते. आणि हे असे हल्ले सगळीकडून एकदम झाले कीं सरकार कोंडीत सापडेल व मग सरकारला नाक मुठींत धरून यावं लागेल असं सर्वांना वाटत होतं. कांग्रेसवाले लढाई करण्यास अत्यंत उत्सुक होते. कांग्रेसेतर सरकारच्या धोरणास कंटाळले होतेच ते ह्या लढाईच्या बातम्या ऐकण्यास उत्सुक झाले होते. " सरकार - कांग्रेस " युद्धाचा निकाल काय लागतो इकडे सर्वांचे डोळे लागले होते.

## नशिबानें दगा दिला.

स्वराज्याकरिता कांग्रेसनं युद्धाची तयारी केली पण देशाचं दुर्दैव संपलं नव्हतं. आयत्यावेळीं नशीबानं दगा दिला. चौरीचौरा ( यु. पी ) इथे भयंकर दंगा झाला. कांही लोक प्राणाला मुकले. कांहींना भयंकर जखमा झाल्या. ह्या दंग्यामुळे महात्मा गांधींचा आत्मा कळवळला व त्यांनी १९२२ चे फेब्रुवारी महिन्याचे पहिल्या आठवड्यांतच सत्याग्रह युद्धास तोंड लागण्याचें पूर्वीच सत्याग्रह थांबविला. बारडोली गुजराथेंत व चौरीचौरा यु. पीं. त मग तेथील सत्याग्रहाशीं व येथील दंग्याशीं काय संबंध असे कोणाही मनुष्यास वाटणं साहाजिक आहे व असे कांग्रेसच्या त्या वेळच्या पुढाऱ्यासही वाटलं, नाही असं नाही. पण ज्याच्या शब्दावर लोक झुलत होते, ज्याच्या हिमतीवर व अनुभवावर सत्याग्रह चालवायचा त्या महात्माजींच्या शब्दास मान न देऊन कसं चालेल? सत्याग्रह थांबला. ह्याच वेळीं भंडारा जिल्हा शेतकरी परिषद तिरोडा येथे माझे अध्यक्षतेखाली झाली होती. (का. स. र. क. १ ला पा. १३८)

## शेतकऱ्यांचें राज्य कां असूं नये ?

बारडोलीचा सत्याग्रहाचा लढा लढणारे मुख्य शेतकरी. कर ( Tax ) जो द्यावयाचा नव्हता तो शेतसारा. केव्हाही लढाई म्हटली कीं त्यांत शेतकऱ्यांचा प्रमुख भाग असतो. लढणारे शेतकरी, अन्न उत्पन्न करणारे शेतकरी, दाणा रसद पोचवणारे शेतकरी, एवढेच नव्हे तर वेळ प्रसंगी दारुगोळयाच्या कारखान्यांत शेतकरी. अशी ही हिंदुस्थानांत शेकडा पाऊणशे शेतीवर उदर निर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यांची वर्गवारी. मग सरकार बनवण्याच्या कामांत, सरकार कायम ठेवण्यांत व सरकारला काढून लावण्याच्या कामांत त्यांचा हात असावा असें त्यास कां वाटूं नये ?

## कांग्रेसच्या सामर्थ्याला जोराची ओहोटी

समुद्राला भरती व ओहोटी येते, मूळ धरलेल्या जीवंत झाडाला पानं येतात व झडतातही, धांवत्या रेंगांचे आरे वरचे खालीं व खालचे वर होतात त्याच प्रमाणें जातिवंत व जिवंत संस्थेचेंही आहे. तिच्यावरही भलेबुरे प्रसंग येतात. हा बारडोलीचा सत्याग्रह थांबल्यानंतर कांग्रेसच्या सामर्थ्याच्या ओहोटीला सुरवात झाली. सरकारने महात्मा गांधींवर फौजदारी मुकद्दमा करून त्यांना तुरुंगांत डांबलें. ज्या वकीलांनी वकीली सोडल्या होत्या त्यांच्यापैकी बरेच कोर्टांत जाऊं लागले. त्यांनी वकीली सुरु केली. शाळा कॉलेजांतील विद्यार्थी फिरून सरकारी शाळांत व कालेजांत जाऊं लागले. ज्या राष्ट्रीय शाळा व जीं कॉलेजें अस्तित्वांत आलीं होतीं तीं कशीं तरी रडत खडतच चालूं लागलीं. दारूच्या दुकानांवरचें निरोधन बंद झालें. दारूचे हर्रास सर्रास होऊं लागले. मामुली कान्स्टेबलसुद्धा लोकांना दटाऊं लागला – आणि हे लोक तेच कीं जे डी. सी. कमीश्नरला सुद्धा भीत नसत. सरकारचा पूर्ववत जम बसला. सेनापति नाहीसा झाल्यानंतर सैन्यांतील शिपायांची जी स्थिती होते त्या प्रमाणे लोकांची स्थिती झाली. त्यांनी पुढे टाकलेला पाय मागे घेतला – नव्हे मोहरा बदलला. त्यांची हिम्मत खचली. असहकारितेच्या नाड्या थंड्या पडल्या. असहकारितेचं वादळ शांत झालं. सरकार नौका (State ship) विशेष नुकसान न होता आपला प्रवास सुखरूपपणे करूं लागली.

# सुदर्शन चक्र

**चरखा कीं- ?**

बारडोलीचा सामुदायिक सत्याग्रह महात्माजींनी थांबवल्यानंतर देशांत एक प्रकारची शिथिलता उत्पन्न झाली. तिचं वर्णन पूर्वीच्या प्रकरणांत आलंच आहे. तेव्हा काय करावं असा माझ्यापुढे प्रश्न आला. वकीली सोडल्यानंतर मी व बॅ. मोरुभाऊ अभ्यंकर दोघांनीहीं आपला वेळ, आपला उत्साह व आपलं तन मन धन सार्वजनिक चळवळींत खर्च करण्याचा निश्चय केला. मोरुभाऊनं कॉंग्रेस सांगेल तेंच काम करण्याचा निश्चय केला. दुसरं काम हातीं घेतलं नाही. कॉंग्रेसचा प्रोग्राम इतर चळवळी बंद झाल्यानंतर विधायक कार्यक्रम ( Constructive work ) करण्याचा होता. पण मोरुभाऊने कधी चरखा किंवा टकळी चालवली नाही व सुत काढलें नाही. हिंदुमुसलमानांची एकी खिलाफत चळवळीमुळे होतीच व तसं म्हटलं तर नागपूरांत बेकी कधीच नव्हती. तेव्हा ह्याही बाबतींत कांग्रेस कार्यकर्त्यास कांही करावयास पाहिजे होतं असं नव्हतं. अस्पृश्यता घालविण्याचा प्रश्न आस्ते आस्ते पूर्वीप्रमाणेच सोडविण्याचा प्रयत्न चालला होता. निव्वळ हिंदुमुसलमानांच्या एकीवर जोर देण्याकरिता - त्यावेळेस ह्या प्रांतांत आवश्यकता नसतांही - व अस्पृश्यता घालविण्याचे ठराव करण्याकरिता, चरखा चालवा सांगण्याकरितां परिषदा बोलावण्याची जरुरी नव्हती. परिषदा बोलावणें म्हणजे लोकांचा काळ, पैसा व उत्साह ह्यांचा अपव्यय करण्यासारखेंच होतें. निदान माझ्या वृत्तीला, स्वभावाला पटण्यासारखें कॉंग्रेसचें काम मला दिसलं नाही. माझं मन ज्यांत रमेल असं मला एकच काम दिसलं. त्याला कदाचित कॉंग्रेसचं काम असंही म्हणतां आलं नसतं. चरखा कधी हातीं धरलाच नव्हता. लाठी धरली होती व ती चालवण्याकरितां आधार म्हणून नाही तर स्वतःचा दुसऱ्यांच्या

हल्ल्यापासून बचाव करण्याकरिता. आणि असे हे प्रसंग व्यवहारांत – हा असतो धकाधकीचा मामला – यावयाचेच व माझ्यावर आलेही होते.

## केवळ शांतीपाठाने राज्यशकट चालत नाही

दोन व्यक्तींतले, किंवा दोन समुदायांतील व भिन्नधर्मीयांतील, व्यवहारांतील प्रश्न सदा सर्वदा सामोपचाराने सुटूं शकतील असा माझा अनुभव नव्हता व म्हणून विश्वासही नव्हता. एकाच धर्माचीं, एकाच संस्कृतीचीं माणसं जरी घेतलीं तरी त्यांच्यांतील वादाच्या सर्व गोष्टी चर्चा करून सामोपचारानं मिटतील अशी आशा करणं म्हणजे मृगजळाच्या पाठी मागं लागणं आहे. निव्वळ मानापानाच्या प्रश्नाकरितां, त्याच प्रमाणं क्षुल्लक फायद्याकरितां रणं माजतात, खून पडतात. आणि राज्यशकट चालविणं निव्वळ शांतीपाठीनं व सामोपचारानं तर अगदीच अशक्य !

श्रीकृष्णाची कौरवाकडची शिष्टाई विफल गेली. भारतीय युद्धावाचून गति उरली नाही. सर्व प्रश्न सामोपचारानं, आपसांत विचार विनिमय करून सुटतात असा जे गर्व वाहतात ते श्रीकृष्णापेक्षा श्रेष्ठ समजले पाहिजे ! ज्याला राज्य करावयाचें आहे त्याला शक्तीचा उपयोग करणें अवश्य आहे. अर्थात शक्तीचा उपयोग वेळ प्रसंग पाहून चांगल्याच कामाकरिता – स्वतःच्या, समाजाच्या किंवा राष्ट्राच्या बचावाकरिता – करावा म्हणजेच सात्विक कामाकरिता करावा. निरुपद्रवी माणसांना त्रास देण्याकरिता, परद्रव्य व परस्त्रीचा अपहार करण्याकरितां, शक्तीचा उपयोग करूं नये. तसा तो केला तर तिचा तो राक्षसी उपयोग होईल. श्री समर्थ ह्यांनी आपल्या अनुभवाचें सार अशा दासबोध ग्रंथांत म्हटलं आहेः–

धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला !
नानाबुद्धि शक्ताला ; म्हणोनि सिकवाव्या ॥
शक्त तो सर्वही भोगी । शक्तिविण दरीद्रता ॥
शक्तिनें मिळती राज्यें । युक्तिनें येत्न होतसे ॥
शक्ति युक्ति जिये ठायीं । तेथें श्रीमंत धावती ॥

निव्वळ युक्तीनं कांही होत नाही. युक्तीच्या पाठीमागं शक्तीचा पाठींबा पाहिजे.

असहकारितेच्या प्रचाराची विल्हेवाट लागल्यानंतर व दारूचें दुकाना-वरील निरोधनामुळे उत्पन्न व्हावयाचे स्वयंसेवकाचे खटले थांबल्यानंतर मी व्यायामाच्या व शारीरिक शिक्षणाच्या कामाकडे जास्त लक्ष देऊं लागलों. नागपुरांत होणाऱ्या कुस्तीच्या दंगलांत राजे लक्ष्मणराव भोंसले व नबाब न्याझुद्दीन खान ह्यांच्या बरोबरच तिसऱ्या दंगल अम्पायरचें काम मी फिरून करूं लागलों. दंगल अम्पायर असल्यामुळे निरनिराळ्या वस्तादांच्या ओळखी झाल्याच होत्या. त्यामुळे व नागपूर व्यायाम शाळेचा अध्यक्ष असल्यामुळे निरनिराळ्या आखाड्यांना भेटी देणं, वार्षिक समारंभांना म्हणजे आखाड्यांच्या पूजांना, गुरूपुजांना हजर असणं हें सुरूच होतं. ते आता जास्त प्रमाणावर होऊ लागलं

## च्यापमन विरूद्ध व्हिव्हियन बोस

१९२२ सालींच मी बॉयस्काऊटचे चळवळींत जिद्दीनं जीव तोडून भाग घेऊं लागलों व त्याला कारणही तसचं झालं. आमच्या राष्ट्रीय मंडळाच्या सार्वजनिक गणपत्युत्सवांत अडथळा उत्पन्न करणारे च्यापमन डी. सी. ( का. स. र. क. १ ला पान ९४ ) ह्यांच्यावर मात करण्याची संधि अनायासं चालून आली. मग ती व्यर्थ कां घालवा ? राष्ट्रीय मंडळाच्या गणपत्युत्सवांत अडथळा केल्यानंतर कांही वर्षांनी ह्या साहेबांची यवतमाळ इथं बदली झाली. त्या वेळेसही हे साहेब डी. सी. च होते व रिटायर्ड झाले तेव्हाही डी. सी. च. साहेब I. C. S. पण मठ्ठ डोक्याचा माणूस. ह्या साहेबांना आपल्याकडे चिल्लर एडमिनिस्ट्रेटीव्ह कामाखेरीज व विशेष दगदग ज्यांत नाही अशा रेव्हीन्यु अपिला खेरीज नागपूर येथे तरी दुसरें कोणतेंच कायद्याचें काम ठेवलें नव्हतें.

## लीग ऑफ ऑनरचा मुडदा पडला

ह्या विद्वान साहेबाची कारकीर्द यवतमाळला इतर दृष्टींनी कशी काय झाली तें माहित नाही. पण ह्या साहेब बहादुरांनी तिथे गेल्यानंतर एक 'लीग ऑफ ऑनर' काढली होती – असहकारितेच्या काळापूर्वी सरासरी कांही महिने. या लीगच्या मुलांना पोहण्याचें व इतर खेळ खेळण्याचं शिक्षण साहेब देत. मुलांत मिसळत पण हें सर्व करीत असतांना साहेब एका गोष्टीवर विशेष भर देत. ती म्हणजे राजनिष्ठेची शपथ. साहेबांना वाटत असावं मुलांना

(स्थळ

राजनिष्ठेची शपथ दिली व ती त्यांनी घेतली कीं ही असहकारितेची चळवळ थंड झालीच पाहिजे. विद्यार्थ्यांवाचून चळवळीचा प्रचार लंगडाच व्हायचा. उठल्या बसल्या दिवसांतून कितीदा तरी ही शपथ साहेब मुलांना देत.

सदा सर्वदा नुसती राजनिष्ठेची शपथ दिल्यानं शपथ घेणारे राजनिष्ठ वा सरकारनिष्ठ बनतात कां हा एक मानशास्त्रज्ञांनी विचार करण्यासारखा प्रश्न आहे. राज्यकर्त्यांनीहीं ह्या प्रश्नाची छाननी करणं जरूर आहे असं वाटतं. प्रजेनं सरकारला राजनिष्ठ राहणं हें राज्य हाकण्याच्या दृष्टीनं इष्ट आहे हें कोणीही कबूल करील. पण प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करून आम्हाला राजनिष्ठ रहा, आम्हाला राजनिष्ठ रहा असं कानीं कपाळीं ओरडून कितीही सांगितलं तरी तें घडून येणं कठीण आहे. हिंदुधर्म जग नश्वर आहे म्हणून सांगतो. देहावरची व द्रव्यावरची आसक्ति सोडा असा धर्म सांगतो. प्रत्येक दिवशीं प्रत्येकजण दिवसांतून एक दोनदां तरी दुसऱ्याशीं बोलतांना ह्या धार्मिक आज्ञेचा उच्चार करतो. मग किती जण आपलं द्रव्य समाजाच्या फायद्याकरितां खर्च करितात. कितीजण आपला प्राण समाजाच्या वा राष्ट्राच्या संरक्षणाकरितां देण्यास तयार होतात. पुराणांतलीं वांगीं पुराणांत असा परिणाम असल्या प्रचाराचा होतो. तेव्हा राज्यकर्त्यांनी प्रजेच्या कानीं कपाळीं राजनिष्ठ रहा म्हणून ओरडण्यापेक्षा त्यांना राजनिष्ठ बनविण्याकरिता दुसरे कोणते परिणामकारक मार्ग आहेत हे ठरविलं पाहिजे. सरकार जर आपल्या देशांतील जनतेचं कल्याण करील, स्वतःच्या फायद्यापेक्षा समाजाच्या प्राथमिक गरजा भागविल व स्वतःच्या फायद्यापेक्षा देशाच्या फायद्याकडे लक्ष देईल, सरकार व प्रजा यांत जर आत्मीयता उत्पन्न होईल तरच व्यक्ति व समाज राजनिष्ठ राहील.

श्री. व्हीव्हीयन बोस ( आताचे सुप्रीम कोर्ट न्यायाधीश ) ह्यांनी ह्या ' लीग आफ ऑनर ' वर ' हितवाद ' पत्रांतून खूप कोरडे ओढले. ते शिक्षण खात्यांतील व इतर इंग्रज सिव्हिलियन्स आफीसरांना खूपच झोंबले. नाकांतले केस जळण्यासारखी टीका होती ती. त्या वेळचे शिक्षण खात्याचे डायरेक्टर मी. मेह्यु श्री बोसांना त्यांच्या ह्या टीकेला अनुलक्षून म्हणाले, " नाश करणें सोपें असतें; विधायक कार्य करणें कठीण असते. मुलांना शिस्त लावण्याचे

दृष्टीने चालविलेली ही लीग म्हणून पाडली तर कराना काय करता तें. पाहूं काय दिवे लावतां!!" हें बोसांना आव्हान होतें. ते मला भेटले व त्यांनी 'लीग आफ आनर' वर केलेली टीका व मि. मेह्यु यांचें आव्हान ह्यांची कल्पना दिली. त्यांनी मला म्हटलं कीं त्यांनी बॉयस्काऊटची चळवळ मि. मेह्यु ह्यांच्या आव्हानाला उत्तर म्हणून सुरू केली होती तर मी तींत त्यांना मदत करावी.

त्यांना आमचा व च्यापमन साहेबांचा ऋणानुबंध माहित नव्हता. पण मला त्याचा विसर पडला नव्हता. च्यापमन साहेबाची खुळचट चळवळ मुळासकट काढून टाकता येतेना. बस! तेवढंच मला पुरे होतं. च्यापमन साहेबाला शह देण्याची संधि वाया कां जाऊं द्या! वास्तविक काम जरा कठीणच होतं! कारण कोणतीही परकीय संस्था किंवा तिच्या मार्फत किंवा तिला अनुकूल असलेली चळवळ करणं असहकारितेच्या दिवसांत जडच होतं. पण १९२२ च्या फेब्रुवारी नंतर असहकारितेचा पूर कमी होऊं लागला होता. शाळेवरचा मुलांचा बहिष्कार निघून गेला होता व इतरही बहिष्काराचा जोर फारच कमी झाला होता. जवळ जवळ सर्वच बहिष्कार संपुष्टांत आले होते असं म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. आणि माझ्या पाठीशीं मी वकीली सोडल्याची पुण्याई अजूनही होती. तेव्हा परिस्थिती मी बॉयस्काउट चळवळ हातीं घेण्यासारखी होती. अगदी अनुकूल. माझ्यावर कोणालाही टीका करणं जडच गेलं असतं.

'बॉयस्काऊट' चळवळीला जोराची चालना देण्याच्या हेतूनं मी टाऊन हॉलमध्ये 'बॉयस्काऊट' वर व्याख्यानं देण्याचं ठरवलं व त्या प्रमाणं मी श्री. बोस ह्यांना सांगितलं. नागपूरच्या Y. M. C. A. शीं संबंध असलेले मि. मॉड ह्या नांवाचे एक कानडेयीन गृहस्थ, श्री. बोस ह्यांचे स्नेही, ह्यांनी बॉयस्काउटस् संबंधी म्याजिक ल्यान्टर्नचीं चित्रं व्याखानाचे वेळी आणण्याचं श्री. बोसांना कबूल केलं. ह्या म्याजिक ल्यान्टर्नच्या चित्रांत बॉयस्काउटस्नी १९१४ ते १९१८ च्या युद्धांत जीं समुद्रकिनाऱ्यावर युद्धाचीं ठिकाणं होतीं त्यांच्या रक्षणाची व शत्रूच्या हालचाली कळविण्याची कामगिरी ब्रिटनमधे उत्कृष्ट रीतीनं केली तीं दाखविलीं होतीं. राष्ट्राच्या संरक्षणाची महत्त्वाची

जबाबदारी उचलणारी तरुण पिढी तयार करणारी ही संस्था व हें शिक्षण आहे असं दाखवून देतां आलं. त्यांनी केलेलीं कामें अचाट धैर्याचीं होतीं. व्यायाम प्रेमी माणसांना अशा ह्या संस्थेबद्दल आदर व आनंद वाटणं साहजिक होतं. ही चळवळ मुलांमध्ये समयसूचकता, कार्यप्रेरकता, चातुर्य, सहनशीलता व समाजसेवा इत्यादि आवश्यक गुणांचा प्रादुर्भाव करिते व त्यांना वाढीला लावते हें मी श्रोत्यांना पटवून दिलं. नागपूर व्यायाम शाळेशीं अध्यक्ष ह्या नात्यानं माझा संबंध असल्यामुळं श्री. अण्णा खोत व व्यायाम शाळेशीं संबंध असलेली इतर मंडळी ह्यांचीही ही चळवळ फैलावण्यांत मला मदत झाली. Scouts Rallies होऊं लागल्या. मी व श्री. खोत ह्यांना हजर राहूं लागलों. श्री. बोस ह्यांनी स्काऊट मास्टरच्या कामापासून सुरवात केली. ही चळवळ प्रांतांत फोफावूं लागली. च्यापमन साहेबांच्या ‘ लीग ऑफ आनरने ’ त्यांच्या समक्षच ‘ राम ’ म्हटला.

## बॉयस्काऊट चळवळीशीं संबंध कां सोडला ?

मी ह्या बॉयस्काऊटच्या चळवळींत सरासरी दोन वर्षे भाग घेतला. या काळांत मी श्री. बोसांना सुचविलें कीं स्वतंत्र राष्ट्रें किंवा कानडा वगैरे स्वायत्त वसाहती प्रमाणे हिंदुस्थानचाही विशेष रंगाचा व चिन्हाचा स्वतंत्र राष्ट्रीय ध्वज आहे, ( त्या वेळचा तिरंगी झेंडा ) त्याला मान्यता मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न करावा. ह्या वेळेस श्री. बोस ह्या प्रांतांतील स्काऊटस असोसिएशनचे सेक्रेटरी होते. ध्वजासंबंधी जसा प्रयत्न करायचा तसाच त्यांनी हिंदुस्थानापुरता तरी चमूनी घ्यावयाच्या शपथेंत फरक करून घ्यावा. इंग्लंड देशांत किंवा त्या देशाच्या वसाहतींत राजाबद्दलच्या व देशाबद्दलच्या कर्तव्यांत प्रामुख्य कशास द्यावें या बद्दल मतभेद राहणार नाही. कारण राजा व देश ह्यांच्या बाबतींतील कर्तव्यांत भिन्नता उत्पन्न होणार नाही. पण हिंदुस्तानांतील परिस्थितीला अनुकूल अशी शपथेची रचना असावी. श्री. व्हीव्हीयन बोस ‘ यांनी कलकत्याच्या मुख्य कार्यालयाशीं पत्रव्यवहार करतों’ म्हणून सांगितलं. त्यांनी तसा पत्रव्यवहार केल्यानंतर त्यांना जें उत्तर आलं ते मला अनुकूल वाटलं नाही. उत्तर अशा अर्थाचं होतं कीं शपथेंत बदल करतां येणें शक्य नाही; ध्वजाच्या बाबतींत इच्छा असल्यास युनियन ज्याकच्या क्रयागमधेच हिंदुस्थानच्या

विशिष्ट झेंड्याचा एका कोपऱ्यांत अंतर्भाव करिता येईल. ही चळवळ जरी मुलांचें चारित्र्य बनविण्याच्य दृष्टीनं उपयुक्त व उत्तेजन देण्यासारखी वाटली तरी ह्या मला मिळालेल्या उत्तरानंतर तिच्याशीं असलेला माझा संबंध मी सोडला.

## फक्त पहिलवानांचीच एक सार्वजनिक सभा

उदारामजी पहेलवान यास १९२१ सालांत पोलीसांच्या हातांतून पळून गेल्याच्या गुन्ह्याबद्दल तुरुंगांत जावं लागल होतं. ते १९२२ चे अखेरी नागपूरचे तुरुंगांतून शिक्षा भोगून सुटून आले. सुटून आल्यानंतर थोडेच दिवसांनी ते मला भेटावयास आले. त्यांच्या प्रकृति संबंधी चांकशी केल्यानंतर मी त्यांना म्हटलं कीं सर्व आखाडेवाल्यांना उद्देशून मला भाषण करावयाचं आहे. आखाडेवाल्यांचीच एखादी परिषद भरविली किंवा तें नच जमलं तर एखादी फक्त आखाडेवाल्यांचीच सार्वजनिक सभा भरविली तर ठीक होईल. त्यांनी टाऊन हालमध्ये पेशेवाल्या आखाडेवाल्यांची सार्वजनिक सभा बोलावतो म्हणून कबूल केलं व म्हटल्याप्रमाणे त्यांनी एक सार्वजनिक सभा नागपुरचे टाऊन हालमध्ये बोलाविली. ह्या सभेचे अध्यक्ष डॉ. परांजपे होते. मी पहेलवानांना उद्देशून भाषण केलं ' ते महाराष्ट्र ' वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालं आहे. त्याचा थोडक्यात सारांश असाः ' आपल्याला माहितच आहे कीं सरकार व सुशिक्षित गृहस्थ ह्यांचे आपणांबद्दल चांगलं मत नाही. पहिलवान म्हटला कीं तो दारुबाज, जुव्वेबाज इत्यादि दुर्गुणांचा पुतळा असा त्यांचा ग्रह झालेला आहे. सर्वच पहेलवान दुर्गुणी आहेत असं समजणाऱ्यापैकी मी नाहीं. तरीपण बरीचशी मंडळी आपल्या शक्तीचा सदुपयोग करीत नाहीत असं मोठ्या खेदानं म्हणावं लागतं – मला माझ्या वकीलीच्या पेशांत – मी वकिली करीत होतों तेव्हा – असं दिसून आलं कीं शेतांचा कबजा घेण्यास व जुगार चालविण्यास लोक ह्यांना पैसे देऊन ह्यांची मदत घेतात व ते देतात. ह्यांनी आपली शक्ति जर समाजाचं व देशाचं कार्य करण्यांत खर्च केली, सद्वर्तनानं वागून आपल्या कलेचा जर देशांत सुशिक्षितांत प्रचार केला तर त्यांची इज्जत वाढेल व त्यांची वाहवा होईल. कांही वर्षांपूर्वी आपल्याकडे गवय्ये, बजवय्ये व नट ह्यांना हीन म्हणजे कमी दर्जाचे समजण्यांत येत असे. कारण

आनुक्रम ९८९५ दि. ४-२-२

त्यांचे पैकी बहुतेक व्यसनाधीन असत. हें मी स्वानुभवावरुन सांगतों. पण सरासरी पंधरा वर्षांपासून पंडित दिगंबर पलुसकर यांनी आपले आचार व चारित्र्य ह्यांच्या जोरावर सुशिक्षित लोकांची मनें आपल्याकडे ओढून घेतली व गायन कलेचा प्रचार सुशिक्षित वर्गांत केला. गाणाऱ्यांची प्रतिष्ठा वाढविली. त्यांनी अनेक आधुनिक पद्धतीच्या गायनशाळा ठिकठिकाणीं काढल्या. मी, डॉ. परांजपे व आमचे इतर स्नेही यांनी नागपुरांत 'नागपुर व्यायाम शाळा' सुरू केली आहे. तिचा व इतर आधुनिक व्यायाम शाळांचा उद्देश व्यायाम विशारद लोकांचा दर्जा वाढवावा हा आहे. पाश्चात्य देशांत धंदेवाईक मल्ल व खेळाडू यांना फार मान मिळतो. ह्या हिंदुस्थान देशांतही ह्या लोकांना मानाचं स्थान मिळवून द्यावं अशी माझी इच्छा आहे. आपण आम्हाला मदत करावी.'

ह्या वेळी मी नागपूर म्युनिसिपल कमिटीचा एक सभासद होतों. पदवीधरांनी त्यांच्यातर्फे निवडून दिलेला प्रतिनिधी. सभा आटोपल्यानंतर कांही वेळाने एक वकील रस्त्यानं भटला व त्यांनी मला प्रश्न टाकला 'आपण प्रतिनिधी ग्रॅज्युएटांचे कीं पहिलवानांचे?' मी म्हणालों 'दोघांचाही.' ह्या सभेनंतर दोनच वर्षांनी कांही पहेलवान कॉंग्रेसमध्ये आलेत व एकाच दशकांत जिल्हा कौन्सिलें व म्युनिसिपालीट्या सारख्या संस्थांत व प्रांतिक कायदे कौन्सिलांत थोडंबहुत शिकलेली पहिलवान मंडळीही निवडून येऊ लागली.

## सत्याग्रह करा नाहीतर कौन्सिल बहिष्कार उठवा

बारडोली येथील सामुदायिक सत्याग्रह बंद केल्यानंतर देशांत कोणत्याही तऱ्हेची कॉंग्रेसची उत्साहवर्धक अशी चळवळ सबंध १९२२ सालांत नव्हती. कांही तरी कांग्रेसची जोरकस चळवळ लोकांसमोर ठेऊन लोकांचा आत्मविश्वास फिरून जागृत करण्याच्या विचारांत कांही कांग्रेस पुढारी होते. लोकांना कांहीतरी उत्तेजक असं काम देऊन त्यांना कार्यप्रवृत्त करणं जरूर होतं. कांही पुढाऱ्यांना विव्वळ स्वस्थ बसवेना. दे. दास व पं. मोतीलाल नेहरू हे कांही चरखा चालविणारे नव्हते. त्यांनी हजारों रुपयांचा आपला वकीलीचा धंदा सोडला होता तो कांहीं चरखा चालविण्याकरिता किंवा हात

जोडून स्वस्थ बसण्याकरितां सोडला नव्हता. त्यांनी म्हणायला सुरवात केली ‘ सत्याग्रह तरी करा नाहीतर कौन्सिल बहिष्कार तरी उठवा. ’ सत्याग्रह करण्यासारखी परिस्थिती आहे कीं नाही वगैरे ठरविण्याकरितां एक ‘ सीव्हील डीसओबिडियन्स इन्क्वायरी कमिटी ’ नेमली. आजचं मरणं उद्यावर गेलं. कौन्सिल बहिष्कार तितकेंच दिवस कायम राहिला. सत्याग्रह करणं तितकंच लांबणीवर पडलं. कमिटी नेमण्याच्या नेहमीच्याच युक्त्या ह्या. रिपोर्ट कांही दिवसांनी येणार. मग रिपोर्ट विचारांत घेतला जाईलच, किंवा घेतला तरी किती दिवसांनी ह्याचा कांही नेम नसतो. कमिटी संबंधीच्या कल्पना आम्ही इंग्रज राज्यकर्ते यांच्या जवळून उचलल्या. त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेऊन चालूं लागलों. पुष्कळ वेळां कांही करायचं नसलं म्हणजे कमिट्या नेमायच्या. निदान कोणतंही अप्रिय असं काम करायच नसलं किंवा असलं तरी वेळ लावायचा असला की नेमून टाकावी कमिटी.

ह्या सीव्हील डीस ओबिडियन्स इन्क्वायरी कमिटीसमोर बॅ. मोरुभाऊ अभ्यंकर, डॉ. मुंजे व लोकनायक बापुजी अणे यांच मत पडलं कीं सत्याग्रह करण्यासारखी परिस्थिती नाही व म्हणून कौन्सीलवरील बहिष्कार उठवणं आवश्यक आहे. कौन्सिलमधूनच सरकारशीं लढणं शक्य आहे. सि. डि. कमेटिनं केलेल्या रिपोर्टावर दुमत व म्हणून तेव्हा पासूनच कौन्सिल प्रवेशासंबंधी प्रांतांत लोकमत तयार होऊं लागलं. ह्या नंतर लौकरच गया येथे १९२२ मध्ये कांग्रेसचं अधिवेशन भरलं व त्या अधिवेशनांत कौन्सिल प्रवेशाच्या प्रश्नावर कांग्रेसवाल्यांत दोन तट पडले. गया कांग्रेसचे अध्यक्ष दे. दास ह्यांनी कौन्सिलबहिष्काराचा ठराव बहुमताने पास झाल्यावर आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

दे. दास व पंडित मोतीलाल नेहरू ह्यांनी कौन्सिल प्रवेशाला अनुकूल असणाऱ्यांची एक पार्टी काढण्याची गयेसच चळवळ सुरू केली. ह्या पार्टीलाच विठ्ठलभाई पटेल हेही येऊन मिळाले. नवीन पार्टीचं नांव ‘ खिलाफत स्वराज्य पार्टी ’. पण ही पार्टी ‘ स्वराज्य ’ पार्टी ह्या सुटसुटीत नांवानंच संबोधल्या जाऊं लागली. पार्टीचा उद्देश ‘ स्वराज्य ’ मिळविण्याचा, खिलाफत कायम ठेवण्याचा व पंजाबमध्ये जे अत्याचार झाले होते त्या संबंधी योग्य ती कारवाई

करण्याचा होता. स्वराज्य पार्टीचा म्यानिफेस्टो होता त्यावर अभ्यंकर व मी दोघांनीही गयेसच सह्या केल्या.

**मालवीयजींच्या मनांत काय शिजत होतं**

गया येथील कांग्रेस आटोपल्यानंतर मी गयेहून नागपुरास येण्यास रेल्वेने निघालों. पंडित मदन मोहन मालवीयजी , तात्यासाहेब केळकर ( पुणें ), मी व कदाचित आणखी एखादा गृहस्थ इतकेच एका डब्यांत होतों. स्वराज्य पार्टी-संबंधी गोष्टी झाल्या. ह्या पार्टीला अनुकूलच होते ते. ह्या गोष्टी झाल्यानंतर त्यांनी अत्यंत महत्वाच्या गोष्टीसंबंधी भाषणास सुरवात केली:



**पं. मालवीयजी**

पं:— ( मला व तात्यासाहेबांना उद्देशून ) तुमच्या प्रांतांत मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा काय आहे ?

मी:— चौदा वर्षांपासून अठरा वर्षांपावेतों मुलींचं लग्न करण्याची रुढी पडल्यासारखी आहे.

के:— मुंबईपुण्याकडे उच्च शिक्षणामुळे ( College Education ) मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा विसाच्याही पुढे गेली आहे.

पं:— तुमच्या प्रांतांत मुलगी एवढी वाढवली तर मुलीच्या बापाविरुद्ध त्याच्या जातीचे लोक काही काहूर उठवित नाहींत ? त्या मनुष्याला बहिष्कृत करीत नाहीत का ?

मी:— लोकांना हल्ली तरी त्या बाबतींत विशेष कांही वाटत नाही, असा माझा अनुभव आहे.

के:— ती कांही आमच्याकडे नवलाची गोष्ट राहिली नाही. मुलांना चांगल्या सुशिक्षित मुलींशीं लग्न करावयाचें असतें. मुलाचे वडीलही आजकाल मुलाच्या पसंती नापसंती लक्षांत घेतात. मुलीच्या वडीलालाही ही गोष्ट आता कळून चुकली आहे. तेव्हा तो मुलीला कॉलेज शिक्षण देतो. निदान हायस्कूल शिक्षण तर देतोच देतो. तेव्हा साहजिकच मुलीच्या लग्नाची वयोमर्यादा वाढली. आणि हा सर्वसाधारण नियम झाला आहे. तेव्हा कोण कोणाला बहिष्कारांत टाकणार ?

पं:— माझी मुलगी आठ वर्षांची होती तेव्हापासूनच माझ्या पत्नीला तिच्या लग्नाचीं फिकीर पडली होती व ती बेचेन होती. तिला लोकापवादाची व बहिष्काराची भीति होती. आमची मालवीय ब्राम्हणांची जात फारच लहान. त्यांतही सर्व धार्मिक बंधनं पाळून योग्य घराणं व मुलगा मिळणं म्हणजे मोठी मुष्कीलीची गोष्ट. अखेरीस पहातां पहातां दोन वर्षानंतर म्हणजे मुलीच्या वयाच्या १० वे वर्षीं लग्न झालं. माझ्या पत्नीला किती आनंद झाला म्हणून सांगू तुम्हाला! बरं तुमच्याकडे विधवांच्या पुनर्विवाहाला मज्जाव आहे का ?

मी:— ब्राम्हण व मराठा क्षत्रिय जाती वगळून बाकीच्या जातींत विधवांच्या पुनर्विवाहाला मज्जाव नाही. अशा विवाहास ‘ पाट ’ म्हणतात.

के:— ब्राम्हण जातींतही मुंबईपुण्याकडे अशा विवाहास कांही वर्षांपासून सुरवात झाली आहे. अर्थात अशा विवाहाची संख्या फारच कमी.

पं:-- पण पुनर्विवाह करणाऱ्यावर बहिष्कार टाकल्या जातो कीं काय ? बहिष्कार टाकल्यास तो त्यांना कितपत जाणवतो ?

मीः— समाज इतका सुशिक्षित व संयम पाळणारा झा । आहे कीं तो ह्या गोष्टी लक्षांतच घेत नाही. पाहिजे तर तो ह्या बाबतींत उदासीन आहे म्हणाना! क्वचित पुनर्विवाहीत बाईला इतर बायां ठीक वागवत नाहीत. त्यांची ह्या बायांशीं वर्तणूक अपमानकारक असते.

पंः— यु. पी. मध्ये तर ब्राम्हणेतर समाजांतही पुनर्विवाहाची चाल नाही. बरं तुमच्या प्रांतांत बाटलेल्या हिंदुला त्याची खुशी असल्यास मुसलमानाचा हिंदु होता येते कां? अशा मुसलमानांना हिंदु करून घेणार कोणी आहेत का तिकडे?

मीः— मुसलमानांना हिंदु करून घेणारे जवळ जवळ कोणी नाहीतच असं म्हटलं तरी चालेल. ख्रिश्चन धर्मीयांना हिंदु करून घेणारे एक गजाननराव वैद्य ह्या नांवाचे गृहस्थ मुंबईला आहेत.

पंः— ( त्यांच्याजवळच असलेल्या एका ट्रंककडे बोट दाखवून ) ह्या ट्रंकमध्ये मी म्हणतों अशा रीतांचे कितीतरी मुसलमानांचे अर्ज माझ्याकडे हिंदु होण्याकरितां आले आहेत. मुसलमानांचे सबंध गावच्या गाव मुसलमानांचे हिंदु होण्यास तयार आहे.

मीः— कोणत्या गावचे लोक आहेत ते?

पंः— हे लोक मलकाना रजपूत आहेत. मी पहातों आहे असा कोणीतरी साधु पुरूष कीं जो ह्या सर्व लोकांना हिंदुधर्माची दीक्षा देईल. पण अजून कोणी भेटला नाही. एखादा हिम्मतबाज साधुपुरूष भेटायला पाहिजे.

मीः— साधुपुरूष पाहिजे हे मी समजूं शकतों. पण हिम्मतबाज!

पंः— हिम्मतबाज अशा करितां कीं जा हें काम हातीं घेईल त्याला तें काम करण्याकारतां तळहातावर शीर घ्यायला पाहिजे. त्याला मुसलमानांपासून धाका राहील.

मीः— म्हणजे अशा धाकामुळे ज्या मुसलमानाला इच्छा आहे कीं आपण हिंदु व्हावं त्याला जबरदस्तानं मुसलमानच रहावं लागणार. अगदीं मनाच्या विरुद्ध असताहि?

पंः— हो असं आहे खरं. मुसलमानांना इतरांना बाटवून आपली जमात वाढवावी असं वाटतं. पण जमातींतून कोणीही बाहेर पडणं आवडत

नाही. माझ्या मनांत आणखीही एक गोष्ट आहे ती बोलून टाकाविशी वाटते. ती म्हणजे गया बुद्ध लोकांच्या स्वाधीन करावयाची. तिथली जीं बुद्धाचीं देवळें आहेत त्यांची सर्व व्यवस्था बुद्ध लोकांकडे देऊन टाकावी. तें एक बुद्ध लोकांचं पवित्रस्थान – जसं हिंदुंच काशी, मुसलमानोंचं मक्का, ख्रिस्ति लोकांचं जेरुसलेम – ह्या प्रमाणे करावं म्हणजे चीनचा, जपानचा व आपला स्नेहसंबंध वाढेल. परस्परांची एकमेकांबद्दल सहानुभूति राहील.

के:— कल्पना कांही वाईट नाही. घडून आल्यास उत्तम.

मी:— असं घडून येण्याला कोणती अडचण आहे ?

पं:— अडचण येते आहे महंताकडून. ते लोक हीं देवळं आपलीं खाजगी मालमत्ता समजतात. ती त्यांची उत्पन्नाची बाब आहे. त्यांना स्वार्था-पलीकडे कांही दिसत नाही. तूर्त तरी ते माझी गोष्ट ऐकायला तयार नाहीत.

कांही दिवसांनी मलकाना राजपुतांची शुद्धी स्वामी श्रद्धानंद यांनी केली व त्या कार्यामुळे त्यांना आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागली. एका मुसलमानाने त्यांचा खून केला.

पंडीत मालवीयजींची जी बुद्धधर्मीय राष्ट्राची सहानुभूति मिळविण्याची कल्पना होती तिचे परिणाम बरेच दूरवर जाण्यासारखे होते. सन १९२२ सालांत बर्मा हिंदुस्थानांतच मोडत होता. तो १९३५ नंतर हिंदुस्थानापासून अलग झाला. बर्मा बुद्धधर्मीय, चायना व टिबेट बुद्धधर्मीयच, सयाम बुद्ध-धर्मीय व जपानही त्याच धर्माचा. म्हणजे पांच राष्ट्रें ज्यांची संस्कृति हिंदु संस्कृतिपासून उत्पन्न झालेली व ज्यांचा धर्म हिंदुधर्मापासून उत्पन्न झालेला त्या पांच राष्ट्रांचा गट हिंदुस्थानच्या पूर्वेस हिंदुस्थानच्या पश्चिमेस असलेल्या मुसलमानी राष्ट्रांच्या, ज्यांचा एक गट पान इस्लामीझमच्या प्रचारामुळे बनविल्या जात होता त्यांच्या विरुद्ध समतोलपणा ( Balance ) राखण्याच्या कामीं पडला असता. त्यांच्या गया ह्या पवित्र स्थानांवर आक्रमण करण्याचा कोणाही राष्ट्राने इरादा केला असता तर हीं पांच राष्ट्रें एक जुटीने मधे पडतीं. पान इस्लामीझममुळे ज्या हिंदुंच्या मनांत धास्ती उत्पन्न झाली

असेल त्यांच्या मनांतली ती धास्ती घालविण्याचा, हा गट उत्पन्न करणें एक उपाय होता.

## प्रांतिक खेळांचे सामने

मी गयेहून नागपूरास आलों व लगेच माझ्या आवडीचें शारीरिक व्यायाम प्रचाराचें काम हातीं घेतलें. मध्यप्रांतांत व वऱ्हाड प्रांतांतील सुशिक्षित मंडळींत व्यायामाचा कितपत प्रचार झाला आहे हें जाणण्याकरितां व सुशिक्षित मंडळींनी ज्या व्यायामशाळा काढल्या होत्या त्यांचा एकमेकांना परिचय व्हावा म्हणून 'नागपुर व्यायामशाळेच्या' कार्यकारी मंडळापैकी आम्हीं-मी, डॉ. परांजपे व कै. अण्णा खोत- व दास मंडळाच्या कार्यकारी मंडळापैकी श्री. गाडगीळ व कृष्णा पाटील ह्यांनी विचार विनिमय करून मध्यप्रांत वऱ्हाडचे प्रांतिक खेळांचे सामने नागपूरांत १९२३ च्या फेब्रुवारी महिन्यांत भरविण्याचें ठरविलें. सामने भरविण्यांत वर सांगितलेल्या उद्देशाशिवाय आणखीही एक हेतु होता. निरनिराळ्या व्यायामशाळांतील खेळांत सुत्रबद्धता आणणें, त्यांच्या संबंधी नियम करणें व ते सर्व व्यायामशाळांतून अमलांत आणले जातील अशी व्यवस्था करणें हाही एक हेतु होता.

आम्ही प्रांतिक सामने भरवणार आहोंत ही गोष्ट डॉ. मुंजे यांचे कानावर गेली. त्यांनी मला बोलावून सांगितलं "सामने नीट रीतीने पार पाडण्याकरितां जी एखादी कमिटी तुम्ही बनवाल त्यांत राजेबहादुर रघोजीराव भोंसले, त्याच प्रमाणे राजे लक्ष्मणराव भोंसले व सर गंगाधरराव चिटणवीस ह्यांना घ्या. ह्यांची योजना अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या जागीं करा. मी हें घडवून आणण्याकरितां प्रयत्न करितों." मी ती सूचना मान्य केली.

कोणतेंही काम हातीं घेतलं कीं तें सिद्धीस नेण्यास द्रव्याची गरज लागते. नागपुरांतील व्यायामप्रेमी सज्जनांनी द्रव्याचीही मदत बरी केली. ह्या मदत करणाऱ्यांत कै. माधवराव किनखेडे वकील होते. त्यांचा उत्साह व कळकळ दांडगी होती. मी त्यांच्याकडे वर्गणी मागण्यास गेलों असतां त्यांचे व माझे जें भाषण झालं त्यावरून हें दिसून येणार आहे.

किनखेडे:- देशमुख, तुम्ही फारच चांगलं काम हातीं घेतलं आहे. मोहप्याकडे माझं गाव आहे. तिथे चार रोहिले. पण सबंध गाव त्याना भितं.

इतके मेंढ्याप्रमाणे भेकाड आमचीं माणसं सध्या झालीं आहेत. तुम्ही जें काम हातीं घेतलं आहे त्याची अत्यंत आवश्यकता आहे. हिंदुंचा भित्रेपणा केव्हा जाईल देव जाणे.

मी:- भित्रेपणा घालवण्यानेच जातो. गाववाल्यांना ते कोण आहेत याची जाणीव करून द्यावयाला पाहिजे. हितोपदेशांत मेंढ्याच्या कळपांत राहणाऱ्या सिंव्हाच्या बच्चयाची गोष्ट आहे. ती बरीच अर्थपूर्ण आहे. तुमच्या गावांतील लोकांनी हे खेळ पाहिले म्हणजे त्यांच्या सारखीच माणसं किती मर्दपणाचें काम करतात हें त्यांना दिसून येईल. ह्या रोहिल्यापासून संरक्षण करण्याकरितां आणखीही एका गोष्टीची आवश्यकता आहे. ती म्हणजे खेड्यांतल्या सर्व जातीच्या लोकांत बंधुभाव उत्पन्न करणं. माळ्याला मारलं तर तेल्याला मला काय त्याचं व तेल्यास मारलं तर मला काय त्याच असं कुणब्यास किंवा ब्राम्हणास वाटतां कामा नये. आपण सर्व एक आहोंत असं त्याना वाटलं पाहिजे. तागाची एक लट म्हणजे. कांही नाही अगदी क्षुल्लक. तटकन तुटते पण त्याच पुष्कळशा एकत्र करून त्यांचा दोर केला तर हत्तीला सुद्धा बांधून ठेवतां येतं हें त्यांच्या मनावर बिंबवायला पाहिजे. आपसांत एकी पाहिजे व ती एकी घडवून आणण्यास आखाड्यासारखी दुसरी संस्था नाही. आखाड्यां-तल्या एखाद्या माणसावर प्रसंग आला तर सबंध आखाडा धांवून जातो हा माझा अनुभव आहे. तुम्ही आपल्या गावांत एक आखाडा काढा." त्यांनी मला वर्गणी दिली व म्हणाले "चला माझ्या बरोबर, मी तुम्हाला चांदी सोन्याच्या ओळींतून माझ्या मारवाडी पक्षकारांकडून वर्गणी देववतों." असं म्हणून त्यांनी मला तिकडे नेलं व वर्गणी गोळा करून मला दिली.

खेळांचे सामने धनंतोली पार्कचे मैदानावर भरविण्याचं ठरलं. पार्क नांवाचाच होता. तिथं त्या वेळेस एकही झाड नव्हतं. राजेबहादुर रघोजीराव भोंसले व त्यांचे बंधु राजे लक्ष्मणराव भोंसले यांनी या सामन्यांच्या कार्यक्रमांत फार उत्साहानं सहकार्य केलं. प्रांतिक खेळांचे सामने मोठ्या प्रमाणावर घड-वून आणण्याचा ह्या प्रांतांतला हा पहिला प्रसंग. ह्या प्रसंगीं कुस्ती, लाठी, काठी, गदगाफरी, भाला, बिन्नोट, आट्यापाट्या, खो खो वगैरे खेळांचा कार्यक्रम ठरविण्यांत आला व तो शांततेने पार पडला. कुस्तीच्या वेळेस बहुतकरून

दंगा होतोच. तोही कुस्ती खेळणारे खालची कुस्ती खेळतात तेव्हा. तसा तो न व्हावा म्हणून कुस्ती चांगल्या तीन फूट उंचीच्या विटांनी बांधलेल्या स्टेजवर करण्याचं ठरवलं. अशा कुस्त्या मी लंडन इथें पाहिल्या होत्या. फरक एवढाच कीं तिथलं स्टेज मजबूत असून त्यावर म्याट्रेसेस; व मी केलेलं स्टेज विटाचं त्यावर माती.



**राजे बहादुर रघोजीराव भोंसले**

राजे बहादुर रघोजीराव भोंसले यांना खेळांचे सामने व व्यवस्था फार आवडली. त्यांनी खूप होऊन मला विचारलं 'तुम्हाला आमचा बिन्नोट पाहाण्याची इच्छा आहे काय?' मी एकदम होय म्हटलं. मात्र माझ्याबरोबर माझे दोन तीन स्नेही आणण्याची मी त्याना परवानगी मागितली व ती त्यांना दिली. ह्या बद्दल मी त्यांचे आभार मानले. व मी, डॉ. परांजपे, अण्णा

खोत व सोहनी नांवाचे गृहस्थ – ज्यांचा नागपूर व्यायाम शाळेशीं संबंध होता व जे सरासरी १-१॥ वर्षानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघांत लाठी काठीचें शिक्षण देऊं लागले – सक्करदऱ्यावर राजेसाहेबांचा बिन्नोट पहावयास गेलों व बिन्नोटचे डाव पाहिले.

सामन्यांचे खेळांचे दिवसांत निरनिराळ्या खेळासंबंधी नियम बनविण्याकरितां एक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीचा मी अध्यक्ष व खोत सेक्रेटरी होते. ह्या कमिटीवर ठिकठिकाणच्या व्यायामशाळांचे प्रतिनिधी घेतले होते. बालाघाटपासून खामगावपर्यंतचे बहुतेक ठिकाणचे प्रतिनिधी रोज कमेटीचे सभेचे वेळी जमत, विचार करीत व निर्णय घेत. ह्या कमिटीच्या सभांना सर्वांनी मदत केली. पण त्यांतहि हनुमान शाळेच्या प्रतिनिधींनी केलेली मदत महत्वाची होती. ह. व्या. प्र. मंडळाचा वृक्ष जरी आज मोठा दिसत असला तरी १९२३ च्या प्रांतिक खेळांच्या सामन्यांच्या वेळी तें एक जोमदार रोपटें होतें एवढंच म्हणतां येईल. आमची नागपूर व्यायामशाळा हनुमान व्यायामशाळेपूर्वी ५ वर्षं आधीं निघाली होती. पण त्या शाळेतील चालकांचा आमच्यापेक्षा संस्था चालविण्याच्या बाबतींत जास्त अनुभव होता. श्री. 'हनुमान क्लब' ह्या नांवाची उमरावतींत एक संस्था व्यायामाचें शिक्षण देणारी व सामाजिक कार्य (Social relief) करणारी कांहीं वर्षांपासून अस्तित्वांत होती. प्रसिद्धि पराङमुख दोघे वैद्य बंधु – बाबुराव व अंबादासपंत – ह्या संस्थेचे संस्थापक सदस्य. ह्यांचा ह. व्या. प्र. मंडळाशीं संबंध कायमच राहिला. हे मंडळ १९२३ सालींच अस्तित्वांत आलें. त्याच सालीं सामन्यांच्या वेळी डॉ. शिवाजीराव पटवर्धन हे त्या संस्थेचे अध्यक्ष होते. डॉ. पटवर्धन हे तालीमबाज व व्यायामप्रेमी आहेत व त्यांनी व्यायाम प्रचाराच्या कार्यास स्वतःस वाहून घेतलें होतें. उत्तम सार्वजनिक कार्यकर्ते, एक कट्टर कांग्रेसभक्त व उत्तम वक्ते अशी त्यांची त्या वेळी वऱ्हाडांत प्रसिद्धि होती. सामन्यासंबंधी नियम करण्याकरितां जी कमिटी नेमली होती ह्या कमिटीवर संस्था चालविण्याचा बऱ्याच वर्षांचा अनुभव असलेले डॉ. शिवाजीराव व त्यांचे साथी वैद्य हे होते. त्यांच्या खेरीज डॉ. काणे – यवतमाळचे – व्यायामक्षेत्रांत व बॉयस्काऊट चळवळींत प्रमुखपणे भाग घेणारे व सार्वजनिक कार्यकर्ते व इतरही व्यायाम शाळांचे प्रतिनिधी होते.

## बालगंधर्वाच्या स्त्री पार्टांची विद्यार्थ्यांच्या मनावर पकड

एक दिवस नियम करणाऱ्या कमिटीच्या सभेच्या वेळेवर मी व वऱ्हाडांतील एक व्यायामप्रेमी गृहस्थ इतकेच हजर होतों. आणखी सभासद येईपर्यंत मी वाट पहाण्याचं ठरवलं. वऱ्हाडांतील त्या गृहस्थानं विद्यार्थी व्यायामाचे बाबतींत किती दुर्लक्ष करतात व भलत्याच मार्गाला लागतात ह्या संबंधी एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले, " उन्हाळ्याचे दिवस होते. मी पुण्यास गेलों होतों. तिथे गेल्यावर एका कॉलेज होस्टेलच्या ओळखीच्या सुपरिंटेंडेंटला भेटण्यास गेलों. कॉलेजला उन्हाळ्याची सुट्टी होती. विद्यार्थी आपआपल्या गावीं गेले होते. विद्यार्थ्यांसंबंधी त्यांचें व माझें बोलणें झालें. ते सांगूं लागले विद्यार्थ्यांत व्यायामाचा शौक मुळीच नाही. त्यांचा बायकीपणाकडे कल होऊं लागला आहे. तुम्ही माझ्याबरोबर होस्टेलमधल्या खोल्यांतून एक फेरफटका मारा. तुम्हाला मी काय म्हणतों हें दिसून येईल." ते व मी होस्टेल-मधल्या कांही खोल्यांत गेलों. त्यांनी खोल्यांमधील ट्रंका उघडण्यास सुरवात केली व मला म्हणत पहा काय आहे यांत. मी त्यांनी ज्या ज्या ट्रंका उघडून दाखवल्या – व त्या निदान दहा बारा तरी असतील – त्यांत पाहिलं तर काय ? बालगंधर्वाचा स्त्री वेषांतील फोटो, एक दोन साड्या व कुंकवाच्या डब्या वगैरे सामान. त्यांनी मी प्रत्येक ट्रंक पहात असतांना मला म्हणावं ' काय दिसतो का गामाचा किंवा स्यांडोचा फोटो ? कांही डंबेल्स वगैरे ? ' मला दर वेळेला नाही असंच म्हणावं लागे. कांही ट्रंका पाहिल्यानंतर मी म्हणालों " पुरे करा. मला हें सर्व पाहून विद्यार्थ्यांबद्दल किळस उत्पन्न झालेली आहे. आता जास्त ट्रंका पाहण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांची ही मनःस्थिती व वागणूक शोचनीय आहे. ह्यावर तुम्ही कांहीतरी इलाज केला पाहिजे. मला वाटतं तुमचं तें कर्तव्य आहे. " त्यांनी सांगितलेली ही गोष्ट १९१८ किंवा १९२० सालांतील विद्यार्थ्यांसंबंधी असावी. माझ्या डोक्यांत सहज विचार येऊन गेला. बालगंधर्वानं एखाद्या मल्लाचं किंवा धैर्यधराचं वा कोदण्डाचं काम केलं असतं तर त्याला विद्यार्थ्यांच्या मनाची पकड घेऊन त्यांना शूर वीर बनवतां आलं असतं कां ? कीं बालगंधर्वाला हें अशक्य व तितकंच ह्या विद्यार्थ्यांनाही अशक्य ! माझं व या वैदर्भीय गृहस्थाचं भाषण संपतं न संपतं

तोंच कमिटीची बाकीची मंडळी आली व नियम करण्याच्या कामाला सुरवात झाली.

विद्यार्थ्यांच्या बाबतींत हीच परिस्थिति बरींच वर्षे कायम राहिली. १९३३ सालीं जुलै महिन्यांत पुण्यांत एका वक्त्याने व्याख्यानांत कॉलेजमधील विद्यार्थ्यांना 'कॉलेजीय बायकी तरुण, जनानी नायक' व त्यांच्या वर्तनाला 'कॉलेजीय बायकी तरुणांचे चाळे' असं म्हटलं. सन १९४३ सालीं मात्र मी पुण्यांस गेलों असतांना डॉ. जेजुरीकर ह्यांच्या निमंत्रणावरुन 'महाराष्ट्रीय व्यायाम शाळा' व 'सैनिकीकरण मंडळ' पहायला गेलों तेव्हा निराळंच चित्र दिसलं. संस्थांतील तरुणांत व्यायामाचे बाबतींत बराच उत्साह व प्रगति दिसली. महाराष्ट्रीय व्यायाम शाळेला भेट देण्याचं जें निमंत्रण दिलं होतं त्याचंही तसंच एक कारण होतं. त्यांनी तरुणांना सैन्यांत भरती होतां व्हावें म्हणून लष्करी शिक्षण द्यायला आरंभ केला होता. पण ते उपकरणाच्या अभावीं सिद्धिस जाऊं शकत नव्हतं. त्याचे व त्यांच्या कामाला ज्या ऑफीसर्सची, मिलिटरी व सीव्हीलियन ह्यांची सहानुभूति होती त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले होते. मी तीं उपकरणं मिळवून दिलीं. तो मनोरंजक इतिहास एका निराळ्या मंजूषेंत येणार आहे.

## केवळ आत्मसंरक्षणासाठीं

नागपुरांतील मध्यप्रांत व वऱ्हाड येथील मैदानी खेळाचे सामने संपल्यानंतर मी पंधरावीस दिवसांनीच 'महाराष्ट्र' वर्तमानपत्रांत (२८-२-१९२३) ह्या खेळांचें महत्व, सामना करण्याचे उद्देश व ते कशा रीतींने करावे ह्या संबंधी "केवळ आत्मसंरक्षणासाठीं" ह्या शीर्षकाखाली एक लेख लिहिला, त्यांतील महत्वाचा भाग खाली दिला आहे. हल्ली हिंदुस्थानांत – व विशेषतः हिंदुसमाजांत – लोकांस आत्मसंरक्षणाची जरुरी वारंवार भासूं लागली आहे. मोपल्यांचें बंड, मुलतानचा दंगा, सिधपूर प्रकरण इ. अलीकडे घडून आलेले प्रकार; तसेच कलकत्त्यास गुंडांचा सुळसुळाट व मुंबईस पठाणांची पुंडाई या सर्व गोष्टींवरुन हिंदी जनतेला या पुढे केवळ पोलसाच्या मदतीवर विसंबून राहून भागणार नाही असें वाटूं लागलें आहे. खेडेगावांत तर संघशक्ति व स्वसंरक्षणाची तयारी यांची फारच जरुरी भासत आहे. दोन तीन

बलुची गावांत आले, तर ते सबंध गावाची गाळण उडवून देतात ! हिंदी सरकार या त्रासाकडे विशेष लक्ष देत नाही हें प्रसिद्धच आहे. पण प्रत्येक नागरिकाचें रक्षण सर्व वेळी व सर्व स्थळीं करण्याचें कार्य कोणतेंच सरकार करूं शकणार नाही. शिवाय पोलीस व लष्कर यांचा खर्च आधीच डोईजड झाला, म्हणून तो कमी करा, छाटाछाट करा असा लकडा आपण सरकारचे मागे लावीत आहोंत. अशा वेळी लोक आत्मसंरक्षणास तयार झाले पाहिजेत; पूर्ण स्वावलंबी होण्याइतकी ताकद त्यांच्या आंगीं आली पाहिजे.

परवा नागपुरास वऱ्हाड मध्यप्रांतांतील खेळाडूंचे मर्दानी खेळांचे सामने भरविण्यांत आले. ते केवळ करमणुकीखातर भरविण्यांत आले नसून लोकांत मर्दानीपणाची व पराक्रमाची हौस उत्पन्न करावी व त्यांस आत्मसंरक्षणक्षम बनवावें या हेतूनेच भरविण्यांत आले होते. सुशिक्षित व सामान्य लोक यांनी एकत्र जमून मिळून मिसळून एकदिलानं समाजाची शक्ति वाढवावी असा उद्देश होता. सुशिक्षितांना आत्मसंरक्षणाचे मार्ग समजावे व इतरांना शिस्त व संघशक्ति यांचें महत्त्व कळावें; व सर्वांनी मिळून समाजाची ताकद वाढवावी हाच ह्या सामन्यांचा उद्देश होता.

## वीरवृत्तीचा परिपोष करणारे खेळ खेळा

माझ्या मतें शारीरिक व मर्दानी शिक्षण प्रत्येक तरुणास मिळालें पाहिजें व शारीरिक शिक्षणांत कुस्ती, पोहणें, घोड्यावर बसणें, गदगाफरी (Fencing) लाठी, बॉक्सिंग, जुजुत्सु इ. चा समावेश झाला पाहिजे. त्या खेरीज शारीरिक शिक्षण पूर्णच होऊं शकत नाही. या खेळांनी अंगी लढवय्येपणाची वृत्ति बाणते.

आपला धर्म, आपले देशबांधव किंवा त्यांची मालमत्ता यांच्या रक्षणार्थ ( स्वतःच्या शरीरास व जिवास धक्का पोचण्याची भीति असतांही ) प्रांतांतील तरुण माणसें प्रसंग पडेल तेव्हा लढण्यास तयार झालीं, तर नागपूर वऱ्हाडांत मर्दानी खेळाचे सामने सुरू झाल्याचें सार्थक झालें असें मी समजेन.

थोड्याच महिन्यानंतर नागपुरांतील व्यायामाच्या हौशी जवानांना हिंदुसमाजाचें व हिंदुधर्माचें रक्षण करण्याचा, कधी स्वप्न सुद्धा पडलं नसेल असा अत्यंत कठीण व आणीबाणीचा प्रसंग आला.

# स्वराज पार्टी

## फेर नाफेरवाल्याचा झगडा

व्यायामक्षेत्रांतला आनंद अनुभविल्यानंतर राजकारणांतल्या क्षेत्रांत फिरून फेरफटका करणं तुम्हाला कमी आनंददायक वाटूं नये असं मला वाटतं. १९२२ च्या 'गया' कांग्रेसमधे 'फरवाले' 'नाफेरवाले' असे दोन पक्ष निर्माण होऊन 'फेरवाल्या' पक्षाच्या पुढाऱ्यांनी 'स्वराज' पार्टी काढल्यानंतर लगेज देशबंधु दास ह्यांनी हिंदुस्थानभर तुफानी दौऱ्यास सुरवात केली. सभा भरविण्यांत येऊं लागल्या. पार्टीचा प्रोग्राम लोकांना समजाऊन देण्यांत येऊं लागला. प्रांताप्रांतांतून स्थानिक स्व. प. पुढाऱ्यांनी आपआपल्या प्रांतांत 'स्व. पा.' कार्याची दिशा समजाऊन देण्याकरितां उत्साहानं नेटाची चळवळ सुरू केली. मोठ मोठ्या सभा होऊं लागल्या. देश झोपेंतून जागा झाला. सभांतून व वर्तमानपत्रांतून 'स्वराज्य' पार्टीवाले म्हणजे Changers व 'कट्टर' म्ह० No Changers आपआपल्या प्रोग्रामचें समर्थन, मंडन व दुसऱ्या पार्टीच्या प्रोग्रामचें खंडन करू लागले. पण ह्या वादाच्या भरांत एक पार्टी दुसऱ्या पार्टीच्या उखाळ्या पाखाळ्या काढूं लागली. तरी बरं कीं 'स्वराज्य' पार्टीचे पुढारी ह्यांनी आपली द्रव्याबद्दलची बेपर्वाइ, अनासक्ति, आपला निःस्वार्थीपणा व देहदंड सोसण्याची तयारी तुरुंगांत जाऊन लोकांना दाखवून दिली होती. पण ह्याची दखल कोणास? "म. गांधी व मौ. महमदअली हे कौन्सीलांवर बहिष्कार टाका म्हणतात ना, कौन्सिल जाना हराम ह म्हणतात ना! बस टाका बहिष्कार कौन्सिलवर. दास, नेहरू असतील मोठे आपल्या घरचे! आम्हाला त्याचं काय!"

## खाली पिशाव पैछानना जानता है

हकीम अजमलखान हेही स्वराज्य पार्टी घडवून आणण्याच्या कामीं

दे. दास, व पंडित मोतीलाल नेहरू यांस मदत करीत होते. त्यांनी कौन्सील मधे जा असं म्हटलं नाही. पण एका सभेत – दे. दास यांच्या घरींच – कौन्सीलमधे जाणं हराम नाही असं म्हणाले. बसं तेवढंच त्यांचं म्हणणं त्याच्या विरुद्ध गेलं. त्यांनी जमातीकरिता केलेलं कार्य मुसलमान विरोधकांच्या पार दृष्टिआड झालं. त्यांनी दिल्लींत मोफत दवाखाना काढून युनानी वैद्यकीय कॉलेज काढून जी जनतेची सेवा केली, ती सर्व लोकांच्या दृष्टिआड झाली. त्यांनी 'मेडीकल मिशन' पाठवून तुर्कस्थानला लढाईचे वेळी केलेली मदतही त्यांच्या धर्माची मंडळी विसरली. हकीम अजमलाखांच्याच धर्माच्या लोकांनी त्या सभेंत हकीमखांनी कौन्सील जाना हराम नही म्हटल्याबरोबर माझ्या समक्ष त्यांच्यावर तोंडसुख घेतलं. "ये क्या जानता है? खाली पिशाब पैछानना जानता है!" ह्या सभेंत पंडीत मोतीलालजीनी आपल्या पर्शियन भाषेच्या प्रभुत्वावर, लोकप्रियतेवर व स्वार्थत्यागाच्या पुण्याईवर वेळ मारून नेली. पण त्या कट्टर मुस्लीम मंडळीच्या मनांतली रुखरुख कायमच राहिली. आणि हे कट्टर मुसलमान व हिंदु कट्टर कोण तर 'मं गांधी व मौ. महम्मदअली कोर्टावर बहिष्कार टाका असं म्हणत होते तरी त्यांचं मुळीच न ऐकणारे!' कोर्ट बहिष्कारांत स्वार्थाला धक्का बसला असतांना. कौन्सिल बहिष्कार संबंधी तसं कांही होण्याचा मुळींच संभव नव्हता. मग गांधी भक्तीस उत कां येऊं नये!

ह्या प्रांतांतही दोन्ही विरुद्ध पक्षांत बाचाबाचीस सुरवात झाली. पण प्रकरण एकेरीवर आलं नाही. त्या वेळचे प्रमुखपणे कांग्रेसचं काम करणारे डॉ. मुंजे, डॉ. परांजपे, डॉ. खरे, बॅ. अभ्यंकर वगैरे मंडळी व मी सर्वच प्रांतांत प्रमुखपणानं कांग्रेसचं काम करणारे 'स्वराज्य' पार्टीस मिळालों. ह्या सभासदांच्या सार्वजनिक सभेंतील भाषणांत चरखा फिरवून स्वराज्य मिळविण्याची अशक्यता, हिंसा व अहिंसा, उपवास करून सरकारच्या किंवा विरोधी पक्षाच्या वा जमातीच्या अंतःकरणांत बदल घडवून आणण्याचा फोलपणा, एका वर्षांत 'स्वराज्य' मिळवून देतो अशी विफल झालेली गर्जना इत्यादि मुद्दे असत. मुख्य गोष्ट म्हणजे 'हिंसा अहिंसेचा' कीस निघूं लागला. हिंसा म्हणजे काय? ती कोणत्या मर्यादेपर्यंत मनुष्यास पाळतां येणें शक्य आहे? इत्यादि प्रश्नांचा कीस निघूं लागला. कट्टर कांग्रेसवाल्याला तो

ज्या सभेंत बोलत असेल त्या सभेंत एखाद्या श्रोत्यानं जर विचारलं – आणि तसं नेहमीच विचारण्यांत येई – "तुमच्या आईबहिणीवर एखादा गुंड तुमच्या समक्ष बलात्कार करण्यास तयार झाला तर तुम्ही काय कराल तें सांगा ?" तर त्या कट्टरवाल्याला प्रश्नाचं उत्तर देणं मुष्कील ! व्यापाऱ्यांची व्यापारांतली फसवेगिरी महात्माजीच्या 'सत्य व अहिंसा' ह्या साच्यांत कितपत बसते हा तर एक सौम्य स्वरूपाचा प्रश्न होता. असं हे त्यांच धरसोडीच वर्तन कट्टरांच्या अंगावर येऊ लागलं.

## ही हिंसा कीं अहिंसा सांगा बरं

अगदी सत्यकथा आहे ही. वाढोना गावाजवळच तीन चार मैलावर नारायणपूर हें गाव आहे. हे गाव 'वाढोना' ते 'ढग' ह्या रस्त्यावर आहे. 'नारायपूर' जवळ 'धाम' नदीच्या एका तीरावर गोंडाची वस्ती असलेले 'महादापुर' व दुसऱ्या तीरावर गवळी रहात असलेले 'दानापुर' अशीं लहान खेडीं आमोरा सामोर आहेत. ह्या गावांत आमचा मालगुजारी हिस्सा व शेती आहे. शेती व शेतमजुरी हा ह्या 'महादापुर' गावांतील गोंड लोकांचा धंदा. बैल, गाई, म्हशी ह्या गुराबरोबरच हे बकऱ्याही पाळतात. 'दानापुर' येथील गवळयांचा धंदा शेती, दुध दुभतं व उत्तम गवळाऊ गाई बैल तयार करून विकणं.

सन १९२३ सालाची जानेवारींतली गोष्ट. जवारीच्या कांही शेतांतील जवारी सोंगल्या गेली होती तर कांही शेतांतील जवारी उभी होती. शेतांत राखणीचे उंच मळे ठिकठिकाणीं तसेच कायम होते. अशाच दिवसांत एक दिवस बारा बारा चवदा चवदा वर्षांची ५-६ पोरं न्याहारी करून महादापुर गावाशेजारच्या 'धाम' नदीच्या एका लोटाकडे १०-१२ लहान मोठ्या बकऱ्या चारण्यास घेऊन गेले. बकऱ्या भाराटी, बाभळी व जंगली वेलांच्या झुडपांत चरूं लागल्या. कांही पोरं गिल्लीदांडू व कांही पोरं जवळच्याच झाडांवर डाबडुबोल्या खेळूं लागले. हे खेळ खेळल्यानंतर ते लपना छपनी खेळूं लागले. खेळतां खेळतां तिसऱ्या प्रहरची वेळ झाली. मुलं लपनाछपनी खेळत असतानाच कांही बकऱ्या घाबऱ्या आवाजानं ओरडत गांवाकडे पळत जात असतांना त्यांनी पाहिल्या. मुलं जिथ बकऱ्या चरत होत्या व जिथून

त्या पळूं लागल्या होत्या तिकडे गेले. त्यांना दुरुनच दिसून आलं कीं एका बकऱ्याला तोंडाकडून कोणीतरी जबड्यांत धरलं आहे व त्या बकऱ्याला जागचं हालतां येत नाही. ह्या जंगलांत लहान मोठे वाघ ढग्याच्या जंगलांतून बहुधा येतात. 'वाघानं बकरं धरलं' 'वाघानं बकरं धरलं' अस गावाकडे धूम ठोकून ओरडण्यास ह्या मुलांनी सुरवात केली. खळ्याजवळच्या माणसांनीही 'लोटांत वाघ रे वाघ' असा आरडा ओरडा सुरू केला. झालं! गावांतील व शेतांतील दहा पंधरा माणसांचा एक तांडा लोटाकडे निघाला. कोणाच्या हातांत कुऱ्हाड, तर कोणाच्या हातांत तुते तर कोणाच्या हातांत जाडें. जे ज्याला सापडेल ते घेऊन तो लोटाकडे जाण्यास निघाला. लोटांत जाऊन पहातांत तों एका भल्यामोठ्या अजगरानं बकऱ्याला मुंडीकडून आपल्या तोंडांत धरलं आहे व आपल्या शरीराचा बाकीचा भाग बकऱ्याच्या धडाभोवती गुंडाळून शेपूट मागच्या पायांतून बाहेर सोडलेलं आहे. बकऱ्याला सोडवलं पाहिजे, त्याचा जीव वाचवला पाहिजे हा तर त्यांचा उद्देश. कशी सोडवणूक होणार होती बकऱ्याची? गावकऱ्यांनी त्या अजगराच्या तोंडावर दगड मारणं, तोंड ठेचणं, शरीरावर काठ्या लगावणं सुरू केलं. ह्यांत हिंसा असेलही, पण ह्यावाचून दुसरा कोणता इलाज होता? अजगराला तोंडावर व अंगावर मार बसल्यानंतर त्यानं त्या बकऱ्यावरची आपली पकड ढिली केली. पकड ढिली झाल्याबरोबर त्या माणसांपैकी दोघांनी त्या बकऱ्याला अजगराच्या तोंडांतून बाहेरं काढलं. बाकीच्या माणसांनी त्या अजगराला ठिक ठिकाणीं ठोकून त्याचे मणके ढिले केले. एका माणसानं जाडा दोर घेऊन अजगराला मधोमध पक्का बांधला. नंतर दोघांनी दोर हातांत घेऊन शेपटीकडे होऊन त्या अजगराला फरफटत फरफटत महादापुरास नेलं व तिथं आंब्याच्या एका झाडास पक्कं बाधून टाकलं. ती दिवाबत्तीची वेळ होती. गावकरी आपआपल्या घरीं गेले. जिवानिशी सुटलों असं अजगराला वाटलं. गावकऱ्यांनाही वाटलं आपण अगदी जरूर तितकाच मार त्या अजगराला दिला. आणि कोणाही तिऱ्हाइताला असंच वाटेल. त्या गावकऱ्यांना त्या अजगराला लोटांतच ठार मारणं कांही मोठीशी गोष्ट नव्हती. पण त्यातल्या त्यांत त्या लोकांनी त्या अजगराला जीवदान दिलं.

दुसऱ्या दिवशीं थोडा कोठं दिवस निघाला असेल नसेल अशा वेळी शेतकरी शेतावरच्या कामावर जाण्यास निघाले. जातां जातां पहातात तर काय ! गावाजवळच्या एका बकऱ्याच्या वाडग्याजवळ एक मोठा अजगर. त्यांनी कल्ला केला, गांवकरी जमा झाले. त्यांनी बल्लमांनी त्या अजगराचा जीव घेतला. ' हा कोठून आला असेल ? ' असा त्यांना विचार पडला. ह्या गोष्टीचा छडा लावण्याकरितां त्याना कठीण गेलं नाही. अजगराच्या येण्याची एक चांगली दीड वीत रुंद वाट गागऱ्यांत पडली होती. त्या वाटेनं जातां जातां ते आंब्याच्या झाडाजवळ जाऊन पोहचले. तिथं जाऊन पहातात तर झाडाला दोर, पर दोराला जनावर नाही. तेव्हा त्यांच्यापैकी एकानं म्हटलं ' अरे वाडग्याजवळ मारलेलं जनावर येथचच. झाडाला बांधलेलं. आम्ही ज्यास जीवंत धरून आणलं, जीवंतच इथं झाडाला बांधून ठेवलं – ज्याला जीवदान दिलं – तोच हा वाडग्याजवळचा अजगर. ' गावकऱ्यांत आपआपसांत भाषणाला सुरवात झाली.

महादु.— (आपल्या सोबत्यांना) अरे बरं म्हणून बरं. 'आपलं' नशीब बाकं म्हणून व लवकर उठलों व आपल्यास हा दिसला. नाहीतर एक दोन बकरे यानं पार केले असते.

जानु:— अरे रात्रींच जर का हा लवकर सुटून वाडग्याकडे जातां तर तूं म्हनतोस तसा ह्यानं एक दोन बकऱ्याचा फराळ केला असता. हा गुपचूप येता. हाक बोंब, तेवढ्या रातीं करायसाठी कोणीच नसता. मग त्याला बकऱ्याचा फन्ना पाडायसाठी अडचन कोणती होती ? नशीब शिकंदर म्हणून त्या धोक्यांतून आपण वाचलों.

म्हातारा:— अरे तं गडेहो ह्या अजगराला तेथंच लोटांत खल्लास काढून नाही केलं ? काळास तुम्ही आपलं घर दाखवतां ! ह्याची जात कोणती हे तुम्ही भुलले. त्यानं आपल्या जातीवर जाऊन तुमचं बकरं धरलं होतं. जात कोनती हे दाखवून दिलं तरी बी तुम्ही तिकडे ध्यान नाही केलं व त्यास आपलं घर दाखवलं ! केवढा तुमचा शहानपना !!

महादु:-- बावाजी, असं वाटलं कीं ह्या अजगरास ठेच ठाच केलंच आहे हा आता काय करल ? पोराबाळास दाखवून देऊं, मालकाकडे घेऊन

जाऊं व मग दूर कोठं तरी सोडून देऊं. जीव घेन्यांत काय मतलब !

म्हातारा:-- जीव घेन्यांत काय मतलब अँ ! अन आपल्यास उठन्यास उशीर झाला असता, अन् ह्या अजगरानं एक दोन बकरे उरकवले असते तर मतलब होता नाही ? वारे शहान्या ! काय तुही गोष्ट !!

जानु:-- अरे तर भल्या मानसा जीव घेऊं नये गाई बैलाचा. पर वाघाचा अन लांडग्याचा की घेऊं नये ! वाघास का गाई बैल पोर बाळं खाऊं द्यावं ? अन लांडग्यास का कोंबड्या बकऱ्या खाऊं द्यावं ? गाई बैल कोंबड्या बकऱ्या खल्लास झाल्यावर आपन जगनार कशाच्या भरोशावर ?

म्हातारा:-- अन् जवानपनीं पोरं बाळं सँभाळले नाही तर मग म्हातारपनीं आम्हास कोन संभाळल ? जीव घेन्यांत काय मतलब सांगनारे बरमग्यानां व्हय ? वा हरदासबुवा वा !!

ही सगळी मंडळी, मी व माझा भाऊ दामुअण्णा व दोघे पाहुणे नदीच्या तीरावरच्याच एका शेतांत हुरडा खायला बसलों होतों तिथे आली. शेगटींतला आहार तयार झाला होता व कणसांचा पहिला फेर लावला होता. त्या मंडळीपैकी एकानं अजगरासंबंधी घडलेली सर्व हकीकत सांगितली व महादु, जानु व म्हातारा ( बावाजी ) ह्यांच्यांत झालेलं बोलणंही इत्थंभूत सांगितलं. एकानं दामुअण्णास म्हटलं ' तुम्हाले दाखवायले आणूं का हा अजगर ? लई मोठा आहेजी. ' दामुअण्णा म्हणाले ' काय पहायच आहे. प्रत्येक जंगली खेड्यांत हे असतात ' त्याच्यापैकी एकानं म्हटलं " भाऊसाहेब, आम्ही अजगराला मारनं ठीक होतं कीं सोडून देनं ? " हा त्याचा प्रश्न महादुला टोमणा म्हणूनही असण्याचा संभव होता. मी शेगटीजवळ बसलेल्या माणसांना हाच प्रश्न टाकला. तेव्हा त्यांच्यापैकी एक गवळी होता तो म्हणाला ' मले एवढं माहित आहे कीं किसनजीनं यमुनांतल्या डोहांत कालिया नागाच्या बोडक्यावर नाचून त्याचा घाम काढला, त्याचे मनके मनके ढिले केले व त्याला डोह सोडणं भाग पाडलं. त्याला मेल्यावानीं झालं व मंग जावं लागलं व तव्हापासून गाईचा जीव वाचला, व गवळी बेफिकीर झालेत. जिकडे तिकड गोकुळांत आनंदी झाला असं पुराणांत आहे.

मी:-- हा अजगर दोरीतून निसटून लोटाकडे किंवा जंगलात कोठे तरी नाही निघून गेला तर ज्यांनी जीवदान दिलं त्यांच्याच बकऱ्या फस्त करण्याकरिता वाड्याकडे आला.

आमचा एक स्नेही:— गोंडांनी अजगराला मारलं ही हिंसा कीं अहिंसा?

मी:-- गोंडांनी अजगराला मारलं हें योग्य केलं – व्यवहाराला धरून केलं. माझं मत ह्या म्हाताऱ्या गृहस्थाच्या तावून सुलाखून निघालेल्या व्यवहारालाच धरुन आहे. अजगराला जिवंत जर ठेवला असतां तर त्यानं कोंबड्या बकऱ्यांचा केव्हाना केव्हा तरी जीव घेतला असता. तो प्रसंग आता नेहमीकरितां टळला. हिंसा कीं अहिंसा ह्या वादात्मक प्रश्नांत मी पडूं इच्छित नाहीं.

नंतर मी त्या गावकऱ्यांना म्हणालों "तुमची तारीफ करण्यासारखी तुम्ही एक गोष्ट केली. ती म्हणजे संकट कोणावरही आलं, नुकसान कोणाचंही होणार असलं तरी सर्वानं एकजुटीन एकमेकांस मदत करण्याकरितां धावून जाणं. आणि असच सर्वांनी एकमेकास अडचणीच्या वेळी मदत केली तर सर्वांचाच फायदा आहे. हाच अजगर जिवंत असतां अन त्यानं तुमच्यापैकीं एखायाचं बकरं गिळलं असतं व तुमच्यापैकी प्रत्येकजण समजतां कीं त्याचं बकरं खाल्लं माझं तर नाही व तिकडे काना डोळा केला असता तर त्या अजगरानं आज एकाच बकरं, उद्या दुसऱ्याचं, परवां तिसऱ्याचं असं बकरं घशांत घातलं असतं व अशा रीतीनं तो प्रसंग सर्वांवरच आला असता. वेळींच सर्वांनी काटा काढून टाकला हें फार बरं केलं" ही शेतकरी मंडळी आपल्या कामावर निघून गेल्यावर मी पाहुण्यांना म्हणालों: अजगर मारला ही हिंसा कीं अहिंसा हा आपला प्रश्न मोठा मजेदार आहे. अजगर मारला ही हिंसा खरी. पण हिच्या पोटीं अहिंसेचा जन्म आहे. कारण अजगर जिवंत असता तर त्यानं कितीतरी कोंबड्याबकऱ्यांची हिंसा केली असती. ती त्याला ठार करण्यानं बंद झाली. अहिंसेचं वातावरण उत्पन्न झालं. "दया तिचें नाव भूताचें पालन निर्दालन कंटकाचें." तेव्हा कंटकाचें निर्दालन हाही भूताचें पालन ह्याच प्रमाणे दयेचा एक मार्ग आहे हें विसरुन कसं चालेल? भगवान श्रीकृष्ण परित्राणाय साधूनाम म्हणतात त्याच प्रमाणे विनाशायच दुष्कृताम्

असंही म्हणतात. मी तर म्हणतों प्रथम दुष्टांचा संहार केल्यावांचून साधूंचं रक्षण करताच येणार नाहीं. देवाचा अवतारही प्रत्येक वेळेस दुष्टांचा संहार होण्याकरिताच होत गेला. ह्यांचा संहार प्रथम न होतां तर ऋषिंचं किंवा इतरांचं संरक्षण कसं होतं? दुष्टांचा नाश हा दयेचा म्हणजेच अहिंसेचा एक प्रकार आहे." गावाहून परत आल्यावर मी व्यायामक्षेत्रांत व प्रांतिक खेळाचे सामन्यांत काम केल्यावर स्वराज पार्टीचा प्रोग्राम लोकांस समजावून देण्यास ठिक ठिकाणीं जाऊं लागलों. "आम्ही स्वराजिस्ट कौन्सिलमधे जाऊन सरकारशीं लढाई देऊन सरकारचं राज्ययंत्र बंद करणार" ही स्वराजिष्टाची घोषणा, लढाईची भाषा. ह्याच्या उलट नाफेरवाले म्हणत: "विधायक कार्यक्रम करा, चरखा चालवा वगैरे." त्यांची लढाईची भाषा नव्हती. सत्याग्रहास परिस्थिति अनुकूल नाही असा तर कांग्रेसने नेमलेल्या सी. डी. ई कमिटीचा रिपोर्ट. नाफेरवाल्यांना वाटूं लागलं नुसतं विधायक कार्यक्रम करा असं सांगून लोकांत जोश उत्पन्न होणार नाही. स्वराजिस्टांची लढाईची भाषा. तर आपलाही कांही लढाऊ कार्यक्रम पाहिजे. नाहीतर आपण लोकांचीं मनं आकर्षण करून घेऊं शकणार नाही व लोकांच्यावर असलेला थोडा बहुत ताबा हाही नाहीसा होईल. पडद्याआडचा कार्यक्रम धामधुमीच्या कार्यक्रमासमोर फिक्काच पडणार. कांहीतरी लोकांच लक्ष वेधून घेणारा कार्यक्रम त्यांच्या समोर ठेवला पाहिजे असं नाफेरवाल्यांस वाटूं लागलं. तशी संधि त्यांना मिळालीही. नशिबानं साथ दिली.

## नागपूरचा झेंडा सत्याग्रह

नागपूरच्या डिस्ट्रीक्ट म्याजिस्ट्रेटनं 'कांग्रेसच्या झेंड्याची मिरवणूक' सीव्हील स्टशनमधे एका विवक्षित मर्यादेपलीकडे मे महिन्यांत मना केली. नागपूरच्या नाफेर कांग्रेसवाल्यांनी हा हुकूम मोडण्याचं म्हणजेच 'झेंडा सत्याग्रह' करण्याचं ठरवलं. नागपूरचे कांग्रेसवाले लहान लहान टोळ्या करून रोज सत्याग्रह करूं लागले. एकदा झेंडा सत्याग्रह सुरू झाल्यानंतर झेंडा सत्याग्रहाला मदत करणं हें सर्वच कांग्रेसवाल्याच, हिंदुस्थानांतील कांग्रेसवाल्यांचं कर्तव्यच होऊन बसलं. स्थानिक कांग्रेसवाल्यांनी जरी हा सत्याग्रह करण्याकरितां आ. इं. कां. कमिटीची किंवा वर्कींग कमिटीची परवानगी

घेतली नव्हती तरी त्यांना आता ती चळवळ एक सारखी चालवण्याकरितां मदत करणं जरूरच होत. आमची परवानगी घेतली नाही ह्या सबबीवर ही चळवळ अंगाबाहेर टाकणं शक्यच नव्हतं. ह्या चळवळीला मदत करणं हिंदुस्थानांतील सर्वच कांग्रेस कार्यकर्त्यांचें कर्तव्य होऊन बसलं. ' कांग्रेसचा झेंडा ' म्हणजे ' कांग्रेसची इज्जत. ' इतर कांग्रेसवाले मनांत काहीही म्हणोत पण नागपूरच्या नाफेरवाल्यांनी ' कांग्रेसच्या झेंड्याच्या अब्रूची ' ज्या नाफेर-वाल्यांना चाड होती त्या सर्वांना भाग घ्यायला लावलं. लढाई लादली गेली – खुशीची नसेल – पण एकदा कोणांतरी लढाईला मुरवात केल्यानंतर लढाई सुरू ठेवणं भागच होत.

## उडाणटप्पू उदयकर्ते बामणगावकर

ही लढाई सुरू ठेवण्याकरिता बाहेर गावाहून स्वयंसेवक नेऊं लागले. त्यांच्यापैकी बहुतेकांना सत्याग्रह करण्याची संधि मिळवण्यापूर्वीच उडाण-टप्पू ( Vagrant ) म्हणून तुरुंगांत जाण्याची पाळी येई. अशा ह्या उडाण-टप्पूमधे माझे स्नेही ' उदय ' कर्ते बामणगावकर हेही होते. बामणगावकरांना वाटत असावं ' उदय ' कर्ता जर उडाणटप्पू तर संभावित तरी कोण लोकाचा ? धनुर्भंगकर्ता मातींतच मिळाला म्हटलं पाहिजे तो जर उडाण-टप्पू तर ! धनुर्भंगवाला हा मानभंग सहन करणार नाही ! बॅ. रामराव देशमुख यांच्या मांडीशीं मांडी लावून बसणारा मी उडाणटप्पू ! अं ! खापर्ड्यांच्या मैफलींतील मी उडाणटप्पू ! कोणत्याही सरकारी मंत्र्याच्या किंवा असेंबलींतील सभासदांच्या बरोबरीचा मी. आणि म्हणे उडाणटप्पू. कोण उडाणटप्पू हे ह्या सैतानी सरकारच्या नजरेस आणून देणार.

दामुअण्णा, माझे धाकटे बंधू ह्या झेंडा सत्याग्रहाचे दिवसांत सत्याग्रहींना मदत करण्याकरितां कोर्टांत व जेलांत जात असत व जी काय मदत करता येईल ती करत. बामणगावकर दामुअण्णाच्या ओळखीचेच. त्यांना बामण-गावकरानं सांगितलं ' दामुअण्णा, गोविंदरावाना माझा डिफेन्स करायला सांग ' दामुअण्णानं हा निरोप मला पोचवला. दुसऱ्या दिवशीं दामुअण्णांची व त्यांची भेट झाली तेव्हा ते म्हणाले ' दामुअण्णा डिफेन्स करायचं ठरवलं होतं, पण डिफेन्स केला तर माझ्याबरोबरचे अंडर – ट्रायल्स बोलून बोलून

अनुक्रम ७७

माझा जीव खातील. नको तो डिफेन्स. ' डिफेन्स करूं कीं नको करूं हा एक त्यांच्यासमोर मोठा प्रश्नच येऊन पडला व त्यांचं मन त्यांत घोटाळूं लागलं. अशा ह्या परिस्थितींतच त्यांची जेलांत रवानगी झाली. त्यांनी ती शिक्षा भोगण्याचा निश्चय केला. पण त्यांच्या नशीबानं अशी मेख मारली कीं त्यांनीं जेलाची शिक्षा तर भोगायला लावलं पण सत्याग्रहीचं यश त्याना लाभूं दिलं नाही. जेलांत राहण्याचा – वैयक्तिक स्वातंत्र्य गमावण्याचा प्रसंग तर त्यांच्यावर आणला पण झेंडा सत्याग्रह केल्याचं, झेंड्याकरितां प्राण पणाला लावल्याचं श्रेय मात्र त्यांना मिळूं दिलं नाही. बामणगावकरांना जेलांत जाव लागलं ते उडाणटप्पू म्हणूनच. नशिबाचा चक्कर केव्हा केव्हा हा असा असतो !

बामणगावकराना शिक्षा झाल्यानंतर व त्यांच्या अंगावर जेलांतील कैद्यांचा पोशाख चढवल्या गेल्यानंतर त्यांची इतर कैद्यांबरोबर एक दिवस ड्रील चालली असतांना त्यांची व दामुअण्णांची दृष्टादृष्ट झाली. जेल सुपरिंटेंडेंट कर्नल जठार यांची नजर चुकवून संधि साधून दामुअण्णाकडे येऊन ते म्हणाले " दामुअण्णा, गोविंदरावाना अपील करायला सांगा. " दुसऱ्या दिवशीं त्यांची व दामुअण्णाची जेलांत भेट झाली तेव्हा ते म्हणाले " दामुअण्णा अपील नका करूं. " बामणगावकरांचा जीव ' करूं कीं नको करूं ' असा सारखा घुटमळत होता, हेलकावे खात होता. त्यांच्या मनांत एकसारखी कालवा कालव सुरू होती. मनुष्यानं सारासार विचार करून सद्सद्विवेक बुद्धि सांगेल त्या प्रमाणे वागावं कीं लोक खुष रहावेत म्हणून त्यांच्या मताला ( मग तें मत भल बुरं कसंही कां असेना ) मान झुकवून वागावं हा प्रश्न पुष्कळदा सार्वजनिक काम करणाऱ्यासमोर उभा असतो. बुद्धीस पटेल त्या प्रमाणेच वागणें श्रेयस्कर. लोकमत केव्हा, कसें व काय कारणाकरितां बदलेल ह्याचा नियम नाही. म्हणून आपल्या स्वतःच्या मताप्रमाणे वागल्याचं समाधान लाभावं म्हणून आपल्या बुद्धिपूर्वक विचार करून ठरवलेल्या मत प्रमाणेच वागावं. लोकमत हें एखाद्या वावडीप्रमाणे पतंगाप्रमाणे आहे. त्याचं आकाशांत उडणं, तननं सर्वस्वी परावलंबी. वाऱ्यावर अवलंबून – त्याची दिशाही वाऱ्यावर अवलंबून. स्वतः पतंग कांहीच करूं शकत नाही. पतंगाची कर्तबगारी

वाऱ्यावर, दोऱ्यावर व दोरा ज्याच्या हातांत आहे त्याच्यावर अवलंबून. आणि तोही दोरा मांज्याचा असला ( म्हणजे विशिष्ट द्रव्यानं वेष्टित असला ) तर मग बोलायलाच नको. दुसऱ्या पतंगीचा काट सहज होतो. लोकमत हें असं आहे पतंगीसारखं


## झेंडा सत्याग्रहाचा निकाल

सत्याग्रहाला चांगलंच स्वरूप आलं. त्या वेळेलाच मध्यप्रांताच्या कायदे-कौन्सिलांत सत्याग्रहींना सोडून देण्याचे ठराव पास झालेत. १९२३ च्या आक्टोंबरमधे नव्या निवडणूकी होणार होत्या. "लोकांत बरं कां न म्हणून घ्या? कौन्सिलमध्ये आलों तरी बरं, नाही तरी बरं. निदान कौन्सिल करिता उभा राहिलोंच तर लोकांसमोर जायला कांही उजागरी तरी झाली. नच उभा राहिलों तर कांग्रेसच्या चळवळींला मदत केली हें श्रेयही कांही कमी नाही" असा विचार कित्येक सभासदांनी केला असला पाहिजे. कित्येकांनी केला नसेलही. कारण येवढी गोष्ट खरी कीं ह्या स्वयंसेवकांत, ह्या उडाणटप्पूमधे कौन्सिलच्या सभासदांचे कांही स्नेही व कांही नातेवाईक असत. तेव्हा असेंबलींत ठराव पास करून ह्यांची सुटका करावी असाही हेतु असण्याचा संभव. झेंड्याचा प्रश्न मध्यप्रांत सरकार व कांग्रेस ह्यांनी आपसात समजुतीनं करून मिटवला. सीव्हील स्टेशनमधेही झेंडा फिरूं लागला. पण बार्डोलीचा पहिला सत्याग्रह एका एकी बंद केला म्हणून लोकांचें जें धैर्य गेलं, लोक जे demoralise झालेत ते झालेच. एखाद्या नामवान पहिल-वानानं कुस्ती खावी, त्याची हिम्मत खचावी व मग त्या पहिलवानाची एखादी छोटी कुस्ती करवून यशस्वी म्हणून नांव मिळवून दिलं तरी त्या पहिलवानांत पूर्वीची हिम्मत येत नाही. पहिलवान कटला तो नेहमीकरताच. तशातली कांग्रेसचं झालं. हिमतीनं दुसरा कोणताही सत्याग्रह करण्यास कांग्रेसनं कंबर बांधली नाही. व त्याचा परिणाम असा झाला कीं — हें निव्वळ माझंच म्हणणं नाही तर कित्येक जबाबदार कांग्रेसवाल्यांचेंहि. — कांग्रेसमध्ये भांडणें सुरू झालीं. बारडोलीचा सत्याग्रह थांबल्यामुळेच कांग्रेसमध्ये भांडणें सुरू झालीं व हिंदुमुसलमानांच्या एकींत बिघाड झाला असं दिल्ली येथे भरलेल्या कांग्रेसच्या खास अधिवेशनाचे वेळीं ( अक्टोबर )

कांग्रेसवाले व कांग्रेसचे पुढारी बोलत होते ते मी व मोरूभाऊ अभ्यंकर दोघांनीही ऐकलं होतं. एकंदरीत परिस्थिति अशी होती कीं कांग्रेसनं स्वराज पार्टीच्या कार्यक्रमाला मान्यता दिली. त्याच पार्टीचा लढाऊ कार्यक्रम देशासमोर होता.

## स्वराज पार्टीचा जाहीरनामा

ह्याच आक्टोबर महिन्यांत 'स्वराज' पार्टीच्या निवडणुकीचा जाहीरनामा ठरविण्याकरिता कलकत्ता येथे ठिकठिकाणचे स्वराजिस्ट जमावयाचे होते. परिषद दे. दास यांचे येथे भरावयाची होती. मी व मोरूभाऊ अभ्यंकर आम्ही दोघेही नागपुरहून या परिषदेस हजर राहण्यास गेलों. परिषदेंत स्वराज पार्टीने आपला म्यानिफेस्टो ठरवला. त्यांत स्वराज पक्ष सरकारशीं सतत अखंड विरोध करील, द्विदल पद्धतीचा फोलपणा लोकांचे नजरेस आणील, कौन्सिलांतून चढाईचें धोरण ठेविल व स्वराज्याची लगेच मागणी करील असं म्हटलं होतं.



देशबंधु चित्तरंजन दास

## दिलीप कुमार राय गवई, बॅ. जयकर तबलची

ह्या परिषदेच्या वेळेला दे. दास कार्पोरेशनचे अध्यक्ष व श्री. सुभाषचंद्र बोस ( नेताजी ) हे कलकत्ता कार्पोरेशनचें चीफ आफीसर होते. सुभाषबाबूंनी स्वराजिस्ट पक्षाच्या बऱ्याचशा मंडळीला रात्रीं जेवायला बोलावलं

होतं. मी व अभ्यंकर दोघेही जेवायला गेलों. तिथे जमलेल्या मंडळींत ब. ( आतांचे डाक्टर ) जयकर मुंबईतील स्वराजिस्ट सभासदांचे पुढारी हेही होते. तिथेच बैठकींत परिचय करून दिल्यामुळे माहित झालेले श्री. दिलीप कुमार राय हेही होते. जेवण झाल्यानंतर जेवलेल्या मंडळींना हार घातल्या-नंतर दिलीप कुमार राय यांचें गायन व्हावयाचं होतं. ते आपल्याजवळ हात हार्मोनियम घेऊन बसले होते. जवळच तबला होता. पण तबल्याजवळ तबलची नव्हता. तबलचीवाचून गाण्याला सुरवात कशी होणार ? तेव्हा आमच्या जमलेल्या मंडळींपैकी कोणाला तबला येतो काय याची चौकशी चालली. मंडळींत कोणी असेल वा नसेलही. असल्यास पुढे येण्यास – तबला वाजवण्यास – इभ्रत कमी होईल ह्या खोट्या भावनेंन धजत नसेल असं मला वाटूं लागलं. मग दिलीप कुमारसारख्या भारतीय व पाश्चिमात्य गाण्याचं ज्ञान असलेल्या गाणाऱ्याचं गाणं ऐकायची संधि जाणार अशी भीति उत्पन्न झाली. आपण सतार शिकलों तसा तबलाही वाजवायला शिकलों नाहीं ह्या बद्दल वाईट वाटलें. गाणं ऐकायला मिळतं कीं नाही ह्या विवंचनेंत मंडळी असतानाच बॅ. जयकर पुढे झाले व त्यांनी डग्गा घेऊन श्री. दिलीप कुमार ह्यांच्या गाण्याला ठेका धरला. मंडळींना उत्तम गाणं ऐकायला मिळालं.

डॉ. जयकरांनी ह्या वेळेला जो खेळाडूपणा दाखवला तो खरोखरच अभिनंदनीय व अनुकरणीय. इंग्रज लोकांत घरच्या मेजवानीच्या वेळीं (Social at homes) असला खेळाडूपणा दाखवतात. घरच्या मेजवानीचा उद्देश जेवायला आलेल्या मंडळींचा वेळ त्यांनी आनंदांत घालवावा हा. जेवायला येणारी मंडळी सारख्याच दर्जाची असते; त्यापैकी जवळ जवळ सगळेच जेवायला बोलावणाऱ्याच्या (म्हणजे host च्या) परिचयाचे असतात. जेवायला बोलावणारा मंडळीचा वेळ उत्तम रीतीनं जावा म्हणून आपल्या परीनं उद्योग करीतच असतो. पाहुणेही हातभार लावतात. कोणी गाणं म्हणतात, कोणी निरनिराळे खेळ खेळतात. अशा प्रसंगी सर्व मंडळी आपला हुद्दा, खोटा अभिमान वगैरे गोष्टी विसरतात. समान भूमिकेवरून वागून सर्वजण जेवणानंतरचे कांही तास आनंदात घालवतात. तिथे कोणी कांही कोणत्याही विषयाची परिक्षा घ्यायला किंवा घ्यावयाला येत नाही हें

सर्वांनाच माहित असतं. खेळीमेळीचें वातावरण उत्पन्न करावयाला असे At Homes उपयोगी पडतात. ही चाल अनुकरणीय आहे असं वाटत नाही का तुम्हाला ?

## हिंदुस्थानी गायन भक्तिपर कीं बाल्यावस्थेंतील ?

श्री दिलीपकुमार राय ह्यांना हिंदुस्थानी गाणं त्याचप्रमाणे पाश्चिमात्य गाणं ह्या दोन्हीही गाण्यांचं शास्त्रोक्त ज्ञान बऱ्याच उच्च प्रतीचं आहे असं वर सांगितलंच आहे. ते जर्मनींत पाश्चिमात्य गाण्यांचं ज्ञान पूर्ण करण्यास गेले होते असं चौकशीअंती समजलं. कांही वेळानं बरीचशी मंडळी निघून गेल्यावर मी दिलीप कुमारांना म्हटलें "आपण हिंदी गाणं सशास्त्र जाणतां व पाश्चिमात्यही. आपण एका गोष्टीचा खुलासा करूं शकाल असं मला वाटतं. हिंदुस्थानी गाणं हें एकाच माणसाचं गाणं, फार झालं तर त्याला सोबती एक तबलची अशा दोघांचच व पाश्चिमात्य गाण्याला सोबत एक मोठा आर्केस्ट्रा –२०-२५ माणसं व त्यांची निरनिराळीं वाद्य. हा असा फरक कां ?" श्री. दिलीपकुमार म्हणाले, आपलं संगीत हें भक्तिपर संगीत व पाश्चिमात्य संगीत हें सामाजिक करमणूकीचं संगीत म्हणून.

संगीताच्या दोन पद्धतींतला हा फरक विचार करण्यासारखा आहे. पाश्चिमात्य कांही मंडळीचं म्हणणं असं कीं आपली जी पद्धति ती (child's music) गायनाची प्राथमिक अवस्था. आपलं संगीत अर्थातच सोपें. पाश्चिमात्य पद्धति ही सामुदायिक गायनाची ( Collective Music ) पद्धति म्हणजे प्रौढ अवस्था. आता बोलपट सुरू झाल्यापासून हिंदी संगीतामध्येही आर्केस्ट्रा – पाश्चिमात्य पद्धतींचं अनुकरण सुरू झालं आहे ही गोष्ट निराळी. तरीपण आपलं पूर्वीचं संगीत हे भक्तिपर कीं बाल्यावस्थेंतील हा प्रश्न राहतोच.

## स्वराजिस्टांच्या कौन्सिल निवडणुकी

कलकत्त्याहून वापस आल्यानंतर थोड्याच दिवसांनी मी व बॅ. अभ्यंकर आमच्या निवडणुकीच्या तयारीस लागलों. बॅ. अभ्यंकर मध्यवर्ति असेंबलीच्या व मी प्राव्हीनशीयल असेंबलीच्या. आमच्या नवीन पक्षाची – कट्टरांपासून भांडून अलग झालेल्या – इभ्रत कायम ठेवावयाची होती. म्हणून ज्यांना पक्षाची इभ्रत स्थापन करण्याची तीव्र इच्छा, ती वाढविण्याची ज्यांना जिद्द,

ज्यांच्या पाठीमागे पुष्कळ वर्षे निःस्वार्थ बुद्धीने राजकारणांत भाग घेतल्याचा इतिहास व जे बुद्धिमान व निवडणुकीकरिता स्वतःच्या पदरास खार लावणार अशानाच निरनिराळ्या ठिकाणाहून स्वराजिस्ट उमेदवार उभे केले होते. स्वराजिस्टांच्या मागे ह्या वेळेला कांग्रेसची शक्ति नव्हती. नाफेरवाले जरी उघड उघड विरोध करणारे नव्हते तरी सदिच्छा बाळगणारेही नव्हते. ह्या बंडखोर पक्षाची फजीति झाली तर त्यांना पाहिजेच होती. म्हणजे बंडखोर नेहमीकरिता स्वस्थ बसले असते व नाफेरवाल्यास ( कट्टरास ) रान मोकळें झालें असतें, चढाईचें धोरण करण्याकरिता नाही तर चरखेबाजीचा प्रसार करण्याकरिता. तेव्हा स्वराजिस्टांना निवडणुकी जिंकणें हा मानाचा प्रश्न होऊन बसला होता व बाजु जिंकण्याकरिता अटीतटीचे प्रयत्न करावयाचे होते. निवडणुकीला रंग सगळयाच ठिकाणीं चढला पण सर्वात आणीबाणीची निवडणूक मुसलमानेतर नागपूर कामठी मतदारातर्फे नागपुरची. स्वराजिस्टातर्फे डॉ. मुंजे व डॉ. खरे; त्यांचे प्रतिस्पर्धी पारेख ॲडव्होकेट, गोविंदराव प्रधान ॲडव्होकेट, शिवदासपंत बार्लींगे ॲडव्होकेट, राजेबहादुर रघोजीराव भोंसले यांचे इस्टेटीचे म्यानेजर व रावबहादुर नारायणराव केळकर वकील – माजी मिनिस्टर. त्याच प्रमाणे मुसलमानेतर मतदारातर्फे मध्यवर्ती असेंबलीकरिता बॅ. अभ्यंकर; त्यांचे प्रतिस्पर्धी रा. ब. ढोबळे ( ढोबळे कमेटीचे ) रिटायर्ड एडिशनल ज्युडीशीयल कमीश्नर. लक्षांत ठेवण्यासारखी एक महत्वाची गोष्ट. रा. ब. ढोबळे हे हिंदुमहासभेच्या कार्यकारिणीचे सभासद, डॉ. मुंजे, डॉ. परांजपे व मी हिंदुसभेच्या कार्यकारिणीचे सभासद. डॉ मुंजे हे सेक्रेटरी होते. रा. ब. ढोबळे व आम्ही हिंदुमहासभेच्या कार्यकारिणीचे सभासद असूनही आम्ही ढोबळे यांच्या विरुद्ध निवडणुकींत भाग घेतला. तसं करणं आमच्या आड आलं नाही. स्वराजिस्ट पार्टीच्यातर्फे उभे राहण्यास, पार्टीच्या निवडणुकीचा प्रचार करण्यास व स्वराजिस्ट पार्टीला मतें मिळवून देण्यास आम्ही मोकळे होतों. हिंदुसभेचे सभासद निरनिराळ्या राजकीय मताचे असूनही व त्यांचा पार्टीप्रोग्राम भिन्न असूनही हिंदुसमाजाचें रक्षण करण्याकरिता, त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या धार्मिक चालींचें व देवळांचें रक्षण करण्याकरिता एकत्र आलों होतों. ह्या निवडणुकींत हिंदुसभेच्या इतर

सभासदांना म्हणजे जे स्वराजिस्ट नव्हते त्यांना विरोध करण्यास आम्ही स्वराजिस्टांनी कमी केलें नाही. स्वराजिस्ट पार्टीच्या उमेदवारांना विरोध करण्यांत फक्त गोविंदराव प्रधान ह्यांनाच काय तो पार्टीचा पाठींबा. त्यांची पार्टी ब्राम्हणेतर पार्टी. बाकीचे विरोध करणारे ' एकांडे शिलेदार ' – स्वतंत्र.

स्वराज पार्टी मध्यप्रांत व वऱ्हाडमधे सर्वत्र विजयी झाली. त्यांचे सर्व उमेदवार निवडून आले. हिंदु तर आलेच आले. पण आमचे स्वराजिस्ट पार्टीवाले मुसलमानही निवडून आले. कांही दिवसांनी सर्व प्रांताचा आढावा घेतल्यानंतर असं दिसून आलं कीं मध्यप्रांत–वऱ्हाड हाच काय तो प्रांत कीं ज्यांत स्वराज पार्टीच्या सभासदांचें हमखास बहुमत आहे. स्वराज पार्टीच्या मुखंडांना आनंद झाला कीं या मध्यप्रांतांत द्विदल राज्यपद्धतीच्या चिंधड्या उडवून देऊं. बाकीच्या प्रांतांत फार तर अडवणुकीचेंच धोरण अमलांत येऊं शकणार होतें. बंगालमधे सुद्धां स्वराजिस्ट बहुमतांत नव्हते. दे. दास स्वराजिस्ट पक्षाचे अध्यक्ष, बंगाल प्राव्हीनशीयल असेंब्लीच्या निवडणुकींत निवडून आले होते; पण त्यांच्या मागं बहुमत नव्हतें. मग त्यांच्या त्या घोषणेचें ' आम्ही द्विदल राज्यपद्धती नाहीशी करण्याकरता जातों आहों ' काय होणार होतं ? ती पद्धती नाहीशी करण्याच्या कामांत काय फक्त मध्यप्रांतालाच मान मिळणार होता ? द्विदल राज्यपद्धती तोडण्याचं श्रेय काय फक्त मध्यप्रांतालाच ? नाही. दे. दास बाबू ह्यानीं कृषिपक्षाचे फझलुल हक ह्या मुसलमान सभासदाबरोबर एक करार केला व त्या बंगालमधेही त्यांनी द्विदल राज्यपद्धति फेटाळून लावली. बंगालमधे मंत्रिमंडळ होऊं दिलें नाही. बजेट फेटाळून लावलें. ह्या कराराबद्दल दे. दासांना बरीच टीका सहन करावी लागली कारण ती हिंदुंच्या हिताच्या विरुद्ध आहे असं बंगाल बाहेरील हिंदुंना वाटे.

### मध्यप्रांतांत स्वराजिस्टांची तारांबळ

मध्यप्रांतांत असेंबलीच्या सभासदांत स्वराजिस्टांचेंच हमखास बहुमत होतें. मिनिस्ट्री न होऊं देणं व बजेट फेटाळून लावणें ही अगदी हातची गोष्ट. अगदी तळहाताचा मळ. पण घबराट जरी नाही तरी गडबड मचली स्वराजिस्टांची. सर फ्रयांक स्लाय हे त्यावेळीं मध्यप्रांताचे गव्हर्नर होते. त्यांनी

जशी कांही स्वराजिस्ट पक्षाची परिक्षाच करायची असा विडा उचलला होता असे दिसते. त्यांनी असेंबलीच्या पहिल्याच सेशनमधे सेटलमेंट बिल आणलें. फारा वर्षांची लोकांची तक्रार कीं सेटलमेंट फार थोड्या थोड्या वर्षांच्या मुदती नंतर होतात. त्यामुळे शेतकऱ्यांचें व मालगुजारांचें दोघांचेंही नुकसान होतें. कारण दर बंदोबस्तांत सारा चढायचा हें ठरलेलेंच. ह्यामुळं शेतकरी शेताची सुधारणा करण्यासही धजेना. कारण पीक जास्त कीं सारा वर गेला. त्याच प्रमाणे बंदोबस्त करण्यासंबंधी कांही निश्चित तत्वेंही ठरलेलीं नव्हतीं, सर्व कांही सेटलमेंट आफीसरच्या खुशीवर. तेव्हा बंदोबस्ताचा एखादा सुत्रबद्ध कायदा असावा अशी लोकांची मागणी ३०-४० वर्षांपासूनची. ती लोकांची मागणी आता लोकांच्या प्रतिनिधींसमोर ठेवण्यांत आली. स्वराजिस्टांचें हमखास बहुमत – काय वाटेल तसा फरक बहुमताच्या जोरावर करून बिल सर्वस्वी लोकांच्या बाजूस करतां येण्यासारखं होत. मग काय आम्ही स्वराजिस्टांनी तसं करावं ? केलं तर मग आमच्या एकजात अडवणुकीच्या धोरणाचें कसें काय ? बिल लोकांच्या फायद्याचें करून ध्यावें कीं फेकून द्यावें हा बिकट प्रश्न आमच्या समोर उभा राहिला. त्याला तोंड द्यायचें तें कोणत्या रीतीने ?

पण आमची परीक्षा पहाण्याकरिता हा सेटलमेंटचाच प्रश्न नव्हता. त्याच्या बरोबरच हत्यारांचा कायदा दुरुस्त करणारं बिल. तेही उदार मग काय तेही आम्ही फेकून देणार ? ह्या कायद्यासंबंधी लोकांच्या ज्या तक्रारी होत्या त्या नाहीशा होण्याची पाळी आली ती आम्ही काय लाथाडून देणार ?

ह्या वर्षीचें अंदाजपत्रकही मोठें उदार केल्या गेलें. शिक्षण, पाटपाणी, रस्ते वगैरे लोकहिताच्या बाबीसाठी उदार योजना आखल्या होत्या. परंतु सर्वांत अपेक्षापेक्षाही जास्त लांब मुदतीच्या जमीन साऱ्याच्या बिलानं ( Settlement Bill ) स्वराज्य पक्षाला मोठा पेंच पडला. स्वराजिस्ट सभासदांनी ह्या पेचातून सुटण्याची एक युक्ति काढली. अर्थात तिच्या योगाने त्यांनी आपल्यावरची जबाबदारी दुसऱ्यावर टाकली. आपल्या पार्टीच्या मिटींग मधे असें ठरवलें कीं ह्या बाबतींत काय करायचें ते पक्षाच्या नेत्यानीच ठरवून द्यावें. लोकांच्या हितानाहिताची एवढी मोठी जबाबदारी आपण घेतां नये.

श्री विठ्ठलभाई पटेल, दे. दास, पंडित मोतीलाल नेहरू इत्यादि मंडळींना तारा करून बोलावण्यांत आलं. ते आलेत व माझ्याकडेच राहिलेत. दे. दास प्रथम व नंतर विठ्ठलभाई पटेल आलेत, त्यांनी आपसांत खल केला. नंतर दे. दास उमरावतीला आपल्या जावयाकडे गेले. जातांना त्यांनी आम्हाला सांगितलं कीं पंडित मोतीलाल नेहरू नागपुरला आल्यावर ते या बाबतींत निर्णय देतील. देशबंधु गेल्यावर दुसरेच दिवशीं पंडित नेहरू आलेत. पटेल व पंडितजी यांच्यामध्ये बराच वेळ विचार विनीमय झाल्यावर त्यांनी आम्हास स्वराजिस्ट पार्टीच्या सभासदास सांगितलं कीं अंदाजपत्रकाला व सेटलमेंट व आर्म्स एक्ट बिलाला एकजात विरोध करावा.

सेटलमेंट बिल बारगळलें. अंदाजपत्रकही फेटाळले गेलें. त्यामुळे नवीन दिवाणांची औट घटकेचा सद्दी संपली. मध्यप्रांत-वऱ्हाडच्या स्वराज्य पक्षाच्या विजयाचा नगारा जिकडे तिकडे पिटल्या गेला. इतर प्रांतांतील स्वराजिस्टांना त्यामुळे हुरूप चढला.

पंडित मोतीलाल नेहरू मध्यप्रांत असेंबलीच्या ह्या पहिल्याच सेशनच्या-वेळीं - व तें बजेट सेशन होतं - कांही दिवस राहून मग अलाहाबादला निघून गेले. जातांना स्वराजिस्ट सभासदांनी कोणत्याही आफीशियल फंक्शनला किंवा सरकारी आफीसरांच्या सन्मानार्थ असलेल्या फंक्शनला - ह्यांत एट होम्सही आलेच - हजर राहूं नये ह्या स्वराजिस्टांवर घालून दिलेल्या बंधनाची आठवण देऊन गेले. ह्यांतही सरकारशीं असहकारिता, सूक्ष्म रूपाने का होईना, होती हें कोणालाही दिसून येणार होते.

ह्या प्रांतांतल्या स्वराजिस्ट सभासदांनी आपली प्रांतांतली कामगिरी बजावली तर मध्यवर्ती असेंबलींत गेलेल्या सभासदांनीही त्यांची कामगिरी बजावली. बॅ. अभ्यंकर यांनीही दिल्लीच्या मध्यवर्ती कायदे मंडळांत निवडून गेल्यानंतर आपल्या निर्भय व जोरदार वक्तृत्वशैलीनं चांगलीच छाप पाडली. स्वराज्य पक्षाच्या सभासदांच्या खासगी सभांतही ते आपले विचार बेडरपणे मांडीत. कोणाही अखिल भारतीय प्रसिद्ध व्यक्तीच्या पुढे सुद्धा नम्र होत नसत. स्वराजिस्ट मध्यवर्ती असेंबलींत गेल्यानंतर १९२६ सालीं, स्वराज्य

पार्टीचे सरकारशीं अखंड व एकसारखें विरोध करण्याचें धोरण असूनही पंडित मोतीलालजी स्कीन कमिटीवर (हिंदी सैन्याचें हिंदीकरण व तत्संबंधी



इतर प्रश्न सोडवण्यास नेमलेल्या कमिटी-वर) गेलेत तेव्हा त्यांचें हें असें करणें स्वराजिस्टांच्या तत्वाला बाध आणणारे आहे असं बजावून हजेरी घेतली व त्यांना त्या कमिटीच्या सभासदत्वाचा राजीनामा देण्यास भाग पाडले. कांग्रेस श्रेष्ठींची कृपा नष्ट होईल या भीतीने ते कधीही आपले विचार व भाषण स्वातंत्र्य गमावण्यास तयार नसत. आज किती कांग्रेसवाल्या संबंधान असं म्हणतां येणार आहे ?

बॅ. मोरूभाऊ अभ्यंकर

## स्वराजिस्टांविरूद्ध चढाईची मोहीम

ह्या प्रांतांतील स्वराजिस्ट सभासदांनी बजेट फेटाळून लावल्यानंतर थोड्याच महिन्यांनी प्रांताचे गव्हर्नर सर फ्रयांक स्लाय यांनी स्वराज्यपक्षा-विरुद्ध प्रचार सुरू केला. या पक्षाच्या सतत व अखंड विरोधामुळे जनतेचें किती प्रकारानें नुकसान झालें हें लोकांना पत्रकें वाटून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. ह्या अडवणुकीच्या धोरणामुळे शिक्षणाची प्रगति खुंटली, लोकांची पाण्याची अडचण तीव्र राहिली वगैरे वगैरे. स्वराज पक्षाचे नांवाने सरकारने मारे बोंबाबोंब सुरू केली. सरकार पत्रक वाटून स्वस्थ बसलें नाही तर ह्याचवेळीं श्री. भास्करराव जाधव, मुंबई प्रांतांतील मिनिस्टर ह्यांना अप्रत्यक्ष रीतीने निमंत्रण देऊन ह्या प्रांतांत आणून त्यांच्याकडून ब्राह्मण ब्राम्हणेतर वादाचें विष लोकांच्या मनांत कालवण्याचे प्रयत्न सुरू झाले. स्वराजिस्टांच्या विरूद्ध चालवलेल्या मोहिमेंत त्यांचें साहाय्य घेतलें. प्रचार करतांना त्याना स्वराजिस्ट पक्षावरही तोंडसुख घेतां आलें. बजेट फेटाळलें म्हणजे काय ? फायदा होणार होता बहुजन समाजाचा–ब्राम्हणेतर समाजाचा. सेटलमेंट बिल मार्तीत

मिळवलं ! फायदा होणार होतां बहुसंख्य ब्राम्हणेतर कास्तकारांचा व ब्राम्हणेतर मालगुजारांचा. शिक्षण, रस्ते, पाणी ह्याची सोय केली होती. फायदा झाला असतां ब्राम्हणेतर समाजाचा आणि हे सर्व घडूं न देण्याला कारण स्वराजिस्ट ! कोण विचार करतो कीं प्रांतांतील स्वराजिस्टांनी कार्यक्रम असेंबलींत पार पाडला तो त्यांच्याकरितां आखला होता विठ्ठलभाई पटेल यांनी, दे. दास बाबूंनी म्हणजे ब्राम्हणेतरांनी व पंडित मोतीलाल नेहरू – ब्राह्मण खरे पण महाराष्ट्रीय ब्राह्मण नाही व ब्राम्हणेतर हिंदुकडे तर राहूंच द्या पण ब्राम्हणेतर मुसलमानांकडे ज्यांचा कल – त्यांनी.

## जातीयवादापासून फायदा कोणाचा ?

स्वराजिस्टांनी ह्या बजेट सेशनच्या वेळीं ब्राम्हणेतरांचें काय घोडं मारलं असेल तें असो. पण १९२४ ते १९२५ चा काल म्हणजे ११ वर्षांचा काल. त्या कालांत मिनिस्ट्री झाली राव रामराव देशमुखाची, राव केदारांची, पंजाबराव देशमुख जैस्वालची, चौबळ शर्राफची. हे सर्व मंत्री ब्राम्हणेतरच. काय फायदा झाला ब्राम्हणेतर समाजाचा म्हणजेच बहुजन समाजाचा ? ब्राह्मणेतर समाजाची शैक्षणिक व आर्थिक स्थिति कितीक सुधारली ? ज्याचा त्यानीच विचार करावा. ब्राम्हणेतर समाजांत तर मुसलमानांचाही समावेश वऱ्हाडांत केल्या जात होता. कौन्सिलांत जाण्याकरितां निरनिराळे मतदार संघ पण ब्राम्हणेतर परिषदेंत हिंदु मुस्लीम एक म्हणजे joint. ब्राह्मणेतर परिषद उमरावतीस १९२५ च्या जानेवारीच्या सुरवातीस म्हणजे स्वराजिस्ट पार्टीचे बारा वाजण्याच्या सुमारास भरली होती. त्या परिषदेंत पुष्कळ मुसलमान सभासद होते व सेक्रेटरीही मुसलमान होते. ह्या हिंदुमुसलमान ब्राह्मणेतरांनी विचार करावा मामुली मनुष्याचा. ( Man on the street चा) काय फायदा झाला ह्या ब्राह्मणेतर चळवळीमुळे ? कांही व्यक्तींना व त्यांच्या स्नेह्यांना – ह्यांतही कांही ब्राह्मण असतील नसतीलच असं नाही – मानाच्या व अधिकाराच्या जागा मिळण्या पलीकडे ब्राह्मणेतर चळवळीचें पर्यवसान कशांत झालें ?

हा जातीयवाद – मग तो हिंदुमुसलमान असो वा ब्राह्मण ब्राह्मणेतर असो – प्रत्येक जातींतल्या सुशिक्षित व स्वार्थी लोकांच्या महत्वाकांक्षेमुळे,

स्वतःकरितां एक राजकीय क्षेत्र उत्पन्न करून सरकारशीं व्यवहार करण्याच्या ( Bargaining ) दृष्टीनं इतका माजला आहे कीं ब्राह्मणेतरांत, हिंदु ब्राह्मणेतरांत, त्या हिंदु ब्राह्मणेतरांत – मराठे व मराठेतर, मराठे तत्सम, कुणबी, तेली, कोष्टी असे अनेक जातीय पक्ष उत्पन्न झाले.

जाती व उच्चनीच भावनेनं युक्त असलेला हिंदु समाज निव्वळ संख्याबलाच्या जोरावर परकी राजसत्तेच्या वा धार्मिक आक्रमणांपासून सुरक्षित राहील अशी आशा ह्या काळांत करणें व्यर्थ आहे. एखाद्या किल्ल्याभोंवतालच्या तटाला ठिकठिकाणीं भगदाडं पडावं अशी ह्या हिंदुसमाजाची स्थिति झाली आहे. असा किल्ला जितका सुरक्षित तितकाच हिंदुसमाज सुरक्षित !

## तांबे का हो गया सुन्ना

सर फ्रयांक स्लाय स्वराजिस्टांविरुद्ध चळवळ करून चालते झाले व त्यांच्या जागीं सर मांटेग्यु बटलर हे ह्या प्रांताचे गव्हर्नर झाले. त्यांनी प्रांतीय असेंबलीचें स्वराज्य पक्षीय अध्यक्ष श्री. श्री. ब. तांबे यांची सर मोरोपंत जोशी यांच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्याची ( Executive Councillor ची ) मुदत संपल्यानंतर त्यांच्या जागीं नेमणूक केली. ह्या प्रांतांतील व मुंबई प्रांतांतील कांही स्वराजिस्टांनी श्री तांबे यांचे अभिनंदन केलें. सर मांटेग्यु बटलरची नोकरशाहीकडून तारीफ होऊं लागली. ह्या नेमणुकीमुळे सबंध देशांत मोठीच खळबळ उडाली. मध्यप्रांताच्या स्वराज्य पक्षांत तर जबरदस्त फूट पडली. स्वराज्य पक्षांत ह्या भूताने अधिक पराक्रम करूं नये, सरकारच्या आहारीं स्वराज्य पक्षांतील अधिक माणसांनी जाऊं नये म्हणून व स्वराज्य पक्षाची शिस्त अधिक कडक व ती भंग करणाऱ्यास शासन करण्याच्या हेतूने भारतीय स्वराज्य पक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभा ९ नोव्हेंबर १९२५ रोजीं नागपूरास बोलावण्यांत आली व त्याच दिवशीं स्वराज पक्षांतर्गत तिन्ही पोट पक्षांची – वऱ्हाड, मराठी मध्यप्रांत व हिंदी मध्यप्रांत – सभाही तांतडीने नागपूरासच बोलावण्यांत आली.

ही सभा धन्तोलीवरील टिळक विद्यालयांत दुपारीं चार वाजतां सुरू झाली. सभेचा हॉल खच्चून भरला होता. हॉलच्या बाहेरही सर्व बाजूंनी मंडळीचा जमाव उभा होता. सभेचा उद्देश सरकारच्या कार्यकारी सभासदाची

जागा पत्करल्याबद्दल श्री. तांबे यांचा निषेध करणें हा होता. प्रांतांतील स्वराज पक्षाचे सर्व सभासद हजर होते. पंडित मोतीलाल नेहरू आणि बंगालचे बॅ. जे. एन. सेनगुप्ता व गोस्वामी हेही हजर होते.

एका गटाचें नेतृत्व बॅ. अभ्यंकर यांचेकडे व दुसऱ्या गटाचें नेतृत्व डॉ. मुंजे यांचेकडे. दोघेही पूर्वी एकाच आखाड्याचे – राष्ट्रीय मंडळाचे-सभासद व आतापर्यंत एकत्रच काम करीत आलेले. सभेच्या कामाला सुरवात झाली. माझं नाव सभेच्या अध्यक्षपदाकरितां सुचविण्यात आलं आणि तें एकमतानं मान्य करण्यांत आलं. माझ्या दृष्टीनं हा प्रसंग फार बिकट असल्यामुळे मी अध्यक्ष नको व्हावयाला पाहिजे होतं. बॅ. अभ्यंकर हे माझे परमस्नेही. त्यांनी व मी अनेक वर्षे बरोबरीनं सार्वजनिक कार्य केलं होतं. डॉ. मुंजे बरोबरही कांही वर्षे सार्वजनिक कार्य केलं होतं. दोघांशींही असलेला राजकारणांतला संबंध लक्षांत घेतला असतां निःपक्षपातीपणाने या सभेंत अध्यक्षपदाचें काम पार पाडण्याची मोठीच व कठीण जबाबदारी मजवर होती. ती जबाबदारी सद्सद्विवेकबुद्धीस स्मरून प्रामाणिकपणानें पार पाडली तरी कोणत्याही एका गटाचीं माणसं – पुढारी जरी नाही तरी – असं म्हणणारच कीं देशमुखांनी अन्याय केला. सभेस हजर असलेल्या लोकांतही गट असायचेच. पत्रप्रतिनिधिही पूर्वग्रह दूषित होऊन आलेले असायचे. तेव्हा काय करावं असा माझ्या मनांत गोंधळ चालला होता. इतक्यांत मला सूचना झाली. अध्यक्षपदावर जाऊन कामाला सुरवात करा. वेळ घालवण्यांत अर्थ नाही. ह्या सभेचें अध्यक्षस्थान मी स्वीकारल्यापासून सभा ५-६ तास सारखी चालू होती. ठराव, उपसूचना, उपसूचनांना उपसूचना यांचा एकसारखा मारा सुरू होता. बॅ. अभ्यंकर यांनी पंडित मोतीलाल नेहरू ह्यांना सभेंत भाग घेतां यावा असा ठराव मांडला. त्यास डॉ. मुंजे यांचा ( Point of order ) विरोध सुरू झाला. ह्या ठरावातर्फे व विरुद्ध भाषणें झालीं. मी निकाल दिला, ' पंडीतजींस सभासदांस उद्देशून फक्त भाषण करतां येईल. पण मत देतां येणार नाही. ' पंडितजींनी भाषण केलं. भाषणांत म्हणाले ' तांबेका तो हो गया सुन्ना, लेकीन सुन्ना हो गया खाक ' हे स्वराज पक्षाला उद्देशून होतं. सभेच्या कामांत भाग घेणारे रथी महारथी ! कसलेले वकील

ब्यारिस्टर, उत्तम वक्ते व सभेच्या कामांतील खाचा खोचा जाणणारे! सभेचं वातावरण खूप गरम झालं. स्वराजिस्ट पक्षांत राहून, स्वराजिस्ट पक्षाच्या धोरणाविरुद्ध सरकारी जागा स्वीकारल्याबद्दल श्री. तांबे यांचा निषेध हा ठराव. बॅ. अभ्यंकर ठराव मांडणारे. दुजोरा देणारे डॉ. राघवेंद्रराव. डॉ. मुंजे, श्री. तांबे यांची बाजू उचलून धरणारे. देशद्रोही वगैरे शेलक्या शब्दांत श्री. तांबे यांचा उल्लेख. ह्या सभेंत दादासाहेब शेवडे ( त्या वेळेस उमरावतीस प्रॅक्टीस करीत होते ) ह्यांची व बॅ. अभ्यंकरांची मोठमोठ्या आवाजांत बाचाबाची झाली. खडाजंगीचीं भाषणें झाल्यावर ठराव पास झालेत व अध्यक्षाचें माझं एकदाचें काम संपलें. अध्यक्षाच्या खुर्चीवरून परत मी पूर्वी बसलों होतों त्या जागेकडे जात असतांना पंडित मोतीलाल नेहरू व बॅ. जे. एन. सेनगुप्ता दोघांनीही माझ्या सभेचें काम चालविण्याची व त्या वेळच्या वागणूकीची प्रशंसा केली आणि वृत्तपत्रांनीही अनुकूल मत व्यक्त केलें. "सभा चांगलीच खडाजंगीची झाली तरी अध्यक्षानें तिचें काम विनोदिपणानें, सद्‌भाव राखून व निःपक्षपातानें पार पाडलें" असाच शेरा मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रांनी दिला.

या सभेनंतर बॅ. अभ्यंकर व डॉ मुंजे या दोघामध्ये उघड उघड विरोध सुरू होऊन प्रांतांतील कांग्रेसचा पुढारी कोण असावा या बद्दल चढाओढ सुरू झाली.

# प्रतिसहकार पक्ष

मध्यप्रांत वऱ्हाडमध्ये कांग्रेस स्वराजिस्टांच्या सतत व एकजात विरोधाच्या धोरणामुळे असंतोष निर्माण झालेल्या सभासदांनी वऱ्हाडमधे नवा पक्ष स्थापन करण्याची तयारी आरंभिली. कारण इतर प्रांतांत कांग्रेस स्वराजिस्ट पक्षाने बजेटला जरी विरोध केला तरी तीं बजेटें पास झालीं व दिवाणाकडे सोपविलेल्या खात्यांत थोडीफार सुधारणा घडून येत असल्याचें आढळून आलें व या स्वर जिस्ट उच्च दर्जाचें शिक्षण घेतलेल्या, अनुभविक व राजकारणांत मुरलेल्या अल्प गटाचा सामर्थ्यवान विरोधी गटासारखा उपयोग होऊं लागला.

डॉ. मुंजे यांनाही एकजात अडवणुकीचें धोरण पसंत पडलें नाही. ते प्रांतांत दिवाण असावेत, पक्षाच्या विश्वासांतले ते दिवाण असावेत ह्या मताचे होते व म्हणून त्यांनी प्रतिसहकार पक्ष ( लो. टिळकांच्या प्रतिसहकार तत्वाला अनुसरून ) स्थापावयाचा निश्चय केला. फिरून फेर नाफेरवाल्याच्या झगड्याला झाली सुरवात. श्री अभ्यंकर व इतर स्वराजिस्ट व कट्टर कांग्रेसवाले प्रतिसहकारवाल्यांना नोकरीवाले, सरकारचे गुलाम असे म्हणूं लागले. जिथे दिवाण लोकांनी निवडलेल्या सभासदांच्या आधारावर नेमले जातात व दिवाणाविरुद्ध अविश्वासाचा ठराव पास झाला म्हणजे दिवाणपद सोडणं भाग पडतं तिथे दिवाण सरकारचे नोकर नाहीत असं प्रतिसहकार पक्षाचं म्हणणं. (Office not within the gift of the Government) उलट सभासदांनीच दिवाणपदाकरिता निवडलेला एखादा सभासद असेना पण तो गव्हर्नर नेमतो म्हणून Within the gift of the Government सरकारने केलेली नेमणूक ह्या मुद्यांवर इतर मुद्यांबरोबरच प्रतिसहकारवाल्यांच्या विरूद्ध प्रचार होऊं लागला. प्रतिसहकार पक्ष म्हणजे नोकरीवाला

पक्ष असं ह्या पक्षाला हिणवण्यांत येऊं लागलें. पण प्रतिसहकार पक्ष मेला नाही. एवढंच नाही तर तो निरनिराळ्या नांवाखाली निरनिराळ्या प्रांतांत जन्मास आला.

## स्वराजिस्टांची व प्रतिसहकारवाद्यांची टाऊन हॉलमध्ये दंगल.

सन १९२५ सालीं सुरवातीलाच जानेवारी महिन्यांतच ' प्रतिसहकार पक्ष ' निघाल्यानंतर डॉ. चोळकर, त्या वेळचे नगर कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष ह्यांचा निषेध करून त्यांना त्यांच्या पदावरून काढण्याकरिता एक नगर कांग्रेस कमिटीची सभा टाऊन हॉलमध्ये बोलावल्या गेली. डॉ. चोळकर हे ह्या वेळेस प्रतिसहकार पक्षाचे सेक्रेटरी होते. तेव्हा न. कां. कमिटीच्या सभासदांच्या दृष्टीनें हे अनिष्ट होतं. ह्या सभेला मी जरूर आलंच पाहिजे; भांडण मारामारी होण्याचा प्रसंग आहे तरी तुम्ही आल्यावांचून राहूं नये असें मला डॉ. मुंजे यांचें पत्र आलें.

मी व माझा भाऊ दामुअण्णा आम्ही दोघेही टाऊन हॉलमध्ये गेलों. टाऊन हॉल गच्च भरला होता. खुर्च्या थोड्याच होत्या ८ । १०. बैठक सतरंजीचीच होती. सतरंजीवर उदारामजी पहेलवानाला–हेही नगर कांग्रेस कमिटीचे सभासद होते–मी बसलेलं पाहिलं. डायसच्या समोर ८।१० हातावर उदारामजी होते. मी त्यांच्या जवळच जाऊन बसलों. तिथे जाऊन बसण्याच्या आधी विचार केला कीं दंगा करणाऱ्यांची सर्व मदार उदारामजीवर असेल; व जर मी त्यांच्या जवळच जाऊन बसलों तर ते दंग्यांत भाग घेणार नाहीत. हे असं मी आपल्या मनाशीं ठरवतांना मी त्यांच्याकरिता व त्यांचे स्नेही बाजारगावचे श्री. बापुसाहेब देशमुख ज्यांच्यावर खुनाचा आरोप आला होता, त्यांच्याकरिता कोर्टांत केलेले श्रम ध्यानांत घेतले होते असं सागायला कांही हरकत नाही. त्याचप्रमाणे हिंदुमुसलमानांच्या १९२१ च्या आक्टोंबरच्या दंग्यांत व कांही महिने नंतर, त्यांच्या येथील माझी रोजची ८ । १० तासाची बैठक व कोष्टी पुऱ्यांतील कोष्ट्यांचा दाट परिचय ह्याही गोष्टी मी ध्यानांत घेतल्या होत्या. डॉक्टर मंडळी–परांजपे वगैरे व श्री. भवानी शंकर नियोगी हेही खुर्चीवर बसले होते. ते ह्या वेळेस नगर कांग्रेस कमिटीचे सभासद व नागपूर म्युनिसिपालीटीचे अध्यक्ष होते. ही सर्व मंडळी एकत्रच बसली होती.

डॉक्टर चोळकर ह्या सभेचे अध्यक्ष होते. त्यांनी अध्यक्षपदाची खुर्ची खाली करावी कारण त्यांच्या विरुद्ध निषेधाचा ठराव आहे अशी जनरल आवारी यांनी सूचना आणली. डॉ. चोळकर यांनी खुर्ची सोडली नाही. जनरल आवारी तावातावाने एक खुर्ची घेऊन डायसवर गेले. नाही डॉ. चोळकर अध्यक्षाची खुर्ची सोडत तर आपणच एक खुर्ची घेऊन जाऊन अध्यक्ष ह्या नात्यानं सभा चालवावी. त्यांच्या ह्या डायसवर जाण्याला कोणी तरी हरकत घेतली. जबरदस्तीने खुर्ची हिसकून घेतली. बस्स झाली दंगलीचा सुरवात. दोन तीन मुसलमान डॉ. चोळकरवर धावून गेले. डॉ. चोळकरांना सोडविण्याकारितां, डॉ. परांजपे धावून गेले. डॉ. परांजपेवर कांही मंडळी धावून गेली. लांबाझोंबीला खूपच सुरवात झाली. जोराचा गोंगाट सुरू झाला. डॉ. परांजपेना सोडविण्याकरितां दामुअण्णा धावून गेले. डायसच्या जवळ धक्काबुक्कीला व रेटारेटीला चांगलाच रंग आला. टेबलावरचं सामान फेकल्या गेलं. हॉलच्या दरवाजांच्या काचा फुटूं लागल्या. खाड खाड आवाज सुरू झाला. दामुअण्णाना दोन चार मंडळीनं घेरलं. उदारामजी पहेलवान उठून उभे राहिले. मीही उठून उभा राहिलों. ‘ क्यंव पहेलवान किदर जाते हो ? ’ पहेलवान ‘ आपके भाईको छुडानेकुं. देखो उनकूं अदमीयोंने घेर लिया है. ’ पहेलवान डायसकडे जाऊं लागले. मी त्यांच्या मागोमागच जाऊं लागलों. पहिलवानानं खरोखरच ह्या सर्व मंडळीस जागच्या जाग्यावर बसवलं. नंतर मी व पहेलवान फिरून आपल्या जाग्यावर येऊन बसलों. पहिलवान मला म्हणाले “ महाराज लिखे पढे हुयेभी हम सरीखे अडाणी लोकोंके माफीक दंगल मचाने लगे तो अब क्या कहना ! ” सुशिक्षित माणसांनी अशी दंगल मचवन खरोखरच लांछनास्पद ? टाऊन हालच्या इतर भागांतही दंगल मचल्यामुळे श्री. शंकरराव नियोगी ह्यांनी टाऊन हॉलचें जास्त नुकसान होऊं नये म्हणून सीटी सुपरिंटेंडेंटला फोन केला. पोलीस आले. मंडळीला बाहेर जायला सांगितलं. हॉल खाली झाला.

**पार्लमेंटमधील आयरिश पक्षासारखा पक्ष पाहिजे**

एक वर्षाच्या अनुभवाने व सर फ्रयांक स्लायच्या स्वराज्य पक्षाविरूद्ध प्रचाराचा परिणाम म्हणून मलाहि असं वाटूं लागलं कीं अंदाज पत्रकाला एकजात विरोध करण्याचं धोरण व्यर्थ आहे. त्यामुळे कांहीच साधत नाही.

त्या पेक्षा अंदाजपत्रकाच्या गुणावगुणावर लक्ष देणें, स्वराज्य पार्टीनें अधिकाराच्या जागा न पत्करणें पण असेंबलीच्या विश्वासास दिवाण पात्र नसल्यास त्याला पदभ्रष्ट करण्यांत मदत करणें असें धोरण असावें. थोडक्यात म्हणजे त्या वेळच्या ब्रिटीश पार्लमेंटच्या ( लोक सभेंतील ) आयरिश सभासदाप्रमाणेंच स्वराज्यपक्षाचें धोरण असावें व ह्या रीतीनें वागतां यावें म्हणून असेंबलींतील स्वराज्या पक्षाच्या सभासदांची संख्या कमी झाली तर पाहिजेच आहे असं मला वाटे. तावून सुलाखून निघालेल्या कुशाग्र बुद्धीच्या निःस्वार्थी व बरेच वर्ष सार्वजनिक काम केलेल्या सभासदांचा लहान गट असला तरी पुरवला. अधिकारी पक्षाला व मंत्र्यांना दाबांत ठेवणारा, त्यांच्यावर निग्राणी ठेवणारा, त्यांना लोकांचें हित करण्यास भाग पाडणारा व चुकतील तिथे त्यास मार्गदर्शन करणारा एखादा गट असल्यावाचून मंत्रि व अधिकारी पक्ष बेताल वागतील व राज्यकारभारांत गोंधळ माजवितील असं मला वाटत होतं. तेव्हा राज्यकारभार लोकहिताकरिता चालावा म्हणून व तो बेताल तर होऊं नये म्हणून आयरिश सभासदांसारखा गट असावा असं मला फार वाटे.

## स्वराजिस्ट लढाऊ राहून लोकहित करतील

एकदा मी अभ्यंकरांना म्हणालों "असेंबलींत येणाऱ्या सभासदांत कांही महत्वाकांक्षी सभासद असणारच. मग सभासदांचे कमात कमी दोन तरी गट पडतीलच. तेव्हा योग्य वेळेला एका अधिकारी गटाला काढून दुसऱ्या गटाला अधिकारावर चढवणं शक्य होईल. जो अधिकारी गट लोकहिताचेंच काम करेल त्याला, तो लोकहिताचेंच काम करतो आहे तों पर्यंत, त्याच्या जागेवर कायम ठेवतां येईल. बरं लोकहिताच्या विरूद्ध जाईल तर स्वराजिस्टांना त्याला पदभ्रष्ट करणं जड जाणार नाही. त्याला अशा गटाच्या विरूद्ध कडक टीका करता येणार आहे व लोकांना आपला लढाऊपणा नेहमी दाखवतां येणार आहे. राज्ययंत्र शुद्ध व हिताचेंच राहील. स्वराजिस्टांच्या लढाऊपणामुळे व लोकहितदक्षतेमुळे स्वराजिस्टाकडेच लोकांचा कल राहील. हल्ली आम्ही असेंबलींत दोन तीन दिवस फटाके ( Speeches ) उडवतो ते लोकांना दिसतं. नंतर लोकांना आमचें कांहीच काम दिसत नाही. आणि बाहेर तर कांग्रेस किंवा स्वराजिस्ट कांहीच चित्तवेधक असा कार्यक्रम करीत नाहीत. स्वराजिस्टांनी मंत्रिपद घेतलं नाही तर त्यांचा

निःस्वार्थही लोकांपुढे राहील व त्यांची लढाऊ कामगिरीही लोक विसरूं शकणार नाही " व ह्याच धोरणाला अनुसरून मी वर्तमानपत्रांत लेखही लिहिलेत. " स्वराजिस्टांचा कार्यक्रम थोडाबहुत बदलवून घेतां आला तर मी पहातों " असं ते म्हणाले. " तूं आपल्या मताचा प्रचार करूं शकतोस. सध्याच स्वराजिस्ट पार्टीच्या सभासदत्वाचा राजीनामा देऊं नकोस. " मी पार्टीचा सभासद कायम राहीलों.

## भवानीशंकर नियोगी विरुद्ध दादासाहेब उधोजी

डॉ. मुंजे ह्यांनी राजीनामा देऊन मध्यप्रांत असेंबलीमधील आपली जागा खाली केल्यानंतर ह्याच जागेकरिता सर भवानीशंकर नियोगी स्वतंत्र्य पक्षाचे उमेदवार उभे राहिले. त्यांचा म्यानिफेस्टो प्रतिसहकार पक्षाच्या धोरणाला अनुसरून होता. त्यांनीही लोकनियुक्त प्रतिनिधींच्या बहुमताचा पाठींबा ज्यास मिळेल त्यानेच दिवाणगिरी घ्यावी, सरकारी सभासदांच्या मदतीने बहुमत करूं नये असें म्हटलें होतें. त्यांचे प्रतिस्पर्धी निळकंठराव उधोजी हे होते. ते स्वराजिस्ट पक्षाचे उमेदवार. निवडणूक १३ फे. १९२६ रोजीं झाली. निवडणुकींत नियोगीचा पराभव झाला. नियोगी जरी निवडणूक हरले तरी ज्या तत्वांवर नियोगी निवडणूक भांडले त्यांचा जय झाला असंच म्हणावं लागेल. एकटे नियोगी विरुद्ध स्वराज पार्टी असा हा झगडा होता हेंही विसरून चालणार नाही.



डॉ. मुंजे

निवडणूक गेली पण तत्वांचा जय झाला हें १९२७ सालच्या निवडणूकीवरून दिसून येणार आहे, कारण नंतर स्वराजिस्ट अल्पसंख्य गटच राहिला. ह्या निवडणूकीच्या दुसऱ्यास दिवशीं म्हणजे १४ फे. ला अकोल्यास प्रतिसहकारवादी लोकांची परिषद भरणार होती.

## प्रतिसहकार परिषदेंत वादळ

वऱ्हाडांतील स्वराज पार्टीच्या सभासदांचं मत असं होतं कीं अधिकाराच्या सर्वच जागा स्वीकाराव्या व सुधारणा राबवाव्या. ह्या मताला अनुकूल असं वातावरण उत्पन्न करण्याकरिता व एक पक्ष स्थापन करण्याकरिता त्यांनी अकोला येथे ता. १४ फे. ला एक परिषद बोलावली. तिचें अध्यक्षस्थान बॅ. जयकर यांना देण्यांत आलें. या परिषदेचा पुढाकार घेण्यांत लोकनायक अणे होते. या परिषदेला पुण्याचे श्री. न. चिं. केळकर व दा. वि. गोखले हेही हजर होते. या परिषदेसमोर 'पक्षाच्या सभासदत्वासंबंधी (Qualifications) व अधिकार स्वीकारासंबंधी ठराव यावयाचे होते.

परिषदेच्या दिवशीं सकाळीं डॉ. जयकर ह्यांचें अध्यक्षीय भाषण झालें. दुपारीं दोन वाजल्यानंतर परिषदेचे ठराव चर्चेस यावयाचे होते. परिषद दोन वाजतां सुरू झाली. सभासदत्वासंबंधी ठराव चर्चेस यावयाचा होता तो येण्यापूर्वी मी लो. बापुजींना हालमधेंच म्हणालों "बापुजी, मला ठरावाला उपसूचना आणावयाच्या आहेत. तुम्हाला ह्या संबंधी ठराव चर्चेस येण्यापूर्वी कळवणें बरें असें मला वाटलें. नाहीतर तुम्ही म्हणाला असतां 'गोविंदा, तूं मला पूर्वीच कां सांगितलं नाहींस?" लो. बापुजी अणे म्हणाले 'जरूर सूचना आण. विचार केल्या जाईल.' प्रतिसहकार हा नवीन पक्ष स्थापन करण्यासंबंधीचा ठराव कोणीतरी मांडल्यानंतर मी माझी उपसूचना मांडली कीं "प्रतिसहकार पक्षाचा सभासद



डॉ. जयकर

हा कांग्रेसचाही सभासद असलाच पाहिजे." या उपसूचनेला खामगावचे त्या वेळचे प्रमुख कार्यकर्ते श्री. पन्नालाल व्यास यांनी हिंदींत जोरदार भाषण करून दुजोरा दिला. श्री. दा. वि. गोखले व वऱ्हाडांतील एक दोन गृहस्थ ह्यांनी विरोध केला. पण ह्या नंतर डॉ. परांजपे, डॉ मुंजे व आश्चर्याची गोष्ट अशी कीं श्री. तात्यासाहेब केळकर यांनीही माझ्या उपसूचनेला पाठिंबा दिला. श्री. दा. वि. गोखले व श्री. तात्यासाहेब केळकर ह्यांनी या उपसूचनेवर भिन्न धोरणें स्वीकारलीं.

ह्या उपसूचनेला श्री. केळकरांनी दुजोरा देणारें भाषण संपविल्याबरोबर बॅ. जयकर अध्यक्षपदावरच्या जागेवर उभे राहून जरा रागानेच श्री. तात्यासाहेबांना म्हणाले 'तुम्हाला जर असं करायचं होतं तर मग मला बोलावलं कशाला, व ही परिषदही कशाला?' नंतर ते डायसवर बसलेल्या मंडळीशीं त्याच गुर्मीत बोलूं लागले. लो. बापुजी अणे ह्यांनी डॉ. जयकराशीं थोडा वेळ आपसांत भाषण केलं व त्यांची आपसांत चर्चा झाल्यावर अध्यक्षांनी मला बोलावलं व "ह्या उपसूचनेवर उद्या सकाळीं मतें घेतली तर चालेल ना" असं विचारलं. मी उत्तर दिलं चालेल.

दुसरा ठराव अधिकारपदांचा स्वीकार करण्यासंबंधीचा होता. मी उपसूचना मांडली. "आपल्या बहुमताच्या आधारावर ज्या अधिकाराच्या जागा घेतां येतील त्याच जागा प्रतिसहकार पक्षाच्या सभासदांनी घ्याव्या." अर्थातच हें असेंबलींत प्रतिसहकार पक्षाच्या सभासदांचें बहुमत असेल तरच शक्य होतें एरवीं नाही. या उपसूचनेने तर आणखीच जास्त खळबळ उडाली. श्री. पन्नालाल व्यास, डॉ. परांजपे व डॉ. मुंजे यांनीही या उपसूचनेला पाठिंबा दिला. अध्यक्षांनी ह्या उपसूचनेवरही 'उद्या' मतें घेण्यास हरकत नाही ना असं मला विचारलं. मी 'कांही हरकत नाहीं' असं म्हणालों. दुसऱ्या दिवशींच्या परिषदेच्या वेळेपर्यंत उपसूचनांच्या विरुद्ध तर नाहीच पण दुजोरा देणाऱ्यांची संख्या वाढेल ही माझी खात्री होती.

## डॉ. जयकरांचा तडजोडीचा मसुदा

"ठराव व उपसूचना बाबत तुम्ही मला रा. ब. आठले ( हे परिषदेचे स्वागताध्यक्ष होते ) ह्यांच्या बंगल्यावर परिषदेचें आजचें काम आटोपल्यावर

भेटा " असे डॉ. जयकर मला म्हणाले. परिषदेचें त्या दिवशीचें काम संपल्यावर मी बॅ. जयकरांकडे गेलों असतां ते म्हणाले " देशमुख, मध्यप्रांत वऱ्हाड पुरतांच विचार केला तर तेथे स्वराज्यपक्षाचं बहुमत असल्याने प्रत्येक प्रतिसहकारवादी कांग्रेसचा सभासद असणं व त्यानं अधिकारपद स्वीकारल्यास पक्षास जबाबदार असणं शक्य आहे. मध्यप्रांत – वऱ्हाडांत ज्या प्रमाणं स्वराजिस्ट बहुसंख्येंत आलेत त्याच प्रमाणं प्रतिसहकारवादी बहुसंख्येंत येतील असे तुम्हास वाटते व मलाहि असा संभव दिसतो. परंतु मुंबईसारख्या प्रांतांत ह्या अटीमुळे अडचणी उपस्थित होण्याची भीति आहे. कारण कांग्रेस सदस्याची अट ठेवल्यास प्रतिसहकार पक्षाचें तिथे बहुमतच होणार नाही. तसेंच अधिकाराच्या जागा स्वीकारण्यासंबंधी 'पक्षाला जबाबदार' ही अट असली तर प्रतिसहकार पक्षाच्या लोकांना अधिकाराच्या जागाही घेतां येणार नाही. तेव्हा मुंबई प्रांतापुरती तरी थोडी उपसूचना तुमच्या उपसूचनेला आणणें जरूर आहे. ह्या प्रांतांतील नवीन पक्षाला ( प्रतिसहकार पक्षाला ) कांग्रेसच्या सदस्यत्वाची अट नसावी व 'पक्षाला जबाबदार असतील त्याच जागा' ऐवजी " कौन्सीलांतील पक्षाला जबाबदार " ह्या उपसूचना आहेत. आमच्या प्रांतांतली परिस्थिती लक्षांत घेतां ह्या उपसूचना जरूर आहेत. त्या योग्य अशाच होतील. प्रत्येक ठरावांत मला मी सांगितलेली दुरुस्ती करणें–असेंबलींत काम करण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटते. असें झाल्यास मि. जिनास व डॉ. बिझांटचे अनुयायी आहेत, ह्यांस आमच्या पार्टींत येणें सुलभ होईल व अशा रीतीने लोकनियुक्त सभासदांचा बहुमत असलेला पक्ष बनावणें सुलभ होईल. मी ह्यांच्या दोन्हीही उपसूचना मान्य केल्या. दुसऱ्या दिवशीं दुरुस्त केलेले ठराव पास झालेत.

अकोल्याहून परत आल्यानंतर मी अभ्यंकरांना परिषदेचा हाल सांगितला व मी माझ्या पूर्वीच्या मतास चिकटून आहे असं सांगितलं. पण प्रत्येक मनुष्य पक्ष स्थापन करूं शकत नाही. त्याचप्रमाणे जितक्या व्यक्ति तितके पक्ष असणेही योग्य नाही. तेव्हा ह्या परिषदेंत पास झालेल्या ठरावास अनुसरून जो पक्ष निघणार त्यास जाऊन मी मिळणार. " अभ्यंकर म्हणाले, " चालू कौन्सीलाच्या मुदतीपर्यंत अखिल भारतीय स्वराज्य पक्षाच्या आदेशानुसार तूं

१९१५२ ... ९९४ ... ९४/१२/५४

कौन्सीलांत काम कर. पाहूं या पुढे कांग्रेसचें धोरण काय राहते तें ? " मी त्याप्रमाणे वागण्याचें कबूल केलें.

## माझें स्टेटमेंट

स्वराजिस्ट असेंबलीची बैठक ( १९२६ सालाचें अखेरचें बजेट सेशन ) संपल्यानंतर कांही महिन्यांनी नवीन प्रांतीय असेंबलीच्या निवडणुकी होणार होत्या. मी प्रतिसहकार पक्षातर्फे नागपूर कामठी या विभागाकरिता उभा राहिलों. त्या वेळेस मी एक स्टेटमेंट प्रसिद्ध केलें. तें महाराष्ट्राच्या १९२९ च्या ता. १७ आक्टोबरच्या अंकांत ' मी प्रतिसहयोगी कां झालों ? ' ह्या शीर्षकाखाली छापलें गेलें होतें. त्यातील अत्यंत महत्वाचा भाग खाली दिला आहे.

" जी राजकीय चळवळ जनस्थिति सुधारण्याकडे दुर्लक्ष करुन चालविली जाते ती चळवळ फार दिवस टिकणें शक्यच नाही असा माझा अनुभव आहे. १९२१-२२ सालीं राष्ट्रीय पुढाऱ्यांनी जरी कौन्सीलावर बहिष्कार घातला होता, तरी त्या वेळीं लोकपक्षाचे पुष्कळ पुढारी, त्यांचे अनुयायी स्वयंसेवक खेड्यापाड्यांत जाऊन सामान्य जनतेच्या हिताच्या कांही चळवळी तरी चालवित होते. नागपूर जिल्ह्यांत दारूबंदी आणि बिगार बंदी संबंधी चळवळ, भंडारा जिल्ह्यांत ह्या चळवळी शिवाय धान्याची महर्गता नाहीशी करण्याची चळवळ, बालाघाट जिल्ह्यांत गुरें चराईच्या झगड्याची सत्याग्रहाची चळवळ, यवतमाळ जिल्ह्यांत बिगार व बलुते यांच्या विरूद्ध चळवळ, अशा अनेक चळवळी चालल्या होत्या. ज्या प्रश्नाबद्दल ह्या चळवळी चालवल्या जात होत्या त्या सामान्य जनतेच्या प्रत्यक्ष हिताहिताच्या असल्याने लोकांचा त्यास पाठिंबा मिळत होता – त्या संबंधी सर्व जनतेस जिव्हाळ्याची कळकळ वाटत होती. " ह्या नंतर स्वराजिस्ट पक्षाच्या अडवणूकीच्या धोरणाचा व बंदोबस्ताच्या कायद्याची दुरुस्ती करणाऱ्या बिलाचा इतिहास देऊन पुढे म्हटलें आहे, " नागपुरांत पाण्याची टंचाई भासूं लागल्या कारणाने म्युनिसिपालिटीने पाण्याचे मोठे नळ घालून अधिक पाणी लोकांस द्यावे अशी योजना केली. त्या साठी सरकारकडून कर्ज काढणें अवश्य होतें. सरकारने त्या करितां ४ लक्ष रुपये बजेटांत ' नागपुर म्युनि० स कर्ज ' म्हणून दाखविलेही होते. पण १९२४ सालीं स्वराजिस्टांनी संबंध बजेट फेटाळलें ! त्यामुळे नोकरशाहीला स्वतःसाठी

लागणारा एक पैसा सुद्धा कमी झाला नाही पण नागपुर म्युनि०ला मिळणारा पैसा मात्र सरकारने नाकारिला. " काय करावें तुमचेच प्रतिनिधी पैसा देऊं नका म्हणतात तर आम्ही कसा द्यावा ? ' सोपीव ' खात्यांत कौन्सिलच्या मंजुरीशिवाय आम्हास एक पैसाही जास्त खर्च करितां येत नाही ! " असें सरकार नागपूरच्या नागरिकांस सांगू लागलें. सबंध वर्षभर नागपूरकरांस पाण्याची गैरसोय सोसावी लागली. सरकार जवळून कर्ज मागण्याचा व घेण्याचा ठराव नागपूर म्यु०ने एकमतानं पास केला होता. असहयोगी सभासदही त्या ठरावास अनुकुल होते. ह्या नंतर पाणीपुरवठा भरपूर नसल्यामुळे लोकांना होणारा त्रास, पाणी भरणाऱ्यांत खुनाखुनी होण्यापर्यंत होणारे तंटे व आगी लागलेलीं घरें न विझविता आल्यामुळे घरांच्या मालकांची राहण्याची गैरसोय ह्या सर्व बाबींचा उल्लेख करून व क्षुल्लक फायद्याकडे पाहूं नका म्हणणाऱ्यांचा समाचार घेऊन हें स्टेटमेंट म्हणतें, " या प्रांतांत म्हणण्या-सारखी ब्राम्हणेतर चळवळ नव्हती. बाहेर प्रांतांतील सत्यशोधक पुढारी – गव्हर्नराच्या चिथावणीने म्हणा किंवा स्वतःच्या स्फूर्तीने म्हणा, त्या चळवळीचें विष इकडे आणूं पहात होतें. स्व. प. च्या सबंध बजेट फेटाळण्याच्या धोरणानें जनतेचें जें नुकसान झालें तें विशेष जोराने पुढे मांडून बाहेरच्या सत्यशोधकांनी ती चळवळ इकडे पसरविण्याची संधि साधली. कांग्रेसच्या मागे जनता आहे असें स्वराजिस्ट भासवितात पण गेल्या वर्षी अमरावतीस भरलेल्या ब्राम्हणेतर परिषदेचे ठराव पाहिले असतां या विषयींचा भ्रम दूर होईल. सारांश स्वराजिस्ट कार्यक्रम हा असहका-रितेच्या कार्यक्रमाप्रमाणेच सद्यःस्थितींत अव्यवहार्य असल्यामुळे तो अयशस्वी झाला. " ह्या स्टेटमेंटमधे शेवटी शेवटी म्हटलें आहे.

" सारांश, स्वराज्यपक्ष सामान्य जनतेच्या हिताविषयी इतका बेगुमान-पणे व बेमुर्वतपणे वागला नसता, त्याने जर कौन्सिलांतील आपल्या बहुमताच्या जोरावर लोकांचा होईल तितका फायदा करून दिला असता, त्यांना स्वतःला दिवाणगिरी नको होती, तरी जर दुसऱ्या कोणासही दिवाण-गिरी घेण्यास सवड दिली असती; आणि त्यानी जर शिस्तीप्रमाणेच शहाण-पणाचेंही धोरण ठेविलें असतें तर मी त्यांना सोडून ' प्रतिसहकारवादी '

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

कधीही झालों नसतों." ह्याच स्टेटमेंटमधे प्रतिसहकारपक्ष अधिकाऱ्याच्या जागा स्वीकाराव्या म्हणतो म्हणजे काय म्हणतों ह्या संबंधी म्हटले आहे. "ते सरकारी नोकर बनूं चहात नाहीत, कौन्सिलाला जबाबदार असणाऱ्या जागाच ते स्वीकारतील. इतर नाही. दिवाणांच्या पाठीमागे लोकपक्षाचें बहुमत आहे असें त्यांना दिसलें तरच दिवाण होतील; सरकारी सभासदांच्या मतांच्या मदतीने जर दिवाण नेमले जाऊं लागले तर प्रतिसहकारवादी तसली दिवाणगिरी कधीही स्वीकारणार नाहीत." मध्यप्रांत कौन्सिलाच्या नवीन निवडणुकी झल्या, त्यांत कांग्रेस सभासदांची बहुसंख्या नव्हती. जे आले त्यांत प्रतिसहकारवादी वऱ्हाडांतून, स्वतंत्र कांग्रेस पक्ष महाकोशलमधून – ह्या पार्टीचे लीडर डॉ. राघवेंद्रराव व कांही कांग्रेसवाले स्वराजिस्ट. कांग्रेसवाल्यांची संख्या प्रतिसहकारवादी व स्वतंत्र कांग्रेसवाले या दोघांच्या संखेपेक्षा कमी. नागपूर – कामठीतर्फे डॉ. खरे वं धाबे वकील कांग्रेसतर्फे. दोघांपैकी फक्त डॉ. खरे निवडून आले. डॉ. परांजपे वं मी रिस्पान्सिव्ह कोआपरेटर्सतर्फे-प्रतिसहकार पक्षातर्फे. दोघंही निवडून आलों नाही. श्री. गोविंदराव प्रधान वकील ब्राह्मणेतर पक्षातर्फे, ते निवडून आले. असो कांग्रेसपार्टी हा अल्पसंख्यांकांचा गट होता. लोकांच्या मताचा वारा कोणीकडे वाहतो तें कांग्रेसला दिसून आलं.

मध्यप्रांत असेंबलीच्या निवडणुकींत लोकमताचा वारा कोणीकडे वाहतो हें जसं दिसून आलं तसंच मध्यवर्ती असेंबलीच्या निवडणुकींतही लोकमताचा वारा कोणत्या दिशेनं आहे हें दिसून आलं. बॅ. अभ्यंकर – कांग्रेसतर्फे होते. त्यांच्या विरुद्ध डॉ. मुंजे–प्रतिसहकार पक्षाचे. डॉ. मुंजे निवडल्या गेले. मध्यवर्ति असेंबलीच्या निवडणुकींत बॅ. अभ्यंकरांचा जो पाडाव झाला त्याला कारण लोकमत कांग्रेसच्या असेंबलीच्या धोरणाच्या विरुद्ध होतं हें दिसून आलं. त्यांत ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाचाही प्रश्न नव्हता कारण दोघेही उमेदवार ब्राह्मणच होते.

## मी प्रतिसहकार पक्षाचा राजीनामा दिला

प्रांतांतील नवीन निवडणुकीनंतर प्रांतांत राव रामराव (डॉ. राघवेंद्रराव व बॅ. रामराव देशमुख) ह्यांची मिनिस्ट्री झाली. पण ती लोकनियुक्त व सरकारनियुक्त (सरकारने नियुक्त केलेल्या) सभासदांच्या पक्षाची, निव्वळ

लोकनियुक्त सभासदांची ती मिनिस्ट्री नव्हती. अकोल्याच्या प्रतिसहकार पक्षाच्या परिषदेंत पास झालेल्या टरावांविरुद्ध अशी ती बनविलेली मिनिस्ट्री. त्या मिनिस्ट्रीला डॉ. मुंजे मोठ्या अभिमानानं माझी मिनिस्ट्री म्हणत. पण ती बनविलेली होती लोकनियुक्त व सरकारने नेमलेल्या सभासदांचा खिचडी पक्ष स्थापून. कांही दिवसांनी प्रतिसहकार पक्षाचा मी राजीनामा दिला. त्या दिवाणांनी व त्याच्या पक्षानी आतून किंवा बाहेरून कोण्याही ठिकाणून भांडण्याचं धोरण चालू ठेविलें नाही किंवा लोकांत उत्साह आणण्याचा-वाढविण्याचा तर लांबच राहिलं-प्रयत्न केला नाही. ह्या मिनीस्ट्रींत व पूर्वीच्या केळकर-चिटणीस मिनिस्ट्रींत कांहीच फरक नव्हता. सर्वस्वी सरकारच्या मेहेरबानीवर अवलंबून असलेली मिनिस्ट्री ! ती काय दिवे लावणार.

लो. टिळकांच्या ‘ प्रतिसहकार ’ पक्षाचे आपणास म्हणविणारे लोक, फायदा करून घेणारे लोक लो. टिळकांचे महत्वाचे शब्द विसरले. “ मिळाले ते घ्या ”- ते त्यांनी घेतले पण “ आणखी मिळविण्याकरिता भांडा ” हें मात्र त्यांनी तेव्हा किंवा नंतरही केलं नाही. आणखी सत्ता मिळविण्याचं भांडण सन १९३० पासून कांग्रेसलाच करावं लागलं.

# नागपूरची हिंदुसभा

सन १९२१ ते १९२७ सालांत राजकीय वातावरणांत काय काय फेरफार व कसे कसे होत गेले, असहकारितेचें शस्त्र कसें बोथट झालें, सरकारवर केलेला मारा नंतर प्रजेवरच कसा उलटला, सरकारवर केंद्रीभूत मारा करणाऱ्याची कशी पांगापांग झाली, कांग्रेसवाल्यांचें चढाईचें धोरण कसें फिसकटलें हें आपण पाहिलं. जवळ जवळ ह्याच कालांत हिंदुस्थानांतील भिन्नधर्मीयांच्या संबंधांतही कसे फरक पडत गेले, हिंदुसमाजांतील निरनिराळया थरांचे, जाती जातींचे परस्परांचे संबंध कसे राहीले, ह्या धामधुमीच्या व विचार क्रांतीच्या कालांत ते तसेच राहिले कीं ह्या भिन्नधर्मीयांच्या अनुयायांच्या समाजांतील निरनिराळया स्थितींतील लोकांच्या व हिंदुसमाजांतील लोकांच्या वागणुकींत फरक पडत गेला कीं काय हें जाणून घेण्याची उत्सुकता असणें अगदी साहजिक आहे. चला तर १९१३ सालाकडे म्हणजे ओघाओघाने ज्या घटना घडल्या, जे प्रसंग उद्‌भवले त्या वरून हा काल राजकारणाखेरीज इतर दृष्टीनेही कसा महत्वाचा आहे हें दिसून येईल.

## हिंदुंच्या नेहमींच्या सवाद्य मिरवणुकींवर घाला

सन १९२३ च्या भाद्रपद महिन्यांतली गोष्ट. एक दिवस सकाळीं ७ वाजण्याचे सुमारास मी आपल्या सीव्हील स्टेशनमधील बंगल्यांतील समोरच्या बाजूस असलेल्या बगीचांत टेहळत असतांना शुभ्र खादीचे कपडे घातलेला गृहस्थ माझेकडे आला व त्याने मला नमस्कार केला.

मीः— नमस्कार. काय आपलं नांव ? कुठे असता ?

तोः— माझं नाव गणपतराव तितरमारे. मी राहतों नागपूरलाच गणेशपेठेंत.

मी:— आपण काय काम करता ? आपलं माझ्याकडे काय काम आहे ?

तो:— काम काय आहे हे डॉ. परांजप्यांनी ह्या पत्रांत लिहिलेलं आहे ( मला पत्र दिलं ). मी ' महाराष्ट्र ' प्रेसमधे कम्पाझिटर आहे.

डॉ. परांजपे यांचें पत्र वाचल्यानंतर व गणपतराव तितरमारे याना कांही प्रश्न विचारल्यानंतर त्यांच्या अडचणीची कल्पना मला आली. गणपतराव तितरमारे ह्यांनी त्यांच्या नेहमीच्या वहिवाटीप्रमाणे ह्या सालींही आपलें घरीं भाद्रपद महिन्यांत गणपतीचे उत्सवाचे दिवसांत गणपति मांडला. गणपति विसर्जनाचे दिवसा पावेतोंचा त्यांच्या गणपतीच्या उत्सवाचा कार्यक्रम नीट रीतीने पार पडला होता. गणपति विसर्जनाचे दिवशीं ते नेहमीच्या वहिवाटीस अनुसरून वाद्यासहित गणपतीची मूर्ति भजनी मंडळीसह सडकेने मिरवत नेत असतांना मुसलमानांनी त्यांच्या मिरवणूकीस हरकत घेतली. ज्या ठिकाणीं हरकत घेतली त्या ठिकाणीं मुसलमानांनी नवीनच मसजीद उभारली होती. पूर्वी त्या ठिकाणीं एक लहानसा दर्गा होता. " आमच्या मामुली वहिवाटीप्रमाणे आम्हाला त्या रस्त्याने मिरवणूक सवाद्य नेण्याकरितां कोर्टाने मदत केली पाहिजे. कोर्टातून तसा हुकुम मिळवून द्या " अशी त्यांनी मला विनंति केली. हें काम करण्याचं मी कबूल केलं – अर्थातच बिना वेतन.

मि. स्लेनी ह्या नांवाचे पहिल्या वर्गाचे सिटी म्याजिस्ट्रेट होते त्यांच्याकडे मी अर्ज दिला. चौकशीला सुरवात झाली. मुकर्दम्याच्या दोनतीन पेशा झाल्या. स्लेनी साहेबांनी दर्ग्याची जागा पाहिल्यावर, म्युनिसिपालिटीचे जुने नकाशे तपासल्यावर व तोंडी पुरावा ऐकल्यावर त्यांची खात्री झाली कीं मसजीद नवीनच बांधली आहे व सडकेकडचा दिवालीचा भाग व दरवाजा तर अगदीच नवा, ६।७ दिवसांपूर्वीच बांधलेला. तसं त्यांनी बोलूनही दाखवलं. या वरून हेंच अनुमान निघणार होतं कीं ह्या नवीन दरवाज्यावरून सडकेनं सवाद्य मिरवणूकीस कोर्टाची परवानगी मिळणार. फैसला कांही वेळानं लिहिला जाणार होता. व त्या प्रमाणं त्यांनी आम्हाला सांगितलं. कोर्टांत तितरमारे ह्यांचा एक स्नेही माझ्याबरोबर कोर्टांत हाजर होता त्यास त्याप्रमाणे सांगून मी डीस्ट्रीक्ट कोर्ट बाररूममधे गेलों. मि. स्लेनी ह्यांनी मला कोर्टांत कांही

वेळानं बोलावलं. त्या वेळेला कोर्टात व कोर्टाचे व्हरांड्यांत व समोर मैदानांत मुसलमानांचा खूप मोठा जमाव दिसला. हिंदूंच्या बाजूने फक्त मी व तितरमारेंचा एक स्नेही असे दोघेच. मि. स्लेना ह्यांनी आरडर सुनावली. " हिंदुंनी मशिदीवरून सवाद्य मिरवणूक नेऊं नये. " " मशीद नवीन असून हिंदुंच्या सवाद्य मिरवणूक नेण्याच्या हक्कावर ही गदा काय म्हणून " असं मी मि. स्लेनी यांस विचारलं असतां ते म्हणाले " मुसलमानांचा जो मोठा जमाव पहातां तो डिस्ट्रीक्ट म्याजिस्ट्रेटच्या बंगल्यावर गेला होता. डिस्ट्रीक्ट म्याजिस्ट्रेटनं त्यांच म्हणणं ऐकून घेऊन शांतताभंग होईल म्हणून क्रि. प्रो. कोड कलम १४४ खाली मिरवणूक बंदीचा हुकूम काढण्यास सांगितलं. " हे डीस्ट्रीक्ट म्याजिस्ट्रेट इंग्रज होते हें सांगणें नकोच.

डीस्ट्रीक्ट म्याजिस्ट्रेट व मि. स्लेनी ह्यांचा मुसलमान शांतताभंग करतील असा ग्रह झाल्यास तो चुकला कसा ? किती हिंदु ह्या मुकर्दम्यांत लक्ष घालत होते ? तितरमारे ह्यांचा गणपति ! त्यांत इतर हिंदुंच्या हिताहिताचा प्रश्न उद्भवतो कोठे ? ज्याचं त्यानं आपल पहावं. आपल्यां गणपतीवर थोडाच हा प्रसंग आहे ? म्हणजे गणपती गणपतिचीही वाटणी. माझा गणपति, त्याचा गणपति. जस कांही मोहल्या मोहल्यांतील गणपति आपल्या आपल्या मोहल्ल्यांतीलचं लोकांना मोक्षास नेतील. गणपति तेवढे एक, एकच देवता व तिचा अपमान कोठेही झाला तरी सर्वच हिंदुंच्या धार्मिक भावनांवर तो अघात आहे असं दुर्दैवानं प्रत्येक हिंदूस वाटत नाही. सर्वच बाबतींत हिंदूंची वैयक्तिक दृष्टि. स्वतःपुरतेच पहाणारे. स्वतःचा आर्थिक फायदा, स्वतःची स्नानसंध्यां, स्वतःचं देऊळ व स्वतःचाच देव. जितका हिंदु जास्त शिकलेला तितका तो अलग राहूं इच्छितो. काय करायचं आहे समाजाचं !

## वैदिक कालांत आम्ही काय म्हणत आलों

" सं गच्छध्वं सं वदध्वं सं वो मनांसि जानताम् ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति
सहनाववतु सहनौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ।

आणि आमचं वैदिक कालांतील भरतवाक्य–

सर्वेत्र सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ॥
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित दुःखभाग् भवेत् ॥

ज्या आम्ही वैदिक कालांत समयष्टिधर्माची घोषणा केली, जे आम्ही रोज परमेश्वराजवळ सर्वांचं हित होण्याची प्रार्थना करीत होतों तेच आह्मी आता अगदी स्वतःपुरतेच पहातों. सामुदायिक रीतीनं विचार करणं, वागणं हें विसरत चाललों. नाही नाही अगदीच विसरलों !

तशी हिंदूेतर समाजांची स्थिती नाही. धर्माच्या बाबतींत धार्मिक मंदिराच्या बाबतींत हिंदुखेरीज कोणताही समाज, कोणतंही, कुठलंही मंदिर ते त्या धर्मातील समाजाचं मंदिर. त्या मंदिराचा अपमान तो देवाचा अपमान व देव तर एकच आहे. देव प्रत्येक ठिकाणीं भरला आहे असा हिंदुंचा वेदांत सांगत असला तरी प्रत्यक्षांत हिंदुचं वर्तन निराळं. दुसऱ्या मोहोल्यांतलं देऊळ, त्याचं या मोहोल्लेवाल्याला काय ? उलट हंसापुरा शनिचरींतील मुसलमान ह्या गणेशपेठेंतील मुसलमानांना कोर्टांत साथ देण्यास आले होते.

गणेशपेठेंतील हिंदुच्या गणपतीच्या सवाद्य मिरवणुकीची बंदी हीच कांही हे विचार सुचण्याला कारण झाली नाही. हंसापुरींतल्या गोवधासंबंधीही मला अनुभव असाच आला होता. गोवध होणार ही बातमी आणणारे मारवाडी व्यापारी. पण ज्या वेळेस मी व डी. एस. पी. मोक्यावर गेलों तेव्हा कोणाही हिंदुचा–ज्या मारवाड्यांनी बातमी आणली त्यांच्यापैकी कोणाचाही–पत्ता नव्हता. सरकारला किंवा सार्वजनिक कार्यकर्त्याला आपल्या अडचणीची, संकटाची जाणीव करून दिली कीं बस्स. झालं त्यांचं काम संपलं. हे लागले आपल्या नित्य व्यवसायाला. त्यांचीही कांही जबाबदारी आहे, त्यांनीही कांही ह्या कामाचं ओझं उचलायचं असतं–अंशतः कां होईना – हे ते ओळखतच नाहीत.

धर्मासाठी, धर्माच्या नांवाखाली इतर समाजकार्यासाठी कसं तुटून पडावं, त्या कार्याकरिता कसा प्रोपेगांडा करावा – खरा असो वा खोटा – हे मुसलमान जाणतात. जिथे जिथे हिंदु व मुसलमान, मुसलमान व हिंदुस्थानी ख्रिश्चन या दोन जमातींचा वा त्या जमातींतील व्यक्तींचा नफा नुकसानीचा प्रश्न

तिथे सर्व मुसलमान एक. मध्यप्रांत व वऱ्हाड ह्या दोन्ही प्रांतांत मुसलमान संख्येने अल्प असूनही निर्भय व सुखाचं जीवन कंठतात ह्याला कारण एकच-त्यांची एकी. दुसऱ्याचं दुःख तें आपलं दुःख व त्यांच सुख तें आपलं सुख. आज त्याच्यावर प्रसंग आहे उद्या कदाचित आपल्यावरही तोच प्रसंग येईल अशी प्रत्येक मुसलमानाची भावना आहे. म्हणूनच ते सामुदायिक रीतीनं विचार करतात व ते आचरणांत आणतातही. आणि म्हणूनच तो समाज निर्भय रीतीने राहूं शकतो.

## हजरत हिटलर व डॉ. मुंजे चॅंबरलेन

ह्या गणपति उत्सवानंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे आश्विन महिन्यांत 'काकड आर्तीचे' दिवस आले. याच गणेशपेठेंत मशीदीपासून एका फर्लांगा-वरील अंतरावर मारुतिच्या देवळांत सकाळीं ५ वाजता 'काकड' आर्ती सुरु झाली. आर्तीच्या वेळीं मृदंग, टाळ, झांज व घड्याळ ( brass disc ) हीं वाद्यें नेहमी वाजविलीं जातात. हें मारुतिचें देऊळ फार जुनें व ही काकड आर्तीची चाल कितीतरी वर्षांची. पण ह्या वर्षी मुसलमानांनी हिंदुंना सांगितलं कीं त्यांनी आपले मारुतिचें देवळांत वाद्य वाजवूं नयेत. त्यांना, प्रार्थनेंत अडथळा होतो, त्रास होतो. गणपतीच्या सवाद्य मिरवणूकीच्या विरुद्ध निकाल दिल्यामुळे शेफारून गेलेल्या मुसलमानांनी ह्याही पुरातन धार्मिक चालींवर आक्रमण करण्याचा चंग बांधला.

हा असा काळ होता कीं कांग्रेसनं खिलाफतीच्या चळवळींत मदत करण्याचें ठरविलें होतें. हिंदुमुसलमानांच्या एकीवर भर दिल्या जात होता. तेव्हा त्या मोहोल्ल्यांतील ज्या कांग्रेसवाल्या हिंदुंनी खिलाफतीच्या बाबतींत उत्साहाने भाग घेतला होता अशा हिंदुंच्याकडून मध्यस्थीचें बोलणें सुरू झालें. मोहोल्लेवाल्यांना वाटलं ह्या हिंदुंचं तरी ते ऐकतील. पखवाज न वाजवतां, घंटा न वाजवतां बाकीच्या वाद्यासहित म्हणजे टाळ व झांज यांच्यासहित आम्हाला आर्ती करूं द्या असं बोलणं ह्या कांग्रेसवाल्या हिंदुंनी मुसलमानाशीं सुरू केलं. सर्वच वाद्यें बंद व्हावींत हा मुसमानांचा आग्रह.

डॉ. मुंजे हे ह्या वेळेस प्रांतिक कांग्रेस कमिटीचे सेक्रेटरी होते व आमची जी स्वराजपार्टी – जिचं पूर्ण नांव ' खिलाफत स्वराज ' पार्टी होतं – तिचेही ते सेक्रेटरी होते. त्यांनीही ह्या गणेशपेठेंतल्या मुसलमानांना विनंति केली कीं "दोन टाळ" तरी वाजवूं द्या. किती अल्पशी मागणी व हिंदुंच्या हक्काची केवढी तरी सोडचिठ्ठी ! डॉ. मुंजेनी समझौत्याच्या नीतिची शिकस्त केली पण हजरत हिटलर कांही ऐकेनात. ही अशी मुसलमानांची हटखोर वृत्ति पाहिल्यावर डॉ. मुंजे ह्यांच्याही वृत्तींत बदल झाला. ह्या बद्दल कोणास नवल कां वाटावे ? जात्याच डॉ. मुंजे मुसलमानांच्या विरूद्ध असणें शक्य नव्हते. त्यांचें सगळं कॉलेज लाईफ मुसलमान, ऍंग्लोइंडीयन व ख्रिश्चन विद्यार्थ्यांत गेलेलं. शिष्ट मुसलमान मंडळी धंद्यामुळे चांगल्या परिचयाची. तेव्हा मुसलमान म्हणून मुसलमानांचा द्वेष करणं त्या वेळेपावेतो तरी शक्यच नव्हतं. ' दोन टाळा 'ची मागणी केली असतांही मुसलमान समाज आपला हेकडपणा सोडीत नाही. येळकूट कायमचं हें पाहून त्यांच्या पायाच्या तळव्याची आग मस्तकास गेली असं पाहिजे तर म्हणा. ते त्यांच्याशीं बोलणं बंद करून निघून गेले.

## धार्मिक हक्कांकरिता हिंदुंची सत्याग्रह करण्याची तयारी

मुसलमानांच्या आगळीकीनं ह्या गणेशपेठेंतील ' मारुतीच्या ' देवळांत वाद्यें बंद झालीं; मग नव्या मशिदीवरून सवाद्य मिरवणूक निघणं शक्यच नव्हतं. मुसलमान लोक सांगून विनवणी करून समजले नाहीत. म्हणून कोर्टातून त्या संबंधी कांही इलाज करावा ह्या हेतूनें गणपतराव तितरमारे कांही मंडळीसह माझेकडे आले. मी त्यांची विनंति मान्य केली नाहीं. मी म्हणालों " तुम्ही दुसरा कोणी वकील पहा. मी कोर्टातून हें भांडण भांडण्यास तयार नाहीं. वकील पुष्कळ आहेत. " त्यांनी मला हें कोर्टातील काम हातीं न घेण्याचं कारण विचारलं तेव्हा मी म्हणालों " धार्मिक बाबतींत तुमचा तीव्र उत्साह दिसत नाही. कोर्टानं आपल्या हुकमानं जर एखादा आचार – ज्याला तुम्ही धार्मिक आचार समजतां – बंद केला तर तुम्हाला त्याचं कांही वाटत नाही. तुमची धाव फक्त कोर्टापर्यंत. कोर्टानं तुम्ही तसं करूं शकत नाही म्हटलं कीं गप्प बसावं; कोर्टानं हो म्हटलं तर नाचूं लागावं.

कोर्ट हाच तुमचा देव. कोर्ट म्याजिस्ट्रेट आर्डर देतांना एकच गोष्ट पहातो ती ही कीं शांतताभंग होण्याचा संभव आहे कीं काय? तो पहातो मुसलमान समाज दांडगाई करून शांततेचा भंग करणार तेव्हा त्याच्यातर्फेचाच हुकूम दिला कीं काम झालं. शांततेचा भंग होणार नाही. शांतता राखण्याचं काम सुलभ होईल." मी त्याना हंसापुरींतील गोवधाची हकीकत सांगितली, मसजिदीवरून त्यांच्या गणपतीची सवाद्य मिरवणूक बंद केली होती तीची आठवण दिली व म्हणालों "कोर्टातून काम करून घेण्याचा प्रयत्न करणं महामूर्खपणा आहे व तो मी आपल्या पदरीं बांधून घेण्यास तयार नाही. मला इतर सार्वजनिक कामें करावयास वेळ पाहिजे. तुमचं हे काम तुम्हीच संभाळा."

तितरमारेः— कोर्टातून जर आमच्या पूर्वापार चालत आलेल्या हक्कांवर गदा येतच असेल व सरकार आमच्या हक्कांचं संरक्षण करणार नसेल तर मग आता मार्ग एकच दिसतो. सत्याग्रह!

मीः— नुसतं हक्क असूनच भागत नाही. हक्क बजावण्याची स्वतःची तयारी असली पाहिजे व ती तशी दिसली पाहिजे. तुम्ही तुमची सवाद्य मिरवणूक बंद झाली त्या वेळेसच जर अशी तयारी दाखविली असती तर हा आजचा प्रसंग तुमच्यावर आला नसता. कांग्रेसचा नागपूरचा झेंडा सत्याग्रह कांही महिन्यापूर्वी झाला होता तो तुम्हाला आठवत असेलच. कांग्रेसवाल्यांनी आपल्या झेंड्याचा मान राखण्याकरितां शांततेनं सत्याग्रह केला. मान राखण्याकरितां देहदंड सोसला. ते तुरूंगात गेलेत. झेंड्याच्या अभिमाना इतकाच जरी तुम्हाला धर्माभिमान असेल तरी तुम्ही काय करावें, हें उघड आहे.

तितरमारेः— आम्ही सत्याग्रह करणार. पण त्या वेळीं दंगा होणार नाही ह्या बद्दल आपण व्यवस्था करावी. आम्ही शांतता ठेवण्याचा व शांततापूर्वक सत्याग्रह करण्याचा प्रयत्न करूं. पण मुसलमान दंगा करून शांततभंग करण्याची जवळ जवळ खात्रीच वाटते. सत्याग्रहाचे वेळी शांतता राहील असं तुम्ही पहा.

मीः— त्या बद्दल तुम्ही निर्धास्त असा. मात्र सत्याग्रह कराल त्या वेळीं मी सांगतो त्या प्रमाणं करा. हिंदु सत्याग्रह करणार ह्याची सरकारला जाणीव द्या. म्हणजे तेही त्यांना जो काय बंदोबस्त करायचा तो करतील. सत्याग्रह ४-४ माणसांच्या टोळीनेच करावा. रोज एक दोन टोळ्यांच्या वर

व तेही कांही कांही तासाच्या अंतरानं करा. सत्याग्रहाच्या वेळीं हिंदुंचा खूप जमाव तुमच्या पासून दूर थोड्या अंतरावर असावा. ते तमासबीन. त्यांनी सत्याग्रहांत भाग घेऊं नये. ह्याचा परिणाम दुहेरी होणार आहे. मुसलमानांना वाटेल तुम्ही सुसंघटित होऊन दिंडी वाजवत नेण्याची तुमची नेटाची तयारी आहे. सरकारला वाटेल दोन्ही जमाती ह्या वेळेला नेटानं भांडणार. म्हणून ते पोलीस बंदोबस्त चांगलाच ठेवतील. सबब दंगा होणार नाही. जर तुमच्या विरुद्ध कांही कारवाई केल्या गेलीच तर ती म्हणजे तुम्हाला धरून कोर्टांत पेश करण्याची. पलीकडचं काम माझ्याकडे लागलं. काम आनंदानं करीन. कोर्टांत हजर राहून सर्व कारवाई करणं माझ्याकडे लागलं.

तितरमारे:— माझी अशी इच्छा आहे कीं आपण हजर रहावं व उदाराम पहेलवानालाही आपली आखाडेवाली मंडळी घेऊन येण्यास सांगावं.

मी:— उदाराम पहिलवानला त्याच प्रमाणं मयाराम पहिलवानालाही हजर राहण्यास सांगीन. तुम्ही निर्धास्त रहा. मी येईनच येईन.

## हिंदूंचा दिंडी सत्याग्रह

दुसऱ्याच दिवशीं "दिंडी सत्याग्रह" होणार अशी वार्ता नागपूरांत पसरली. डॉ. मुंजे ह्यांना सविस्तर हकीकत कळल्यावर त्यांनी ह्या सत्याग्रहांत लक्ष घातलें. कोणत्याही गोष्टीला व्यवस्थित, भव्य व बोजदार स्वरूप देण्याच्या त्यांच्या नेहमीच्या पद्धतीस अनुसरून त्यांनी एक सत्याग्रह कमिटी बनवली. तिचे अध्यक्ष कै. सर गंगाधरराव चिटणविस यांना करण्यांत आले. सत्याग्रह अत्यंत शांत रीतीने दोन तीन दिवस चालला. सत्याग्रहाचे जागीं लोकांची खूप गर्दी असे व पोलीस बंदोबस्तही खूप – पोलीस सत्याग्रह करणारांना धरून नेत व लॉकअप मधे ठेऊन कांही वेळानं सोडून देत; किंवा मुकर्दमा करीत. ह्या मुकर्दम्यांत



सर गंगाधरराव चिटणीस

दंड होत. नंतर एक दिवस कै. गंगाधरराव चिटणीस ह्यांनी स्वतः सत्याग्रह कांही जणासमवेत केला व कै. राजेलक्ष्मणरावही "आरती" घेऊन सत्याग्रह करण्यास तयार झाले.

हा सत्याग्रह फारच परिणामकारक झाला. मशिदीवरून सवाद्य काकड आर्तीची मिरवणूक नेण्याच्या चळवळीस रंग चढत गेला. गंगाधरराव चिटणीस व राजे लक्ष्मणराव ह्यांच्यावर कांही कारवाई झाली नाही. ह्या वेळीं सर फ्रयांक स्लाय गव्हर्नर होते. त्यांनी स्वतः ह्या मशिदींवरून वाद्य वाजविण्याच्या बाबतींत चौकशी केली व एकंदर परिस्थिति लक्षांत आणून त्यांनी ह्या सर्व प्रकरणाचा निकाल केला. हिंदूंची तक्रार रास्त आहे. त्यांना ह्या नवीन मशिदीवरून वाद्य वाजवीत मिरवणूक नेतां येते असा हुकूम दिला. 'काकड' आर्तीच्या बाकीच्या राहिलेल्या दिवशीं दिंडी सकाळीं सवाद्य निघत असे.

## कायरोंत मशिदीवरून वाद्यें वाजत जातात

मशिदीवरून सवाद्य मिरवणूक नेण्याचे प्रसंग हिंदूंना बरेचदा येतात व त्यामुळे दंगे होतात तेव्हा हिंदुस्थानाबाहेर इस्लामी धर्म ज्या देशांत आहे अशा मुसलमानी राष्ट्रांत काय चाल आहे ती जाणून घेण्याचा प्रसंग मला एकदा आला व मी तो व्यर्थ जाऊं दिला नाहीं.

सन १९४३ चे मे महिन्यांत मी, श्री हृदयनाथ कुंझरू, सर्व्हंट आफ इंडीया सोसायटीचे अध्यक्ष, सरदार बहादुर सरदार बुटासींग, सर फ्रेडरीक जेम्स, श्री. जम्नादास मेथा व क्याप्टन दलपतसींग इतके संरक्षण सल्लागार कमिटीचे सभासद मध्यपूर्व म्हणजे इजिप्त, टीपोली वगैरे देशांत गेलों होतों. तिकडे कांही दिवस राहिल्यानंतर आम्ही परत येण्याचें आदले दिवशीं रात्रीं 'कायरो' इथे 'सय्यद बकरी बे' ह्या इजिप्सियन श्रीमंत गृहस्थाने आम्हाला जेवायला बोलावलं. आमच्या बरोबरच त्यांन कांही इजिप्शियन सद्गृहस्थांना बोलावलं. हिंदुस्थानांत हिंदुमुसलमानांचे झगडे दोन गोष्टीवरून होतात. मशिदीवरून सवाद्य मिरवणूक व गोवध. आम्हाला जेवायला बोलावणाऱ्या गृहस्थाला व जेवायला आलेल्या एका पाहुण्याला "कायरो शहरांत

मशिदीवरून वाद्य वाजवीत मिरवणूकी जातात काय ? कीं मिरवणूकींना वाद्य वाजवणं बंद करावं लागतं ? " असा प्रश्न मी टाकला. व दोघांनीही " वाद्य बंद न करतां मिरवणूकी नेतात " असं सांगितलं. मग हिंदुस्थानांतच मुसलमानांचा हा दुराग्रह का असा विचार उत्पन्न होतो ?

काकड आर्तीच्या दिंडी प्रकरणानंतर मशिदीवरुन सवाद्य मिरवणूक नेण्याच्या बाबतींतला निर्णय मौलाना आझाद ह्यांनी नागपूरच्या हिंदु व मुसलमान ह्या दोघांनाही मार्गदर्शक होईल असा पंच या नात्याने दिला. अत्यंत जुन्या मशिदी ( म्हणजे सन १९२३ पूर्वी शंभर दीडशें वर्षें अस्तित्वांत असलेल्या मशीदी खेरीज करुन ) खेरीज करून बाकीच्या मशिदीवरून वाद्य वाजवित मिरवणूक नेण्यास हरकत नाही. मात्र अत्यंत जुन्या मशिदीवरून मिरवणूक प्रार्थनेच्या वेळेस वाजवत नेऊं नये. हें त्या मशिदींना मान देण्याच्या बुद्धीने करावयाचें आहे. ह्या निवाड्यांत त्यांनी अत्तरवाल्याची मशीद ह्या मशीदींचा उल्लेख केला आहे असे वाटते.

## नागपूरांतील हिंदुसंघटन

नवीन मशीद बांधून पूर्वापार चालत आलेल्या हिंदूंच्या धार्मिक चालीस हरकत घेणें ही जी मुसलमानांची दुराग्रही वृत्ति तिच्यामुळे हिंदुही धार्मिक हल्ल्याच्या प्रतिकारार्थ संघटित झाले. मुसलमानांनी ही जी हिंदूंच्या हक्कावर चढाईची प्रवृत्ति दाखविली व दोन जमातींत वितुष्टपणा उत्पन्न करण्याला सुरवात केली ही नवीनच. ह्या दोन्ही जमातींचे संबंध पूर्वी चांगले होते.

नागपूरकर भोंसले राजांचे दरबारी व मानकरी बरेच मुसलमान होते. मोहरमांत भोंसले राजे भाग घेत. नाल्या हैदरची सवारी आहे. तिच्याबरोबर राजेबहादुर राजे रघोजीराव भोंसले व राजे लक्ष्मणराव भोंसले कत्तलच्या रात्रीं रात्रभर घोड्यावर बसून फिरत. प्रत्येक मोहोल्यांतील माणसाला व आखाडेवाल्याला – प्रत्येक मोहोल्यांत आखाडा असेच – आपल्या मोहोल्यांतील माणसांबद्दल, हिंदुमुसलमानाबद्दल अभिमान असे. आपलेपणा असे. दुसऱ्या मोहोल्यांतील मनुष्य त्याच्या जातीचा असो कीं परक्या जातीचा असो परका समजला जात असे. मारामाऱ्या सुद्धा एका मोहोल्यांतील हिंदुमुसलमान

एकीकडे व दुसऱ्या सोहोळ्यांतील हिंदुमुसलमान दुसरीकडे म्हणजे विरोधी पक्षाकडे अशा होत.

सुशिक्षित हिंदु – वकील, बॅरिस्टर, डाक्टर – व सुशिक्षित मुसलमान वकील हेही खेळीमेळानं रहात. इतक्या कीं ही सुशिक्षित मंडळी एका पंक्तींत जेवायला सुद्धा बसत. एक मुसलमान गृहस्थ महामहोपाध्याय भटजी शास्त्री घाटे यांचेकडे पाणिनिचं व्याकरण शिकायला जात. त्यांना खानशास्त्री ही पदवी लोकांनी दिली होती. सुशिक्षित हिंदुच्या जेवायच्या पंक्तींत मुसलमानाबरोबरच इतर सुशिक्षित परधर्मीयही राहात. उदाहरणार्थ बॅ. डीक, श्री. व्हीव्हीयन बोस व प्रो. गद्रे ( हिंदी ख्रिश्चन ) वगैरे. पण १९२२ नंतर सुशिक्षित मुसलमानांच्या बाबतींत फरक घडून आला.

हिंदुमुसलमानांचं खेळीमेळीचं वातावरण कां बिघडलं? परप्रांतीय, त्यांतही पंजाबसारख्या जातीय वादांत मुरलेल्या पंजाबी मुसलमानांची भरती पोलीस खात्यांत होऊं लागली. इतर खात्यांत मुळीच नव्हती असा याचा अर्थ नाही. पण पोलीस खात्यांत आफीसर्स म्हणून भरती झाल्यानंतर त्यांचा त्यांच्या जमातीच्या सामान्य माणसांशीं वारंवार व निकटचा संबंध येऊं लागला. ह्या प्रांतांतील सलोख्याच्या वातावरणांत त्यांनी त्यांच्या हाडामासांत खिळलेला जातिद्वेष सहजगत्या किंवा त्यांच्या इंग्रज आफीसर्सच्या सांगण्यावरून उत्पन्न केला असला पाहिजे. आय. सी. एस्. सर्व्हिसमधील जे इंग्रज आफीसर्स बाहेर प्रांतांतून ह्या प्रांतांत आलेत त्यांनीही मुसलमानांना उचलून धरलें व चेतना दिली. हे इंग्रज आफीसर्स हिंदुविरूद्ध असण्याला कारणही तसेच सबळ होतें. सन १९२१ पासून सुरू झालेला काळ हा असहकारितेचा काळ – खूपच धामधुमीचा. तिचे जनक हिंदु. ती फैलावून इंग्रजी सत्तेस सतावणारे बहुसंख्य हिंदुच. हिंदुमुसलमानांत दंगे झालेत म्हणजे इंग्रज आफीसर्सचें साधे. त्यांना हिंदुवर दडपशाही करण्याला एक चांगलं निमित सापडे. आणि हिंदुमुसलमानांत वितुष्ट येण्याचं शेवटचं पण कमी महत्वाचं नाही असं कारण म्हणजे विभक्त मतदार संघ व त्यावर आधारलेल्या निवडणूकी. हिंदु व मुस्लीम जमातीला एकमेकांपासून अलग ठेवण्यांत, त्यांच दळण वळण कमी करण्यांत किंवा बदं करण्यांत झाला. एका

जमातीच्या उमेदवाराला दुसऱ्या जमातीच्या मतदाराकडे जाऊन त्याचीं सुख दुःख समजवून घेण्याची गरजच राहिली नाही. त्यांच्याशीं दोन हिताच्या गोष्टी बोलण्याची संधीच राहिली नाही. एकाच धर्माचे दोन असेंबली उमेदवार एकमेकाविरुद्ध एखाद्या त्यांच्याच जमातीच्या जागेकरिता कायदे-मंडळाच्या निवडणुकीस उभे राहिले म्हणजे त्या दोघांत धर्माकरिता जास्त काम कोण करितो, धर्माप्रमाणे जास्त कोण वागतो ह्याचं प्रदर्शन करण्यांत चढाओढ लागते, व मग मतदार भलतीकडेच बहकतात. राजकारणावर दृष्टि न राहतां धर्माकडे वळते – औपचारिक चालीरीतीकडे वळते. ह्या दोन उमेदवारा-पैकी एखादा जर पुष्कळ वर्षांचा दुसऱ्या जमातीच्या माणसांबरोबर काम करणारा उदार मताचा असला तर मग धर्मवेडेपणाला सीमाच राहत नाही. अशा रीतीनं निवडून येऊन मिनिस्ट्री मिळविण्याचा व सरकारशीं सौदा करण्याचा हा एक उद्योगच होऊन बसला. अशा वर सांगितलेल्या प्रचाराचा परिणाम जरी १९२३ च्या अक्टोबर डिसेंबरच्या निवडणुकींत झाला नाहीं तरी १९२७ पासून नंतर ह्या उपद्व्यापी उमदवारांना यश येऊं लागलं. १९२३-२४ च्या निवडणुकींत आमचे स्वराजिस्ट मुस्लीम स्नेही निवडून आले. पण १९२७ च्या निवडणुकींत मात्र ते निवडून येऊं शकले नाहीत.

आमच्या बरोबर ज्यांनी दहा पंधरा वर्षे खांद्याशीं खांदा लावून सार्वजनिक कामें केलीं अशा स्वराजिस्ट मुसलमानांच्या विरुद्ध निवडणुकीच्या वेळेच्या प्रचाराचें एक दोन उदाहरणें घेऊं.

## गाईच्या कुरबानीवर निवडणूक

माझ्या ओळखीच्या व स्नेही मुसलमान वकीलाच्या विरुद्ध जो उमेदवार उभा होता त्याने आमच्या स्नेह्याविरुद्ध एक चमत्कारिक व बाष्कळ प्रचार सुरू केला. प्रतिस्पर्धि मुसलमान उमेदवाराने आमच्या स्नेह्याच्या विरुद्ध मुसलमान मतदारांच्या सभांतून सांगायला सुरवात केली हा – म्हणजे आमचा स्नेही – इस्लामधर्माच्या विरुद्ध आहे. कां ? तर त्याने मुसलमानांना म्हटलं आहे कीं गाईची कुरबानी करूं नका. तो आपलं म्हणणं सिद्ध करण्या-करितां आमच्या स्नेह्यानी केलेल्या भाषणाचा वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेला उतारा वाचून दाखवायचा. आमच्या स्नेह्यालाही केव्हा तरी त्या मतदारांना

सभेंत उत्तर देण्याचा प्रसंग येई. त्यानें एक बचावाचा मार्ग काढला व म्हणाले "मै कुरबानीके बराखिलाफ कहां हूं ! गय्या की कुरबानी मना करा, लेकीन बैलकी तो नही." पण ह्या खुलाशाने त्या समाजाची समजूत थोडीच पटणार होती ! गाईच्या कुरबानीवर सर्व सभांतून जोर देण्यांत येण्याचा परिणाम जमातींत वितुष्ट येण्याला कारण झाला.

मुसलमान मतदारांना मुसलमान उमेदवार आपण काय करणार आहों ह्याचा पाढा वाचत बसत नाही. तिथेही एकाच्या विरुद्ध दुसऱ्याला धर्मवेडे-पणामुळे मदत होते. आपण पूर्वी काय काय सार्वजनिक कामें केलीं आता काय करणार आहों हें सांगावें लागत नाही.

## इनके लिये खुदासे दुवा मांगो

माझ्या दाट ओळखीचे एकाच धंद्याचे दोघे सुशिक्षित मुसलमान गृहस्थ एकाच मुसलमान मतदार संघातर्फे उभे होते. हिंदुमुसलमानांच्या दंग्याच्या दिवसांत दोघेही आपल्या जमातीकरिता आफीसर्सना भेटून जी काय मदत मिळवितां येईल ती मिळवित होते. ह्या दोघांपैकी कोणीही त्या वेळपर्यंत सार्वजनिक काम केलेलें नव्हतें. पण ह्या दोघांपैकी एक होता सुन्नी व दुसरा होता शिया पंथाचा. निवडणुकींत शिया पंथाचा पडला. निवडणुकीनंतर शिय्यावाल्याची व माझी गाठ पडली.

मी त्याला म्हणालों:— अरे भाई आप इलेकशनमे गिरे इसलिये हमे बहोत अफसोस मालूम होता है. लेकीन आपके खडे रहेनेसे एक तो बात हुई. आप दोनोकी लडाई होनेसे आपका इलेक्टोरेट ( मतदार संघ ) तो एज्युकेट हो गया ! उनकुं आपका प्रोग्राम व आजकालके पॉलिटिक्स इसकी शिक्षा तो मिली. ये कुछ कम फायदा नही.

तो ( शिय्या ): — मिस्टर देशमुख हमारा इलेक्टोरेट क्या हिंदु इलेक्टोरेट है ! आपमे व्याख्यानबाजी चलती है. लोगोंको वो क्या करेंगे ये बताते है. अगर पार्टीवाला हो तो पार्टीकाभी प्रोग्राम बताते है. हमारेमे ये कुछ नही. मशीदका पेशइमाम जो मुख्य होता है उसको कह दिया उमेद-वारने कीं मजहब वालेको जमा करो, और हमारे लिये कोशीस करो तो बस हो गया. मुझाहिद ( अज्ञान पुकारणारा ) अज्ञान पुकारके लोगोंकू

मसजिदमे एकट्ठा करता है. पेशइमाम ( नमाझ prayer पढणारा ) नमाझके बात कह देता है कीं + + + इनके लिये खुदासे दुवा मांगो. बस हो गया इलेकशन. शिया व्होटर्स ये कान्पटीटयुएन्सी मे कम, फाइव्ह परसेंट भी नही तो फेर हम कैसे आ सकते ? हमारेमे भी जात और धरम का असर इलेकशनपर होता है !

डेमोक्रसीची सर्व मदार मतदार सुशिक्षित असण्यावर, त्याला त्याचं हित कशांत आहे इतपत समजण्यावर, बरं कोणचं वाईट कोणचं हें समजण्यावर, उमेदवाराच्या संबंधी सर्व माहिती काढून व त्याचा कार्यक्रम समजवून घेण्यावर आहे. आणि जिथे हें मुळीच केल्या जात नाही व निवडणूकी धर्माच्या किंवा जातीच्या नांवावर लढविल्या जातात तिथे डेमोक्रसी काय रडणार ! सर्व अंदाधुंदी !! आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ. निवडून आलेला उमेदवार मात्र आपल्या पोळीवर तूप ओतून घेणार व आनंद मानणार.

## प्रांतिक हिंदुसभेची स्थापना

पूर्वी सांगीतल्याप्रमाणे एकदा हिंदुमुसलमानाच्या तेढीस सुरवात झाल्यानंतर ती वाढतच गेली. शहरभर पसरली. आपल्या धार्मिक हक्कांचें संरक्षण करण्याकरिता हिंदुंनी आपली संघटना केली. संघटना करण्याची पहिलीच वेळ. संघटना करण्याला कारण गणेशपेठेंतील मुसलमानांकडून काकड आर्तीच्या सवाद्य मिरवणुकीला झालेला अडथळा. डॉ. मुंजे ह्यांनी लगेच प्रांतिक हिंदुसभा स्थापन करण्याला पुढाकार घेतला. हिंदु समाज सुसंघटित व बलवान करणें हा हिंदुसभेचा उद्देश होता. नागपूरला हिंदुसभा स्थापन होण्यापूर्वी ह्याच सालीं ( १९२३ ) पंजाब, यु. पी. वगैरे प्रांतांत हिंदुमुसलमानांचे दंगे झाल्यानंतर प्रांतीय हिंदुसभा स्थापन झाल्या होत्या त्या दंग्यांत हिंदुंचीं देवळें बाटवल्या गेलीं होतीं, शिखांच्या गुरुद्वारावर हल्ला झाला होता व हिंदुंना जबरदस्तीने बाटविले होते. तेव्हा तें लोण इकडे येण्यापूर्वी व प्रांतांत नुकतेच हिंदुमुसलमानांचे संबंध जे बिघडले होते त्यांनी उग्र स्वरुप धारण करण्यापूर्वी हिंदुंच्या धर्माचें व समाजाचें रक्षण करण्याकरिता व संघटण करण्याकरिता हिंदुसभेची आवश्यकताच होती. ठिकठिकाणीं

ठरावही त्या धोरणाला अनुसरूनच होत होते. अस्पृश्यता निवारण, पतित-परावर्तन, आखाडे वगैरेचा प्रचार सुरू झाला होता. सनातनी हिंदुमहासभेच्या ह्या कार्यक्रमाच्या विरुद्ध होते; व म्हणून ते जरी हिंदुसभेला मिळाले नाहीत तरी इतर पुरोगामी व उदार मताचे हिंदु ह्या हिंदुमहासभेंत सामील झाले. प्रांतिक हिंदुसभेंत सरकार पक्षीय, सरकारी पेनशनर व इतर शिष्ट मंडळी होती. कांग्रेसवाले हिंदु ह्यांनाही त्या वेळेस हिंदुसभेंत जाण्यास मज्जाव नव्हता. मुसलमान कांग्रेसवाल्यानाही कांग्रेसने मुसलीम लीगमध्ये जाण्यास मज्जाव केला नव्हता. आम्हीही म्हणजे डॉ. मुंजे, डॉ. परांजपे वगैरे मंडळी व मी हिंदुसभेचे सभासद झालों. सर गंगाधरराव चिटणीस हे अध्यक्ष, राजे लक्ष्मणराव भोसले हे उपाध्यक्ष, कांही दिवसानंतर अध्यक्ष व डॉ. मुंजे हे सेक्रेटरी व त्यांच्या बरोबरच श्री. दळवी हे जाईंट सेक्रेटरी होते. सरदार तात्यासाहेब गुजर, रा. ब. ढोबळे, डॉ. परांजपे, उदारामजी पहेलवान, धोंडबाजी पहेलवान वगैरे मंडळी सभासद होते. हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाच्या सभा भोंसल्यांच्या सुप्रसिद्ध तुळशीबागेंत भरत.

## हिंदु स्वयंसेवक समिति व संरक्षण समिति

हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाने हिंदूच्या संरक्षणार्थ व हिंदूच्या देवळाच्या रक्षणार्थ स्वयंसेवक नोंदविले; व त्यांची एक सभा तुळशीबागेंतच बोलावली. त्या सभेंत शें-दिडशें आखाडेवाले हजर होते. त्याच्यातच नारायण पेंटर ही नागपूरांतली एक प्रमुख व्यक्तिही होती. स्वयंसेवकांकडेच त्यांचा प्रमुख नेमण्याचें काम सोंपवल्या गेलें. त्यांनी मला आपला प्रमुख निवडला. हिंदू-स्वयंसेवकांवर किंवा इतर हिंदूवर कोर्टांत प्रकरण गेल्यास त्यांचा बचाव करण्यासाठी व त्यांना कायद्याची मदत करण्यासाठी एक संरक्षण समिति नेमण्यांत आली. ह्याही समितीचा अध्यक्ष मींच होतों.

## देवळें बाटविलीं

हिंदूसभेची स्थापना झाल्यावर एक दिवस एकमेकाला लागून असलेल्या मोमीन व कोष्टीपुऱ्यांत मोमीन व कोष्टी यांची तिसऱ्या प्रहरीं मारामारी झाली. ज्या दिवशीं ही मारामारी झाली त्या दिवशीं संध्याकाळचे पाच वाजतां तुळशींबागेंत सभेच्या कार्यकारी मंडळाची सभा होती. हिंदुसभेच्या कार्यकारी

मंडळाने तत्काल दोन बाबी निकालांत काढल्या. हिंदुसभेच्या स्वयंसेवकांचें कार्यालय व छावणी उदारामजी पहेलवानाचे घरीं कोष्टीपुऱ्यांत उघडण्यांत आली. तिथे शेदिडशे लाठीबंद स्वयंसेवक नेहमी हजर असत व बाकीच्यांची जा, ये सुरुच असे. स्वयंसेवकांचें जेवणखाणं व थंडाई वगैरे तिथेच होई. स्वयंसेवकांच्या छावणीची तशी सोय लावली व त्यांच्या व इतरांच्या कोर्टांतील बचावाचं काम करणाऱ्या संरक्षण समितीचें आफीस श्री. भाऊसाहेब टालाटुले ( एक बडे जमीदार व वाघांचे प्रसिद्ध शिकारी ) यांच्या घरीं टाऊन हॉलजवळ ठेवण्यांत आलें.

दंग्यांच्या दिवसांत मी रोज आपल्या सीव्हीलस्टेशन मधील बंगल्यांतून ७ - ७॥ वाजतां सकाळीं निघून स्वयंसेवकांच्या छावणीला व समितीच्या ऑफीसला भेट देत असे. डॉ. मुंजे व डॉ. हेडगेवार हेही केव्हा केव्हा तिथे येत. असाच एक दिवस पहाणी करण्यास निघालों असतां हल्लीच्या सुभाष रोडवरील दत्त मंदिराजवळून जात असतांना तिथला पुजारी व कांही मंडळी यांनी माझी मोटार थांबविली. व मला सांगितलं कीं त्या दत्त मंदिरांत व इतवारींतील बालाजीचे मंदिरांत आदले रात्रीं मुसलमानांनी गाईचे मांस टाकलें व देऊळें बाटविलीं. दत्त मंदिराचें आजू बाजूस जशी आता दाट वस्ती आहे तशी वस्ती त्या वेळेस तिथे नव्हती. दत्त मंदिराजवळून थोडा पुढे गणपतीच्या देवळाजवळ गेलों तों हिस्लाप कॉलेजचे इंडीयन ख्रिश्चन प्रोफेसर ओळखीचे भेटले. त्यांनी सांगितलं कीं सितावर्डीवरील मुसलमानांनी त्यांच्या चर्चची घंटा प्रार्थनेच्या आधी थोडावेळ वाजत असतांना बंद केली. चर्च कितीतरी जुनें व तो प्रघात नेहमीचाच तरी ही घंटा बंद केली. मी तिथून चितार ओळींतून चांदी सोन्याच्या दुकानांवरून जात असतां तिथले मारवाडी दुकानदार मोटारजवळ आलेत व संतापाने सांगूं लागले कीं “ बालाजीच्या मंदिरांत गाईचं मांस मुसलमानांनी टाकलं म्हणून आम्ही त्यांच्यावर बहिष्कार टाकला आहे. ह्या बहिष्काराला हिंदुसभेनं आपली सम्मति देऊन हिंदु सभेतर्फे आता बहिष्काराचा पुकारा केला पाहिजे.” मी म्हणालों “ बालाजीच्या मंदिरांत जातों. तिथं काय झालं आहे ते स्वतः पहातों व मग हिंदुसभेला तुमचं म्हणणं कळवितों. सभा जो काय निकाल

देईल तो मी आपणास कळवितों. देवळांच्या संरक्षणाकरिता काय बंदोबस्त केला पाहिजे याचाही तिथे विचार करण्यांत येईल.'' असं सांगून बालाजीच्या मंदिरास भेट देऊन उदारामजी पहिलवानाच्या इथल्या स्वयंसेवकांच्या छावणीकडे व कार्यालयाकडे गेलों. त्या मंडळीलाही बालाजीच्या देवळांत गोमांस टाकलें ही बातमी कळलीच होती व तेही संतापलेलेच होते. त्यांनाही मारवाडी लोकांनी मुसलमान लोकांवर टाकलेल्या बहिष्काराची माहिती मिळालीच होती. हा बहिष्कार हा हा म्हणतां दोन तीन तासाच्या आंत सर्वत्र शहरभर पुकारल्या गेला. हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाच्या तातडीच्या सभेची वाट कोण पहातो ? हा बहिष्कार हिंदुसभेवर लादल्या गेला. हिंदुसभेला आतां त्या बहिष्काराला उचलून धरण्याशिवाय दुसरा मार्गच राहिला नव्हता. बहिष्कार पुकारूनच लोक स्वस्थ बसले नव्हते तर तो कसा काय अमलांत आणल्या जात आहे हें पाहण्याकरिता स्वयंसेवक स्वयंस्फूर्तीनं देखरेख करूं लागले. त्यांनी शांततेचा भंग होऊं दिला नाही. नागपूर नगर कांग्रेस कमिटी 'हरताळाचे' निरनिराळे प्रसंग लोकांकडून शांततेने पाळून घेत असे. त्यामुळे जनतेला व स्वयंसेवकांना एक प्रकारची शिस्त लागली होती व दोघेही जनता व स्वयंसेवक शांततेने व शिस्तीने वागत होते.

### बहिष्काराने उत्पन्न झालेलें तंग वातावरण

बहिष्काराचा पुकारा होऊन तो लगेच लोकांनी अमलांत आणायला सुरवात केल्यानंतर हिंदुमुसलमानांचे परस्पर होणारे व्यवहार बंद झाले. हिंदु मुसलमानांच्या व मुसलमान हिंदुच्या टांग्यांत बसेनासे झाले. हिंदु भाजी विकणाऱ्यांच्या दुकानांतून मुसलमान भाजी घेईनासे झालेत. मुसलमानांनी भाजी विक्रीचीं व मिठाईचीं दुकानें काढलीं. कल्हईचा धंदा मुसलमानांच्याच हातांत असे. हें काम शिकण्यास व कल्हई करण्यास हिंदुंनी सुरवात केली. बांगड्यांचा व्यापार व बांगड्या भरणें मुसलमान करीत. ते काम करण्याकरितां हिंदु कांचार व त्यांच्या बायका ह्यांनी पुढाकार घेतला व हिंदुच्या घरोघर जाऊन बायांना बांगड्या भरूं लागल्या. हिंदुमुसलमान व्यापाऱ्यांचा एकमेकांशीं होणारा व्यापार थांबला. गिरण्यांतील कामावरही थोडाफार परिणाम झाला. भीतीने मजूर कामावर जाईनात. वातावरण तंग झालें.

## सुशिक्षित पांढरपेशा हिंदूंचें तिरस्करणीय वर्तन

शहरांत वातावरण असें तंग असतानाच माझेकडे मी टालाटुले यांचें घरीं संरक्षण समितीचे आफीसांत बसलों असतांना सकाळीं १० वाजतां कांही स्वयंसेवक आलेत व म्हणाले, "वाकररोडवर ८।१० सुशिक्षित मंडळी आहेत. ते मुसलमानांच्या टांग्यांत बसण्याच्या विचारांत आहेत. आम्ही त्यांना हात जोडून विनंति केली कीं मुसलमानांवर हल्ली बहिष्कार आहे तर आपण ह्यांच्या टांग्यांत बसूं नका. ते ऐकत नाहीत तर आपण लवकर चला. तूर्त आमच्या स्वयंसेवकांनी टांग्यांना थांबवलं आहे." मला जाणं भागच होतें. स्वयंसेवक अशिक्षित. ज्यांच्याशीं त्यांचा प्रसंग ते सुशिक्षित. स्वयंसेवक अशिक्षित असूनही आपल्या रोजीवर पाणी सोडणारे कोष्टी व ज्यांच्याशीं प्रसंग ते कोर्ट व आफीसांत आपली रोजी संभाळणारे. ह्या गरीब स्वार्थत्यागी माणसांना सुशिक्षित माणसांच्या स्वार्थाची चीड येणार. तेव्हा बाचाबाचीचाच, तेजीचाच प्रसंग येऊन ठेपणार व तो प्रसंग कदाचित भडकणार. हें होऊं नये म्हणून मला जाणं भागच होतं. त्याच प्रमाणं हिंदुसभेने पुकारलेला बहिष्कार अमलांत आणायचा प्रसंग आला असतां मला तो टाळतां येणं शक्य नव्हतें. तेव्हा शांततेचा भंग न करता जें काय मला करता येणं शक्य आहे तें केलं पाहिजे असा मनाशीं विचार करून मी आपल्या मोटारींत त्या स्वयंसेवकांना घेऊन वाकररोडकडे गेलों. ज्या ठिकाणीं स्वयंसेवकांनी टांगा थांबविला होता तें ठिकाण आफीसपासून मोटारीने दोन मिनिटाच्या रस्त्यावर. मी तिथे स्वयंसेवकांबरोबर गेल्यानंतर त्या गृहस्थांना म्हणालों "तुम्हाला माहित आहे कीं शहरांत मुसलमानांवर बहिष्कार आहे. तेव्हा कोर्टांत किंवा आफीसांत जाण्याकरिता हिंदुच्या टांग्याचा बंदोबस्त केला असतां तर बरं झालं असतं. प्रयत्न करून टांगे मिळण्याचा संभव नाहीं असं जर तुम्हाला वाटतं तर तुम्ही लवकरच जेऊन कोर्ट व आफीसकडे पायीं गेला असतां तर फार बरं झालं असतं. माझी विनंति आहे कीं आपण ह्या टांग्यांत न बसतां आफीस किंवा कोर्टांत पयदल जावं." त्यावर कोर्टांत व आफीसांत जाणारी ती मंडळी स्ववंसेवकांना उद्देशून व त्यांच्याकडे पहात म्हणाली "आम्ही ह्या टांग्यांत बसून जाणार. आम्हाला कोणी अडवूं शकत नाहीं. जो अडवेल त्याच्याविरुद्ध आम्ही

कोर्टात कारवाई करूं." त्यावर मी इंग्रजींत म्हणालों, "आपण जाऊं शकतां. आम्ही जबरदस्ती करूं इच्छित नाही व मी आपणावर ह्या स्वयंसेवकांना कोर्ट दाखविण्याचा प्रसंग येऊं देणार नाहीं. पण मी आपणास एवढीच विनंति करतों कीं ह्या गरीब मनुष्यांनी बहिष्कार यशस्वी करण्याकरितां आपले धंदे बंद करून जो स्वार्थत्याग केला, बाजार बंद झाल्यामुळे शहरांतल्या व खेडेगावावरून येणाऱ्या गरीब लोकांनी नुकसान सहन करून हा हरताळ पाळण्याचा जो निश्चय दाखविला, तो त्यांचा स्वार्थत्याग लक्षांत आणा. तुमच्या सारख्या सुशिक्षित लोकांबद्दल ह्यांच्या भावना काय राहतील. त्यांना काय वाटेल हें लक्षांत आणा व मग काय तें ठरवा." ही मंडळी कांही न बोलतां त्याच टांग्यांत बसून चालती झाली.

ह्या मंडळीपैकी दोघांनी त्याच दिवशीं संध्याकाळीं वाकररोडवर शुक्रवार तलावाजवळ मुसलमानांच्या हातचा खूप मार खाल्ला. तलावाजवळ थोड्या अंतरावरच एक मशीद आहे. तिथे मुसलमान गुंडांचा बसण्याचा अड्डा आहे. त्यांच्या हातचा मार ह्या दोघांना मिळाला. मला ही बातमी कळल्यावर मी त्यांच्यापैकी एकाचें घरीं गेलों. हाच गृहस्थ स्वयंसेवकांना दटावणाऱ्यांत प्रमुख होता व त्यालाच कर्मधर्मसंयोगाने जास्त मार बसला होता. मी त्याला म्हणालों, "तुम्हाला मुसलमानांच्या हातचा मार बसला म्हणे." तो म्हणाला होय. मी म्हणालों "चला माझ्या मोटारींत बसा. आपण कोतवालींत जाऊं तिथे रिपोर्ट द्या. पुढचं सर्व काम कोर्टातलें सुद्धा तुमच्यातर्फे मी विनावेतन करायला तयार आहे." तो म्हणाला, "मी रिपोर्ट करूं इच्छित नाहीं व कोर्टात जाऊं इच्छित नाहीं" मी म्हणालों, "कां बरं?" तो म्हणाला "कोर्टात तुम्ही माझें काम कराल. पण कोर्टाच्या बाहेर प्रसंग राहील त्या माणसांशीं. तेव्हा थोडेच तुम्ही माझं रक्षण करायला हजर राहूं शकाल?" मी म्हणालों, "अरे त्याच्या. मी समजलों तुम्ही पाणीदार मनुष्य आहां. स्वयंसेवकांनं अडथळा केला तर तुम्ही कोर्ट दाखवणार होता ना त्यांना. आणि आतां चांगला मार खाल्ला तरी कांही करायचं नाही हा तुमचा निश्चय. 'मारते के आगे भूत भागे' हेंच खरं. बर तर जातों मी. हिंदुसभेने तुमच्या बाबतींत कांही केलं नाही असा तुमचा शब्द आमच्या कानीं येऊं नये म्हणून मी आलों. जातों नमस्कार."

## सरकारच्या शांतता समितीचा बोजवारा

ह्या दंग्याच्या वेळेस सर हाईड गवान हे जिल्हाधिकारी व मि. स्मिथ डी. एस. पी. होते. त्यांनी शहरांत शांतता स्थापन करण्याकरिता एक शांतता समिती स्थापन केली. कमिटीचे मेम्बर्स राजे लक्ष्मणराव भोंसले, डॉ. मुंजे व मी हिंदुतर्फे; नवाब न्याझुद्दीन खान व बॅ. युसुफ शरीफ मुसलमानातर्फे. ह्या कमिटीची पहिली सभा गवान साहेबांच्या बंगल्यावर झाली. सभेला समितीचे सर्व सभासद व मि. स्मिथ हजर होते. त्या सभेंत शांतता राखण्याची जबाबदारी दोन्ही जमातीच्या पुढाऱ्यावर टाकण्यांत आली. दुसरी सभाही दुसरेच दिवशीं तिथेच झाली. दरम्यानच्या कालांत मुसलमानांनी एक चिल्लर मारामारी केली. हा प्रश्न ह्या सभेंत निघाला असतांना त्या मारामारी बद्दलची जबाबदारी मुसलमान मेम्बर्स घेण्याला तयार नव्हते. ते म्हणाले "आमचे लोक आमचं ऐकत नाहीत. ते अशिक्षित आहेत व म्हणून त्याना समजवतां येत नाही. तसं हिंदुचं नाही. हिंदु लोक आपल्या पुढाऱ्याचं ऐकतात. तेव्हां त्यांनी आपल्या लोकांना शांत ठेवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत." ह्यावर डॉ. मुंजे म्हणाले, "हे गृहस्थ जर आपल्या जमातीला कबजांत ठेऊं शकत नाहीत तर हे पुढारी कसले?" मी म्हणालों, "करार पाळून घेण्याची जबाबदारी तुम्ही दोन्ही जमातीच्या पुढाऱ्यांवर टाकली, त्या वेळेला ती ह्यांनी मान्य केली. तेव्हा अशिक्षित सुशिक्षिताचा प्रश्न निघाला नाही. हिंदु-पुढाऱ्यांचे हिंदु समाज ऐकेल केव्हा तर झगड्याची बाब व तिचा निकाल योग्य असेल तर. मुसलमान समाजानं आगळीक करावी, त्यांच्या पुढाऱ्यांनी जबाबदारी टाळावी व शांतता रक्षण करण्याची सर्व जबाबदारी हिंदु पुढाऱ्यांवर असावी हें आम्हाला मान्य नाही. मला वाटतं मुसलमान पुढारी ज्या अर्थी जबाबदारी घेऊं इच्छित नाही त्या अर्थी ही शांतता समिती चालू ठेवण्यांत अर्थ नाही." राजे लक्ष्मणराव भोंसले कांही बोलणारं तोंच गवन साहेब गुर्मीत म्हणाले. "जास्त वादविवाद नको." त्या बरोबर डॉ. मुंजे संतापून म्हणाले "राजे साहेबाशीं तुमचें वर्तन उद्धटपणाचें झालें. आम्ही ह्या सभेंत भाग घेऊं इच्छित नाही व ह्यापुढे आम्ही ह्या तुमच्या शांतता समितीचे सभासद नाही असं समजा." आम्ही तिघेही गवन साहेबांचे बंगल्यावरून चालते झालों.

## मि. स्मिथ हिंदुसभेला शरण गेले

हिंदुसभेने टाकलेला बहिष्कार सुरूच राहिला. भीतिचं वातावरण जिकडे तिकडे मोहल्या मोहल्यांतून पसरलेलें होतें. शहरांत ठिकठिकाणून मुसलमान बाया मुलं व माणसं ह्यांना पोलीस संरक्षणाखाली गोळा करून गोंड राजाच्या किल्ल्यांत नेलं व इतर ठिकाणच्या मुसलमानांना नवाब न्याझुद्दीन खान ह्यांच्या बंगल्यावर सीव्हील स्टेशन पलीकडे नेलं. बहिष्कार इतका कडक पडला होता कीं खाण्याचं सामान किल्ल्यांतील मुसलमान लोकांना मिळेना. फुटाणे मुरमुरे ह्यांवर दिवस काढावे लागत होते. भंगी त्या लोकांची किल्ल्यांतली वस्ती साफ करायला जाईना. त्यामुळे दुर्गंधी दोन दोन फर्लांग पर्यंत— किल्ल्याचे दक्षिणेस सरदार तात्यासाहेब गुजरांचे वाड्यापर्यंत— पसरली होती. मुसलमानाला बाहेर जायचं झालं तर त्याच्या बरोबर एक पोलीस शिपाई द्यावा लागे व तोही मुसलमानच असावा लागे. असे हे मुसलमानांचे हाल! त्यांनी केलेल्या आगळीकीचें प्रायश्चित्त पांच सहा दिवस चालल्यानंतर मि. स्मिथ राजे लक्ष्मणराव भोंसले यांच्या वाड्यांत गेले व त्यांनी हिंदुसभेच्या मदतीची याचना केली. राजेसाहेबांनी मि. स्मिथ यांना माझी भेट घेण्यास सांगितलें. मि. स्मिथ माझे बंगल्यावर आले. मी त्यांना राजेसाहेबाकडे घेऊन गेलों व त्यांच्या समक्ष असं ठरविलं कीं, " हिंदु स्वयंसेवक आपल्या हिंदुनेत्यांच्याच व त्यांनी नेमून दिलेल्या माणसांच्या हाताखाली काम करतील. त्यांना शहरांत पहारा देत असतांना ज्याला संशयावरून पकडावेसे वाटेल त्याला ते पकडतील. ते जे कांही करतील ते good faith मध्येंच त्यांनी केलं आहे असं धरून चालावं लागेल व आमच्या पैकी ४-५ जणांना तरी रिव्हॉल्व्हर्स जवळ बाळगण्याची परवागी द्यावी लागेल." त्यावर मि. स्मिथ म्हणाले, " म्हणजे स्पेशीयल कान्स्टेबल्स करा असं तुमचं म्हणणं. मी ह्या संबंधी विचार करून तुम्हाला उद्यां सांगतों." दुसरे दिवशीं सैन्यांतील इंग्रज शिपाई आणून त्यांनी ठिकठिकाणीं नाकेबंदी केली व शिपायांनी भरलेल्या गाड्या शहरांतून फिरूं लागल्या. बहिष्कार सुरूच होता. शहर भयाण दिसत होतं. रहदारी अगदी बंद. रस्ते ओसाड होते. त्यांतच दंग्याच्या

गप्पांचा सुळसुळाट. जो तो हिंदु आपआपल्या घरीं किंवा गल्लीच्या तोंडावर. रस्त्यानं फिरकेना. मिलिटरीवाल्यांनी धरून नेण्याचा संभव.

सुदर्शन मंजुषेंत सांगितल्याप्रमाणे ह्या अकल्पित प्रसंगीं–स्वप्नींही नसलेल्या प्रसंगीं – हिंदूंना त्यांच्या कुस्तीच्या व मैदानी खेळांच्या वाढत्या प्रचारानं व उत्साहानं स्वसंरक्षणक्षम बनविलं होतं. अर्थात लोकांच्या संरक्षणाचा बराचसा बोजा अशिक्षित आखाडेवाल्यांनी उचलला. शिवराम गुरूच्या आखाड्यानं व नागपूर व भारत व्यायाम शाळा ह्यांनाही ह्या कामीं हातभार लावला.

## बहिष्कार निघाला कसा ?

साधारण मनुष्याची–रोज ज्यांनी मिळवावं व त्यांतूनच आपला चरितार्थ चालवावा अशा हिंदु माणसांची बहिष्कारामुळे उत्पन्न झालेल्या परिस्थितीने कुचंबणा होऊं लागली. त्यांना आपला माल विकून चार पैसे मिळवितां येईना व पोटाला घालतां येईना. गरीब माणसांची ही स्थिति. तरी ते तशाही परिस्थितींत कसे तरी दिवस काढतच होते. त्यांनी आपल्या दुःखाला वाचा फुटूं दिली नाही. ह्याच्या अगदी उलट श्रीमंत व्यापारी माणसांची स्थिती. ते अगदी बेचैन झाले. आठ दिवसाच्या बहिष्कारांत मारवाडी व्यापारी मेटाकुटीस आले. त्यांनी आपल्या रडकथा मला सांगितल्या. त्यावरून हिंदु व मुसलमान व्यापाऱ्यांचे हितसंबंध परस्परावर बरेच अवलंबून होते असें दिसून आले. हुंड्यांचा व्यापार करणाऱ्यांना त्यांच्या झालेल्या नुकसानीने घाबरवून सोडलं होतं. ते रडकुंडीस आले होते. दोन्ही जमातीच्या श्रीमंत व्यापाऱ्यांना चांगलाच चटका झोंबूं लागला. मारवाडी व्यापारी मला म्हणाले "आता बहिष्कार उठवा." मी म्हणालों " तुम्हीच हिंदुसभेला बहिष्कार पुकारायला सांगितला. आता हिंदुसभेनंच तो उठविला पाहिजे. मी हा प्रश्न हिंदुसभेच्या मीटिंग समोर आज मांडतों. सर्व गोष्टी शिस्तीला धरून झाल्या पाहिजेत." बहिष्कार, धादाचं वादळ न उठतांच निघाला. मोरुभाऊ अभ्यंकर, स्वराजिष्ट ह्यांच्या विरूद्ध रा. ब. ढोबळे, उदारमतवादी पक्ष, हिंदुमहासभेच्या कार्यकारिणीचे सभासद, असा हा असेंबली निवडणुकीचा सामना. अभ्यंकर निवडून आले.

ह्या बहिष्काराच्या काळांत हिंदूंच्या चमत्कारिक सामाजिक चालीरीती—ज्याचा हिंदूंच्या आर्थिक जीवनाशीं संबंध आहे अशा माझ्या नजरेस आल्या.

त्यापैकी एक बरीच महत्वाची आहे. तिचा संबंध आर्थिक तर आहेच पण इतर दृष्टीनेही हिंदूंच्या जीवनाशीं पोचतो.

## बंगालमधून हिंदु खाटीक बोलवावे लागले

हिंदु खाटीक स्वतः शेळी बकरी मारत नव्हते. मुसलमानानं तिला "हलाल" करावी व तसं तिला हलाल केल्यानंतरच हिंदु खाटकाने तिचं मांस विकावं ही नागपुरांतली पूर्वापार चाल. कशी पडली कोण जाणे? बरं ह्या रूढीच्या विरुद्ध जो हिंदु खाटीक वागेल – म्हणजे बकरी स्वतः मारील-मांस विकील त्याच्यावर जातीचा बहिष्कार. म्हणजे काय कीं मुसलमानांचा हलालीचा धंदा हा एक मक्त्याचा धंदा होऊन बसला. त्याच्या त्या मोनोपलीच्या आड कोणी येऊं नये, त्याचा धंदा चालूंच रहावा हे हिंदूनीच आपल्या डोक्यावर लादून घेतलं. मुसलमानावर टाकलेल्या बहिष्काराचा परिणाम असा झाला कीं जे मास खाणारे हिंदु होते त्यांना मास मिळेना व हिंदु खाटकाचा धंदा बसला. असा हा दुहेरी पेच पडला. काय करावं हा प्रश्न उत्पन्न झाला. डॉ. मुंजे ह्यांनी तोड काढली. बंगालच्या हिंदुसभेला लिहून त्यांनी बंगालमधून हिंदु खाटीक आणवून त्यांच्याकडून शेळ्या मेंढ्या रेशीम बागेंतील एका लहानशा देवळांतील देवीसमोर मारून मास पुरविण्याचं काम त्यांच्याकडेच सोपवलं व त्यांनी स्थानिक मयाराम पहेलवान खाटीक ह्यानं मास विकण्याच्या कामांत साथ दिली. ह्या मयाराम खाटकावर त्याच्या जातवाल्यांनी बहिष्कार टाकला.

हिंदूंचें आर्थिक जीवन स्वायत्त व स्वतंत्र राहण्यासाठी अशा चमत्कारिक प्रकारच्या कुचंबणेचें कुपंण काढून टाकावयास पाहिजें. शिक्षण व प्रचार या साधनांनी लोकांमधील वेडगळ व चुकीच्या समजुती व त्यांच्या व्यवहारांतील आर्थिक अडचणी व परावलंबन प्रत्येक जातीच्या पुढाऱ्यांनीच दूर केल्या पाहिजेत.

## हिंदूंनो देवळें बांधूं नका

ह्या जातीय दंग्यासंबंधी लिहितांना हिंदूंच्या देवळासंबंधी उल्लेख करावासा वाटतो. कित्येक मारुतीचीं व महादेवाचीं देवळें अशीं असतात कीं त्यांना दरवाजे सुद्धा नसतात. एक जोता व त्यावर मूर्ति. फार झालं तर एखादी चुन्या विटाची घोंगशी. पण त्याला एखादा लाकडी दरवाजा किंवा लोखंडाच्या

गजाचा दरवाजा सुद्धा नसतो. वरं देवळांची संख्या एका एका मोहोल्यांत इतकी असते व देवळें इतक्या ठिकाणीं पसरलेलीं असतात कीं कित्येक ठिकाणीं देवदर्शनास कोणी जातो कीं नाही ह्याची शंकाच आहे. कांही कांही ठिकाणीं तर पुजाहि होत नाही. जीं देवळें श्रीमंत माणसांनी आपलं नांव रहावं म्हणून बांधलीं आहेत तीं सुंदर आहेत, भव्य आहेत. तसंच त्यांनी पुजा-अर्चेचाही बंदोबस्त केला आहे. ह्या करितां नेहमीचें उत्पन्न करून दिलेलें असतें. पण देवळाच्या व मूर्तिच्या संरक्षणाची मात्र सोय केलेली नसते. हा माझा ह्या दंग्यांचे वेळचा अनुभव. इतर देवळासंबंधी तर राहूंच या पण ह्या दंग्यापूर्वी १०।१५ वर्षे नागपूरांत शनिचरींत नागरमल्ल पोद्दार शेटजींनी बांधलेल्या एका सुंदर व भव्य देवळाचेंच उदाहरण घेऊं.

देऊळ ज्या वेळेला बांधलें त्या वेळेला आता प्रमाणे दुकानांची व घरांची गर्दी देऊळ बांधलेल्या जागेच्या भोवती नव्हती. आजू बाजूला व मागे बरीच रिकामी जागा. देऊळ मात्र फारच सुंदर असं बांधलं. मूर्तिही रमणीय - रामाची मूर्ति ही फारच देखणी. देवळाच्या आत प्रशस्त खुली जागा. देवपूजेची उत्तम सोय. पण दंगा झाला त्यावेळीं शेटजी घाबरले. ते माझेकडे आले व देवळाच्या संरक्षणाकरितां स्वयंसेवक मागूं लागले. शेटजी घाबरण्याला कारणही तसेंच होतें. देवळापासून फार दूर नाही अशा ठिकाणीं एक मोठी मसजिद. तिला शनिचरीची मसजिद म्हणतात. आजूबाजूला मुसलमानांची वस्ती. मोमीन लोकांचा मोहल्ला मशीदीपासून कांही फार दूर नाही. शेटजींचं घर देवळापासून लांब ३।४ फर्लांगावर. शेटजी माझ्याकडे स्वयंसेवक मागण्यास आले. ते दिवस तंग वातावरणाचे. बालाजीच्या देवळांत गोमास टाकून एकदोनच दिवस झाले असतील. तेव्हा शेटजींना आपल्या देवळाबद्दल साहजिकच भीति उत्पन्न झाली. त्यांनी मला स्वयंसेवकांची मदत मागितली व ती मी एक आठवडा पावेतो म्हणजे वातावरण बरचसं शांत होई पावेतो दिली. अर्थात हे स्वयंसेवक म्हणजे उदारामजी पहेलवानाचे इथल्या छावणींतील लोक. सर्व आखाडेवाले. उदारामजींनेच निवडक २५ माणसें दिलीं. शेटजींनें ह्या स्वयंसेवकांची व्यवस्था उत्तम ठेवली. थंडीचे दिवस होते तेव्हा प्रत्येकाला ब्लॅंकेट, रात्रीं धुनीची व्यवस्था. खाण्याची व्यवस्थाही उत्तम होती. ज्या

ज्या वेळेला मी ह्या देवळाला भेट दिली त्या त्या वेळेला स्वयंसेवकांची व्यवस्था उत्तमच दिसून आली. स्वयंसेवकांनी आपलं काम उत्तम रीतीनं बजावलं.

पण देऊळ सुरक्षित राहण्याकरितां जो बंदोबस्त करावा लागला त्या वरून विचार सुचला कीं देवळाचं रक्षण करण्याची व्यवस्था ह्या देऊळ बांधणारांनीच कां करूं नये ? देवाच्या पुजेअर्चेचा बंदोबस्त करतातच कीं नाही ? मग हाच बंदोबस्त कां करूं नये. ती जबाबदारी समाजावर किंवा सरकारवर कां टाकावी ? ही टाकलेली जबाबदारी—एकंदर देवळाची संख्या लक्षांत घेतां—नीट रीतीनं पार पाडणं अशक्यच नाही कां ? कोणतं सरकार हें करूं शकेल ? बरं समाजाच्या संबंधी बोलायलाच नको. हिंदुंच्या बाबतींत तरी असं म्हणतां येईल कीं जे काम सर्वांचं तें कोणाचच नाही. जो तो आपल्या पुरतं पहातो. माझं घर, माझं देवघर, माझं देऊळ व माझ्यापुरताच धर्म. इतरांचं इतर पाहून घेतील. मला काय त्याचं ! तेव्हा सर्व देवळांचं रक्षण करणं कोणत्याही संस्थेला किंवा सरकारला अशक्य. पैसा व माणसं दर देवळागणिक आणायचे कोठून ? तेव्हा देऊळ बांधणाऱ्यानं देवळाच्या संरक्षणाची काळजी घ्यावी. एखाद्या आखाड्याची व्यवस्था केलेली बरी. देवळाच्या रक्षणाची जबाबदारी जर उचलायची नसली तर देवळेंच बांधूं नयेत.

**बोला काढाल आखाडा ?**

हिंदुमुसलमानांचा हा दंगा शांत होऊन दहा बारा दिवस झाले असतील. जिकडे तिकडे शांतता होती. मिलिटरीचं काम संपल होतं. तो शिपायांची तुकडी निघून गेली होती. लोकांचे व्यवहार नेहमी प्रमाणे सुरळीत चालू झाले होते. अशा परिस्थितींत एक दिवस माझ्याकडे हंसापुरींतील मारवाडी दुकानदार व परदेशी तेली दुकानदार आले. त्यांनी सांगितलं कीं हंसापुरींतील मुख्य सडकेवरील देवळावर मुसलमानांनी हल्ला केला व देवळाच्या समोरच असलेल्या घरांवर हल्ला होण्याची भीति आहे. त्यांच्या घराच्या मागेच मुसलमानांची घरें आहेत तेव्हा त्यांची भीति अनाठायीं, निराधार नाही. त्या मंडळींत कांही कॉंग्रेसवाले शुभ्रखादीधारी व गांधी टोपी घातलेलेही लोक होते. मी कॉंग्रेसवाला म्हणून ही सर्व मंडळी माझेकडे आली. कॉंग्रेसवाल्यांनीच आणखी इतरांनाही आणलें होतें. त्यांनी आपली भीति व्यक्त केल्यावर

मला ते म्हणाले, " कांही बंदोबस्त करा. " मी म्हणालों, " काय करूं ? " त्यांच्या पैकी एक म्हणाला, " डीस्ट्रीक्ट म्याजिस्ट्रेटकडे आमच्या बरोबर चला व मुसलमानांनी आम्हाला कोणताही त्रास देऊ नये असा त्यांना बंदोबस्त करायला सांगा." मी म्हणालों " तुम्ही आपल्या मोहोल्ल्यांत संरक्षण मंडळ कां बनवलें नाही? तुम्हाला डीस्ट्रीक्ट म्याजिस्ट्रेट पोलीसचा मदत देणं आता शक्य नाही. मी तुमच्या बरोबर येऊं इच्छित नाही." त्यांनी भीतिमुळे आपण खरोखरच बेचैन आहो असं वारंवार सांगितल्यावर मी म्हणालों "तुमच्या मोहोल्ल्यांत आखाडा आहे काय ? " त्यांनी नाही असं म्हटल्यावर मी म्हणालों " मी एका अटीवर तुमच्या बरोबर येण्यास तयार आहो. जर डीस्ट्रीक्ट म्याजिस्ट्रेटने तुम्हाला पोलीसची मदत दिली नाही तर तुम्ही आपल्या मोहोल्यांत आठ दिवसाचे आंत आखाडा काढण्याची व्यवस्था केली पाहिजे. ही अट जर तुम्हाला मान्य नसेल तर मात्र मी येत नाहीं. कायदेशीर कारवाईच जर करायची असेल तर दुसरे वकील आहेत. मी करूं इच्छित नाहीं. " त्यांनी आखाडा काढण्याची अट कबूल केली.

## बंदर के माफीक क्यंव करते हो ?

ह्या मंडळींनी माझी अट मान्य केल्यावर मी त्यांच्यासह मि. ( नंतर सर व गव्हर्नर ) हाईड गवन यांचेकडे गेलों. त्यांना आमच्या येण्याचं कारण सांगून बरोबरचे गृहस्थ मोठे व्यापारी आहेत इनकम ट्याक्स देणारे श्रीमंत गृहस्थ आहेत यांची जाणीव करून दिली. त्यांना मुसलमानांची भीति वाटते हेही सांगितलं व देवळावरील कांही दिवसापूर्वीच्या हल्ल्याची माहिती दिली. मुसलमानांपासून त्यांचं संरक्षण होण्याकरितां सरकारनं बंदोबस्त करायला पाहिजे अशी त्यांची विनंति आहे असं मी म्हणालों. माझं म्हणणं ऐकून घेतल्यावर गोवन साहेब माझ्या बरोबरच्या मंडळीवर खूप रागावले. ते त्या लोकांना म्हणाले "क्यंव डरते हो ! बंदर के माफीक क्यंव करते हो. ताकद रखो. जान बचानेकी तुम कोशीस करो. मत इधर उधर भागो." नंतर मला इंग्रजींत म्हणाले त्याचा सारांश. " मि. देशमुख सामुदायिक मनोभावना (Mass Psychology) कशी असते तुम्ही जाणतां. आता कोठे थोडी शांतता प्रस्थापित होत आहे तो पुनः ह्या लोकांनी घाबरटपणा सुरू केला. देवळावरच्या हल्ल्याची बातमी

शहरांत पसरल्यास पळापळीला सुरवात होईल. मग पुनः दंगे होण्याचा संभव." पुन्हा व्यापाऱ्याकडे पाहून हावभाव युक्त शब्दांत ते म्हणाले, " मोटे बनो! ताकदवान बनो! डरो मत! घबराना नहीं! हिम्मत रखो!! अफसोस है हम आपकूं कुछ मदत नही दे सकते." मी साहेबाच्या बंगल्यावरून त्या मंडळी बरोबर हंसापुरींत गेलों व त्यांना म्हणालों, "तुम्ही कबूल केलं होतं कीं साहेबाने मदत केली नाही तर आम्ही आखाडा काढूं म्हणून. आता तुम्ही आपला शब्द पाळला पाहिजे. साहेबानं सांगितल तुम्हाला कीं 'ताकदवान बनो. अपना बंदोबस्त करो.' ही गोष्ट आखाडा काढल्यावाचून शक्य नाही. त्यांनी म्हटलं कीं त्यांच्याजवळ वस्ताद नाही. मला वाटलं हे लोक मी टाकलेल्या अटींतून पळवाट काढताहेत. निदान चाल ढकल करून पहावी अशा ह्यांचा इरादा दिसतो. लांबणीवर गोष्ट पडल्यावर आखाडा काढलाच पाहिजे हे कोणी सांगितलं, असाही ह्यांचा विचार असेल असं मला वाटलं. मी ह्या मंडळीशीं बोलत असतानाच माझ्या भोवतीं इतर मंडळी जमा झाली. त्यांत मला 'वाघ' ह्या आडनांवाचा ओळखीचा इसम दिसला. मी त्या मंडळींना लगेच म्हणालों, 'तुम्हाला वस्ताद पाहिजेना? हा घ्या वस्ताद.' वाघ हा गृहस्थ जातीनं मराठा. बी. एन. आर. च्या वर्कशापमधे काम करीत असे व त्याच मोहोल्यांत राहतही होता. त्या मारवाडी लोकांना असंही सांगितलं कीं जमल्यास त्यांनी कोष्टी लोकांना आपल्या घराच्या मागच्या बाजूस घरें भाड्यानं रहाण्यास द्यावीं व आपले येथे नोकर ठेऊन घ्यावेत. शेटजीशीं बोलणं संपल्यावर मी घरीं आलों. त्या मोहल्ल्यांत दंगा झाला नाही.

## सुशिक्षितांनी संरक्षणक्षम झालं पाहिजे

हिंदुमुसलमानांच्या ह्या १९२३ च्याच दंग्याच्या दिवसांत डॉ. मुंजे व डॉ. हेडगेवार हे केव्हा केव्हा दोघे मिळून तर केव्हा केव्हा एकटे उदारामजी पहेलवानाच्या इथल्या स्वयंसेवक कचेरीस भेट देऊन जात.

एकदा डॉ. हेडगेवार तिथे आले असतांना त्यांच्या समक्ष एक प्रतिष्ठित सुशिक्षित गृहस्त दंगा सुरू झाल्यानंतर ५-६ दिवसांनी स्वयंसेवकांची मदत मागण्यास आले. मी मदत देण्याचें नाकारलें. " आपल्या मोहल्ल्यांत स्वयंसेवक जमवून बंदोबस्त कां केला नाही?" असा खडा सवाल मी त्यांना टाकला.

" दुसऱ्यावर अवलंबून राहिल्याने तुम्ही स्वतः कधीही कांहीही करणार नाही. तुम्हाला मदत न करणें हेंच तुम्हाला स्वावलंबन शिकण्याला भाग पाडेल. तुम्हाला मदत न करणं हें वर वर जरा निर्दयपणाचं दिसतं. पण शेवटीं तेंच तुमच्या फायद्याचं ठरणार. निरुपाय म्हणूनच कां म्हणाना पण स्वावलंबनाच्या मार्गावर याल. श्रीमंताच्या मुलांना त्यांचे नोकर नेहमी कडेवर घेऊन फिरतात. हीं मुलं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातात पण कोणाच्या भरवशावर ? नोकरांच्या व स्वतःचे पाय अधु करून घेतात. त्यांना स्वतःच्या पायानं चालणं भाग पडलं तर ते केव्हाना केव्हा तरी आपल्या पायानं नीट चालायला लागतील व त्यांचे पाय शाबूत व मजबूत होतील. नोकरांच्या कडेवर बसणं सुखाचं खरं पण ते परस्वाधीनच जीणं व त्यामुळे पाय गमवावे लागतात. स्वतः पायानं चालणं त्रासदायक खरं पण तुम्ही स्वतः चालूं लागता. मी स्वयंसेवक तुम्हाला देत नाही म्हणतों ते तुमच्या हिताकरताच. माझं बोलणं कडू वाटेल पण माफ करा. " तो गृहस्थ गेल्यावर मी डॉक्टर हेडगेवारांना म्हणालों, " डॉक्टर ह्या गृहस्थाला मी मदत केली नाही म्हणून तुम्हाला वाईट वाटलें असेल. माझ्याबद्दल तुमचा गैरसमज होऊं नये म्हणून मी तुमच्याजवळ खुलासा करतों. ह्या दंग्यांत हिंदुंच्या देवळाचं व हिंदुंचं संरक्षण ज्या स्वयंसेवकांनी केलं ते सर्व आखाडेवाले-अशिक्षित. ज्यांना हे असले प्रतिष्ठित गृहस्थ आपल्याजवळही उभे करणार नाहीत. शिवराम गुरुचा आखाडा, नागपूर व्यायाम शाळा व भारत व्यायाम शाळा यांतील स्वयंसेवक सोडून दिल्यास बाकीचे स्वयंसेवक अशिक्षित, अडाणी व गरीब लोक." वाकररोडवरील सुशिक्षित लोकांनी स्वयंसेवकांना व पर्यायानं मला दिलेल्या धमकीची हकीकत सांगून मी म्हणालों, " ह्या सुशिक्षित लोकांच्या निंद्य वर्तणुकीवर टीका करण्याची माझी इच्छा नाही. पण ज्या अडाणी लोकांत सुशिक्षित व श्रीमंत लोकांना मिसळण्याची लाज वाटते व ज्यांच्याशीं ह्या लोकांची वागणूक बेपर्वाईची असते त्या अडाणी लोकांजवळ स्वतःचा जीव व वित्त वाचविण्याकरिता मदत मागण्याची ह्यांना लाज नको का वाटायला ? सुशिक्षित व श्रीमंत लोका संबंधी ज्या वेळेला मी बोलतों त्या वेळेला अमुकच एका जातींतील लोक असं समजण्याची गरज नाही. मी ब्राम्हणांनाच, मारवाड्यांनाच उद्देशून बोलतों

असं नाहीं. तर सर्वच जातींतल्या सुशिक्षित व श्रीमंत लोकांना–त्यांत मराठे, कोष्टी वगैरे सर्व सुशिक्षित व श्रीमंत लोक आलेत–उद्देशून माझं बोलणं आहे. अडाणी व आडदांड लोकांशीं यांची वागणूक गुर्मीची पण जिवावर बेतली कीं मग वागणूक नरमाईची अगदीं गाईची. सुशिक्षित लोकांनी संघटित होऊन आप आपल्या मोहल्लयाचं व हिंदुसमाजाचें रक्षण केलं पाहिजे व इतरांना धडा घालून द्यायला पाहिजे. 'दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला' असं समर्थ रामदास स्वामीनं म्हटलंच आहे.

"ह्या लोकांना आता मदत न द्यायला दुसरंही एक कारण आहे. ह्या दंग्याच्या दिवसांत सर्व स्वयंसेवकांच्या बचावाची जबाबदारी माझ्यावर आहे. डिफेन्स कमिटीवर जबाबदारी व तिचा मी अध्यक्ष, तेव्हा माझ्यावरच जबाबदारी असं म्हटलं पाहिजे. मला स्वयंसेवकांच्या समितीचा अध्यक्ष व संरक्षण समितीचा अध्यक्ष ह्या पहेलवान लोकांनी निवडून माझ्यावर आपला विश्वास टाकला आहे. त्या विश्वासाचा दुरुपयोग होतां कामा नये हे स्वयंसेवक निरर्थक संकटांत सापडणार नाहीत हें मी पाहणं माझं कर्तव्य आहे. मारपीटीच्या दंगलीच्या मुकर्दम्यांत स्वतःचा बचाव हाच एक बचावाचा मार्ग. दुसऱ्यांच्या मोहल्लयांत रात्रीं बेरात्रीं किंवा दिवसाही मारपीट करणाऱ्या स्वयंसेवकांना–स्वयंसेवकांच्या गटांना हा बचावाचा मार्ग काम देणार नाही. बरं धोका पत्करण्यासारखी महत्वाची जी वेळ होती – म्हणजे सुरवातीला – ती वेळ निघून गेली. तेव्हा प्रत्येक मोहोल्लेवाल्यानेच आता आपल्या संरक्षणाचा मार्ग काढला पाहिजे." डाक्टर कांही वेळ थांबून निघून गेले.

डॉक्टर हेडगेवारांनी हिंदुसमाजास – विशेषकरून सुशिक्षित हिंदूस त्यांची सघटना करून स्वसंरक्षण करण्यास समर्थ केलें. ती संघटना 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' ह्या नांवाने प्रसिद्ध आहे. तिचं कार्य मोहोल्लया पुरतं न राहतां संबंध राष्ट्राचं कार्य ती संस्था करीत आहे. तिला आजचं यश मिळण्यास काय काय प्रयत्न डॉ. हेडगेवारांना करावे लागले व अडचणींना कसं तोंड द्यावं लागलं याचा इतिहास स्वतंत्र रीतीनं पुढे येणार आहे.

**मोहरमावर बहिष्कार**

ह्या दंग्यानंतर दोन तीन महिन्यांनीच मोहरमचे दिवस आले. नागपूरचे

मोहरम पहाण्याकरिता लांब लांबून, खेड्यापाड्यांतून व शहरांतून खूप लोक येत. इथले ताबूत भव्य ६०।६० फूट पर्यंत उंच, नक्षीदार व प्रेक्षणीय असत. कारागिरीची कमाल केलेली असे. दरसाल कांहीतरी नावीन्य ह्या ताबूतांत दिसे. चमेलीचे, बताशाचे ताबूत कोणी पाहिले आहेत ? सन १९२३ सालापूर्वी हिंदुमुसलमानांत एकी होती व हिंदु ताबूत करण्यांत, सवारी काढण्यांत व इतर रीतीनेही म्हणजे 'फकीरी' घेण्यांत, 'खिचडा' देण्यांत भाग घेत. सवाऱ्या बरोबर फिरणं, मोहरमात वाघ बनणं, 'कत्तल'च्या रात्रीं रात्र रात्रभर फिरणं, ताबूत 'थंडे' होण्याच्या दिवशीं निरनिराळीं अस्वलाची 'चटणी' वगैरेचीं सोंग काढणं हे हिंदु करीत. कत्तलीच्या रात्रीं व ताबूत थंडे होण्याच्या दिवशीं इतकी गर्दी असे की बाहेरगावचे लोक जिथे जागा सापडेल तिथे उघड्यावर रहात व निजत. कत्तलीच्या रात्रीं मोहल्लचा मोहल्ल्या-मधल्या 'सवाऱ्या' मधे मारपीट होई व मग ह्या बाहेरगांवच्या तमासबिनांची मोठी तारांबळ उडे. दरसाल अशी ही गर्दी जमे व मोहरमास ताबुतांमुळे, वाद्य व इतर सोंगामुळे खूप रंग चढे.

ह्या दंग्याचे वर्षी मुसलमानांचे 'मोहरम' येण्याचे ७ – ८ दिवसांपूर्वी हिंदुसभेने मोहरमावर बहिष्कार टाकला. हिंदूंनी मोहरमांत भाग घेऊं नये असा आदेश दिला. बाहेरगावाहून लोकांनी मोहरम पहाण्यास येऊं नये अशी छापील पत्रकें ठिकठिकाणीं वाटलीं व वर्तमानपत्रांतून ह्या बहिष्काराची प्रसिद्धि व दंग्याच्या धोक्याची सूचना दिली. लुटून जाण्याचा व मारपीट होण्याचा संभव आहे सबब इथे मोहरम पहाण्यास येऊं नका असा इषारा देण्यांत आला. हिंदुमहासभेने रेल्वे स्टेशन व रेल्वे पुलानजीक स्वयंसेवक ठेऊन नागपूरला येणाऱ्या हिंदु माणसांना व बायकांना योग्य तें मार्गदर्शन करण्याचा बंदोबस्त केला. मोहरमावरील बहिष्काराचा परिणाम झाला. मोहरम सुना गेला. पण ह्या मोहरमाच्या बहिष्कारामुळे कोणाच्या ध्यानीं मनीं नसेल असा एक निराळाच प्रश्न उपस्थित झाला. तो हा.

### गणपतींत वाघ शिरले

कै. नारायण पेंटर हा नागपुरांतील चांगलाच प्रसिद्ध चितारी. आखाड-बाजही. पुष्कळशा आखाडेवाल्यांचा पुढारी. हा हिंदुसभेचा स्वयंसेवक झाला

होता व आपल्या बरोबर बरेच आखाडेवालेही त्यानं स्वयंसेवक बनवले होते. तो मोहरमावर हिंदुसभेनं बहिष्कार पुकारल्याबरोबर माझ्याकडे आला व मला म्हणाला, "हिंदुसभेनं मोहरमावर बहिष्कार टाकला. आम्ही हिंदु, शिवाय सभेचे स्वयंसेवक. तेव्हा हिंदुसभेनं टाकलेला बहिष्कार पाळणं व तो पाळला जाईल हें पहाणें आमचं कर्तव्य. पण हिंदुसभेच्या ह्या बहिष्कारामुळे आमच्यावर जो प्रसंग येणार आहे त्याचा हिंदुसभेनं विचार करावयास पाहिजे." मी म्हणालों, "पेंटर, काय प्रसंग ओढवला?" पेंटर म्हणाला, चितारी लोकांची भाकर गेली. त्यांच्या पोटावर पाय दिला गेला. पोटापाण्याचा प्रश्न आमच्यासमोर 'आ' वासून उभा आहे. मी म्हणालों, तो कसा? पेंटर म्हणाला, मोहरमांत चितारी लोक वाघ रंगवतात. किती लोक वाघ रंगतात हे आपण दरवर्षी पहातातच. बरेच आखाडबाज लोक निव्वळ शाकीनी खातर, जीवाची हौस करण्याकरता, तर कांही गरीब लोक 'चिराखी' मिळविण्याकरिता वाघ बनतात. वाघ बनणाऱ्यांत शेकडा ८० तरी हिंदु असतात. प्रत्येक वाघ बनणारा ५ रुपयापासून ८ रुपयापर्यंत आम्हास रंगाईबद्दल देतो. तेव्हा तुमचा हा मोहरमाचा बहिष्कार आम्हास चितारी लोकांस भोवणार. चितारी सगळेच हिंदु, तेव्हा मोहरमांतील ताबूत तर थंडे होतीलच पण आमचेही ताबूत थंडे होण्याचा प्रसंग आहे. चितारी लोकांच्या पोटावर पाय येईल, त्यांचें भयंकर नुकसान होईल हें मी सांगायला पाहिजे असं नाही. ह्या अडचणींतून बाहेर पडण्याकरिता कांही तरी तरकीब लढवली पाहिजे. तुम्ही आमचे स्वयंसेवकांचे कप्तान. तेव्हा तुम्हाला आमची अडचण सागणं हें आमचं काम त्यांतून रस्ता काढणं स्वयंसेवकांची बाजू हिंदुसभेपुढे मांडण हें तुमचं काम. मी म्हणालों, तुम्ही माझ्याकडे आले हे उत्तम केलं. तुमची शिस्त पाहून मला आनंद झाला. पण मला ह्यावर आताच कांही तोड सुचत नाही. हा पेचप्रसंग हिंदुसभेपुढे मांडण्याचं काम मी आजच करतों.

हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांची सभा तात्काल बोलावल्या गेली. सर्वच कार्यकर्त्यांना विचार पडला कीं ह्या लोकांना काय सांगावं. चितारी लोकांचं म्हणणं अगदी खरं होतं हें प्रत्येकासच वाटे. त्यांच्या प्रश्नाचा निकाल त्यांना सोयीस्कर होईल, त्यांचं नुकसान भरून काढील असाच व्हावयास पाहिजे

होता. त्या सभेंत डॉ. मुंजे ह्यांनी तोड काढली कीं मोहरमाचे ऐवजी गणपतीचे दिवसांत हिंदूंनी वाघ बनावं व चितान्यांनी वाघ रंगवावे. मात्र त्यांनी मशिदीवरून जातांना त्यांच्या बरोबर असलेले तासे बंद करूं नयेत. तासे वाजवणं सुरूच ठेवायला पाहिजे. ह्यांनी आपला हक्क गाजवला पाहिजे. ( मौ. अबुल कलम आझाद ह्यांनी मशिदीवरून वाघ वाजंत्रीत नेण्याच्या बाबतींत दिलेल्या तडजोडीच्या निकालाला अनुसरून ) हिंदुसभेला ह्या नवीनच उत्पन्न झालेल्या पिचकार्टीतून डॉ. मुंजे ह्यानी सोडवलं. चितारी खुष होऊन गेले.

## गणपतीच्या मूर्तींचें विकृत स्वरूप

दोनतीन वर्षांतच मोहरमवरील बहिष्कार हळूहळू अंतर्धान पावला. गणपति उत्सवांत तात्पुरती अडचण सोडवण्यास वाघ बनण्याची जी सवड दिली होती ती आता कायमचीच होऊन बसली व यामुळे गणपति उत्सवाचं धार्मिक व उदात्त स्वरूप जाऊन तें विकृत व हास्यास्पद झालं आहे. ‘ गणपति ’ उत्सवाचं जें मोहरमांत रूपांतर झालं त्यांतच दोन तीन तीन वर्षांनी गणपतीच्या मूर्ति करणारांनीही आणखी भर घातली. गणपति देवतेच्या मूर्ति-संबंधी ज्या गणेशभक्तांच्या भावना त्यांना जबरदस्त धक्का दिला. गणपति ह्या देवतेचा जन्म सिंदुरासूरादिक दैत्यांचा नाश करण्याकरिता. गणपतीच्या हातीं अंकुश, परशु, पाश त्रिशूळ, इत्यादि असावयास पाहिजेत. ते जाऊन आजकाल गणपतीच्या हातीं चरखा, तबला, किंवा क्रिकेटची ब्याट. गणपतीची ही मूर्ति पाहिल्यावर कोणाला वाटेल कीं गणपतीचा जन्म असूरांना मारण्याकरिता व देवांना साधूंना संरक्षण देण्याकरिता झाला होता ? चितारी लोक धार्मिक लोकांच्या भावनाशीं खेळताहेत व सनातनी सुद्धा ह्या बद्दल चळवळ करीत नाहीत ? कल्पना करा महात्माजींच्या पुतळ्याच्या हातीं चरखा नाही पण तरवार व बंदुक आहे – कल्पना करा म्हणतो याचं कारण कोणाही चितान्याला तशी हिम्मत झाली नाही. शिवाजीच्या हातीं चरखा दिलेला पुतळा मी पाहिला. पण महात्माजींच्या हातीं तरवार दिलेली मी पाहिली नाही– तर असा हा हत्यारबंद महात्माजींचा पुतळा पाहून कोणाला काय वाटेल ? महात्माजी चरख्याचा, हातकताई सुताचा पुरस्कार करणारे होते, अहिंसावादी होते असं वाटण्याचा जरा तरी संभव आहे का? महात्माजींचा हत्यारबंद

पुतळा पाहून कोणालाही धक्काच बसेल ! मग ह्या देवतांची व ऐतिहासिक पुरुषांचीच तेवढी विटंबना कां ? महात्माजींच्या हातीं तरवार दिली असती तर कांग्रेसवाले खवळले असते म्हणून; व देवतांची, ऐतिहासिक शूर पुरुषांची विटंबना झाली तरी सनातनी व इतिहास प्रेमी चळवळ करीत नाहीत म्हणून.

## शिवाजी ग्रँट रोडनं पळाला

लोकांना जर आपलं कौसल्य दाखवावसं चितार्‍यांना वाटत असेल तर दुसरे पुतळे करून त्याच कल्पना त्यांनी कां व्यक्त करूं नयेत. तबलची वा क्रिकेट खेळणारा गणपतिच कां दाखवावा? एखाद दुसरा पुतळा करून कां दाखवूं नये? क्रिकेटपटु रणजीतसींगचाच पुतळा करून त्याच्या हातांत क्रिकेट ब्याट कां देऊं नये? तसं केलं तर त्यांत वास्तवता दिसेल व पुतळा करणार्‍याने कितपत पुतळा बरोबर उतरवला हेही दिसेल.

नागपूरांत पूर्वी राजू चितारी म्हणून एक फार प्रसिद्ध चितारी असे. तो गणपतीच्या मूर्ति धार्मिक भावना व्यक्त करणार्‍या अशा बनवी व त्या बरोबरच इतर पुतळे करून घरीं आपल्या स्वतःच्या कसबाचें प्रदर्शन करी. त्यानं कधी लोकांच्या धार्मिक भावना दुखवल्या नाहीत.

हिंदु लोक मूर्तिपूजक व विभूतिपूजक असूनही त्यांच्या देवतेच्या किंवा विभूतीच्या विकृत, व हास्यास्पद अशा कोणी मूर्ति बनविल्या तरी त्यांना चीड येत नाही. इतके ते उदासीन किंवा मेल्या पित्ताचे असतात. उलट मुसलमान लोक मूर्ति पूजक नसूनही त्यांच्या भावना दुखवणारा जर एखादा प्रसंग एखाद्या नाटकांत किंवा सिनेमांत असला तर ते कसे तुटून पडतात हे "आग्र्याहून सुटका" या नाटकाची पहिली आवृत्ति वा खेळ व मागूनच्या आवृत्त्या व खेळांतील प्रवेश यांची तुलना केल्यास दिसून येईल. शिवाजी औरंगजेबाच्या नजर कैदेंतून युक्तीने निसटून गावाबाहेर घोड्यावर बसून आग्र्याहून फरार होऊं पहातात. त्या वेळेस औरंगजेबाची मुलगी भेटण्यास येते असा कांहीसा प्रसंग होता. एक दिवस हा खेळ मुंबईला पिला हाऊसमधे दुपारीं होत असतांना वर सांगितलेला प्रवेश प्रेक्षक पहात होते. शिवाजीशीं बेगमचें होणारें भाषण त्यांना आवडलं नाही. प्रेक्षकांपैकी मुसलमान प्रेक्षक एकदम स्टेजवर

चालून गेले. शिवाजीनं ग्रँट रोडने धूम पळून आपली सुटका करून घेतली. नाटकांतील पडदे ह्या मुसलमान प्रेक्षकांनी फाडून टाकले.

आर्यसमाजिस्ट कांही मूर्तिपूजक नाहीत पण त्यांनाही हिंदी पुराणांतील सीता वगैरे साध्वी स्त्रियांचें काम मुसलमान वेश्यांनी करण पसंत नाही म्हणून तशा सिनेमा तारकांना हिंदी नांव देण्याची चाल आहे असं एका फिल्म प्रोड्युसरने मला १९४४ सालीं त्याचा स्टुडीओ दाखवायला नेलं त्या वेळेला सांगितलं. सनातनी लोकांना अशी ही धर्माची पायमल्ली चालली असतांना जाग येत नाही. पण एखाद्या सुधारक मनुष्यानं त्यांच्या प्रचलित अनिष्ट रूढीविरुद्ध एखादी चळवळ सुरू केली किंवा एखादा कायदा करण्याचं मनांत आणलं कीं मग यांची घनगर्जना होते सुरू – वर्तमानपत्रांतून व क्वचित सभांतून आकाश पाताळ एक करून सोडतात. वाची वीर ते, ते काय उगे बसणार ! पण परधर्मीयांनी देवाची किंवा विभूतींची विटंबना केली तर चालते कारण तिथे भाषण करूनच निभणार नाही. कृति करावी लागते. आणि मग ' बहु बायकांत बडबडला ' ' बृहन्नडे रथ फिरव ' अशी उत्तराची कौरव सैन्य पाहिल्या बरोबर जी गर्भगळीत स्थिती झाली त्या प्रमाणे ह्यांचीही होते. रण मैदान सोडून पळून जाणं सहज सुचतं.

## डॉ. मुंजे धर्मवीर कीं मटनमार्तंड ?

हिंदुमुसलमानांत दंगे झाले त्याच सालीं डॉ. कुर्तकोटी, शंकराचार्य हे नागपुरला आलेत. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध व शुद्धि चळवळीतर्फेची व्याख्यानें दिलीं. हल्लीही क्षत्रिय आहेत व त्यांना ब्राम्हणाप्रमाणेच वेदाधिकार आहेत असं आपल्या अधिकारयुक्त वाणीनं सांगितलं. ह्याचा परिणाम असा झाला कीं कोल्हापुरकडे जो वेदाधिकारासंबंधी तीव्र वाद माजला होता तसा वाद इकडे माजला नाही. ब्राम्हण ब्राम्हणेत्तर वादाला तीव्र स्वरूप येण्याला कोल्हापुरकडे जें मुख्य कारण झालं होतं त्याचो इकडे नांव निशाणीही नव्हती. राजे लक्ष्मण-राव भोसले हे सर्व धार्मिकविधी वैदिक पद्धतीनं करूं लागले. डॉ. कुर्तकोटी ह्यांनी हिंदुमुसलमानांचे दंग्यांत हिंदुतर्फे ज्यांनी विशेष श्रम घेतले होते त्याना पदव्या दिल्या. डॉ. मुंजे ह्याना धर्मवीर ही पदवी मिळाली. पण एका गृहस्थास हें सहन न होऊन त्याने एका वर्तमानपत्रांत एक लेख लिहून

डॉ. मुञ्यांना 'मटन मार्तंड' ही पदवी दिली. डॉ. मुंजे मांस खात असत व मांस खाणं जरूर आहे असा प्रचार करीत. मध्यम वर्गांतील मनुष्यांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे दुध, लोणी दुर्लभ झालं म्हणून त्यांनी कोंबड्या पाळाव्या कारण त्या पाळण्यास कांहीच खर्च येत नाही व अंडीं खावींत असा उपदेश करीत. ह्या डॉ. मुंज्यांच्या प्रचाराला उद्देशूनच ह्या लेखकानं डॉ. मुंज्यांच्या धर्मवीर पदवीची टिंगल उडविण्याकरिता डॉ. मुंज्यांना दिलेली 'मटन मार्तंड' ही पदवी. पण ह्या पदवीनं डॉ. मुंज्यांचं कांहीच नुकसान झालं नाही किंवा निव्वळ ह्या पदवीमुळेच त्यांचे अनुयायी कमी झाले नाहीत. उलट त्यांचा हिंदुसभेचं काम करण्याचा उत्साह वाढतच गेला.

## डॉ. मुंजे ह्यांची हिंदुसमाजाबाबत दूरदृष्टि

डॉ. मुंजे ह्यांनी हिंदूंच्या धार्मिक चालीरीतींत कोणतीही आडकाठी येऊं नये, हिंदुमुसलमानांचे तंटे होण्याचे प्रसंग वाढूं नयेत म्हणून किती दक्षता ठेविली होती ह्या संबंधी अनेक उदाहरणें आहेत. त्या पैकी एक ठसठशीत उदाहरण देतों. त्या वरुन डॉ. मुंजे ह्यांची दृष्टि किती दूरपर्यंत पोचत होती हें स्पष्ट होणार आहे.

सन १९२५ सालचा श्रावण महिना. कान्होबा शिरवले त्या दिवसा-नंतरचा दुसरा दिवस. मध्यरात्रींचा सुमार. माझ्या बंगल्याच्या हॉलचें दार कोणीतरी ठोठावत आहे असं वाटलं म्हणून मी आपल्या निजण्याच्या खोलींतून हॉलचं दार उघडण्यास गेलों. दार उघडलं. पहातो तो डॉक्टर मुंजे !

मी म्हणालों, "डॉक्टर, एवढ्या रात्रीं व इतक्या लांब आलांत तुम्ही ! कांही विशेष काम ?" डॉ. म्हणाले, "ताजुद्दीन बोवा वारले." मी म्हणालों, "अरे काय डॉक्टर ! एवढ्या रात्रीं स्वतः येऊन सांगण्या सारखी ही बातमी आहे असं मला वाटत नाही. ताजुद्दीन बोवा वारले ! वारले असतील !! त्याचं मला काय ?" डॉ. म्हणाले, "तुम्हाला महत्व नसेल पण मला ह्या गोष्टीचं विशेष महत्व आहे. हिंदुसमाजाच्या दृष्टीनं ही मोठी महत्वाची बाब आहे. ऐका. थोडा वेळ कमी झोप झाली तरी चालेल." मी म्हणालों, "बरं सांगा." डॉ. म्हणाले, "ऐका. ताजुद्दीन बोवा राजेबहादुर रघुजीराव भोसले यांच्या सक्करदऱ्या वरील एका बंगल्यांत रहात होते. ताजुद्दीन बोवा मेल्यामुळे त्यांना

कोठं पुरावं हा प्रश्न उपस्थित होईल. रहात होते तिथेच बहुधा पुरलं जाईल. असं झालं तर मोठी अडचण उपस्थित होईल. हल्लीच ताजुद्दीन बोवा तिथे रहात होते म्हणून सडकेच्या दुतर्फा, फकीर व भिकारी लोकांच्या झोपड्यांची चिकार गर्दी. बोवाच्या बंगल्याच्या रस्त्यानं ज्या दीड दोनशे झोपड्या आहेत त्यांत बदमाषांच्याही झोपड्या आहेत. बोवाच्या दर्शनास जाणारे इथले व परगावचे-ही. जाणाऱ्यांत हिंदु माणसं त्याचप्रमाणे हिंदु बायाही असतात. अशिक्षित माणसं व बाया असच समजूं नका. त्यांत सुशिक्षित माणसं व बायाही असतात. बोवाच्या भोवती असलेल्या माणसांकडून, बदमाषांकडून व भिकाऱ्याकडून ह्या दर्शनास जाणाऱ्या माणसांना व बायांना खूप त्रास होत असे. माझ्या कानांवर कित्येकदा तरी अशा गोष्टी आल्या. तुम्हाला काय गाव जळला हनुमान बाहेर. आगीची आच गावांत राहतात त्यांना लागते." मी म्हणालों, "डाक्टर मी बाहेर राहत असेन पण शहरांतील माणसांची चाकरी करतों. दंग्याच्या वेळेला मी बाहेर राहत होतों पण शहरांत येऊन शहरांतल्या माणसांची चाकरी करीत होतों. बरं तेंहा राहूं द्या. कालच तुम्ही मला एक कामगिरी शहरांतली सांगितली. सर्व कान्होबा एकत्र करुन त्यांची शुक्रवार दरवाज्यावरील मशीदींवरुन शुक्रवार तलावाकडे वाजत गाजत मिरवणूक घेण्यासंबंधीची. ह्या हनुमानाने शहरांत येऊन काम केलं व तेंही उत्तम रीतीने हें तुम्हाला कबूल करावं लागेल." डॉक्टर म्हणाले, "कबूल. पण मी आता सांगणार आहे तें काम बरच कठीण व जर तें यशस्वी रीतीनं पार पडलं नाही तर त्याचे दुष्परिणाम हिंदुसमाजास व खुद्द रावबहादुरास भोवतील." मी म्हणालों, "सांगा तुमचं काम. वाचा यादि दुष्परिणामांची."

डॉक्टर म्हणाले, "प्रथम दुष्परिणाम काय होतील ते सांगतों म्हणजे तुम्हास कामाचं महत्व कळेल. ताजुद्दीन बोवांना सकर दऱ्यावरच गाडण्यांत आलं तर आजुबाजूला अनेक झोपड्या व इमारती नेहमी करतां तिथे बांधल्या जातील. त्यांत मुसलमान फकीर, भिकारी, दर्ग्याची पुजा करणारे वगैरे राहणार. बोवांच्या दर्शनास जाणाऱ्या हिंदु स्त्री पुरुषांची संख्या आता पेक्षा जास्त वाढणार. त्यांना व विशेषेंकरुन बायांना मोठ्या प्रमाणावर त्रास होणार. फकीरांचा व बदमाषांचा तांडा कित्येक बायांना गोषांत घालणार. आतापर्यंत

गेल्या नाहीत असं नाही. पण हा उपद्रव आणखी वाढणार. ह्या फकीर व बदमाष लोकांपासून तिन्हाइतानाच त्रास होईल असं समजूं नका. खुद्द राजेसाहेबांच्या सक्करदऱ्यावरील देवळांतील घंटा वाजवणंही हळूहळू ते बंद करायला लागतील. राजेसाहेबावर सुद्धा हा प्रसंग आजकालच्या दिवसांत येणार नाही असं नाही." मी म्हणालों, "डॉक्टर हिंदुवर काय प्रसंग ओढवणार ह्याची कल्पना तुम्ही दिली. पण मी काय करावं म्हणतां?" डॉ. म्हणाले, "मुसलमानांनी जमावानं सक्करदऱ्यावर कांही अनिष्ट प्रकार करूं नये म्हणून तुम्ही उद्या अगदी सकाळीं उदाराम पहेलवानाकडे जा व त्याला आपली मंडळी घेऊन सक्करदऱ्यावर सूर्यनारायण निघतो आहे अशा बेतांत पोचायला सांगा." मी म्हणालों, "डॉक्टर पहेलवानाला तुम्हीच सांगायला गेला असतां तर इथे येण्याचे तुमचे अर्धे श्रम वाचते. तुम्ही शहरांत, पहेलवानही शहरांत." डॉक्टर म्हणाले, "श्रम वाचले असते पण काम झालं नसतं. हें काम तुमच्यावरूनच होण्यासारखं आहे." मी म्हणालों, "बरं डॉक्टर तुम्ही घरी जा. मी उदारामजी पहेलवानाला सांगतों व तसंच धोंडबाजी पहेलवानालाही सांगतों. शिवाय जुन्या शुक्रवारींत सक्करदऱ्याच्या जवळच माझ्या लछमनसिंग वस्तादचे शिष्य आहेत त्यांनाही आखाड्यांतली मंडळी आणायला सांगतों. दंग्याचा बंदोबस्त नीट होईल. तुम्ही जा आता. निर्धास्त रहा."

उदारामजी पहेलवानाची सुटका जाळपोळीच्या व डाक्याच्या मुकदम्यांतून विनावेतन मी कशी केली ही गोष्ट त्याच प्रमाणे उदारामजी पहेलवानांच्या सांगण्यावरून त्यांना ज्यांनी आश्रय दिला त्या बाजारगावच्या देशमुखावरील खुनाचा मुकदमा किती कसोशीनें मी चालविला हीही गोष्ट, शिवाय ह्या पहेलवानांत माझी नेहमीची वापर ह्या सर्व गोष्टी जमेस धरूनच डॉक्टरांनी हें काम मला सांगितलं असलं पाहिजे असा मी आपल्या मनाशी अदांज बांधला व दुसऱ्या दिवशीं सकाळीं पाच वाजतांच उठून कामास लागलों.

मी मोटारींतून प्रथम उदारामजी पहिलवानाकडे गेलों. थोडा झिम झिम पाऊस यायला सुरवात झाली होती. त्यांनाच धोंडबा साव वस्तादला बरोबर घेऊन सूर्योदयापूर्वी सक्करदऱ्यावर येण्यास सांगितलं. तिथे जाण्याचा उद्देश

थोडक्यात समजाऊन सांगितला. नंतर जुन्या शुक्रवारींतून लछमनसींग वस्तादच्या शिष्याला भेटून त्याला सक्करदऱ्यावर त्याच कामाकरितां येण्यास सांगितलं व थेट सक्करदऱ्याच्या सडकीनं राजेबहाबूराकडे जाण्यास निघालों. पाऊस पडतच होता. निघालों तेव्हा झिम झिम पाऊस होता पण आता जोराचा येऊं लागला. तरीही बोवाच्या अंतदर्शनास जाणाऱ्यांची रिघ लागली होती. लोक टांग्यांतून. पयदल व सायकलवर चालले होते. टांग्यांतून स्त्री पुरुष मंडळी चालली होतीं. जाणाऱ्यांत सगळेच भाविक हिंदु होते.

मी सक्करदऱ्यावर गेलों ते थेट राजेबहादुर जिथे बसले होते तिथे. राजेबहादुरांचे भेटीस जाण्यास व राजे लक्ष्मणराव ह्यांचेकडेही त्यांना भेटण्यास मला मोकळीक असे. पहेलवान, पहारेवान, बारेदार व कारकून हे सर्व मला ओळखत होते. मला रोक टोक कुठेच नव्हती. मी गेलों ते थेट राजेसाहेब तोंड धुत होते त्या ठिकाणीं. थोडं औपचारीक भाषण झाल्यानंतर मी त्याना म्हणालों, "महाराज ताजुद्दीन बोवाला कुठे गाडण्यांत येणार?" राजेबहादुरांनी हात केला मुख्य दरवाजाच्या दिशेला. थोड्या वेळानं मी येईन असं सांगून सक्करदऱ्यावरून निघून दिघोरीस (गाव सक्करदऱ्याजवळच आहे) सर गंगाधरराव चिटणीस यांचेकडे गेलों. सक्करदऱ्यावरून दिघोरीस जाण्यास निघालों. त्या वेळेस बोवाच्या तैनातींत असलेल्या मुसलमानांखेरीज इतर मुसलमान तिथे नव्हते. दिघोरीकडे जात असतांना बोवाच्या दर्शनास जाणाऱ्याची जी रांग लागली होती ती हिंदु स्त्री पुरुषांचीच.

सर गंगाधररावाकडे गेलों. ते बाहेर व्हरांड्यांतच बसले होते. मी त्यांना नमस्कार करून म्हणालों, "दादासाहेब, ताजुद्दीन बोवा वारले हे आपल्यास माहित झाले असेलच. त्यांना गाडणार कुठे आहेत हें आहे का आपल्यास ठाऊक? आपण राजेसाहेबांचे प्रमुख सल्लागार तेव्हा आपणास माहित असेल कदाचित?" त्यांनी "नाहीं" असं म्हटल्यावर डॉ. मुंज्यांनी दर्शविलेली भीति मी त्यांच्या कानावर घातली. त्यांनी मला म्हटलं "थांबा जरा. मी चौकशी करवतों." "तुम्ही चौकशी करा. मी आता जातों" असं म्हणून मी निघालों सक्करदऱ्यावर जाण्यास. सक्करदरा स्त्री पुरुषांनी फुलून गेला होता.

मुसलमानांचीही खूप गर्दी जमली होती. उदारामजी पहेलवान, धोंडबा वस्ताद व त्यांची मंडळी शवापासून थोड्या दूर अंतरावर उभी होती.

### तेल गेलं, तूप गेलं हातीं धुपाटणं आलं

मुसलमानांचा जमाव ताजुद्दीन बोवांच्या शवाजवळच होता. तिथून निघून डॉ. मुंजे वगैरे मंडळी कुठे आहेत याची चौकशी काढून एका छोट्या दिवाणखान्यांत गर्दी होती तिथे गेलों. त्या दिवाणखान्यांत डॉ. मुंजे, डॉ. परांजपे, रा. ब. बंबावाले, कुवर फत्तेसिंगराव, सरदार तात्यासाहेब गुजर वगैरे मंडळी होती. बॅ. युसफ शरीफ व नबाब न्याझुद्दीन खान हेही हजर होते. मी दिवाणखान्यांत गेलों त्यावेळेस बॅ. युसुफ शरीफ डॉ. मुंजेना म्हणत होते, "हमकू वो सब खेत का खेत होना. दस एकरसे कुछ नही होगा." हें शेत म्हणजे सक्करदऱ्याकडे येणाऱ्या रोड व उमरेड रोडं ह्या दोन रोडमधील जागा. नवलोजीराव गुजर, राजे लक्ष्मणराव भोंसले व इस्मायल वस्ताद म्हणून एक घोडेस्वार असे, ह्यांची पोलो खेळण्याची ती जागा. शेताची आराजी १२ एकर. बॅ. युसफ शरीफ हे बारा एकर मागत होते व राजे बहादुरातर्फे दहा एकर देऊं म्हणून सांगण्यांत येत होतं. त्या दिवाणखान्यांतल्या गर्दीत रावबहादुर बंबावाले ( रिटायर्ड डी. एस. पी. ) हेही होते. राजेबहादुरांच्या इस्टेटीची व्यवस्था पहाण्याकरितां एक कमिटी नेमली होती तिनं रा. ब. बंबावाले ह्याना म्यानेजर नेमलं होतं. मी त्यांना विचारलं "तुम्ही राजे-बहादुरातर्फे कांही बोलले आहां कीं काय?" त्यांनी "कांहीच नाही. मी फक्त निरीक्षण करतों आहे" असं म्हटलं. हिंदु पुढारी डॉ. मुंजे यांचं म्हणणं कीं राजेबहादुर १० एकर जमीन देतो असं म्हणतात तर तेवढी तुम्ही घ्या. मुसलमान पुढारी बॅ. युसफ शरीफ म्हणत होते त्यांना बाराही एकर द्या. त्यांना वाटत असावं ज्या अर्थी ही मंडळी १० एकर द्यायला तयार झाली त्या अर्थी थोडं ताणून धरल्यास बाराही एकर मिळणं कांही कठीण नाही. दहा एकर देणारे काय आणखी दोन एकर देणार नाहीत?

असं हे दोघांत भाषण चाललं असतांना मी गुटमळलों. मला समजेना कीं बारा एकर कशास पाहिजे? व दहा एकर देतों म्हणतात ते दहा एकर तरी कशाकरितां? म्हणून मी बॅ. युसफ शरीफ ह्यांस म्हणालों, "इतने

जमीन की क्या जरूरत? बारा एकर काहेके लिये होना?" बॅ. शरीफ म्हणाले "वहां एक मशीद बांधे जायेगी, मदरसा होगी. वहां हरसाल उरूस होगा. इतनी जगा तो होनाही." डॉ. मुंजे ह्यांनी माझ्या बंगल्यावर आदल्या रात्रीं जी भीति व्यक्त केली होती ती खरी होती तर! मी लगेच राजेबहादुराचा तपास काढला. मला कळलं कीं ते देवळांत पुजा करण्यास गेलेत. मी लगेच त्यांना जाऊन भेटलों व म्हणालों, "महाराज आपण मुसलमान पुढाऱ्यांनां ताजुद्दीन बोवांना पुरण्याकरिता वगैरे दहा एकर जमीन देतां आहां. पण आपण आपली इस्टेट पहाणाऱ्या कमिटीची सम्मति घेतली आहे कां? त्यांच्या सम्मतिवांचून आपण आपला शब्द देणं, इस्टेटीची विल्हेवाट करणं ठीक नाही. जर कमिटीनं ही देणगी नामंजूर केली तर कायदेशीर अडचणी उभ्या राहतील. आपला शब्द खाली पडण्याचा संभव, मग आपणांस वाटेल आपला अपमान झाला. सर्व घोटाळाच घोटाळा उत्पन्न होईल. तेव्हा ह्या गोष्टी आपण लक्षांत घेतल्यास बरं होईल." राजे बहादुर म्हणाले, "ठीक आहे. दोन एकर जमीन त्यांना मिळेल. त्याच्या पेक्षा जास्त मिळणार नाही. असा निरोप द्या." मी देवळांतून परतलों व ज्या दिवाणखान्यांत हिंदुमुसलमान पुढारी खल घोळून होते तिथे जाऊन डॉ. मुंज्यांना माझं राजेबहादुराशीं झालेलं भाषण सांगितलं. कुंवर फत्तेसिंगराव तिथेच उभे होते ते आश्चर्यचकित होऊन म्हणाले, "दोन एकर असं बावा म्हणतात!" मी म्हणालों 'हो' त्यांनी 'माझ्याबरोबर तुम्ही चला' असं म्हटल्यानंतर मी त्यांच्या बरोबर राजे-बहादुराकडे देवळांत गेलों. कु. फत्तेसिंगरावनी राजेबहादुरांना म्हटलं, "बावा, ह्या लोकांना दोनच एकर जागा द्यायची काय!" राजेबहादुरांनी म्हटलं जर हे लोक ऐकत नाहींत तर आम्हास दोन एकरापेक्षा जास्त देणं नाहीं." मी डॉक्टर मुंजे ह्यांना फिरून घडलेला हाल सांगितला. मुसलमान अर्थातच तितकी जमीन घेण्यास तयार नव्हते. दहा एकर घेणार नाही बारा एकर पाहिजे असा जिथे अट्टाहास तिथे काय ते दोन एकर घेणार होते! अखेरीस त्यांच्या हातीं धुपाटणंच आलं. तिथे जमलेल्या मुसलमान लोकांनी तिथल्या तिथे वर्गणी करून कांही रुपये जमविले व सक्करदऱ्यापासून थोडं लांब असलेल्या नबाब ग्याझुदीन खान यांच्या जमिनीबद्दल सौदा केला. तिथे ताजुद्दीन

बोवाना पुरण्यांत आलं. ह्या जागेला 'ताजबाग' म्हणतात. इथे बांधलेल्या इमारतीकरतां ताजुद्दीन बोवाच्या दूरदूरच्या हिंदु भक्तांनी पैसे पाठविले.

**बोवाचे जातभाई म्हणतात बोवा पागल**

ताजुद्दीन बोवावरच्या हिंदुंच्या भक्तीची कल्पना वाचकांस आली असेलच. गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्वच वर्गातील बरेचसे हिंदु त्यांचे भक्त होते. राजेबहादुर दहा एकर जमीन फुकट देण्यास तयार झाले होते व मुसलमान पुढारी आपलाच हेका जर न चालवते तर त्यांना दहा एकर मिळाले असतेही. व मला मग राजेसाहेबाशीं बोलण्याचा प्रसंगही मिळाला नसता. राजेसाहेब फुकट जमीन द्यावयास तयार झाले होते तर न्याझुद्दीन खान ह्यांनी ताजबाग ह्या जमिनीचे पैसे घेतले. ज्या बॅ. शरीफनी ताजुद्दीन बोवाच्या स्मारकाकरिता राजेबहादुरांकडून बारा एकर जमीन उपटण्याचा प्रयत्न केला – मशाद, दर्गा व उरूस ह्या करिता – त्याच बॅ. शरीफ साहेबांनी मिय्या अबदुल रहमान व अबदुल जबार यांच्यातर्फे ताजुद्दीन बोवा पागल झाले आहेत व म्हणून त्यांची इस्टेट पहाण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत यावी व बोवाच्या इस्टेटीची व्यवस्था करण्याकरितां अबदुल रहमान यास पालनकर्ता नेमण्यांत यावे असा एक अर्ज बोवा मरण्यापूर्वी कांही महिने नागपूरच्या डीस्ट्रीक्ट जजच्या कोर्टात केला होता. अर्जाच्या सुनावणीचे वेळीं श्री. वासुदेवराव पुराणिक, वकील यांनी राजेबहादुरातर्फे जबाब दिला कीं "साईबोवा साधुपुरुष आहेत. पागल नाहीत." बॅ. शरीफ "ह्यांनी बोवा पागल आहेत असं स्पष्ट सांगितलं." ह्यावर श्री. पुराणिक ह्यांनी बॅ. शरीफ ह्यांनी तसे अफिडेव्हीट व मेडीकल सर्टीफिकेट पेश करावे. नंतरच चौकशी व्हावी" असं म्हटलं. अफीडेव्हीटसाठी तारखाही दिल्या होत्या. पण अफीडेव्हीट पेश झालं नाही. दरम्यान बोवा पैगंबरवासी झाले व त्यांना पागल ठरविण्याच्या त्यांच्याच धर्मीयांच्या प्रयत्नांना यश लाभलं नाही. खुदानं त्यांच्यावर खैर केलाच असंच म्हटलं पाहिजे. पण बोवाच्या धर्मीयांची त्यांच्यासंबंधी कोणती बुद्धि होती हें यावरून दिसून येतें व त्याच वेळेला हिंदु बोवाना काय समजत होते हेंही स्पष्ट दिसून येते.

## हिंदुसमाजाची अवनति

सन १९२७ सालीं गणपति उत्सवांत यवतमाळ येथें डॉ. सावरकर यांचे अध्यक्षतेखाली एक व्याख्यान देण्यास गेलों होतों. व्याख्यानाचा विषय 'हिंदुसमाजाची अवनति' हा होता. ह्या व्याख्यानांत अस्पृश्यांना अस्पृश्यता व्यवहारांत पदोपदीं कशी नडते, त्यांना परधर्मीयापेक्षाही कसं कमी समजण्यांत येतं याचीं अनेक उदाहरणें देऊन व त्यानी मांडलेल्या व भक्तीभावानं पुजलेल्या हिंदु देवतांच्या मिरवणुकींत त्यांचे काय हाल होतात, सवर्ण हिंदु आपल्याच देवतांची त्या वेळेला कशी विटंबना करतात हें सांगून अस्पृश्यता घालवणें, अनाथालयें काढणें व शुद्धीचा चळवळ करणें ह्यांची हिंदुसंघटनेच्या दृष्टीनं कशी अत्यंत जरूरी आहे हें दाखवून म्हणालों, "हिंदु समाजांतील निरनिराळ्या जातींत संगठन व एकोपा घडवून आणणें हेंही अवश्य आहे. त्या शिवाय एकमेकास कोणी सहाय्य करणार नाही. हिंदूचें नुसतें संख्याबल मोठें असून काय उपयोग? त्यांच्यांत एकदिलाने व एकोप्याने वागण्याची बुद्धी असेल, तरच ती संख्या सामर्थ्यवान बनेल. विस्कळीत समुदायाला कोण विचारतो? ही एकरूपता व एकोपा समाजांत उत्पन्न करण्यासाठी कांही सामाजिक व धार्मिक प्रसंगीं सर्व जातीच्या हिंदु लोकांनी त्यांत भाग घ्यावा व सर्वांस समानतेने व स्नेहभावाने वागण्याची सवय लावली पाहिजे. एरव्ही एकोपा उत्पन्न होणार नाही. मेंढराचा कळप केवढाही जंगी असला, तरी एकच लांडगा त्यांचा सहज फन्ना पाडूं शकेल! म्हणून संख्याबल व एकोपा असूनच भागणार नाही तर अंगीं तेजस्विताही पाहिजेच. प्रत्येक हिंदु आत्मसंरक्षणार्थ समर्थ बनला पाहिजे."

दुसऱ्या दिवशीं यवतमाळहून धामणगाव येथे उमरावतीस जाण्यास आलों तर कळलं कीं नागपूरास हिंदुमुसलमानांत दंगा झाला. मी उमरावतीस न जातां एकदम नागपूरास आलों. ह्या दंग्याचे वेळीं पूर्वीसारखा स्वयंसेवकांचा बंदोबस्त करावा लागला नाही. राष्ट्रीय स्वयंसेवकाच्या संघानं मोहल्ल्या मोहल्ल्यांतून हें काम केलं. मि. लिली डीस्ट्रक्ट म्याजिस्ट्रेट व मि. स्मिथ (पूर्वीचे डी. एस. पी.) इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस ह्यांनी वेळ न दवडतां एकदम गोऱ्या सैनिकांची तुकडी बोलावली. मिलिटरी इतक्या लवकर

बोलविण्याला कारणही तसंच झालं होतं. ह्या दंग्याचे वेळीं मुसलमान दंगेखोरांनी ठिकठिकाणीं हिंदुवर गोळीबार केला होता. हिंदुसभेला हिंदुवर सरकारनं केलेल्या फौजदारी मुकर्दम्यांतील त्यांच्या बचावाशिवाय दुसरं कोणताहि काम करावं लागलं नाही. हिंदुसभेनं एक समिती नेमली. तिचं अध्यक्ष मला केलं व मला साह्य करण्याकरितां कांही वकील मंडळी ह्या समितीवर नेमली.

## वादळानंतरची शांतता

नागपूरांत ह्या १९२३ च्या व १९२७ च्या जातीय दंग्यानंतर शांतता नांदूं लागली व ती तशीच कायम रहावी ही सर्वांची – हिंदुमुसलमानांची – इच्छा असणं साहजिक आहे. अनुभवानं दोन्हीही धर्मांतील लोकांना शहाणपण आलं असलं पाहिजे असं मी समजतों. दोन्हीही समाजानं एकमेकांकडे आदरानं पहाणं, खेळीमेळीनं राहणं आवश्यक आहे. परस्परांचं हित असंच वागण्यांत आहे हें दिसून येईल.

हिंदुमुसलमानांत १९२७ नंतर नागपूरांत दंगे कां झाले नाहीत ह्याला कारण तसंच आहे. दोन्ही जमातींतील – हिंदुमुसलमान जमातींतील – सर्व मामुली लोकांना समजून आलं कीं नागपूरांत दोन्ही समाज – हिंदुमुसलमान – बरोबरीचे आहेत. तेव्हा इतर प्रांताप्रमाणे ह्या गावांत मुसलमानांना दंगल माजवून कांहीही फायदा होणार नाही. नागपूर कांही कोहाट नव्हे, साहारनपुरही नव्हे हें त्याना समजून आलं. त्यांना हेंहि समजून आलं कीं आर्थिक दृष्ट्या नुकसान होत त्यांचं. दोन्ही समाजाच्या वरील थरांतील माणसांना विशेष आच पोचत नाही. फौजदारी कोर्टांत मुकर्दमे होऊन जेलांत जावं लागतं त्यांना – श्रीमंत लोकांना किंवा मौलाना, मौलवी किंवा पुजारी लोकांना नाही. जातीय वादामुळे जर कोणाचा फायदा होत असेल तर असेंबली निवडणुकीस उभे राहिलेल्या व निवडून आलेल्या उमेदवारांचा व त्यांतल्या त्यांत अधिकस्य अधिकं फलं ह्या म्हणीप्रमाणं जे मिनिस्टर्स झाले त्यांचा. म्हणजे प्रत्येक जमातींतील दोन तीन महत्वाकांक्षी पुढारी व्यक्तींचा.

प्रत्येक प्रांतांत त्या प्रांताची परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनं शांततेचं वातावरण असणं जरूर आहे हें माझ्या प्रमाणं प्रत्येक सद्‌भावनेच्या नागरिकाला वाटेल. मोठमोठे कारखाने चालण्याकरिता, व्यापार सुरळीत चालण्याकरिता व प्रांताची भरभराट होण्याकरितां शांततेचं वातावरण असणं अवश्य आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याचा धंदा चालविण्याला असलेल्या संपत्तीचा उपभोग घेण्याला भीतिचं वातावरण नसलं पाहिजे व म्हणून एकत्र येणाऱ्या भिन्न भिन्न समाजांत व जातीजातींत समजूतदारपणा पाहिजे. समाजाच्या व सरकारच्याही दृष्टीनं प्रांतांत शांतता नांदणें आवश्यक आहे, जातीय वादास मूठमाती मिळणं जरूर आहे ही गोष्ट ह्या मंजुषेंतील घटनांवरून स्पष्ट झाली असली पाहिजे. जाती जातींतल्या धर्माधर्मातल्या माणसांत लढा लाऊन फोडा व झोडा ह्या नीतीस अनुसरून राज्य करणें सोपे आहे. ही एक परकीय सरकारची – पाहिजे तर कोणत्याही सरकारची म्हणा राजनीति आहे. पण दंग्यांच्या दिवसांन जिथे मिलिटरी आणण्यापर्यंत पाळी येते व सार्वजनिक जीवन विस्कळीत होतें ती परिस्थिती मोठी स्पृहणीय आहे असं नाही.

**समाज एकमेकांकडे आदरानं केव्हा पाहतील.**

दोन्ही समाज एकमेकाशीं छटून न राहतां खांद्याशीं खादां भिडवून जर व्यवहारांतील काम करावयास लागतील तर त्यांत समाजाचं हित आहे. आणि हें अस घडून येण्याकरितां मनाचा मोकळेपणा आवश्यक आहे. तो एकमेकांकडे आदरानं पहाण्यानंच उत्पन्न होणार आहे. व तसं तें घडून येण्याला प्रत्येक समाज सामर्थ्यवान बनला पाहिजे. सामर्थ्यच आदर उत्पन्न करूं शकतं. मात्र थोड्या व्यक्ति शक्तीने, बुद्धीनं खूप संपन्न झाल्या म्हणजे समाज सामर्थ्यवान झाला अशी भूल करून घेऊं नका. समाजांतील असंख्य लोकांची तनमनधनाची पातळी जेव्हा यथायोग्य वर चढेल तेव्हाच तो समाज सामर्थ्यवान झाला असं म्हणतां येईल व दुसऱ्या समाजांना आपल्याला आदरानं वागवावयाला लावील.

## हिंदुसभेशीं माझा संबंध तुटला

प्रांतांत १९२७ सालांत शांतता स्थापन झाल्यावर हिंदुसभेचं काम रडत खडत चाललं होतं. क्वचित एखादी शुद्धि, क्वचित एखादी निषेध प्रदर्शन करायला बोलावलेली सभा. १९३५ सालीं कांग्रेसने कोणत्याही कांग्रेसवाल्याने हिंदुसभा किंवा मुसलीम लीगचा सभासद राहूं नये असा ठराव केल्यानंतर माझा हिंदुसभेशीं संबंध तुटला. हिंदुसभाही नंतर राजकारण खेळणारी संस्था बनली. तिचा उद्देश व तिचा कार्यक्रम ह्यांचा संबंध सर्वस्वीं राजकारणाशीं येऊं लागला. ह्या बाबतींत कांग्रेस व हिंदुसभा ह्यांचा परस्पराशीं विरोध होता. मी १९२७ पासून इतर सामाजिक व कांग्रेसच्या चळवळींत भाग, मोठ्या प्रमाणांवर, घेऊं लागलों.

# लोहपुरुष

### वटवृक्ष

वटवृक्ष हा सर्वांच्या परिचयाचा आहे. वडाचं झाड नाही असं गांव नाही; असा डोंगर नाही; असं मैदान नाही. सर्वच ठिकाणीं वड सापडेल. वडाच्या झाडाचा मनुष्याला, किंवा कोणत्याही प्राण्याला उन्हाच्या तापापासून आपलं संरक्षण करतां येतं हा मोठा उपयोग व म्हणूनच त्याची मातब्बरी. जितकं झाड मोठं त्याचा विस्तार मोठा तितका त्याच्यापासून फायदा. एकाच वेळेस कितीतरी प्राणी जनावर किंवा माणसं – निरनिराळ्या जातींचे – उन्हाळ्याच्या दिवसांत दुपारच्या तीव्र तापापासून बचाव करण्याकरितां वडाच्या आश्रयास येतात व तो त्या सर्वांना सारखा मिळतो.

अगदी थेट वडाच्या झाडा बरहुकूम ह्या नागपुरांत एक संस्था गाजावाजा न करतां जन्मास आली, हळूहळू कोणाच्याही डोळ्यांत भरणार नाही अशा रीतीनं वाढीस लागली व तिनं नागपुरांत चांगलं मूळ धरल्यावर तिच्या शाखा व पारंब्या दूरवर पसरल्या व त्यांनी एकमेकांस मजबूत करण्यास मदत केली. तिनं कितीतरी पोळल्या जाणाऱ्या मानवांना आश्रय दिला व त्यांच्या मनाला शांति उत्पन्न करून दिली. समाजाच्या संरक्षणाचं काम केलं. ह्या संस्थेचा इतिहास देण्यापूर्वी ज्या विद्युत शक्तिनं भारलेल्या लोहपुरुषानं हें अचाट कार्य घडवून आणलं त्याची माहिती देणं जरूर आहे.

### 'वंदेमातरम्'चा उडचलेला वार

सन १९०७ सालीं निल सिटी स्कूलचे कै. जनार्दन ओक हे हेडमास्तर होते. रिस्ले सरक्युलरचा अम्मल जारी झाला होता. शाळेच्या म्याट्रीकच्या 'ए' सेकशनमध्ये दामुअण्णा, माझा सर्वांत धाकटा भाऊ व श्री. हेडगेवार (डां. हेडगेवार) हे सहाध्यायी होते. सप्तेंबरचा महिना. इन्स्पेक्टर शाळा

पाहण्यास येणार असा विद्यार्थ्यांना इशारा देण्यांत आला होता. हेडगेवार यांनी म्याट्रीकच्या सर्व सेकशनमधून इन्स्पेक्टरांना 'वंदेमातरम्'ची सलामी देण्याची आगाऊ तयारी करून ठेवली. ठरल्याप्रमाणे इन्स्पेक्टर साहेब शाळा पाहण्यास आले. ठरविल्याप्रमाणेच प्रत्येक सेकशनमधे त्याना 'वंदेमातरम्'ची



डॉ. हेडगेवार

गरमा गरम सलामी मिलाली. साहेब बहादुर घुस्श्यांत येऊन निघून गेले. ह्या विद्यार्थ्यांना त्यांच्या ह्या वर्तनाचा परिणाम जर भोंवला नाही तर इन्स्पेक्टर साहेबाचा बाेज तो काय राहिला ! ते इन्स्पेक्टर कसले !! शाळेच्या कार्यकारी मंडळाच्या कानावर विद्यार्थ्यांच्या वागणूकीच्या तक्रारी घालण्यांत आल्या. विद्यार्थ्यांना दंडाच्या व शाळेबाहेर हाकून देण्याच्या धमक्या देण्यांत आल्या. पण हा सगळा बार फुकट गेला. विद्यार्थी नरमले नाहीत. शरण गेले नाहीत. त्यांनीही शाळेंत न जाण्याचें ठरविलें. अखेरीस, कार्यकारी मंडळ व विद्यार्थी यांच्यांत तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. तडजोडीचा मसुदा

ठरला. " विद्यार्थ्यांनी झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी प्रदर्शित करावी. माफी मागावी लागणार नाही. शाळेंत यावें." सर्व विद्यार्थी–फक्त एक खेरीज करून–ह्या गोष्टीस कबूल झाले. कबूल झाले नाहीत हेडगेवारच ! त्यांनी नागपूर सोडले. ते यवतमाळला गेले व तिथे राष्ट्रीय शाळेंत आपलं नाव घातलं. ती शाळा सरकारच्या रोषाला बळी पडली. शाळा बंद झाली. हेडगेवार नंतर पुणें येथील राष्ट्रीय शाळेंत दाखल झाले व तिथल्या शाळेची म्याट्रीकची परीक्षा पास केली. नागपूरला येऊन त्यांनी खासगी शाळेंत शिक्षकाची नोकरी धरली. कै. जयकृष्णपंत उपाध्ये (कवि)– हे आमचे घराशेजारींच रहात असत– त्यांनी एक " शिवराज समाज " काढला होता. त्या समाजाच्या सभांना हेडगेवार नेहमी हजर रहात. ह्या समाजाचे क्रांतीवीर खानखोजे (मेक्सिको) हेही एक सभासद होते.

## कलकत्त्यांत हेडगेवार व क्रांतिकारकांच्या भेटीगाठी

डॉ. हेडगेवार १९१० सालीं कलकत्त्याच्या न्याशनल मेडीकल कालेज–मधे वैद्यकीचा अभ्यास करण्याकरतां गेले. ह्याच वेळेस मूर्तिजापूरचे श्री. शंकरराव नाईक व आर्वीचे डॉ. मोहरीर हेही त्याच मेडीकल कालेजमधे शिकत होते. डॉ. हेडगेवार व डॉ. शंकरराव नाईक हे दोघेही कन्हैयालाल धुरलेन–मधील ' शांति निवास ' ह्या घरीं एकाच खोलींत रहात असत. ह्या दोघांना दामुअण्णा, आमचा लहान भाऊ १९११ सालीं जाऊन मिळाला. जाण्याला कारण असं झालं. आमच्या वडीलानं, तात्याजीनं असं ठरवलं की दामुअण्णाला जपानमधे एखादा लहानसा उद्योगधंदा शिकण्यास पाठवावं, पण त्यापूर्वी त्याला थोडं उद्योगधंद्याचं शिक्षण घेण्याकरितां कलकत्त्यास धाडावं. सेन नावाचे एक गृहस्थ सेरामपूर मिल्समधे म्यानेजर होते. त्या सेनची व डॉ. गोपाळरावची–आमच्या बंधुची–विलायतची ओळख. तिथे तशी शिकण्याची सोय म्हणून दामुअण्णांना कलकत्त्यास पाठवण्यांत आलं. दामुअण्णा कलकत्त्यास गेल्यानंतर डॉ. हेडगेवार व डॉ. नाईक–आमचे नातेवाईक–ह्यांच्या बरोबरच ' शांति निवास ' मधे राहूं लागला.

## बाँबच्या स्फोटानंतरचे दिवस

बंगाली क्रांतिकारक ह्या तरुण मंडळीच्या भेटीस येत. घर गल्लींत व

उजेड जेमतेमच. जुन्या काळचे दिवे व जुन्या काळचीच म्युनसिपालिटीची राजवट. तेव्हा 'शांति निवास' मधे येऊन डॉ. हेडगेवाराना भेटणं ह्या क्रांतिकारकांना कठिण गेलं नाही. ह्याना भेटणाऱ्यांत बाबु बिपिनचंद्रपाल, जपानांत स्थायिक झालेले राशबिहारी बोस, भट्टाचार्य, शामसुंदर चक्रवर्ती व युगांतर आफीसमधाल तरुण कार्यकर्ते प्रमुखपणे असत. दामुअण्णा व डॉ. नाईक ह्यांनी डॉ. हेडगेवाराच्या सांगण्यावरुन ह्या क्रांतीकारक मंडळींना आर्थिक मदत करावी. डॉ. हेडगेवार व डॉ. नाईक ह्या दोघांनीही बंगाली भाषेचं बरंच ज्ञान मिळवलं.

## डॉक्टर हेडगेवार सार्वजनिक कामांत व राष्ट्रीय चळवळींत भाग घेऊं लागले

डॉक्टर हेडगेवार आपला शिक्षणक्रम संपवून नागपूरास आल्यानंतर डॉ. मुंजे यांचेकडे येऊं जाऊं लागेल. राष्ट्रीय मंडळाच्या सभांनाही अधून मधून ते हजर राहत, पण त्या मंडळाचे ते सभासद नव्हते. १९१६-१७ सालीं त्यांनी होमरूलच्या चळवळीवर बरींच व्याख्यानं दिलीं. सन १९२० सालीं नागपूरच्या असहकारितेच्या कांग्रेसच्या वेळीं त्यांनी स्वयंसेवकांचा एक आफीसर ह्या नात्यानं डॉ. परांजप्यांच्या हाताखाली काम केलं. डॉ. हेडगेवार ह्यांज बरोबरच कै. नारायणराव पढंरपुरकर वकील, कै. अण्णा खोत - नागपूर व्यायाम शाळेचे सेक्रेटरी- व दामुअण्णा आफीसर्स म्हणून काम करीत होते. दामुअण्णाला स्वयंसेवकांच्या आफीसरचं काम कांही नवीन नव्हतं. सन १९१६ सालीं सय्यद हुसेन इमाम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मुंबईच्या स्पेशीयल कांग्रेसच्या वेळेस त्यांनी 'न्याशनल व्हालंटीयर कोर' मधे आफीसरचं काम केलं होत.

## जेलची यात्रा

डॉ. हेडगेवार ह्यांनी नागपूरच्या 'असहकारितेच्या कांग्रेसनंतर' कांग्रेसच्या असहकारितेच्या कार्यक्रमाचा प्रचार करण्यास सुरवात केली. विद्यार्थ्यांनी सरकारी शाळा व कालेजे ह्यांवर बहिष्कार टाकावा म्हणून जी चळवळ नागपूरांत करण्यांत आली तींत डॉक्टरांनी भाग घेतला. इतर कार्यक्रम अमलांत यावा म्हणून बाहेरगांवीं प्रचार करण्यास सुरवात केली. त्यांची

भाषणं फार कडक होत. सरकारनं त्यांचा तो प्रचार बंद पाडण्याकरितां क्रि. प्रो. कोडच्या १०८ कलमाखाली जमानत देण्यासंबंधी कारवाई केली. डॉक्टरनीं त्या मुकर्दम्यांत बचाव न करता, जमानत न देतां तुरुंगवास पत्करला. तुरुंगांतून सुटून आल्यानंतर १९२२ चे फेब्रुवारी महिन्यांत भंडारा जिल्हा शेतकरी परिषद तिरोडा येथे माझ्या अध्यक्षतेखाली भरणार होती तिला हजर राहिले. तो काल गरमागरमीचा होता व परिषदेंत भाग घेणाऱ्यांना सरकार तुरुंगांत टाकणार आहे अशी बोलवा होती. आणि अशी ही बोलवा होती म्हणून तर ते आपल्या वडील बंधुसह त्या परिषदेस हजर राहिले. बारडोलीचा सत्याग्रह ह्याच आठवड्यांत व्हावयाचा होता. कांही महिन्यापूर्वी राजद्रोही भाषण केल्याबद्दल जेलची यात्रा केलीच होती. आता भाषण करून जेलची दुसरी वारी होणार होती. 'काळ आला होता वेळ यावयाची होती.' जेलमधे जाण्याची वेळ आली नव्हती म्हणूनच तिथे आलेले डीस्ट्रीक्ट म्याजिस्ट्रेट व डीस्ट्रीक्ट सुपरिंटेंडेंट आफ पोलीस – दोघेही युरोपीयनच – भंडाऱ्याला कांही गडबड होणार आहे याचा संशय आल्यावरुन तरोड्यावरुन एकाएकीं निघून गेले.

श्री. हेडगेवार ह्यांनी राजकारणांत लक्ष घातलं तरी ते हिंदु समाजाला विसरले नव्हते. अगदी सुरवातीला त्यांचा संबंध आला 'अनाथ विद्यार्थी गृह' ह्या संस्थेशीं. ही संस्था १९२२ सालीं गणेश चतुर्थीचे मुहूर्तावर कै. गंगाधरराव चिटणीस ह्यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यांत आली. तेव्हापासून दामुअण्णा देशमुख संस्थेचे सेक्रेटरी आहेत. ह्या संस्थेचे उत्साही व कार्यतत्पर सुपरिंटेंडेंट गोविंदराव चोळकर व डॉ. हेडगेवार ह्या दोघां ब्रम्हचाऱ्यांनी ती संस्था नांवा-रूपास आणण्यास खूप मेहनेत घेतली. डॉ. हेडगेवार मरेपावेतो अनाथ विद्यार्थी गृहाच्या व्यवस्थापक कमिटीचे सभासद होते. 'अनाथ विद्यार्थी गृह' केवळ अनाथ विद्यार्थ्यांकरितांच राहिलं नाही तर त्या संस्थेने हिंदुंच्या अनाथ मुलांचा (आरफन्सचा) सांभाळ करणेंही अंगावर घेतलं. हिंदु आर्फनेजच्या अभावीं हिंदुचीं अनाथ मुलें मुसलमान किंवा ख्रिश्चन मिशनरींच्या हातांत सापडतांत. असल्या मुलांचे वाली तेच! एवढा मोठा हिंदु समाज ना! पण त्याला आपल्या धर्मांतल्या अनाथ मुलांची काळजी तितपतच!! तरी बरं ह्या हिंदु समाजांत मुसलमान समाजापेक्षा श्रीमंत माणसं जास्त आहेत!!! पण नाही सार्वजनिक

हिताची कळकळ (public spirit) समष्टिपेक्षा स्वतःच्याच हिताची, चैनीची कळकळ. हिंदु समाजाबद्दल वृथाभिमान दाखवणारे बोलघेवडेच पुष्कळ. झीज सोसणारे लाखांत एक !

अनाथ विद्यार्थ्यांची पोषणाचीच तेवढी जबाबदारी घेऊन भागणं शक्य नव्हतं. त्यांच्या शिक्षणाचीही सोय पाहणं भाग होतं. ह्या कामांत मुंबईचे माझे बधुं ( डॉ. गोपाळराव देशमुख ) ह्यांनी बरीच मदत केली. त्यांनी तात्याजीचे म्हणजे वडीलांचे स्मरणार्थ " विनायकराव देशमुख हायस्कूल " ही मोठी इमारत बांधून दिली. मुलांच्या राहण्याची, शिक्षणाची व देखरेख ठेवण्याची सोय झाल्यामुळे पोलिस, भटकणाऱ्या हिंदु मुलाला इथल्या अनाथालयांत घेऊन येत. देखरेख गोविंदराव चोळकर सुपरिंटेंडेंट ह्यांची असे. ह्या अनाथालयांत स्पृश्यास्पृश्य भेदभाव नाही. सर्वांना एकाच संस्कृतीचं शिक्षण मिळतं. हिंदुस्थानांतील लहान मोठ्या पुढाऱ्यांनी ह्या अनाथालयास व त्यास जोडून काढलेल्या शाळेस भेटी दिल्या. भेटी देणाऱ्यांत महात्मा गांधी, सर शंकरन् नायर, पंडीत मदन मोहन मालवीय, पंडीत जवाहरलाल नेहरू, लाला लजपतराय हे भारतीय पुढारी होते. अशा रीतीने डॉ. हेडगेवारांच्या हळूहळू भारतीय पुढाऱ्यांशीं ओळखी होत गेल्या. समाजसेवा करणारी उत्तम संस्था असाच शेरा कांही युरोपियन अधिकाऱ्यांनीही दिला.

डॉ. हेडगेवार ह्यांनी अशा रीतिनं हळूहळू राजकीय व सामजिक उपयुक्त चळवळींत बराच भाग घेतला व त्याना प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या व्यक्तीला ज्या अडचणी येतात त्यांचा व त्या नाहीशा करण्याचा बराच अनुभव आला. ह्या अनुभवाचा फायदा त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काढण्याच्या वेळेस मिळाला. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काढण्यास हिंदु समाजांतील जो कमजोरपणा कारण झाला तो त्यांच्या नजरेस विशेष ठळकपणे येण्यास कांही विशेष घटना घडावयाच्या होत्या त्या नागपूरांत १९२३ सालीं घडल्या.

## पंडीत मालवीयजींची हृदयद्रावक हाक

सन १९२३ सालीं सुरवातीसच उत्तर हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं हिंदु-मुसलमानांचे भीषण दंगे होऊं लागले. आगष्टमधला ' साहारानपुर ' येथील दंगा तर फारच भयंकर झाला. ' कोहाट ', साहारानपुर वगैरे ठिकाणीं देवळांची

व गुरुद्वारांची नासधूस करण्यांत आली. गीता जाळली, ग्रंथ साहेब जाळला. हिंदुंची मालमत्ता लुटण्यात आली, बाया पळविण्यांत आल्या. ह्या सालीं हिंदु-महासभेच्या अधिवेशनांत वर उल्लेख केलेल्या दंग्यात हिंदुवर, त्यांच्या देवळांवर, त्यांच्या बायावर होणाऱ्या हल्लयांचा, जाळपोळ व लुटालुटींचा उल्लेख करून पंडीत मालवीयजींनी अत्यंत जीव तोडून म्हटलं "हिंदुंनी एक जबरदस्त व प्रभावशाली संघटन बनवलं पाहिजे. इंग्रज बाईच्या केसाला जर कोणी धक्का लावतो म्हटलं तर सरकारची सर्व शक्ति त्या बाईच्या पाठीमागे प्रतिकार करायला सज्ज आहे. मुसलमान बाईचा अपमान वा विनयभंग एखाद्यानं केला तर संबंध मुसलमान समाज एकवटून प्रतिकार करतो, बंडाळी करतो व आपल्या स्त्रियांचं संरक्षण करतो. पण हिंदु समाज सुसंघटित नाहीं. मुसलमान समाजांतील बेजबाबदार गुंडांना जर असा अनुभव आला की ठोशास ठोसा लगावणारा असा हिंदु समाज बनलेला आहे तर ह्या गुंडांचे सर्व चाळे बंद पडतील. हिंदुंच्या देवळावर व स्त्रियांवर हल्ले करण्याची हिम्मत होणार नाही." पंडतजींच्या या दु:खित अंत:करणाच्या हाकेस ओ दिला डॉ. हेडगेवारांनीं राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काढून. ज्या घटना उत्तर हिंदुस्थानांत साहारानपुर वगैरे ठिकाणीं झाल्या त्या लहान प्रमाणावर नागपुरांत १९२३ सालाचे सप्तेंबरांत घडल्या व मग लोकांचे डोळे खाडकन उघडले. त्या महिन्यांत नागपुरांत हिंदुमुसलमानांत तेढ उत्पन्न झाली. ती उत्पन्न होण्यास झालेली कारणं, तिनं वेळोवेळीं धारण केलेले उग्र स्वरूप, नंतर दंगा, दंग्याच्या वेळची व्यवस्था व स्वयंसेवकांच्या आफीसांत उदारामजीच्या घरीं मी एका प्रतिष्ठित गृहस्थाला स्वसंसेवक देण्याचं नाकारलं त्या संबंधीचा खुलासा ह्या सर्व गोष्टी ह्याच करण्डकांत ४ थ्या मंजूषेंत सांगितलेल्या आहेत.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन झाला त्यावेळची परिस्थिती, त्यावेळचें वातावरण लक्षांत आणा. हिंदुस्थानांत हिंदुमुसलमानांचे दंगे, हिंदु समाजाचं संरक्षण करण्याकरितां हिंदु समाजाची प्रभावी घटना करा अशी हिंदु पुढाऱ्यांची हाक. नागपुरांत मुसलमानांचें हिंदुच्या धार्मिक हक्कांवर अन्यायी आक्रमण. नागपुरांत शिवराम गुरुच्या आखाड्याचा शेजारचा भाग वगळल्यास शांतता

ठेवण्याकरिता नागपुरांतील बहुतेक मोहोल्यांत अशिक्षित अडाणी आखाडेवाल्याकडूनच संरक्षण. ह्या गोष्टी डाक्टर साहेबांनी लक्षांत घेतल्या. स्वतःचं संरक्षण करणं ज्यांना अशक्य आहे अशांना संरक्षण देणं हें मानवतेचं लक्षण आहे असं जाणून व हें एखादी प्रभावी स्वयंसेवकांची संघटना काढल्यावाचून शक्य नाही असं जाणून राष्ट्रीय स्वयंसेवकांचा संघ स्थापन करण्याचा त्यांनी चंग बांधला. हिंदुवरच अत्याचार होत तेव्हा त्यानाच संरक्षणक्षम करणं जरूर होतं. त्यांचीच संघटना करणं आवश्यक होतं. त्यानाच त्यांचें व समाजाचें संरक्षण करण्याचें काम शिकवावयाचं होतं. आगळीक करणारे मुसलमान सुसंघटित, त्यांच्या सामाजिक संस्थाही फक्त त्यांच्याच करितां, राजकीय दृष्ट्याही ते इतरांपासून अलगच-मुसलमानांचा मतदार गट निराळा व मुसलमानेतर ( हिंदु, ख्रिश्चन, पार्शी, युरोपियन ) मतदारांचा गट निराळा तेव्हा हिंदुच तेवढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघांत कां व मुसलमान कां नाही ह्या बद्दल आश्चर्य वा उजर करण्यांत अर्थ नाही.

## रा. स्व. संघ व हिंदुसभा ह्यांचा संबंध नाही

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा व हिंदुसभेचा मुळीच संबंध नव्हता. एखादी व्यक्ति व्यक्ति ह्या नात्याने दोन्हींकडे काम करीत असेल पण म्हणून दोन्ही संस्था एकच आहेत असं मानणं रास्त नाही. एखाद्या संस्थेची एखादी व्यक्ति किंवा एकाहून जास्तही व्यक्ति दुसऱ्या संस्थेंत भाग घेते किंवा घेतात म्हणून दोन्ही संस्था एकच असं समजण्याचा मूर्खपणा शहाणे माणसं करणार नाहीत असं वाटतं. वकील लोकांच्या कांही मंडळींनी व्यायाम शाळांशीं संबंध ठेवला म्हणून बार असोशिएशन व व्यायाम शाळा ह्या दोन्ही संस्था एकच नाहीत. डॉ. हेडगेवार ह्यांनी स्वतंत्र रीतीने, व्यक्तिशः हिंदु सभेंत भाग घेतला किंवा आणखीही जणांनी व्यक्तिशः भाग घेतला तर त्या दोन्ही संस्था एकच असं समजणं शहाणपणाचं होणार नाही. मी स्वतः नागपूर व्यायाम शाळेचा अध्यक्ष, कांग्रेसचा सभासद, असहकारितेच्या काळांत बॉयस्काऊटशीं संबंध असलेला, हिंदुसभेंत १९२७ पर्यंत सक्रिय भाग घेणारा व नंतर ही १९३५ पर्यंत हिंदुसभेशीं संबंध ठेवणारा तसंच १९३५ पर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशीं संबंध ठेवणारा पण कोणीही – सरकारनं किंवा कांग्रेस –

संस्थांनी – ह्या सर्व संस्था एकच असं कधी म्हटलं नाही. सर्वांत ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे असहकारितेच्या काळांतही श्री. व्हीव्हीयन बोस ह्यांनी माझ्यासारख्या सरकारशीं असहकारिता करणाऱ्याची स्काऊट चळवळीची वाढ करण्यांत मदत घेतली ता. ह्या पासून आपल्या मंडळीला धडा घेतां येणार नाही कां? बॉयस्काऊट ह्या संस्थेशीं तर गव्हरनर व इतर युरोपियन सरकारी अधिकारी ह्यांचाही, ती चळवळ नागपूरांत निघाल्यापासून संबंध असे. तरी त्यांनी तारतम्य ठेवलें. दोन्हा संस्था कांग्रेस व बॉयस्काऊट निरनिराळ्या असंच मानलं व बॉयस्काऊट चळवळींत माझी मदत घेण्यास त्यांनी श्री. बोस यांना आडकाठी केली नाही. आमच्या मंडळाला तेवढेंही तारतम्य असूं नये!

प्रत्येक संस्थेचं ध्येय निराळं, कार्यक्रम निराळा, प्रचार कार्य करण्याची पद्धत निराळी. कार्यकारिणी निराळी. मग ह्या सर्व संस्था, एखादा मनुष्य ह्या पैकी अनेक किंवा सर्वच संस्थांचा सभासद म्हणून, एकच कशा? राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं ध्येय, प्रचार कार्य व कार्यकारी मंडळ हे हिंदुसभेच्या ध्येयापेक्षा निराळं व कार्यकारी मंडळही निराळं. हिंदुसभेचं ध्येय हिंदुसमाजांत सामाजिक सुधारणा, हिंदु धार्मिक चालीरीतींत आवश्यक त्या सुधारणा घडवून आणून हिंदुसमाज सुसंघटित करणं. बालविवाह बंद, विधवांच्या विवाहावरील बंदी उठवणं, अस्पृश्यता निवारण, शुद्धि – पतित परावर्तन वगैरे. उलट राष्ट्रीय स्वयंसेवक संघानं हिंदुसमाजांतील तरुणांना जातिभेदाची तमा न बाळगतां एका ठिकाणीं आणून सशक्त, स्वसंरक्षणक्षम व हिंदु समाजाचं इतर आक्रमिक समाजापासून रक्षण करणं व संस्कृतिचं रक्षण करणं हें आपलं ध्येय ठेवलं. ह्या दोन्ही संस्था म्हणजे हिंदुसभा व रा. स्व. सं. वेगवेगळ्या होत्या म्हणूनच हिंदुसभेला आपलं स्वतत्र स्वयंसेवक पथक ' रामसेवक ' काढावं लागलं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा हिंदुसभेचा एखादा तिजवर अवलंबून असलेला किंवा तिच्या तंत्रानं चालणारा संघ नव्हता. राष्ट्रीय स्वसंसेवक संघ हिंदुसभेला मदत करीत नाही ह्या बद्दल खुद्द डॉ. मुंजे ह्यांनीच १९३४ सालीं माझे जवळ तक्रार केली. डॉ. मुंजे ह्यांनी संघाविरुद्ध केलेल्या ह्याच तक्रारी संबंधी मी सन १९४५-४६ सालीं सिमला येथे अशुतोष लाहिरी चौधरी – महासभेचे

चिटणीस – ह्यांचे जवळ उल्लेख केला व त्यांनी म्हणजे संघवाल्यांनी आपल्या ध्येयाशिवाय व कार्यक्रमाशिवाय इतर संस्थेच्या ध्येयाशीं व कार्यक्रमाशीं संबंध न ठेवण्यांतच त्यांचं हित आहे असं मी म्हणालों. ज्या प्रमाणे एखाद्या बाबतींत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वसंसेवकानं दुसऱ्या संस्थेच्या एखाद्या कार्यक्रमांत भाग घेणं किंवा सहमत होणं म्हणजे आपलं स्वत्व गमावणं नव्हे त्याच प्रमाणं डॉ. हेडगेवारानं १९३० च्या प्रां. कांग्रेसनं सुरू केलेल्या जंगल सत्याग्रहांत डॉ. मुंजाबरोबर भाग घेणं म्हणजे दोन्ही संस्था हिंदुसभा व रा. स्व. सं. एक नव्हेत व कांग्रेस व रा. स्व. सं. एक नव्हेत. डॉ. हेडगेवारांनी निरनिराळ्या संस्थांशीं संबंध ठेवल्यामुळे त्याना संस्था चालविण्याचा बराचसा अनुभव येत गेला व मोठ मोठ्या माणसांच्या – भारतीय पुढाऱ्यांचाही – सहवासाचा लाभ होत गेला. ह्या दोन्ही गोष्टींचा त्यांनी रा. स्व. संघाची घटना मजबूत करण्यांत व संघाच्या शाखा ठिक ठिकाणीं वाढविण्यांत करून घेतला.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बीजारोपणाला अनुकूल भूमि

रा. स्व. संघाचं बीजारोपण होण्याला वातावरण जसं अनुकूल, संस्थापक जसा अनुभविक व कार्यकुशल तशाच इतर गोष्टीही अनुकूल. ज्या मोहोल्ल्यांत संघ सुरू झाला त्या मोहोल्ल्यांत शिवराम गुरूचा आखाडा म्हणजे सुशिक्षित वर्गही ज्या आखाड्यांत जात होता तो. जवळच नागपूर व्यायाम शाळा. जिथे सुशिक्षित विद्यार्थ्यांना व गृहस्थांना कुस्ती, लाठी काठीचं व मैदानी खेळांचं शिक्षण देण्यांत येत होतं ती शाळा. तेव्हा संघाला रंगरूट मिळायला वेळ लागला नाही. भिक्षुक मंडळी, नोकर, पेशावाले गृहस्थ, तरुण व वृद्ध, मोहते यांच्या पडक्या वाड्यांत लाठी काठीचें शिक्षण सायंकाळीं घेऊं लागले. त्या वेळेला लाठीकाठीचे संघाचे शिक्षक श्री. अण्णा सोनी हे होते. हेच गृहस्थ नागपूर व्यायाम शाळेंत संघ निघण्यापूर्वी शिक्षक होते.

संघाच्या सुरवातीला संघांत शिकणाऱ्यांचा पोषाखही विचित्र व गमतीदार असे. कोणी धोतराचा पचांग मारलेला तरुण व डोक्यावर कांहीही शिरस्त्राण नसलेले, तर कोणी रेशीमकाठी धोतर नेसलेले व डोक्याला रेशीम काठी उपरण बांधलेले वृद्ध तर कोणी खादीचं धोतर नेसलेले व गांधी टोपी घातलेले. असा हा उत्साही माणसांचा मेळावा होता. एक दीड वर्षानंतर

संघांत युनिफार्म आला पण ब्यांड नव्हता. तेव्हा डाक्टरांना मी म्हणालों " डाक्टर, संघाचा मार्च उठावदार व्हावा म्हणून ब्यांड राहील तर बरं होईल. संघाच्या स्वयंसेवकांना चालतांना रूबाबदार ऐट ठेवण्यांत मन सहज लागून जाईल. त्याना ऐटीनं चालण्यांत अभिमान वाटेल. " डाक्टर म्हणाले "ब्याडं आहे खर्चाचं काम ते जमावं कसं. पाहूं या कांही दिवसांना. पण समजा ब्यांडचं साहित्य जमवलं तर शिकवणाराही पाहिजेना. तोहा धुंडाळावा लागणार." मी म्हणालों, " ब्यांडचं जमल की शिक्षकाची व्यवस्था मी करून देतों. "

## व्हीव्हीयन बोस ह्यांची मदत

डॉ. हेडगेवारांनी कांही महिन्यांनी मला कळवलं, " आम्ही ब्यांडचं सामान जमवलं. तुम्ही शिक्षकाची जबाबदारी घेतली होती तर ती आता पार पाडून आपला शब्द खरा करायला पाहिजे. " मी ' बरं ' म्हटल्यानंतर त्यांना मार्तंडराव जोग ह्यांना माझ्याकडे पाठवलं. मी त्यांना श्री. व्हीव्हीयन बोस बॅरिस्टर ( आता हायकोर्ट जज ) ह्यांच्याकडे घेऊन गेलों. ते ' गनर ' ( Gunner ) होते हे मला पहिल्या लढाईच्या वेळींच १९१५ सालीं त्याना लढाईवर जाण्याचा प्रसंग आला त्यावेळीं त्यांच्याकडून कळलं होतं व नंतरही ते सीताबरडींच्या किल्ल्यावर जात. ते मला मदत करतील अशी माझी खात्री होती. श्री. व्हीव्हीयन बोस व मी दोघेही ज्युडीशीयल कमीश्नरच्या कोर्टांत एकाच वेळीं प्रयाक्टीस करीत होतों. त्यांनी हितवादच्या संपादकावर अब्रुनुकसानीची फिर्याद केली त्यावेळीं मी त्यांचेतर्फे काम चालविलें होतें. त्यांना मी स्यामन साहेबाची लीग आफ आनर थंडी करण्यांत व बॉयस्काऊटच्या चळवळीला चालना देण्यांत मदत केली होती. शिवाय श्री. बोस हे मनानं सरळ व तरुणांच्या संस्था, शिस्त व चारित्र्य बनविणाऱ्या, निघाव्या अशा विचाराचे. तेव्हा ते मला एखादा शिक्षक देण्याची व्यवस्था करतील, नाही म्हणणार नाहीत अशी खात्री होती. मी त्याना एक ब्यांड शिकवणारा शिक्षक आम्हाला पाहिजे असं म्हणालों व त्यांनीही शिक्षक पाठवून दिला. एक इंडीयन ख्रिश्चन गृहस्थ आला व त्यानं ब्यांडच्या शिक्षकाचं काम केलं.

कांही दिवसांनी मी फिरून आपण होऊनच श्री. बोस यांचेकडे गेलों. मनांत विचार कीं संघाकरितां जर ( Marching Tunes ) संचलन गीताचे

सूर मिळालेत व त्याला अनुसरून एखादं उत्तेजक गाणं बनवतां आलं तर उत्तम होइल. मी त्यांच्याकडे जाऊन माझी कल्पना सांगितली त्यांनी मला मास्टर बर्न्स म्हणून नागपूरला एक प्रसिद्ध पियानिस्ट होता त्याच्याकडे त्यांचा ओळख करून देणारी चिठ्ठी घेऊन जायला सांगितलं. मी कवि आनंदराव टेकाडे यांना घेऊन मास्टर बर्न्सकडे गेलों व ती ओळख चिठ्ठी त्यांना दिली. त्यांनी निरनिराळे Marching Tunes वाजवून दाखविले. पण आमच्या आनंदरावना स्फूर्ति कांही झाला नाही, व चढाईच्या गाण्याचें जमून आलं नाहीं.

## संघाच्या नरडीला नख

संघाच्या बाल्यावस्थेत म्हणजे संघ ३।४ वर्षाचा असेल तेव्हाच त्याला शत्रू उत्पन्न झालेत. आखाडे व व्यायाम शाळा ह्यांना थोड्याच वर्षात संघाच्या वैभवाचा हेवा उत्पन्न झाला व्यायामशाळांचा योग्यता व मान मान्यता आखाड्यापेक्षा जास्त वाढला होती. कारण कीं व्यायाम शाळेंत जाणारी मंडळी सुशिक्षित, व्यायाम शाळेच्या कार्यकारी मंडळांत सुशिक्षित व सार्वजनिक कामांत भाग घेणारे कार्यकर्ते, मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या संस्थेस भेटी, वार्षिक उत्सव ह्या अनेक गोष्टीमुळे व्यायाम शाळांची भरभराट होऊं लागली होती. पण संघ जन्मास येऊन ३।४ वर्षे झालीं असतील नसतील तर व्यायाम शाळांना संघाबद्दल हेवा वाटूं लागला. कारण स्वयंसेवक सुशिक्षित, शिक्षक सुशिक्षित, संघाशी ज्यांचा संबंध तेही वजनदार गृहस्थ व सार्वजनिक कार्यकर्ते. शिवाय स्वयंसेवकांचा तो युनिफार्म, तो ब्यांड व ते मार्चिंग. क्याम्पींगच्या धर्तीवर उन्हाळ्यांतील शिबिर. गुरुपूजेचे व दसऱ्याचे ते भव्य उत्सव. तेव्हा विद्यार्थी संघांत जाऊं लागले व व्यायाम शाळा ओस पडूं लागल्या. नागपूर व्यायाम शाळेच्या शिक्षकांच्याही तक्रारी येऊं लागल्या कीं शाळेंतील मुलं संघांत जातात व इथला संख्या कमी होऊन राहिली. मी म्हणालें "व्यायाम-शाळा शारीरिक शिक्षण देण्याकरितां काढलींना ? कांही पैसं मिळवण्याकरितां काढली नाही. मग विद्यार्थी इथे नाही तिथे गेलेत. तुमचं नुकसान काय झालं ? जिथ मुलांचं मन रमेल तिथेच मुलं जातील. त्याना जाऊं द्या." व्यायाम शाळेच्या तक्रारींकडे मी किंवा डॉ. परांजपे ह्यांनी लक्ष दिलं नाही. नागपूर व्यायाम शाळेंत कांही विशिष्ट गोष्टी शिकवण्यांत याव्या – त्या त्या शाळेचं वैशिष्टय समजण्यांत याव्या व त्या शिकण्याकरिता विद्यार्थ्यांनी शाळेंत

यावं इकडेच आम्ही आपलं लक्ष दिलं. व्यायाम शाळेच्या तक्रारी शाब्दिक तक्रारी पलीकडे गेल्या नाहीत पण आखाडेवाल्यांचे व संघ शाखावाल्यांचे कांही कांही ठिकाणीं मारपिटीपर्यंत प्रसंग आलेत. आखाडेवाल्यांनी म्हणायला सुरवात केली कीं आमच्या आखाड्यांतले मुलं संघवाले पळवतात. आखाडे-वालेच ते. भांडायला मारपिटी करायला एका पायावर तय्यार. असा एक प्रसंग उमरेडला उत्पन्न झाला होता व तो निपटायचं काम डॉक्टरनी माझ्यावर सोपवलं होतं.

## सरकारने संघावर धरलेलें शस्त्र

आखाडेवाल्यांच्या व व्यायाम शाळांच्या रोषास संघास तर तोंड यावें लागलेंच पण त्याही पेक्षा जबर गंडांतर संघावर आलेत. श्री. श्रीपाद तांबे होम-मेम्बर असतांना मध्यप्रांत सरकारला मुंबई सरकारकडून संघासंबंधी माहिती काढून रिपोर्ट करण्याची विनंति झाली. श्री. श्रीपाद तांबे व दामुअण्णाची चांगलीच ओळख. श्री. तांबे यांनी दामुअण्णाचा स्वभाव ओळखून त्यास आपल्या विश्वासांत घेऊन संघासंबंधी माहिती विचारली. दामु-अण्णानं संघ ही तरुणांना शारीरीक शिक्षण देणारी व चारित्र्यवान बनविणारी एक संस्था आहे, तिचा कोणताही राजकीय उद्देश नाही, फक्त समाजसेवा करावी हाच तिचा उद्देश असं सांगितलं व जास्त माहिती पाहिजे असल्यास डॉ. हेडगेवाराना घेऊन येतों असं सांगितलं. त्यांनी डॉ. हेडगेवारांना घेऊन ये म्हटल्यानंतर दामुअण्णा डॉ. हेडगेवाराकडे आले व त्यांना श्री. तांबे यांच्याकडे घेऊन गेले. डॉक्टरांचें व श्री. तांबे यांचें एक



श्री. दामुअण्णा देशमुख

तासपर्यंत भाषण झालें. श्री. तांबे यांच्या संशयाचें निराकरण झालें, पण संघाच्या नशिबाचा चक्र येवढ्यावरच थांबणार नव्हता. डॉक्टर राघवेंद्रराव हे होम मेम्बर असतांना संघाविरुद्ध प्रांतांतील राजकीय पक्षोपक्षांनी संघ क्रांतीकारक आहे, जातीय आहे अशी १९३४ सालीं हाकाटी केली. त्याच वर्षी श्री. तांबे ह्यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संघाच्या समारंभाचे वेळीं हे दोन्ही आरोप खोडून काढले व संघाचें ध्येय हिंदुसंघटन, हिंदुसमाज सेवा व हिंदु संस्कृति रक्षण हें आहे असं सांगितलं. संघांचा असाच एक समारंभ सर मोरोपंत जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखाली १९३५ सालीं झाला. ते श्री. तांबे यांच्यापूर्वी होम मेम्बर होते. त्यांनीही संघावर येणाऱ्या आरोपांचें निरसन केलें.

## रा. स्व. संघ हा जातीय कसा ?

संघाचें ध्येय हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांचं रक्षण व हिंदुंचं संघटन करणं असलं तर तो इतर जातीचा द्वेष करतो असं कसं सिद्ध होतं ? कांग्रेसचा हिंदुमुस्लिम युनिटी हा प्रोग्राम आहे. त्याचा अर्थ काय कांग्रेसला हिंदुंची व इतर जमातींची पारशी, ख्रिश्चन वगैरेंची युनिटी नको आहे असा होतो ? कां हिंदुस्थानांत हिंदु व मुस्लिम ह्या दोनच जाती आहेत, इतर जाती नाहीत असा होतो ? असा जर अर्थ होत नाही तर मग हिंदुधर्माचं, हिंदुसंस्कृतीचं रक्षण करणं म्हणजे बाकीच्या धर्मांचा विध्वंस करणं असा अर्थ करणं योग्य आहे का ? संघानं जातीयतेच्या तत्वावर कधी मुसलमानाप्रमाणे, किंवा हिंदुस्थानांतील अस्पृश्याप्रमाणे राजकीय हक्क मागितले आहेत का ? मग संघ जातीय कसा ?


## रा. स्व. संघाचा मृत्यु कशांत आहे ?

रा. स्व. संघ ज्या दिवशीं प्रचलित राजकारणांत भाग घ्यायला लागेल त्या दिवशीं तो मृत्युपंथाला लागेल. संघाचा तो अनिष्ट काल समजायला पाहिजे. संघ टिकूंच शकणार नाही. जे हल्लींचे मुख्य व चतुर संघसूत्रधार आहेत त्यांच्या ध्यानांत ही गोष्ट आल्यावाचून राहिली नसेल. प्रचलीत राजकारणांत पडायचं म्हणजे निवडणुकींत पडायचं. निवडणुकींत पडायचं म्हणजे निरनिराळ्या उमेदवारासंबंधीं प्रचार करायचा, संघाच्या भिन्न भिन्न

स्वयंसेवकांनी व स्वयंसेवकाच्या गटांनी परस्पर विरुद्ध अशा उमेदवारांना मदत करायची, संघ संस्थेंत उमेदवारासंबंधीं वादविवाद व्हावयाचे, म्हणजे तीव्र मतभेद होऊन संघांत लाथाळी माजायची. ज्या प्रमाणे कांग्रेसनं आसेतु हिमाचल हिंदुस्थानासंबंधी एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न केली व राष्ट्रीय कार्यक्रम वेळोवेळीं आखला त्याप्रमाणेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ह्या ऑल इंडीया भारतीय संस्थेनं केली आहे. कांग्रेसला प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यानंतर प्रांताप्रांतांत झगडे सुरू झाले. ते आणखी विकोपासही जातील. राजकारणांत पडल्यानंतर प्रांताप्रांताच्या झगड्यांत संघ गुरफटून जाईल. व्यक्तिव्यक्तींच्या, प्रांताप्रांताच्या झगड्यांत संघ सापडला की संघाचें अस्तित्व नाहीसं होईल. संघ संस्था म्हणून निवडणुकींत भाग घेणार नाही त्याचप्रमाणे संघाचे स्वयंसेवक व्यक्तिशः निवडणुकींत भाग घेणार नाहीत तर फार बरं. डॉ. हेडगेवार ह्यांनी संघाला निवडणुकींत भाग घेऊं दिला नाही.

**कांही गोष्टींचा उलगडा पाहिजे**

हिंदुसमाजाचं संरक्षण करण्याचं कंकण ज्या संघानं बांधलं त्या संघासंबंधीं एक दोन गोष्टींचा उलगडा मला कितीही विचार केला तरी होईना. ज्या संघानं पहिल्या जागतिक लढाईतल्या डीमोबीलाईज झालेल्या सैन्यांतील ऑफीसरांची संघाला ड्रील वगैरे शिकविण्यांत मदत घेतली त्या संघानं दुसऱ्या जागतिक लढाईच्या वेळीं आपले कांही स्वयंसेवक सैन्यांत आफीसर्स होण्यास कां पाठविले नाहीत व लढाईचं ज्ञान आत्मसात कां करून घेतलं नाही? कदाचित हें परकीय सरकारला मदत करण्यासारखं झालं असतं नाही असं नाही. पण हवाई हल्ल्यापासून बचाव करण्याचं शिक्षण तरी कां घेतलं नाही.



गुरुजी

दिल्लींतील ज्या साधारण श्रीमंत व सुखवस्तु लोकांची संघाला मदत होती त्यांच्यापैकी बऱ्याच जणांची सहानुभूति संघ गमावून बसला. आता एवढं खरं की दिल्लीच्या हत्याकांडाचे वेळीं हिंदुंना केलेली मदत, हिंदुंच्या घरादारांची जीवाच्या संरक्षणाची पार पाडलेली जबाबदारी ह्या मुळे मामुली लोकांच्या सहानुभूतीचा ओघ संघाकडे फिरून पलटला. दिल्लींतच तर काय पण कलकत्यांत सुद्धा तशीच कामगिरी करून संघाने आपल्याबद्दल आदर उत्पन्न केला. हें सर्व जरी खरं असलं तरी Air Raids सारख्या हल्लयापासून बचाव करण्यास शिकण्यास व शिकल्यानंतर नागरिकांस मदत करण्यास हरकत काय असावी ?

डॉ. हेडगेवार हे शरीरानं धडधाकड अगदीं लोखंडच समजा. वर्णानेही तसेच शाम. स्वभावाने शांत व आनंदी. गंभीर वृत्तीचे व मनमिळाऊ. राष्ट्रीय वृत्तीचे पण कोणाही राजकीय पक्षास न चिकटलेले असे त्यांनी सत्तेकरितां राजकारण खेळण्यांत कधीही भाग घेतला नाही. सबंध आयुष्य संघाला दृढ करण्यांत हिंदुसमाजाचं व संस्कृतिचें रक्षण करण्यांत घालवलं. त्याचेंच हें फळ– हा संघरूपी अक्षय वटवृक्ष.

# इंद्रधनुष्य

पावसाळ्यांत आकाशांत ढग असतांना सूर्यास्ताचेवेळीं 'इंद्रधनुष्य' बहुतेकांनी पाहिलेलंच आहे. पाहत असतांना मन वेधून जाणार नाही असा मनुष्य विरळा. तें निरनिराळ्या रंगांच बनलेलं असतं. एक रंग शेजारच्या रंगाहून भिन्न. तरीही तो जवळच्याच रंगात बेमालुमपणे हळूहळू मिसळलेला. विज्ञान शास्त्रवाले सांगतात कीं हे निरनिराळे रंग सूर्यप्रकाशापासूनच उत्पन्न झालेले. सूर्यप्रकाशाचं असं पृथक्करण होण्यास कारण परिस्थिती. सूर्यप्रकाश जर एखाद्या प्रिझम (लोलकांतून) मधून घातला किंवा सूर्यप्रकाशाकडे जर त्यांतून पाहिलं तर हे सात रंग दिसतात व हे सात रंग जर एकांत एक मिसळले तर पांढरा रंग होतो. एखाद्या वर्तुलाकार तबकडीवर हे असले रंग चिकटवून जर ती खूप जोरानं फिरवली तर तबकडीवरील निरनिराळे रंग एकांत एक मिसळून तबकडी पांढरी दिसते. १९२७ पासून १९३७ पर्यंतचा माझा काल हा कांहीसा इंद्रधनुष्यासारखाच आहे. माझ्या हातून विविध चळवळी घडल्या. ह्या सर्व राष्ट्रोन्नतीच्या चळवळीच्या निरनिराळ्या बाजू होत.

## अ. भा. कण्व परिषद

सन १९२७ सालचे मे महिन्यांत खामगावचे एक वकील श्री. त्रिंबकराव भडंग यांनी खामगाव येथे अखिल भारत कण्व परिषद भरवली. त्या परिषदेचा अध्यक्ष मला निवडलं. ह्या परिषदेस वाई व पंढरपूकडील शास्त्री, व मध्यप्रांत व वऱ्हाडांतील शास्त्री व पुढारी मंडळी व लो. अणे, श्री. बाबासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, श्री. पन्नालाल व्यास इत्यादि निमंत्रित पाहुणे मंडळी हजर होती. माझ्या भाषणांतील महत्वाच्या भागांचा सारांश खाली दिल्याप्रमाणे.

## जातीय सुधारणा व राष्ट्रीयत्व

" प्रथम मला हें सांगितलें पाहिजे कीं आमची ही परिषद जातिविशिष्ठ असली तरी ती एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेशीं विसगंत नाही. अनेक समाजाचे मिळून राष्ट्र बनतें. म्हणूनच प्रत्येक जातीची उन्नति होणें हीच राष्ट्राची उन्नति होय. कण्व ब्राम्हण जातीने आपल्या वृद्धीसाठी, उन्नतीसाठी व अभ्युदयासाठी प्रयत्न करणं म्हणजे अप्रत्यक्षपणे राष्ट्रोन्नतीच्या कार्यालाच हातभार लावण्यासारखें आहे. आमची कण्व परिषद ही आमच्या जातीला विशेष राजकीय हक्क मागण्यासाठी भरलेली नाही. आमच्या जातीच्या अभिवृद्धीच्या मार्गांत आज ज्या सामाजिक अडचणी उत्पन्न झालेल्या आहेत ह्या दूर कराव्या व आमच्या शाखेची सर्वांगीण प्रगति व्हावी म्हणून ही परिषद बोलाविली आहे. जादा राजकीय हक्क किंवा सवलती मागण्यासाठी ही परिषद भरली असती, तर तिचें अध्यक्षस्थान मी स्वीकारलें नसतें. आता आमच्या समाजांत जे जुन्या चालीरीतीचे अभिमानी गृहस्थ आहेत त्यांना माझें एवढेंच सांगणें आहे कीं बाबांनो ! जी जी समाजसुधारणा आजच्या काळास इष्ट व अवश्य वाटेल ती ती सुधारणा करण्यास तुम्ही धर्मशास्त्राची किंवा रूढीची अडचण आड येऊं देऊं नका. असे फरक आपल्या धर्मशास्त्रांत वारंवार करण्यांत आले आहेत. त्यांना आपद्धर्म म्हणतात." कित्येक आपद्धर्मांचीं उदाहरणें देऊन पुढे मी म्हणालों, " या बदललेल्या परिस्थितीस तोंड देऊन आपल्या सामाजिक व्यवस्थेंत जरूर ते फेरफार घडवून आणण्यासाठी हल्ली हिंदुमहासभा अस्तीत्वांत आली आहे व तिने हें कार्य हातीं घेतलें आहे. तिच्या कार्यास मदत करणें हेंच आपलें आद्य कर्तव्य, आहे." नंतर हिंदुमहासभेच्या कार्यक्रमांतील हिंदुसंघटन, शुद्धि, अपृश्यता निवारण व अनाथालय ह्यांच्या आवश्यकतेसंबंधी सांगून जातिभेदासंबंधाने म्हणालों, "यापूर्वी कांही प्रकार चालू असला, तरी यापुढे जाती जातीमधील परस्पर व्यवहारांत हल्लीपर्यंत चालू असलेले तीव्र निर्बंध यापुढे तसेच टिकतील, असें मात्र वाटत नाही. हल्ली स्वच्छता, टापटीप व उच्च दर्जाची रहाणी ही सर्व जातींत हळूहळू दृग्गोचर होऊं लागली आहेत. कारण आधुनिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबर स्वच्छ राहणीच्या कल्पनाही सर्व जातींत पसरत चालल्या आहेत. त्यामुळे

जातिनिर्बंध बऱ्याच प्रमाणांत आज ढिले करण्याची व बदलण्याची वेळ आली आहे. आज हिंदुस्थानांतील फक्त हिंदु समाजांतच जातिभेद अस्तित्वांत आहेत. जगांतील इतर कोणत्याही देशांत किंवा कोणत्याही समाजांत जातिभेद चालू नाही. हल्ली इतर राष्ट्रांत किंवा समाजांत वर्गभेद झाले आहेत. ते आर्थिक स्वरूपाचे आहेत. धार्मिक स्वरूपाचे नाहीत. हल्ली प्रत्येक देशांत भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग भराभर निर्माण होत आहेत. सर्व देशांत आज मजूर "संघ" स्थापन झाले आहेत व होत आहेत. हे मजूर संघ बंधुत्वाच्या व समानतेच्या पायावर उभारले जात असून ते मजूर वर्गाचे हक्क व त्यांचे हितसंबंध संभाळण्यासाठी झटत असतात! उलट जातिभेदाच्या मुळाशीं निरनिराळ्या जातींच्या उच्चनीचतेच्या भावना आहेत. त्या उच्चनीचतेच्या भावना काढून टाकून जातिभेदाचे निर्बंध ढिले केले पाहिजेत."

## पोटजातींचें एकीकरण

"हिंदुसंघटनाच्या कार्याचा अल्पसा आरंभ म्हणून आज मी आपणापुढे पोटजातीच्या एकीकरणाची कल्पना विशेष प्रामुख्याने मांडूं इच्छितों. आपल्या दक्षिणी ब्राम्हण जातींत अनेक पोटभेद आहेत. त्यांच्यापैकी (१) चरक, (२) अर्बार (३) देवरूखे (४) पळसे (५) गोवर्धन व (६) कलंकी (७) नारमही हे असे आहेत कीं त्यांच्याशीं इतर ब्राम्हण रोटीव्यवहार सुद्धा करीत नाहीत मग बेटीव्यवहार तर दूरच. आपस्तंभ व ऋग्वेदी निरनिराळ्या शाखांच्या व वेदांच्या ब्राम्हणांत बेटीव्यवहारास प्रतिबंध नाही. पण कण्व व माध्यंदिन पोटशाखांचा एकच वेद असतांही त्यांच्यामधे मात्र बेटीव्यवहार होत नाही हें आश्चर्य नव्हे काय? म्हणून माझी अशी नम्र सूचना आहे कीं, ब्राम्हणांच्या निरनिराळ्या शाखा व पोटशाखा ह्यांच्यामध्ये चालीरीती, राहणी, व खाणें पिणें ह्यांच्यांत जर एकरूपता असेल, तर ह्या शाखांत किंवा पोटशाखांत परस्पर बेटीव्यवहार सुरू करण्यास बेलाशक सुरवात करावी." या नंतर ब्राम्हण समाजांत बोकाळलेल्या बेकारीचा उल्लेख करून ब्राम्हण मुलांनी अर्थ प्राप्तीच्या व निर्वाहाच्या दृष्टीनं शेतकी, व्यापार-धंदे व कारखाने ह्यांच्याकडे वळले पाहिजे असें सांगितलें. नंतर शारीरिक

शिक्षणाकडे व स्त्रीवर्गाच्या उन्नतीकडे वळून स्त्रियांच्या मतदानामुळे व कौन्सील सभासदत्वामुळे समाजांत होणाऱ्या क्रांतीचा उल्लेख करून समारोपादाखल म्हणालों. " सद्‌गृहस्थहो मी आपलें मन दुखविण्याजोगें बुद्धिपुरस्सर कांहींच बोललों नाहीं असं मला वाटतें. माझे विचार मी कांहींसे मनमोकळेपणे व निर्भीडपणे आपणापुढे मांडले आहेत. कोणास दुखविण्याची बुद्धि माझे पोटांत नाहीं. अमुक एक जात किंवा पोटजात इतरांपेक्षां श्रेष्ठ असें मी समजत नाहीं; व मी तसें म्हटलेंही नाहीं. माझ्यामतें इतर जातीच्या सहानुभूतिविना किंवा सहकार्याविना कोणत्याच जातीला आपली उन्नती घडवून आणतां यावयाची नाहीं.

" जगांतील स्वतंत्र व प्रबळ राष्ट्रांनाही आज परस्पर सहकार्याच्या अपेक्षेनं राष्ट्रसंघ स्थापन करावा लागला आहे ! त्या शिवाय आपलें कल्याण साधेल असें वाटत नाहीं मग एकाच समाजांतील लहान पोटजातींचें कल्याण व प्रगती परस्पर सहकार्यावाचून कशी घडून येईल बरें ? म्हणून हिंदुस्थानांतील सर्व जातींत परस्परांविषयी सहानुभूति, सौजन्य व आदरबुद्धि असली तरच सर्वांचा फायदा होईल. प्रत्येक जातीने आपली नैतिक, बौद्धिक, शारीरिक व आर्थिक उन्नति इतकी करून घेतली पाहिजे कीं, इतर जातींना तिच्या सहकार्याची जरूरी वाटावी. इतर जातीविषयी आपली वृत्ति सानुकंप व न्यायाची असली पाहिजे. स्वार्थत्याग हें तर ब्राम्हणांचें मुख्य लक्षणच होतें, आहे व पाहिजे. तुमच्या जातीच्या उद्धाराचें कार्य हें सर्वस्वीं तुमच्या हातचें आहे." ह्या परिषदेंत अनेक ठराव पास झालेत पण ज्या संबंधीं प्रमुखपणे उल्लेख करावयाला पाहिजे असे दोन. एक अस्पृश्यता निवारणासंबंधीं व दुसरा ब्राम्हणांच्या आंतरशाखीय विवाहासंबंधीं. ह्या दुसऱ्या ठरावाला अस्पृश्यता निवारणाच्या ठरावापेक्षाही जास्त कडवा विरोध झाला होता. ह्याच सालचे (१९२७ चे) डीसेंबर महिन्यांत अकोल्यास " अखिल भारतीय ब्राम्हण परिषद " वाई प्राज्ञ पाठशाळेचे वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे यांचे अध्यक्षतेखाली झाली व त्याहि परिषदेंत वर उल्लेखिलेले दोन्ही महत्वाचे ठराव पास झालेत. पण खूप वादविवाद, कडवा विरोध व सनातनी ब्राम्हणाच्या असहकारानंतर !

## बार्डोलीच्या दुसऱ्या सत्याग्रहांत आखाड्याची कामगिरी

कणत्र परिषदेनंतर लगेच मी मुंबईस माझे बंधु डॉ. गोपाळराव देशमुख यांचेकडे गेलों. तिथे दोन तीन महिने होतों. त्या अवधित पुष्कळ जणांच्या भेटी झाल्या. त्यांत डॉ. चंदुलाल (डेन्टल सर्जन) ह्या कांग्रेस कार्यकर्त्याचीही भेट माझ्या बंधुच्या बंगल्यावर झाली. त्यांनी असहकारितेच्या काळांत आपला धंदा बंद केला व कांग्रेसच्या कार्याला सर्वस्वीं वाहून घेतलं होतं. मी त्यांना म्हणालों " काय चंदु, तूर्त तुझा काय प्रोग्राम आहे ? काय करतोस तूं ? " डॉ. चंदु म्हणाले, " आखाडे काढतों आहे. " डॉ. चंदुलाल देसाई हे अमदाबाद, सुरत वगैरे ठिकाणीं गुजराथेंत जे कांग्रेस कार्यकर्ते होते त्यापैकी एक प्रमुख कार्यकर्ते.

मी म्हणालों, " आखाड्याशिवाय दुसरा कोणताही प्रोग्राम नाही का ? " डॉ. देसाई म्हणाले, " सध्या वातावरण जिकडें तिकडें थंड आहे. कॅांग्रेसचं धडाडीचं असं कोणतही काम नाही. शिवाय कांहीही झालं तरी आखाडे आवश्यक आहेत ? स्वयंसेवकांना एका ठिकाणीं आणायचं; त्यांना लाठी, काठी व कवाईत शिकवायची; शिस्त लावायची हे कांही थोडं थोडकं काम नाही. "

सन १९२७ जून जुलैमधली ही गोष्ट. बार्डोलीचा दुसरा सत्याग्रह– जो विजयी झाला– तो सन १९२८ फेब्रुवारीमधील. बार्डोलीच्या ह्या लढ्यांत पहिल्या बार्डोलीच्या लढ्यासारखं अपयश आलं नाहीं व चांगलाच यशाचा वाटा पदरांत पडला त्यांला कारणें अनेक होतीं. पण आखाड्याचाही भाग त्यांत होताच. ह्या वेळचा लढा मर्यादित होता. पूर्वीच्या लढ्याप्रमाणे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न त्यांवर अवलंबून ठेवला नव्हता. प्रश्न गुजराथेंत सरकारनं सारा वाढण्यासारखी परिस्थिती होती कीं नाही हा. जनतेच्या पुढाऱ्यांचें म्हणणं तशी परिस्थिती नाही. सरकारला हें कबूल नव्हतं. कॅांग्रेसच्या पुढाऱ्यांनी चौकशी कमिटी नेमा म्हटलं. सरकार कबूल झालं नाही. पुढाऱ्यांची चौकशीची मागणी सर्वांना कॅांग्रेस व कॅांग्रेसेतर-जनांना इतकी योग्य वाटली कीं सरकारशीं भांडण्याच्या आखाड्यांत मुंबईचा व्यापारी वर्गही (इंडियन चेम्बर ऑफ कॉमर्सही) उतरला. विद्यार्थी उतरले. हा लढा कसा काय चालतो हें पाहण्याकरितां इतर प्रांतांतली पुढारी मंडळीही

तिथे गेली. सरकारने सारा वसुलीकरितां कास्तकाराचें ढोरं' म्हशी जप्त करण्याकरितां वारंट काढलें. पण सरकारच्या हातीं ढोरं किंवा इतर मालमत्ता कास्तकारांनी लागूं दिली नाही. त्यांना जप्तीच्या वारंटाची सूचना आगाऊच मिळत असे. ह्या ज्या गोष्टी होत होत्या त्या आखाड्यांत तयार झालेल्या स्वयंसेवकांच्या साह्यावाचून थोड्याच झाल्या ! ह्या वेळीं महात्मा गांधी चळवळीचे नेते नव्हते. नाहीतर त्यांनी कास्तकारांना म्हटलं असतं ' आणा तुमचं सामान ! तुमच्या म्हशी !! करूं द्या ह्यांना जप्ती. ' सत्य व अहिंसात्मक चळवळीखेरीज दुसरी चळवळ त्यांना पसंत नव्हती. ह्या बार्डोलीच्या सत्याग्रहाचे सूत्रधार होते सरदार पटेल. साधनांपेक्षा-साधनांच्या शुचिपेक्षा—साध्यावर लक्ष. मला तर बार्डोलीच्या सत्याग्रहाला ' आयरिश ल्यांड लीग ' चा चांगलाच वास येत होता. ढोरं म्हशी व इतर माल जप्त करणं तर अशक्य करून सोडलंच होतं पण सरकारला मदत करणाऱ्यावर सामाजिक बहिष्कारही पडत होता.

## काटोल तालुका शेतकरी परिषद

उन्हाळा मुंबईकडे घालवल्यावर मी नागपूरास १९२७ च्या जुलैच्या महिन्यांत कोंढाळी ( जिल्हा नागपूर ) येथे काटोल तालुका शेतकरी परिषद होती तिच्या अध्यक्षाचं काम केलं. मी भाषणांत म्हटलंः

## शेतकऱ्यांच्या हातांत प्रचंड शक्ति

" महत्वाच्या दृष्टीनं शेतीचा नंबर पहिला लागतो. मग तें महत्व राष्ट्राच्या दृष्टीनं समजा किंवा व्यक्तीच्या दृष्टीनं समजा. शेकडा सत्तर लोक शेतीवर उपजीविका करणारे आहेत. त्यांची संपन्नता म्हणजेच राष्ट्राची संपन्नता. म्हणून, राष्ट्रांतील नेत्यांनी व सरकारने शेतकरी वर्गाला सुसंपन्न करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. सबंध राष्ट्राला अन्न शेतकरी पुरवतात, बहुतेक उद्योगधंद्याची भरभराट शेतकरी वर्गावर अवलंबून आहे. तुम्ही मालकाळीचा व शेतसाऱ्याचा जो पैसा सरकारला देतां त्यावरच सरकारचा बहुतेक खर्च चालतो. सरकारच्या सर्व गमजा शेतकऱ्यांजवळून जो पैसा मिळतो त्यावर चालतात. यावरून तुमच्या हातांत केवढी प्रचंड शक्ति आहे, हें ओळखा.

सरकारला हा पैसा न मिळणं म्हणजे सरकारच्या कंठीं प्राण येणंच आहे. तुम्ही स्वतः शेतकरी असल्याबद्दलचा स्वाभिमान बाळगला पाहिजे व जेव्हा प्रसंग येईल तेव्हा स्वतःचें महत्व समाजास कबूल करावयास लाविलें पाहिजें." नंतर शेतकऱ्यांना शेती करतांना लागणाऱ्या निरनिराळ्या विषयांचें ज्ञान कसं आवश्यक आहे याचं विवेचन करून व शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्याकरितां शेतकऱ्यांची सघंटना करा अशी सूचना करून मी पुढे म्हणालों:

## शेतकऱ्यांची संघटना करा!

"चळवळीची जबाबदारी सुशिक्षित शेतकऱ्यांवर येते. चळवळ सार्वजनिक व जोरदार असल्याशिवाय कांहीही फायदा होणें शक्य नाही. ही चळवळ कौन्सिलमध्ये व बाहेर दोन्हीही ठिकाणीं चालवावयाला पाहिजे. बिगार, बलुता, व दारूच्या प्रश्नांचा निकाल लावण्याकरितां ज्या प्रमाणे सतत, जोमाची व सार्वजनिक चळवळ केली त्या प्रमाणे चळवळ करावयास पाहिजे."

## शेतकरी वर्गांत जातिभेदाला वाव नाही.

"आपली परिषद शेतकरी वर्गाची आहे. यांत जातिभेदाला किंवा धर्माला वाव नाही. श्रीमंत गरीब, हिंदु अहिंदु, स्पृश्य अस्पृश्य यांच्यावर अमल करणारी दैविक किंवा नैसर्गिक शक्ति एकच आहे. तिच्याजवळ भेदभाव नाही. श्रीमंताच्या शेतांत पाऊस पडतो व गरीबाच्या पडत नाही असं कांही होत नाही. तेल्याच्या शेतांत जवस जास्त पिकेल व माळ्याच्या पिकणार नाही असेंही नाही. त्याच प्रमाणे सरकारचे कायदे ल्यॉंड रेव्हीन्यु ॲक्ट व टेनन्सी ॲक्ट कास्तकारांत भेदभाव करीत नाहीत. सर्वांना सारखेच लागूं आहेत. सबब आपण सर्वांनी आपल्या तक्रारीचा निकाल लावून घेण्याकरितां प्रसंग विशेषीं सरकारशीं झगडण्याकरितां एकजुटीने वागले पाहिजे व चळवळ केली पाहिजे."

मी आणखी म्हणालों, " शेतीवर उदर निर्वाह करणाऱ्या शेतकऱ्याला शेती जास्तींत जास्त किफायतशीर होण्याकरितां आपल्या बुद्धीचा, अनुभवाचा व कल्पकतेचा उपयोग करून मनुष्याचे श्रम कसे कमी करतां येतील, थोड्या वेळांत जास्त काम कोणत्या उपायांनी करून घेतां येईल, शेतीचा खर्च कसा वाचवतां येईल, बी बियाणाची जात सुधरवून उत्तम व

जास्त पीक कसें काढतां येईल वगैरे गोष्टींचा विचार करावयाचा असतो. ज्याने ' जाड्याची ' योजना करून एका जाड्यावर दोन डवरे चालवण्याची पूर्वीच्या काळांत योजना करून एका बैलजोडीचा बचाव केला त्यानं आपल्याला कल्पकतेनं काय करतां येईल याचा धडा घालून दिला व आपल्यावर उपकार करून ठेवले. आणखी एक उदाहरण घेऊं. श्री. मा. र. डोक्रस उर्फ बापुराव डोक्रस ह्या नांवाच्या चांदूर येथील वकीलानं शेती करण्यास सुरवात केल्यानंतर बी. ए. च्या परिक्षेकरितां घेतलेल्या वनस्पतिशास्त्राच्यां ज्ञानाचा आपल्या शेतीकडे उपयोग करून घेऊन " डोक्रस कॉटन " ह्या नांवाची कापसाची एक नवीन जात शोधून काढली. प्रयोग आणि निवड ह्या दोनच गोष्टींवर त्यांनी भर दिला: हे शेतकी विषयांत पदवीधर नाहीत ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे व म्हणूनच त्यांनी कापसाच्या जातींत प्रयोग आणि निवड करून जी नवीन जात शोधून काढली तिच्याबद्दल त्यांची तारीफ करावयास पाहिजे. बुद्धि, कल्पकता व शेतींत सुधारणा करण्याची कळकळ हें त्यांचं भांडवल. ह्यामुळेच सरकार जसा पाण्यासारखा पैसा प्रयोग करण्यांत खर्च करतें तसा त्यांना करावा लागला नाही. बापुरावांनी डोक्रस कॉटन काढून स्वतःचा फायदा तर केलाच पण त्या बरोबरच त्या भागांतील शेतकऱ्यांचीही आर्थिक परिस्थिती, ह्या कापसाची त्यांच्याकडून लागवड करून सुधरवली. त्या कापसाकरितां निझाम राज्यांतून, मुंबई प्रांतांतून बरीच मागणी येऊं लागली.

## राजकीय वातावरणांत वादळ

ह्याच सुमारास सायमन कमिशन मांटेग्यु रिफार्मस् कशा काय राबवल्या गेल्या ह्याची चौकशी करण्याकरितां हिंदुस्थानांत आलं होतं. ह्यावर हिंदुस्थानांत सर्व राजकीय पक्षांनी उदारमतवादी पक्षानेही बहिष्कार टाकला होता. कटनी येथे राजे लक्ष्मणराव भोंसले ह्यांचे अध्यक्षतेखाली मालगुजारांची व शेतकऱ्यांची परिषद १९२८ चे जानेवारी महिन्यांत भरली होती. त्या परिषदेला मी व डॉ. मुंजेही गेलों होतों. परिषद आटोपल्याचे दुसरेच दिवशीं मालगुजारांची व शेतकऱ्यांची परिषद माझ्या अध्यक्षतेखाली झाली. सायमन कमिशनवर कडक बहिष्कार टाकण्याचा ठराव पास झाला व तो अमलांत आणण्याचे प्रयत्न सुरू झाले.

## महाराष्ट्रीय समाजाला हादरून सोडणारी घटना

ह्याच सुमारास महाराष्ट्रांत एका सामाजिक घटनेनं वादळ उत्पन केलं. घटना मुंबई प्रांतांतली, पण वादळ उत्पन्न झालं महाराष्ट्रभर. एका सुशिक्षित पदवीधर हिंदु बाईनं एका सुशिक्षित पदवीधर मुसलमानाशी लग्न केलं. खान पाणंदीकर विवाह ही ती घटना. ठिकठिकाणीं निषेधपर सभा झाल्या. नागपुरांतही राजाराम लायब्ररींत, तीव्र निषेधपर सभा झाली. डॉ. मुंजे मुख्य वक्ते. मीही ठरावाला दुजोरा दिला. गोपाळराव ओगले महाराष्ट्राचे संपादक ह्यांनीही निषेधपर भाषण केलं. सुधारलेल्या देशांत अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड सारख्या देशांत आचार विचार व संस्कृति ज्यांची एकच आहे अशा प्रीति विवाह केलेल्या, पण भिन्नधर्म असलेल्या किंवा क्याथालिक प्राटेस्टंट अशा एकाच धर्माच्या दोन भिन्न शाखा असलेल्या व्यक्तींना सुद्धा विवाहित सुखी जीवन फार काल लाभत नाही – मुलं झाल्यानंतर तर लाभत नाहीच नाही. अशा विवाहित काडीमोडींचें उदाहरणं शेकडा नव्वद तरी असतात. मग भिन्न धर्माच्या-मूर्तिपूजक व मूर्तिभंजक- भिन्न संस्कृतिच्या व भिन्न आचार विचारांच्या व्यक्तिंना विवाह-ते प्रीतिविवाह असले तरी- कितपत सुख, लाभ व आनंद देणारे होतील ह्याचा थोडासा जरी विचार केला तरी अंदाज करतां येण्या सारखें आहे. दोन व्यक्तींचें लग्न सुखावह होण्याकरितां समान संस्कृति, समान आचार व विचार ह्यांची जशी आवश्यकता आहे तशीच समान धर्माची – किंवा कोणताही धर्म न पाळण्याची – आवश्यकता आहे.

## रायफल क्लब व भोजन मंडळ

डॉ. मुंजे ह्यांनी पुढाकार घेऊन नागपूरांत १९२१ सालीं एक 'रायफल क्लब' काढला. त्यांत त्यांना भाऊसाहेब टालाट्ुले एक प्रसिद्ध शिकारी व डॉ. हेडगेवार ह्यांचें बरेच सहाय्य झालें. १९२९ सालीं ही Rifle Association रजिष्टर झाली. त्या असोशिएशनचे राजे लक्ष्मणराव भोंसले अध्यक्ष व डॉ. कर्नल कुकडे हे कार्यकारी अध्यक्ष व मलक साहेब उपाध्यक्ष होते. डॉ. चोळकर, डॉ. परांजपे, श्री. नवाथे, माझे बंधु दामुअण्णा, डॉ. हेडगेवार, भाऊसाहेब टालाट्ुले व मी सभासद होतों. ह्या संस्थेतर्फे शिकार पार्ट्याही निघत. त्यांची सर्व व्यवस्था भाऊसाहेब करीत व खर्चही तेच सोसत.

ही संस्था निघाल्यानंतर थोडेच दिवसांनी दुसरी एक संस्था नागपूरांत निघाली. तिचं नाव "भोजन मंडळ" किंवा 'भोजन पार्टी.' त्या वेळेला बऱ्याचशा पार्ट्या होत्या. कांग्रेस पार्टी, रिस्पांसिव्हिस्ट पार्टी, ब्राम्हणेतर पार्टी इत्यादि. म्हणून ह्या भोजन मंडळालाहि भोजन पार्टी म्हणत. तिनंही राजकारणांत भाग घेऊन विस्मयकारक यश संपादन केलं हें पुढे येणाऱ्या प्रसंगांवरून दिसून येईल. तूर्त ह्या पार्टीच्या घटनेसंबंधानं व उद्देशासंबंधानं लिहूं. 'भोजन पार्टी' तेव्हा भोजनाचा भाग प्रमुख. पार्टीचे सभासद श्री. भाऊसाहेब टालाटुले व कुंवर फत्तेसिंगराव भोंसले दोघेही उत्तम शिकारी – श्री. चिमोटे व गोविंदराव लाखे, दोघही उत्तम गाणारे गृहस्थ, गाण्याचे तज्ञ, – ॲडव्होकेट फुले, लेबर लीडर, दाजी शास्त्री चांदेकर, एक सार्वजनिक कार्यकर्ते व राष्ट्रीय दृष्टीनं कीर्तन करणारे गृहस्थ, दामुअण्णा माझे बंधु व मी. ह्या पार्टीचा मी अध्यक्ष. पार्टीचा प्रोग्राम प्रत्येकानं पाळी पाळीनं आपल्या घरीं रविवारीं मेजवानी द्यायची. ही पार्टी म्हणजे राजकीय, सामाजिक व खेळाडू गृहस्थांचा संच; व प्रोग्राम असा कीं त्यांत प्रत्येक सभासदाला भाग घेतां येईल. जेवायच्या वेळेला अर्थात अनेक विषयांवर चर्चा चाले. रायफल क्लबच्या शिकारीच्या प्रोग्राममधे व भोजन मंडळाच्या प्रोग्राममधे एक मोठा जबरदस्त फरक. शिकार पार्टीच्या प्रोग्राममधे एखाद्या दुसऱ्यालाच जनावराची शिकार मिळे व भोजन पार्टीच्या प्रोग्राममधे प्रत्येक सभासदाला उत्तम पक्वान्नाची शिकार मिळे. केव्हा केव्हा वाघाच्या शिकारींत कोणालाच कांही मिळत नाही, वाघ हातावर तुरी देऊन निघून जातो. मग शिकारीला जाणाऱ्यांची सर्वस्वी निराशा. ती शिकार म्हणजे निव्वळ नशीबाचा खेळ! भोजन पार्टीच्या सभासदांना निराशा ठाऊकच नव्हती व सर्वांना तीच संधि व तोच फायदा. पण ह्या भोजन मंडळानं आपला सर्व उत्साह व वेळ राजकीय व सामाजिक विषयांवर चर्चा करण्यांतच घालवला नाही, गाणं बजावण्यांतच लक्ष दिलं नाही, किंवा लाडवाची वा जनावराची (वाघाची) शिकार करण्यांत तासचे तास घालवले नाहीत, तर नजरेंत भरण्यासारख्या, व वाखाणण्यासारख्या, कांही घटनाही घडवून आणल्या. त्यापैकी एक खाली दिली आहे.

## दोन रावबहादुरांची लढत

१९३० सालीं कौन्सील आफ स्टेटची निवडणूक झाली. तिचा व प्रांतिक असेंबलीची निवडणूक झाली तिचा उल्लेख करणं योग्य होईल. १९३० सालीं कौन्सील आफ स्टेटचं बाय इलेक्शन (तात्पुरती निवड) व्हावयाचं होतं त्या करितां दोन उमेदवार. दोघंही रावबहादुर. कांग्रेसचा कोणीच नव्हता कारण तिनं कौन्सीलवर बहिष्कार पुकारला होता. दोघां रावबहादुरापैकी एक कामठीचे डी. लक्ष्मीनाराण – ज्यांच्या नांवाची लक्ष्मीनारायण इन्स्टिटयुट आहे ते — व दुसरे वर्धेचे नायडू ॲडव्होकेट, प्रांतिक असेंबलीचे सभासद व ब्राम्हणेतर पार्टीचे, ह्या प्रांतांतील अध्वर्यु. रा. ब. डी. लक्ष्मीनारायण श्री. भाऊसाहेब टालाटुले यांचें घरीं "भोजन पार्टी" च्या सभासदांना भेटले व त्यांच्या निवडणुकींत त्यांना मदत करण्याची त्यांनी त्यांना (सभासदांना) विनंती केली व मंडळीनं कबूल केलं.

मी कौन्सील आफ स्टेटचा एक मतदार होतों. रा. ब. नायडू ह्यांनी मला एक पत्र पाठवलं त्यांत त्यांनी मी आपलं मत त्यांना द्यावं अशी विनंति केली होती. त्या पत्राला मी एक उत्तर पाठवलं व त्याचीच एक एक नकल 'महाराष्ट्र' व 'हितवाद' पत्रांत प्रसिद्धिकरितां पाठवली व ती त्या पत्रांत प्रसिद्धही झाली. "बॅ. देशमुखांचे रा. ब. नायडूंना सवाल" ह्या शीर्षकाखाली 'महाराष्ट्रांत' प्रसिद्ध झालेलं माझं पत्र:

रा. ब. नायडू वर्धा यांस: आपण मध्यप्रांतांतील सर्व लोकांतर्फे "कौन्सील आफ स्टेट" मध्ये निवडून येण्यासाठीं उमेदवार म्हणून उभे राहिले आहांत. 'सर्व लोकांचे' "जनरल कॉन्स्टिटयुएन्सी" हे तुमचे शद्ब विशेष महत्वाचे आहेत ! तुम्ही माझ्या सारख्या सर्व मतदारांना विनंती पत्रें पाठवून आमचीं मतें मागत आहांत. तुम्ही आपला 'जाहिरनामा' मजकडे पाठविला नाही; किंवा वर्तमानपत्रद्वारा जाहीर केला नाही. कदाचित जाहीरनामा न काढणेंच आपणास सोईवार वाटत असेल ! तुम्ही सर्व लोकांतर्फे उभे राहणार

तरी मी पुढे विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें तुम्ही वर्तमानपत्रद्वारा जाहीर केलीं पाहिजेत.

(१) तुम्ही ब्राम्हणेतर पक्षाचे उमेदवार म्हणून उभे राहणार काय? (२) तुम्ही अजून ब्राम्हणेतर पक्षाचे पुढारी व सभासद आहां कीं नाही? (३) तुमच्या ब्राम्हणेतर पक्षांत युरोपियन, पार्शी, हिंदी, ख्रिस्ती, मुसलमान वगैरे सभासद आहेत काय? (४) सरकारी नौकऱ्या वगैरे बाबतींत केवळ ब्राम्हणांपेक्षाच नव्हे तर वर सांगितलेल्या इतर जातीपेक्षाही ब्राम्हणेतरांना जास्त व विशेष सवलती मागणारे आहांत की नाहीं? (५) इतर जातींच्या समाजाविषयी तेढी बुद्धि असलेला मनुष्य 'सर्व' लोकांचा प्रतिनिधी म्हणून निवडून आला, तर सर्व लोकांचें हितसंरक्षण किंवा प्रतिनिधीत्व कसें करूं शकेल? (६) जातिविशिष्ट चळवळीने हिंदुस्थानांतील खऱ्या राष्ट्रीयत्वाच्या भावनांचें मातेरें उडविलें आहे, असें तुम्हास वाटतें काय?

या निवडणूकींत तुमचे प्रतिस्पर्धी म्हणून उभे राहिलेले रा. ब. डी लक्ष्मीनारायण यांनी आपल्या जाहीरनाम्यांत "जातिविशिष्ट चळवळ ही खऱ्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेला जडलेली व्याधि होय" असें स्पष्ट म्हटलें आहे. तसेंच आपण जर निवडून आलों तर कौन्सील आफ स्टेटमध्ये आपण कसें काम करूं हेंहि दिग्दर्शित केलें आहे. तर या बाबतींत तुमचें म्हणणें काय आहे. जे लोक राष्ट्रीय वृत्तीचे आहेत, ते जाति विशिष्ट उमेदवाराला दूर लोटून राष्ट्रीय वृत्तीच्या उमेदवारालाच आपलीं मतें देतील हें मी आपणास सांगावयास नकोच.

नागपूर ८-२-३० **गो. वि. देशमुख**

## माझ्या सवालांना नायडूंचें उत्तर

रा. ब. नायडूचीं उत्तरें आलीं तींही महाराष्ट्रांत प्रसिद्ध झालीं.

(१) ब्राम्हणेतर पक्षानं उमेदवार उभेच केले नाहीत. (२) मी ब्राम्हणेतर पक्षाचा सभासद व छोटासा कार्यकर्ता आहे. (३) ब्राम्हणेतर पक्षाचें तत्व

असें आहे कीं माणसांची जात पात न पहातां सर्वांना राजकारणांत किंवा सांपत्तिक घडामोडींत सारखी संधि मिळाली पाहिजे. आमच्या पक्षाचा सर्वांस समान संधि मिळविण्याचा हा प्रयत्न कांही वतनदारास नडत असला, तरी आमचा पक्ष बिलकूल जातिनिष्ठ नाही. सर्वांस न्याय मिळावा असें प्रतिपादणारां आहे व खराखुरा राष्ट्रीय आहे ! दुसऱ्यांचा तोटा करुन एकाच जातीला फायदा द्या असें आम्ही मागत नाही. मागासलेल्या जातीस संरक्षण देण्यास आमचा पक्ष तयार आहे. मी कोणत्याही एका जातीच्या विरुद्ध नाही. सर्व जातींची समान सेवा करणें हेंच माझें ब्रीद आहे. माझा पक्ष जातिनिष्ठतेच्या सर्वस्वी विरुद्ध आहे.

## ‘महाराष्ट्र’ आखाडयांत उतरला

‘महाराष्ट्रानं’ रा. ब. नायडूच्या उत्तरावर आपली टीका “रा. ब. नायडूंचा कांगावखोरपणा !” ह्या सदराखाली प्रसिद्ध केली. तिचा सारांश. ब्राम्हणेतर पक्षाचे पुढारी जर जातिनिष्ठ चळवळे नव्हते, तर जगांत ‘जातिनिष्ठ’ चळवळ नाहीच, म्हटलं पाहिजे ! ‘सर्वांस समान संधि’ हेंच जर ‘ब्राम्हणेतर’ चळवळीचें ब्रीद वाक्य असेल तर तें तत्व ज्यांस मान्य आहे, किंवा तें तत्व जे शपथेवर प्रतिज्ञापूर्वक कबूल करतील, अशा ब्राम्हणांस त्यांच्या पक्षाचे सभासद होण्याची मोकळीक त्या पक्षाने कां ठेऊं नये ? अशी सवड ब्राम्हणेतर पक्षाने ठेविली आहे काय ? तसेंच ‘सर्वांस समान संधि’ हें ज्या पक्षाचें ब्रीद आहे त्या पक्षाने आपणास ब्राम्हणेतर असे जाति निदर्शक नांव काय म्हणून घ्यावें ? ‘समाज समता संवर्धक संघ’ असें नांव त्यानी कां धारण करूं नये ? ‘ब्राम्हणेतर’ हें नांव जातिनिदर्शक आहे; सबब तें बदलून ‘शेतकरी पक्ष’ असें नांव आपण घेऊं या; समतेचें तत्व मान्य करणाऱ्या ब्राम्हणासही आपण आपल्या पक्षांत येण्यास सवड ठेऊं या, असे म्हणणाऱ्या रा. जवळकरांना महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांनी बहिष्कृत केलें व ‘हे आमचे पुढारी नव्हतं !’ अशी घोषणा केली हें रा. ब. नायडूच्या कानीं आलें नाही काय ?

सारांश ब्राम्हणेतर चळचळीचा पाया ‘समता’ नसून जातिविशिष्टता हाच आहे. रा ब. नायडूंना ही गोष्ट आज प्रांजळपणे कबूल करणें सोईवार नाही. ते आज कागांवखोरपणाने आपली जातिनिष्ठा व विशिष्ट जातिद्वेष समतेच्या खोट्या पांघरूणाखाली लपवूं पहात आहेत! याने कोण फसणार?” नंतर म्युनिसिपल, लोकल बोर्ड, प्रांतिक असेंबली ह्यांच्या निवडणुकीचा उल्लेख करून व (१९२९ ची) सायमन कमिशनपुढे जी तोंडी जबानी झाली व तींत त्यांची जी फजीती उडाली त्याचे उतारे देऊन ह्या लेखांत पुढे म्हटलें आहे. “वरील उताऱ्यांवरून स्पष्ट दिसून येईल कीं रा. ब. नायडूंना कौन्सिलांत कांही ब्राम्हण निवडून येतात या भीतीने सबंध प्रांतिक स्वायत्तता तर नकोच पण हल्ली सुरू असलेल्या मांटेग्युचेम्सफोर्ड सुधारणाही रद्द झाल्या पाहिजेत.” पुढे ह्या लेखाच्या शेवटीं म्हटलं आहे. “या पेक्षा त्यांचा जातिद्वेष व अराष्ट्रीय वृत्ति याची दुसरी साक्ष कोणती पाहिजे! अशा स्वराज्य विरोधी माणसाला थोडा तरी राष्ट्रीयत्वाची लाज असणारा कौन्सील आफ स्टेटचा ब्राम्हणेतर मतदार तरी आपलें मत कसें देईल?” ‘भोजन पार्टी’ चे तिन्ही उमेदवार रा. ब. डी. लक्ष्मी नारायण, व भोजन पार्टीचे दोन शिकारी सभासद कुंवर फत्तेसिंगराव भोंसले व श्री. भाऊसाहेब टालाटुले हे कौन्सील आफ स्टेटचे, प्रांतिक असेंबलीचे व मध्यवर्ती असेंबलीचे सभासद निवडून आले.

## भोजन मंडळाचें विसर्जन

ह्या निवडणुकीनंतर म्हणजे मार्च महिन्यांत लष्करी कायद्याचा अंमल, सत्याग्रह (मीठ, जंगल), लाठीमार, कायदेभंग, दडपशाही इत्यादि प्रकार घडून आले म्हणून भाऊसाहेब टालाटुले यांनी आपल्या मध्यवर्ति असेंबलीच्या जागेचा राजिनामा दिला. सरकारनं बॅ. अभ्यंकरांवर त्यानी दिलेलं एक व्याख्यान राजद्रोही आहे असा आरोप ठेवला व त्यांना धरून उमरावतीस नेलं. त्यांना उमरावतीस नेलं त्याच दिवशीं मी भोजन पार्टीच्या सभासदांना सांगितलं आता मी भोजन मंडळाचा सभासद राहूं शकत नाही. नंतर भोजन पार्टीचं (मंडळाचं) विसर्जन झालं.

## निजामाच्या राज्यांत मराठीला वाचवणारा खंबीर वीर

भोजन पार्टी विसर्जन होण्यापूर्वी म्हणजे १९२९ च्या सप्टेंबर महिन्यांत सायमन कमिशन बहिष्काराचं वादळ नाहींसं झाल्यानंतर पण १९३० च्या स्टेट कौन्सीलच्या निवडणुकीमुळे वातावरण गरम होण्यापूर्वी मध्यंतरीचा जो शांत काल त्या कालांत ह्या प्रांतांत 'विदर्भ साहित्य' सम्मेलनाची बैठक झाली व साहित्य प्रेमीयांनी ती बरीच गाजवली. त्या साहित्य सम्मेलनाच्या स्वागत कमिटीचा मी एक सभासद होतों. सम्मेलनाचे अध्यक्ष श्री. दादासाहेब खापर्डे होते. श्री. दादासाहेबांचें भाषण त्यांच्या विद्वत्तेस, बहुश्रुतपणास, व विनोदास अनुरूप असेंच झालें. सम्मेलनांत निरनिराळ्या ठिकाणच्या प्रतिनिधींनी विविध विषयांवर भाषणें केलीं. पण त्या सर्व प्रतिनिधिंनी मांडलेल्या ठरावांत महत्वाचा ठराव व भाषणांत महत्वाचें



दादासाहेब खापर्डे

भाषण हैदराबादचे न्यायमूर्ति केशवरावजी कोरटकर यांचें झालें. त्यानी निजामाला विनंति करणारा एक ठराव मांडला. त्यांत अशी मागणी केली कीं "मराठ वाड्यांत – औरंगाबाद जिल्ह्यांत प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मराठींतून दिलें जावें व या मराठी विभागाचं कोर्टांतील कामकाज मराठींतून व्हावें." हा ठराव पास झाला हें सागणें नकोच. डायसवरील सर्व मंडळींत न्या. केशवरावजी आपल्या निजामी पगडीनं ठळकपणे दिसून येत. ठरावाबद्दलची त्यांची कळकळही स्पष्टपणे दिसून येत होती. त्याही पेक्षा त्यांना ज्या धैर्यानं मराठी बोलणाऱ्यांची बाजू सम्मेलनांत मांडली तें धैर्य तारीफ करण्यासारखं होतं. सरकारी नोकरानं, त्यांतही आर्यसमाजिस्टांना सक्रीय मदत करणाऱ्यानं, मराठीची त्या राज्यांत कशी गळचेपी होत आहे –

उर्दू कशी लादली जात आहे – मराठी शिकवल्या जाणाऱ्या शाळांत व उर्दु शिकवल्या जाणाऱ्या शाळांत आर्थिक मदत करण्याच्या बाबतींत कसा भेदभाव केला जातो हें निर्भीडपणं सांगणं, ज्याला मराठी भाषेबद्दल अभिमान व अत्यंत कळकळ आहे, स्पष्ट बोलण्याबद्दल लागणारें धैर्य आहे त्याच्या हातूनच होण्यासारखं होतं. निझामी राज्यांत भितीचं व संशयाचं वातावरण. त्यामुळे एकमेकानं एकमेकांस विश्वासांत घेणं कठीण. केव्हा काय घटना घडून येईल हें अनिश्चित. कसं व कोणतं नुकसान सार्वजनिक हिंदु कार्यकर्त्यांचं होईल ह्याचा नेम नव्हता. ज्या प्रांतांत लोकमत जागृत आहे व भाषा स्वातंत्र्यावर बंधनं नाहीत अशा ब्रिटिश इंडीयाच्या कोणत्याही प्रांतांत काम करणं ह्या निझामी संस्थानापेक्षा पुष्कळ सोपं. ह्या निझामी संस्थानांत तेलंगी-आंध्र-लोक, मराठे, कारवारी व मुसलमान अशा जातींची खिचडी असल्यामुळे ‘फोडा व राज्य करा’ हा ब्रिटिशांची नीति निजाम सरकारला सहज अमलांत आणतां येते. ह्या निझामी राज्यांत हिंदु लोकांच्या अंतःकरणांत भीतिनं कसं ठाणं देऊन ठेवलं होतं व हिंदु एकमेकांकडे कसे संशयानं पाहत होते ह्या गोष्टींची प्रचिती १९३० सालीं मी औरगांबादेस गेलों तेव्हा मला आली.



**केशवरावजी कोरटकर**

## गोविंदाचा गफूरखांच व्हायचा पण थोड्याशानं निभावलं

औरगांबादजवळ मोटार रोडवरच एक गाव होतं. तिथे खामगावच्या श्री. त्र्यंबकराव भडंग वकीलाच्या नातेवाईकाचं लग्न होतं. मला त्या लग्नाचं

निमंत्रण होतं. जाणं जरूरच होतं कारण त्यांचे व माझे संबंध नातेवाईक म्हणून व सार्वजनिक कार्यकर्त्यांचे- त्या गावचे ते सार्वजनिक कार्यकर्त्यांचे नेहमीचेच यजमान म्हणून. जातांना हाही विचार केला कीं औरंगाबादेस आपण जातोंच आहों तर वेरूळचीं लेणीं व दौलताबादचा किल्लाही पाहून घ्यावा. पण हें सर्व ठरलेल्या वेळांत पाहून घेऊन गोरज मुहुर्ताच्या लग्नाला हजर रहावयाचं म्हणजे ट्याक्सीनच प्रवास करणं जरूर होतं. मी नागरपूरहून रेल्वेने निघून औरंगाबादला सरासरी ९।१० च्या सुमारास पोचलों. स्टेशनवर उतरल्याबरोबर ट्याक्सीचा बंदोबस्त करावा म्हणून तिथे प्लॅटफार्मवर एक चांगला पोषाख केलेला – सुटबुटमधे – गृहस्थ दिसला. तो थोडा लांब असतानांच मी त्या गृहस्थाला इंग्रजींत हाक मारली. उत्तर आलं नाही म्हणून जवळ गेलों. वाटलं बहिरा असेल जवळ जाऊन बोलावं. त्याच्याशीं इंग्रजींत 'औरंगाबादला भाड्याच्या ट्याक्सी मिळतात कां?. मला एक वेरूळच्या लेणीला जाण्याकरितां पाहिजे' असं म्हणालों. माझ्या प्रश्नाचं उत्तरच नाही. मला वाटलं हा फारच बहिरा तरी असला पाहिजे, किंवा तिरसटराव तरी. वेळ फुकट जाऊं नये म्हणून माझं सामान एक होल्डऑल व एक सुट केस – दोन्ही वस्तूंवर माझं नांव व गावाचं नांव नागपूर एवढंच होत व तें ही इंग्रजींत – ह्या दोन्ही वस्तू फर्स्टक्लास वेटींगरूममधे ठेऊन लगेच स्टेशन मास्तरकडे गेलों व वेरूळला जाण्याच्या टयाक्सीसंबंधीं चौकशी केली. स्टेशन मास्तर इंडीयन ख्रिश्चन किंवा ॲंग्लोइंडीयन असावा. तो म्हणाला "मी व्यवस्था करतों. तूं आपलं ब्रेकफास्ट तोपर्यंत उरकवून घे." मी त्याचे आभार मानून स्टेशनवरच्याच रिफ्रेशमेंट रूममधे ब्रेकफास्टचा आरडर दिला व तिथेच एका टेबलावरील बेसीनमधे हात धुतले. इतक्यात कांही वेळापूर्वी ज्या मनुष्याशीं मी बोलण्याचा प्रयत्न केला होता पण जो माझ्याशीं बोलत नव्हता तो तिथे आला व आल्याबरोबरच म्हणाला "तूं आपलं सामान – होल्डआल व ट्रंक- इथे घेवून ये." मी त्याच्याजवळ त्याला एका एकी माझ्या संबंधी जो सहानुभूतिचा उमाळा आला त्या बद्दल चौकशी करावयाला लागलों. तो म्हणाला सांगतों पण प्रथम तूं आपलं सामान इथे लवकर आण. मी एका हमालाकडून माझं सामान वेटींगरूममधून रिफ्रेशमेंटरूममधे घेऊन आलों.

तो सांगूं लागला. "मी. पी. डब्ल्यु. डी. मधला नोकर आहे. माझी पेनशनची वेळ आली आहे. अशा वेळीं ह्या राज्यांत हिंदुंना मोठं जपून वागावं लागतं. नाही तर कांही तरी खुसपट काढून सरकार पेनशन बंद करतं. देतच नाही किंवा नोकरीवरुन दूरही करतं. सरकारचा तेवढा पैसा वाचतो व एखाद्या नवीन – त्यांतही गैरमुलकी म्हणजे अलीगड कडील – मुसलमानाची भरती होते. म्हणून हिंदुंना मोठं काळजीपूर्वक वागावं लागतं. कोणा तिऱ्हाईत मनुष्याशीं बोलावं कीं नाही हा विचारच पडतो. आता सामान इथे आणण्या-संबंधी आग्रह कां केला हेंही सांगतों. वेटींगरूममधे जाऊन सामान कोणाचं हें पाहिलं. नाव हिंदु दिसलं व गात्र मध्यप्रांतांतलं म्हणजे दुसऱ्या प्रांतांतलं. मला वाटलं ह्या राज्यांत जे धोके आहेत त्या संबंधी तुला माहिती नसावी. तुझ्या होल्डआलमध्ये एखाद्या लुच्च्या माणसांला कांहीही कागद घालतां आले असते व मग तुझ्यावर कांहीही आरोप ठेवण्यांत आले असते. नंतर काय झालं असतं हें सांगणं कठीण. निझाम सरकारचं एक धार्मिक खातं आहे. त्या धार्मिक खात्यातर्फे निझाम सरकारकडे परधर्मांतून इस्लामी धर्मांत किती माणसं आलेत – ते फसवून, वा जबरदस्तीनंही आणलेले असतील वा अज्ञानानं आले असतील – ह्याचे रोज रिपोर्ट जात असतात. फसवून ह्या धर्मांत कसं आणतात ह्याचं तुला एक उदाहरण देतों. एखादा गृहस्थ रस्त्याने जात असला कीं त्याच्या मागून येणारा गृहस्थ त्याच्या जवळ येऊन विचारतो, 'आपने अलाहजरतकी हजार रुपये की नोट देखी है क्या?' तुम्ही सहजच म्हणतां 'नही.' मग तो तुमच्याजवळ ती नोट देतो. तुम्ही जरा कौतुकानं नोटीकडे पाहूं लागला कीं तो आरडा ओरडा करतो. 'चोर रे चोर–दवडो.' लगेच एक मनुष्य तिथे हजर होतो. हा त्याच्या बरोबर आलेला त्याचा सोबतीच असतो. हे सर्व झाल्यावर तुमच्या विरूद्ध मामला तयार झाला. नोटीचा मालक फिर्यादी, तुमच्या जवळ नोट म्हणून तुम्ही आरोपी व तुमच्या जवळ नोट पाहिलेला साक्षीदार, मुकर्दमा पेश होतो व तुम्हाला शिक्षाही होते. तुरुंगांत जाच असा होतो कीं नोटचा मालक किंवा जेलर तुम्हाला म्हणतों कीं तुम्ही जर मुसलमान झालांत तर या यातनांतून सुटाल व अशा रीतीनं मग कांही जण आपली सुटका करून घेतात." मी ह्या गृहस्थाचे मला

धोक्याची सूचना दिल्याबद्दल आभार मानलेत. गोविंदाचा गफूरखां झाला नाही ह्याबद्दल स्वतःचं अभिनंदन केलं. ब्रेकफास्ट घ्यावयास बसलों असतांना ब्रिटीश इंडीयापेक्षा संस्थानांत प्रवास करण्यासारख्या साध्या बाबतींतहा किती दक्षता घ्यावी लागते ह्याची जाणीव झाली. ब्रेकफास्ट आटोपून स्टेशन मास्तरकडे गेलों. त्यानं माझी एका पारशी गृहस्थाची ओळख करून दिली. व मी एलोराला जाण्या येण्याबद्दल काय द्यायला पाहिजे हेंही सांगितलं. मी मोटार ट्याक्सींत-ही त्या पारशी गृहस्थाची खासगी गाडी – आपलं सामान टाकलं. एलोरा केव्हज् व दौलताबादचा किल्ला दोन्हीही ठिकाणं पाहिलींन व औरंगाबादची Water mill ही पाहिली. हा पारशी गृहस्थ पी. डब्ल्यु. डी. ऑफीसर होता. तोच गाडी हाकत होता. सज्जन गृहस्थ. त्यानं दौलताबादचा किल्ला पाहण्यासंबंधी परवानगीही मिळवून घेतली होती. ह्या प्रसंगानंतर मात्र मी कोणत्याही संस्थानांत प्रवास करावयाचा असल्यास विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर अशा रीतीनंच वागत असे. त्या हिंदु गृहस्थानं दिलेली धोक्याची सूचना मी विसरलों नाहीं. वर दिलेल्या गोष्टीवरून ध्यानांत आलं असेल कीं हिंदुंचं स्वाभिमानपूर्वक जीवन जगणं ह्या निझामी राज्यांत किती कठीण आहे. नव्हे जगणंच किती कठीण आहे. पाण्यावरच्या बुडबुड्या सारखंच. केशवरावजींना तर अशाच राज्यांत हिंदुसंघटन व हिंदुंची संस्कृति, व मराठवाड्यांत मराठ्यांची परंपरा व त्यांची मायबोली कायम ठेवण्याचा कामगिरी करावयाची होती. हे सर्व स्वार्थत्यागाची तयारी असलेल्या, येतील त्या संकटांना तोंड देणाऱ्या धैर्यवान माणसालाच साध्य होणार होतं. व केशवरावजी कोरटकर असे गृहस्थ होते. ते आर्यसमाजिस्टांचे प्रमुख आधारस्तंभ. मुसलमानी राज्यांत आर्यसमाजिस्टांचा प्रमुख आधारस्तंभ म्हणजे काय हें जास्त विशद न करतां-नाही समजण्यासारखं आहे ! ते निझामी राज्याबाहेर कुठेही गेलेत तर त्यांच्या पाठीमागचा गुप्त पोलीसाचा ससेमिरा कधी चुकला नाही. निदान १९३२ पावेतो तरी तो होताच हें त्या सालांतील एका घटनेवरून कळून येणार आहे. त्या संबंधीची माहिती पुढे येणारच आहे.

### मालगुजारावर संक्रांत

विदर्भ साहित्य संमेलानानंतर म्हणजे १९३० च्या जुलै महिन्यांत सत्याग्रहाच्या धामधुमीच्या काळांतच वर्धा जिल्हा शेतकी परिषद बोलाव-

ण्यांचं निळकंठराव उर्फ बाबासाहेब देशमुख ह्यांनी ठरवलं. पण ते तळेगांव (त. आर्वी) च्या सरकारी जगंलांत जगंल सत्याग्रह करुन तुरुंगांत गेले. त्यांच्या पश्चात ही परिषद ता. २७ जुलै रोजीं माझ्या अध्यक्षतेखाली झाली. परिषदेच्यावेळची वर्धा जिल्ह्यांतील राजकीय परिस्थिती फार नाजुक होती. प्रांतांत सर्वत्र जगंल कायदेभंग सुरू झाला होता. हा कायदेभंग सरकारी जगंलापुरताच मर्यादित होता. पण नंतर थोडेच दिवसांनी सरकारी जंगल कायदेभंगाची संक्रांत वर्धा जिल्ह्यांत मालगुजारांच्या शिंदीच्या (ताडीच्या) झाडावर आली. खेड्यांतील लोकांनी शिंदीचीं झाडें तोडण्याचा उपक्रम सुरू केला. ह्यांत सरकार विरूद्ध जनता हा प्रश्न नव्हता तर माल-गुजार विरूद्ध कास्तकार किंवा ठलवे. त्याच प्रमाणे ह्या सत्याग्रहांत ब्राम्हण ब्राम्हणेतर हाही सवाल नव्हता. प्रांतांत बहुसंख्य मालगुजार ब्राम्हणेतरच व कास्तकारांतही बंहुसंख्य ब्राम्हणेतरच. भांवलशाही विरूद्ध हा उठाव होता असं म्हणतां येईल; त्याच प्रमाणे दारूच्या विरुद्ध ही मोहीम होती असं म्हणतां येईल. मालगुजाराचं नुकसान होऊं लागलं, सरकार माल-गुजारांना पोलीसची मदत देण्यास तयार होते. पण ती घेण्याची कोणाही मालगुजाराची हिम्मत होईना. कारण राजकीय वातावरण तसंच प्रक्षुब्ध झालं होतं. ज्या मालगुजारानं सरकारची मदत घेतली असती त्याच्यावर पडला असता सामाजिक बहिष्कार. बरं स्वस्थ बसावं तर शिंदींची झाडं, बनच्या बन, तुटुन त्या झाडापासून होणारं उत्पन्न नाहीसं होणार. बरं इतकंहीं करुन स्वस्थ बसावं तर त्यालाही कांही मर्यादा आहेच. म्हणून मालगुजार व कास्तकार यांच्यांत तडजोड घडवून आणावी ह्या करितां ही परिषद भरविली होती. ह्या शिवाय इतरही मामुली विषय होते. पण कट-कटीचा विषय हाच. ह्या शिंदीच्या झाडाच्या सत्यग्रहाचा प्रश्न मी आपल्या अध्यक्षीय भाषणांत अशा रीतीनं सोडवला. शिंदीच्या झाडाचीं पानें घरगुती वस्तुचे कामीं पडतात सबब तीं झाडें कोणी तोडूं नयेत व कोणीही मालगुजाराने शिंदी-ताडीसाठी झाडें मक्तयाने देऊं नयेत.

कांही दिवसांनी सय्यद अबदुल्ला ब्रेलवी ह्यांनी 'बाम्बे क्रानिकलच्या' त्या वर्षीच्या 'स्पेशीयल' अंकांकरितां मला एक लेख लिहून पाठवायला

सांगितलं. मी लेख पाठविला व तो "Wanted Dare Devils" ह्या शिर्षकाखाली प्रसिद्ध झाला. त्याचा अनुवाद मुसलमान समाजासंबंधीचा भाग वगळून मी 'महाराष्ट्रांत' केला. "Wanted Dare Devils" लेखाचा 'महाराष्ट्रांत' केलेल्या अनुवादाचा सारांश.

## हिंदूंत धाडशीपणा कसा निर्माण होईल

स्वातंत्र्य कोण मिळवूं शकेल. ? ह्या मुद्यासंबंधी चर्चा करून मी म्हटलं आहे, "आपल्या मातृभूमीला दास्यमुक्त करून ज्यांनी तिचें वैभव वाढविलें, परकीयांच्या हल्ल्यांपासून ज्यांनी आपल्या मायदेशाचा बचाव केला, ते लोक कच्च्या दिलाचे आणि ठिसूळ घडणीचे नव्हते. ते धाडशी होते- त्यांची वृत्ति वीराची होती. साहस हा त्यांच्या कर्तृत्वाचा आत्मा होता. हिंदुस्थानांतील सर्व जातीचे व धर्माचे लोक जरी एक झाले, सर्व भारतांत एक भाषा व एक धर्म जरी कदाचित उद्यां, यक्षिणीची कांडी फिरून, प्रचालित झाला, सर्वांचे हितसंबंध जरी एकवटले, तरी तेवढ्याने हिंदुस्थान स्वतंत्र होऊं शकणार नाही. स्वदेश हेंच एक दैवत मानून त्याच्या आराधनेसाठी अकुतोभय वृत्तीने स्वार्थावर आणि सर्वस्वावर लाथ मारणारे साहसी पुरूषच या भारतभूमिला स्वतंत्र करूं शकतील." हिंदूंच्या धाडसाच्या अभावाबद्दल जीं अनेक कारणें दिलीं जातात त्या पैकी 'वेदांताने नेभळे बनवले आहे' ह्या संबंधी लेखांत म्हटलें आहे, "आपलें निवृत्तिपर तत्वज्ञान हें या मानसिक दौर्बल्याचें एक कारण म्हणून सांगितल्या जाते. पण धनुर्धर अर्जुनाच्या किंवा मराठी राज्याचा पाया घालणाऱ्या शूर शिवाजी महाराजाच्या वेळीं ही निवृत्तिपर तत्वप्रणाली अस्तित्वांत नव्हती काय ? शिवाय या तत्वज्ञानाची शिकवण तरी काय आहे ? तर आत्मयज्ञ- ऐहिक सुखाचा संन्यास- हें वेदांताचें तत्वज्ञान जर कोणतें ध्येय समाजाच्या डोळ्यापुढे ठेवित असेल, तर तें स्वतःच्या जिवाची परवा न करण्याचें, स्वार्थावर लाथ मारण्याचें. अशा तत्वज्ञानाच्या शिकवणुकीचा परिणाम असा झाला पाहिजे कीं लोकांत त्यागवृत्ति उत्पन्न होऊन, समाजाच्या सेवेसाठी लोकसंग्रह करण्याची स्फूर्ति त्यांना झाली पाहिजे. हिंदतत्वज्ञानाची ही उज्वल शिकवण कुठे आणि त्याचा वारसदार

जो हिंदुसमाज त्याची स्वार्थलोलुप हीन मनोवृत्ति कुठे! आजचा हिंदु हा फक्त स्वतःच्या प्रपंचापुरते पहातो–त्याला दुसरें ध्येय नाही. तो साहसाच्या कृत्याला कधीही प्रवृत्त होत नाही.'' मांसाशनाभाव हेंही कारण नव्हे हें इतिहास प्रसिद्ध पुरुषांच्या उदाहरणानं व कांही जातींचा उल्लेख करून ह्या लेखांत पुढें म्हटलें आहे "साहसाचा अभाव हा मनाचा रोग आहे, शरीराचा नव्हे" व 'हा रोग कसा नष्ट होईल?' ह्या प्रश्नाचा विचार करतांना म्हटल आहे "आज ज्या वेळीं एखाद्या प्रौढ हिंदुपुढे जिवावर उदार होण्याचा प्रसंग उद्भवतो, तेव्हा पहिल्या प्रथम त्याच्या मनांत आपल्या बायका मुलांच्या भवितव्याचा प्रश्न उद्भवून त्याचे हात पाय गळतात. प्राचीन काळीं आश्रमधर्म अस्तित्वांत होता व त्यामुळे स्वतःच्या बायकामुलांतच गुरफटलेले लोक कमी होते–फक्त गृहस्थाश्रमीच.'' व म्हणून लेखांत आश्रमधर्माचें पुनरुज्जीवन करा! असं म्हटलेलं आहे. "ब्रम्हचारी राष्ट्रांत निर्माण झाल्यास राष्ट्रकार्यासाठी स्वार्थत्याग करणाऱ्या तरुणांची वाण पडणार नाही. तरुण सन्यासी वर्गही वाढला पाहिजे म्हणजे निस्वार्थ काम करणारे स्वयंसेवक आपल्याला मोठ्या प्रमाणावर मिळतील. तसेंच वरिष्ठ जातींत पुनर्विवाह प्रचलित झाले पाहिजेत आणि पडदा पद्धति नष्ट झाली पाहिजे. ज्याच्यांत पुनर्विवाह रूढ आहे आणि पडदा नाही अशा लोकांना आपल्या बायकांची फारशी काळजी वाटत नाही. ते म्हणतात "मी मेलों तर बायको पाट (पुनर्विवाह) करील किंवा शेतांत, कारखान्यांत जाऊन पोट भरील. अर्थात आपल्या बायकापोराचे आपल्या मागे कसें होईल या काळजीचा ससेमिरा त्याच्या मागे नसल्यामुळे तो वाटेल तें साहस करायला प्रवृत्त होतो. सर्वच स्त्रियांना पुनर्विवाह इष्ट वाटणार नाही किंवा शक्य होणार नाही. तसेंच ज्यांचा दर्जा चांगला आहे, अशा स्त्रिया मजुरी किंवा नोकरी करूं शकत नाहीत. अर्थात त्यांचीही सोय झाली पाहिजे. ती करावयाची म्हणजे स्त्रियांना वारसा हक्क दिला पाहिजे.

प्रौढ विवाह, विधवा विवाह, पडदा पद्धतीचा त्याग, स्त्रियांना वारसा हक्क देणें इत्यादि सुधारणामुळे स्त्रियांची असहायता अंशतः कमी होऊन पुरुषांना प्रपंचाच्या काळजीचा इतका धाक वाटणार नाही व ते धाडसाला बेदरकारपणे प्रवृत्त होतील'' असं शेवटीं त्या लेखांत म्हटलेलं आहे.

**मेलेल्या प्रांतांत जीव घालणारी स्वदेशी लीग**

वर्धा येथील शेतकी परिषदेंतलं काम आटोपून मी मुंबईस आपल्या

बंधुकडे गेलों आणि तिकडून १९३१ च्या सुरवातीस आलों. आलों त्या वेळेस प्रांतांत चळवळ कांहीच नव्हती. सर्व सार्वजनिक चळवळी बंद झाल्या होत्या. कांग्रेसचे मुख्य मुख्य पुढारी कायदेभंगामुळे व जंगल सत्याग्रहामुळे तुरुंगांत होते. सामान्य कांग्रेसवाले स्वस्थ बसले होते. प्रांताचा दम निघून गेला की काय असं वाटे. पण सरकारला असं वाटूं देणं ठीक नव्हतं. दडपशाहीचे उपाय योजले म्हणजे लोक तेव्हाच ताळ्यावर येतात असं सरकारला वाटूं देणं कार्यकर्त्यांच्या दृष्टीनं ठीक नव्हतं. प्रांतांत फिरून आंदोलन सुरू केलं पाहिजे असा विचार करून महाराष्ट्राचे संपादक ओगले व कांही कांग्रेसचे स्वयंसेवक व डॉ. परांजपे, पी. एम. नायडू वकील-लेबर लीडर व कांग्रेसचे सभासद ह्यांना भेटून स्वदेशी लीग (संघ) स्थापन केली मी ह्या संघाचा अध्यक्ष व शेषराव पांढरीपांडे हे सेक्रेटरी.

संघाचं नाव 'स्वदेशी लीग' ठेवतों आहे ही मोठी घोडचूक आम्ही करीत आहों. सरकार आमच्यावर कारवाई करील. संघ बेकायदेशीर ठरेल. सभासदांना शिक्षा होतील. तेव्हा "गृहोद्योग प्रोत्साहक संघ" असं नांव ठेवा असं ताकही फुंकून फुंकून पिणाऱ्या हितचिंतक वकील मित्रांकडून सूचना आल्या. "स्वदेशी संघ" हें नांव ठेवलं तर "Beycott Ordinance खाली सरकार कारवाई करील." पण आम्ही 'स्वदेशी संघ' हेंच नांव कायम ठेवलं. ह्या वेळेस होम मेम्बर डॉ. राव होते. त्यांच्या त्या जुन्या काळच्या देशभक्तीची व 'स्वदेशी' बद्दलची परीक्षाच घेऊं या असं मी म्हणालों, "जें होईल तें होईल. भीत्यापाठीमागे ब्रम्हराक्षस हा नियम लागलेलाच आहे."



गो. वि. देशमुख

प्रांतांत चळवळ सुरू केलीच पाहिजे असं सर्वांनी ठरवलं. नागपूरपासून लांब लांबच्या ठिकाणीं पोलीसकडून त्रास झाला पण कोणावरही सरकारी कारवाई-कोर्टांतली-झाली नाही. स्वदेशी मालाला उत्तेजन देण्याबद्दलचा प्रचार करीत असतांना, परदेशी मालांवर बहिष्कार टाका हें म्हणणें आम्ही सोडलें नाही. फक्त केलं नाही परदेशी मालावर पिकेटींग. थंड पडलेल्या प्रांतांत आम्ही स्वदेशीनं प्राण घातला. ठिकठिकाणीं प्रांतांत सभा होऊं लागल्या व आमची मंडळी व्याख्यानं देऊं लागली. स्वदेशीचा प्रचार पुरुषांत ठिकठिकाणीं सभा भरवून होतच होता. पण तेवढ्यानच कांही भागणार नव्हतं. स्त्रियांतही स्वदेशीचा प्रचार झाला पाहिजे असं ठरवलं. तो महिना चैत्रमासाचा होता.

## चैत्रमासांतल्या हळदीकुंकवाचा जंगी जाहीर समारंभ

चैत्रमासांतले हळदीकुंकवाचे दिवस होते ते. महाराष्ट्रांत सामुदायिक रीतीने जे सण साजरे होतात त्यांत स्त्रियांकरितां त्या सणाची योजना केलेली आहे. जुन्या ओळखीच्या स्त्रियांच्या भेटी गाठी होतात व नवीन स्त्रियांची ओळख होते. कांग्रेस स्वयंसेविका एकत्र आणण्याकरितां व स्त्रियांत स्वदेशीचा प्रचार करण्याच्या दृष्टीनं माझ्या पत्नीनं 'महाराष्ट्र' वर्तमानपत्रांतून सर्व भगिनींनां हळदीकुंकवास येण्याची विनंति केली. हें पत्र 'महाराष्ट्र' पत्राच्या १९३२ च्या एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध झालें.

## हळदीकुंकू व स्वदेशी प्रदर्शन

"सौ. रमाबाई देशमुख (बॅ. गोविंदराव देशमुख अध्यक्ष स्वदेशी प्रचारक मंडळ नागपूर यांच्या पत्नि) या आम्हास कळवितात की आज रविवारीं संध्याकाळीं ५ वा. आमच्या घरीं (सिव्हील स्टेशन जिल्हा कचेरीजवळ) चैत्र मासानिमित्त हळदीकुंकू करण्याचें योजिलें असून त्याबरोबरच स्वदशी मालाचें एक लहानसें प्रदर्शनही आम्ही ठेवणार आहोंत. या प्रसंगीं "स्वदेशी"वर कांही स्त्रियांचीं व्याख्यानें व मुलींचे लाठी काठीचे खेळही होणार आहेत. तरी सर्व भगिनीवर्गाने हळदीकुंकवास अवश्य यावें अशी विनंति आहे." ह्या हळदीकुंकवाच्या समारंभाचें वर्णन महाराष्ट्राच्या १९३२ च्या ता. १३ एप्रिलच्या अंकांत एका स्वदेशी प्रचारिकेने लिहून पाठविलें. त्यांतील



सौ. रमाबाई देशमुख

महत्वाचा भाग हा. "सुमारे हजार दीड हजार स्त्रिया ह ़र होत्या. या प्र ंगीं गौरीची माडणी अगदी शुद्ध स्वदेशी तत्वाला धरून केली होती. बहुधा हळदीकुंकवाच्या-वेळीं गौरीच्या पाठीमागे परदेशी शालू, शेले, परदेशी चित्रें, परदेशी साखरेचे पांढरे शुभ्र बत्तासे, परदेशी फोटो इ. मांडून आरास करण्यांत येते. जणू काय गौरीचा आरास म्हणजे परदेशी वस्तूंचें प्रदर्शनच! पण देशमुखाची गौर हिरव्यागार कुंड्यांनी सजलेली होती. बाहेर बंगल्याच्या आवारांत एक छोटेसें स्वदेशी वस्तूंचें प्रदर्शन ठेवलें होतें.

समारंभास ५ वाजतां सुरवात झाली. प्रथम लाठीकाठी, लेझीम इत्यादि मर्दानी खेळ मुलींनी करून दाखविले. नंतर स्वदेशी व्रतावर मंजुळ गाणीं गाऊन दाखविण्यांत आलीं. मग सौ. साळवे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. श्री. सुशीलाबाई गाडगीळ व चंद्राबाई पटवर्धन यांची स्वदेशीवर कळकळीचीं भाषणें झालीं. समारंभ ३ तास चालला होता. हा समारंभ सद्यःस्थितीला अनुरूप व अनुकरणीय झाला. त्यांत नाविन्य होतें. तो स्त्रीवर्गास आवडला यात काय आश्चर्य?"

'वसंत गौरी व स्वदेशी' ह्या शीर्षकाखाली संघाच्या सौ. साळवे, सौ. लक्ष्मीबाई देऊस्कर इत्यादि प्रचारिकांनी सदर्हु प्रसंगांचें वरील आशयाचेंच

पत्र 'महाराष्ट्रांत' प्रसिद्ध केलें व त्या समारंभाचें अनुकरण करावें अशी विनंति केली.

### अ. भा. स्वदेशी प्रदर्शन

ह्या प्रांतांत कधी न झालेली अशी गोष्ट त्या स्वदेशी प्रचारामुळे करण्यांत आली. ती म्हणजे एक फार मोठ्या प्रमाणांवर अखिल भारतीय स्वदेशी प्रदर्शन. एवढं 'भव्य' स्वदेशी मालाचं प्रदर्शन तोपर्यंत झालं नव्हतं एवढंच नाही तर त्या नंतरही झालं नाही. ह्या प्रांतांत स्वदेशी तर राहोच पण नुसतें प्रदर्शन-स्वदेशी विदेशींचा भेदभाव न करितां प्रथम झालें तें १८६६ सालीं. त्या नंतर त्याच तऱ्हेच दुसरं प्रदर्शन झालं ४२ वर्षांनंतर म्हणजे १९०८ सालीं. हीं दोन्ही प्रदर्शनें सरकारमार्फतचीं. त्या नंतर २५ वर्षांनंतर भरणारें हें प्रदर्शन व तेंही फक्त स्वदेशी मालाचं व सरकारच्या सहानुभूतिशिवाय. प्रदर्शन बिनसरकारी पण व्याप अखिल भारतीय. त्या प्रदर्शनाची कल्पना मी चांदा, यवतमाळ, अकोला वगैरे ठिकाणीं १९३२ च्या गणपति उत्सवांत व्याख्यान देण्याची संधि साधून लोकांसमोर ठेविली व अशा रीतीने प्रचार केल्यानंतर अ. भा. स्वदेशी प्रदर्शन १९३३ च्या फेब्रुवारी महिन्यांत नागपूरांत चिटणीस पार्कमधे भरविण्यांत आलें. प्रदर्शनांत बगांल, ओरीसा, यु. पी. अलीगड व मथुरा व बनारस-ओरीसा, मध्यप्रांत व वऱ्हाड, हैदराबाद (निझामचें) व मुंबई येथून बरेचसे दुकानदार निरनिराळ्या तऱ्हेचा स्वदेशी माल घेऊन आले होते. प्रत्येकाला त्यानं स्वदेशी प्रदर्शनांत मांडावयाच्या मालासंबंधी तो स्वदेशी आहे असं अफीडेव्हीट करावं लागे.

### महात्माजींचा प्राणांतिक उपवास

ह्या प्रांतात ह्या वर्षी औद्योगिक क्षेत्रांत चळवळ चालू ठेऊन जो उत्साह जनतेंत उत्पन्न केला होता तो उत्साह व चैतन्य कायम ठेवण्यांत राजकीय क्षेत्रांतही एक महत्वाची घडामोड झाली. महात्मा गांधी यांनी जातीय निवाडा (कम्युनल अवार्ड) रद्द व्हावा म्हणून प्राणान्त उपवास सुरू केला. ह्या मुळे प्रत्येक प्रांतांतील कांग्रेस कार्यकर्त्यांना काळजी लागून गेली. अस्पृश्यांची मतं एखाद्या तडजोडीला मिळवून जातीय निवाडा रद्द करतां आला तर पहावा ह्या उद्देशानं श्री राजेंद्र बाबू नागपूरला आले व

डॉ. खरे यांचे येथे उतरले. डॉ. खरे हे प्रां. कां. कमिटीचे सभासद होते. ते बऱ्याच प्रमाणांत पुष्कळशा संस्थांत व कमिट्यांत काम करूं लागले होते. ( जोशी ह्यांनी लिहिलेलें डॉ. खरे यांचें चरित्र भाग १ ला ) पैकी हरिजन सेवक संघ मराठी मध्यप्रांत शाखेचे ते अध्यक्ष होते. ह्या संघाचा मी एक सभासद होतों. कम्युनल अवार्डने (स्वतंत्र मतदार संघाने) हिंदुसमाजांत फुट पाडल्या-बद्दल महात्माजीने जो प्राणांतिक उपवास केला होता तो अस्पृश्यांशीं तडजोड करून सोडणं शक्य व्हावं म्हणून डॉ. खरे यांनी श्री. राजेंद्रबाबू यांच्याशीं विचार विनियम करण्याकरितां एक अस्पृश्यांच्या गटाची प्रातिनिधिक सभा बोलावली. तींत बराच वेळ चर्चा झाली. चर्चा चालत असतांना महात्माजीचा जीव धोक्यांत आहे तेव्हा तडजोडीचा अनुकूल ठराव कराल तर बरें होईल असं राजेंद्रबाबू म्हणाले. तेव्हा अस्पृश्याचा एक प्रतिनिधी म्हणाला " महात्माजीच्या जीवाचा प्रश्न हा एका जीवाचा प्रश्न आहे. अस्पृशांचा प्रश्न हा सात कोटी जीवांचा प्रश्न आहे. " " भावनावश होऊन कसं चालेल. जे करायचं ते विचार करूनच केलं पाहिजे " असा त्याचा म्हणण्याचा आशय होता. आणि भावनावश होऊन ज्यांनी तडजोडीचा मार्ग काढला त्यांच्यावर नंतर पश्चातापाची पाळी आली हे पुढे दिलेल्या उदाहरणांवरून दिसून येईलच. नागपूरलाही थोडी चर्चा झाल्यानंतर तडजोडीस अनूकूल असा ठराव झाला. तो ठराव घेऊन श्री. राजेंद्रबाबू पुण्यास गेले. तिथे सर्व प्रांतांतील पुढाऱ्यांनी विचार विनीमय करून एक आराखडा तयार केला. तो गांधी आम्बेडकर प्याक्ट किंवा पुना प्याक्ट म्हणून प्रसिद्ध आहे. हा प्याक्ट (ड्राफ्ट draft) योग्य शब्दांत बसवण्यांत सर तेजबहादुर सप्रू ह्यांनी पुढाकार घेऊन आपला राजकारणाचा अनुभव, कायद्याचं ज्ञान, कौशल्य व बुद्धि खर्च केली. महात्माजीला व डॉ. आम्बेडकरांना पसंत पडेल असा तडजोडीचा मार्ग त्यांनी काढला.

### बंगालांत मगरानं गिळलेलं माणिक

वर जो पुना प्याक्ट सांगितला आहे त्यानं महात्माजींचा उपवास सोडण्यास मदत झाली. पण त्यामुळे एक नवीनच प्रश्न बंगालमधे उत्पन्न झाला. पुना कराराचा परिणाम बंगाल्यांतील भद्र लोकांना जाचक झाला.

डॉ. रविंद्रनाथ टागोर ह्यांनी महात्माजीना उपवास सोडता यावा म्हणून घाई घाईने त्या ठरावास सम्मति दिली. सर्व दृष्टीनं त्या ठरावाकडे पाहिलं नाही. महात्माजीनं उपवास सोडल्यानंतर ह्या करारामुळे भद्र लोकांना कसा अन्याय झाला ही गोष्ट त्यांचत्या (टागोर ह्यांच्या) लक्षांत आणून दिल्यानंतर त्यांनी व बंगाली पुढाऱ्यांनी ही गोष्ट महात्माजीच्या नजरेस आणली. त्यामुळे ह्या बाबतींत काय करतां येईल हें पहाण्याकरितां महात्माजीनी दीनबंधु सी. एफ. एंड्रयुज ह्याना पाठविलें होतें. सी. एफ. एंड्रयुज हे कलकत्त्याहून नागपूरास आले व ते अॅडव्होकेट परेख यांचेकडे उतरले. प्रो. राजूंना त्यांना (दीनबंधुना) भेटावयाचे होते म्हणून ते माझ्याकडे आले. ते व मी मिळून अॅडव्होकेट परेख यांचेकडे गेलों. एक (जाईंट एलेकटोरेटच्या) संयुक्त मतदार संघाच्या आधारावर हिंदुस्थानच्या घटनेचा कच्चा खर्डा प्रो. राजू यानी तयार केला होता तो त्यांच्या मनांतून सी. एफ. एंड्रयुज ह्यांना समजाऊन देऊन त्यावर त्यांच्या पसंतीचा शिक्का घ्यावयाचा होता. मी व सी. एफ्. एंड्रयुज शेठ जमनलालजी यांचे बंगल्यावरील गेस्ट हाऊसमधे एकदां दोन दिवस होतों. तेव्हाची माझी त्यांची ओळख. आम्ही दोघे, मी व प्रो. राजू, त्याना भेटल्यावर मी त्यांना म्हणालों "आपण कलकत्त्यास कोणत्या कामाला गेला होता ? सांगू शकतां कां ?" दीनबंधु एंड्रयुजः "पुना प्याक्टमुळे बंगालमधे बंगाली स्पृश्य हिंदुना बराच अन्याय झाला आहे व त्यामुळे बंगाली स्पृश्य हिंदूंत बराच असंतोष पसरला आहे असं महात्माजीना दिसून आल्यावर त्यानी मला युरोपियन्स लोकांना वाजवीपेक्षा जास्त मिळालेल्या (Seats सीट्स) जागां पैकी कांही स्पृश्य हिंदुंना (भद्र लोकांना) मिळविण्याचा प्रयत्न करून पहा असं सांगितलं. मी त्या (Mission मिशनवर) कामाकरितां गेलों होतों." मीः– मग काय झालं आपल्या मिशनचं ? झालं कां यशस्वी ? दी. एँड्रयुजः– ते काय आता घायला बसलेत ? Mission failed (यश मिळालं नाही.) ह्यानंतर प्रो. राजू ह्यानी आपली स्कीम (कच्चा खर्डा) त्यांना समजाऊन दिली व आम्ही परतलों.

सार्वजनिक कार्यात जिथं अनेक लोकांच्या हिताचा प्रश्न येतो तिथं भावनावश होऊन चालायचं नाही, जे कांही करायचं ते लोकांच्या हितावर

दृष्टि ठेऊनच करायला पाहिजे नाही तर फजीता होतो. लोकांच्या हिताची पायमल्ली होते त्याचं हें धडधडीत उदाहरण होतं. एखाद्या व्यक्तिनं आपला शब्द दिला आहे तो खरा करण्याकरितां लाखों लोकांचं नुकसान करणं हे एखाद्या व्यक्तिने उपवास केला आहे तो त्यानं सोडावा म्हणून लोकांच्या हितावर तिलांजली सोडणं हें योग्य आहे का ? हें श्रेयस्कर आहे का ? आणि उपवासाचं बंड तर आता असं माजलं की छोटा मोठा पुढारी सर्वच उपवास करूं लागलेत. लोकांच्या हिताचे प्रश्न सर्व बाजूंनीं विचार करूनच सोडवले पाहिजेत व ते सोडवतांना लोकांची बाजू समजून घेतली पाहिजे. नाही तर कसली डेमोक्रसी (लोकसत्ता)! एखाद्या व्यक्तीची इभ्रत, चार शिष्टांची इभ्रत, वा एखाद्या संस्थेची इभ्रत कायम राहावी म्हणून लोकांच्या हक्कांची वा हिताची राखरांगोळी करणं म्हणजे राज्य चालवणं (Govern) नव्हे. लार्ड कर्झन त्याला वाटेल तेच लोकाचं हित, त्याची स्वतःची इभ्रत कायम ठेवणं म्हणजेच लोकांचं हित, ह्या देशाचं हित व साम्राज्याचं हित, तो म्हणेल तीच पूर्वदिशा अशा रीतीनं वागला पण मग त्याला त्या सर्वांच फळही मिळालंच. लोकांचें राज्य, लोकांच्या विचारानंच चाललं पाहिजे. भावना, इभ्रत, इच्छा ह्यांना राज्यकारभारांत जागा नसावी. स्वतःच्या घरच्या कारभारांत ह्या गोष्टीवर विशेष जोर देऊन कोणालाही वागतां येईल पण जतनेच्या हिताच्या प्रश्नांत कोणालाही ह्या गोष्टींची कास धरून राज्य करण्याचा हक्क नाही. ते न्याय्य होणार नाही.

## राजकीय वातावरणांत बदल-कांग्रेसचा पार्लमेंटरी पक्ष

सन १९३४ चे एप्रिलचे पहिल्या आठवड्यांत राजकीय वातावरणांत बदल झाल्याचे निदर्शक असे वारे वाहूं लागले. ह्या आठवड्यांतच सत्युमूर्ति नागपूरला आलेत व त्यांनी माझ्या अध्यक्षतेखालीं "सध्याची राजकीय परिस्थिती" ह्या विषयांवर इंग्रजींत भाषण केलं. कौन्सील बहिष्काराचं धोरण घातुक आहे (१९३० पासून कांग्रेसने कौन्सीलसवर फिरून बहिष्कार टाकला होता) व निःस्वार्थ बुद्धीनं दिवाणगिऱ्या घ्या ह्या दोन मुद्यांवर त्यांचं भाषण झालं. त्यांनी नागपूर सोडतांना "हा कौन्सिल बहिष्कार उठविण्याचा प्रयत्न मी करणार आहे. तुम्हीही प्रांतांत चळवळ करून माझ्या ह्या कार्याला हातभार लावा" असा निरोप दिला. त्या दिशेने चळवळ सुरू झाली.

कौन्सिल बहिष्कार उटवून लावण्याची चळवळ एकाच महिन्यांत इतकी परिणामकारक होऊं लागली की महात्मा गांधींनीं स्वराज्यपक्षाला – कौन्सिल प्रवेशवादी पक्षाला– काँग्रेसचाच एक पार्लमेंटरी पक्ष या नात्याने कार्य करण्यास मंजूरी देण्याची आ. इं. कां. कमिटीस शिफारस करण्याचें कबूल केलें.

## अखेर कांग्रेस टिळकांच्या वळणावर गेली.

१९३४ सालांत कौन्सिल प्रवेशवादी पक्षाला कांग्रेसचाच एक पार्लमेंटरी पक्ष या नात्याने ओळखण्यांत यावयाचें ठरल्यानंतर त्याच सालच्या ‘निस्पृह’ साप्ताहिकाच्या आगष्टच्या टिळक स्पेशीयल अंकांत प्रसिद्ध करण्याकरिता ‘निस्पृह’चे संपादक श्री. कानेटकर यांचे म्हणण्यावरून एक लेख लिहून पाठविला. त्याचं शीर्षक ‘अखेर कांग्रेस टिळकांच्या वळणावर गेली’ हें होतं. त्या लेखांत कांग्रेस सुरू झाल्यापासून तो १९३४ च्या जुलै अखेरपर्यंतचा (थोडक्यांत) त्रोटक इतिहास देऊन म्हटलं आहे. “सांगण्यांत असें येतें की जुन्या स्वराज्य पार्टीचेंच पुनरुज्जीवन करीत आहों पण वास्तविक तसें नाहीं. स्वराज पार्टीचा प्रोग्राम अडवणुकीचा; सतत एकजात अडवणुकीचा. अधिकाराच्या जागा घेऊं नयेत असा स्वराज पार्टीचा एक नियम होता. आताचा प्रोग्राम पाहिल्यास असें दिसून येतें की ‘श्वेत कागदाचा’ निषेध केल्यानंतर निदान असा प्रयत्न केल्यानंतर व दुसरे जाचक कायदे



लो. टिळक

काढून टाकण्याचा प्रयत्न केल्यानंतर आता कौन्सिलमध्ये जाणारे लोक सर्व तऱ्हेचें काम करण्यास व जबादारीच्या जागा स्वीकारण्यास मोकळे आहेत. याचा अर्थ काय? आता कांग्रेस कोणाच्या वळणावर गेली? "सुधारणांचा शक्य तितका उपयोग करून घ्यावयाचा व तो करून घेतां घेतां पूर्ण स्वराज्य मिळविण्याची खटपट करावयाची असें आपलें धोरण निश्चित झालें आहे" असं ता. २२ मे १९२० रोजीं लो. टिळक पुणें येथे आपल्या भाषणांत म्हणाले होते.

लो. टिळक असहकारितेच्या विरूद्ध मुळीच नव्हते हें येथे नमूद करणें जरूरीचें वाटतें. त्यांचें म्हणणें "असहकारितेच्या तत्वावर विश्वास नाही कोणाचा? प्रश्न इतकाच की असहकारिता कोणत्या प्रकारची असावी. माझें तत्व असें आहे कीं जनतेच्या पुढे तर जावयाचें पण फार पुढे मात्र जावयाचें नाही. पुढारी जनतेच्या पुढे थोडासा असला तर त्याला अनुयायी आपल्या बरोबर नेता येतात. सर्व लोकांची मनापासून तयारी झाली म्हणजे असहकारिता काय किंवा दुसरा मार्ग काय सोपाच आहे. संघशक्ति नाही तो पर्यंत नुसत्या उच्च ध्येयाकडे पाहून काय करणार?" कायदेभगांची मोहीम सुरू करण्याकरितां महात्मा गांधींना १९३० पर्यंत थांबावें लागलें यावरून हेंच स्पष्ट होतें. १९२० पासून १९३० पर्यंत सार्वत्रिक सविनय कायदेभंग करण्याकरितां १० वर्षे लागलीं. आज अखेरीस कांग्रेस पुनः लो. टिळक यांच्या वळणावर गेली. पण लो. टिळकांच्या वळणावर म्हणजे सध्या प्रचलित असलेल्या रिस्पॉनसिव्हिष्ट लोकांच्या वळणावर नव्हे.

प्रतियोगी सहकारितां हे शब्द प्रथम बादशहानी सुधारणांची घोषणा केली व राजकीय कैदी सोडले तेव्हा लो. टिळकांनी योजिले होते. राज्यकर्त्यांनी अशंतः कां होईना पण लौकिक चळवळीचा परिणाम म्हणून ज्या अल्प सुधारणा दिल्या त्याला उत्तर म्हणून लो. टिळकांनी प्रमाणशीर सहकार्य देण्याचें कबूल केलें. सरकारकडून हिंदुस्थानांतल्या लोकांचें हित करण्या संबंधी खरोखरीचे यत्न झाल्यावाचून जनतेकडून प्रतियोगी सहकारिता मिळावयाची नाही. सरकारकडून असे प्रयत्न वारंवार झाले पाहिजेत तेव्हाच त्याना वरचेवर त्या त्या प्रमाणांत सहकार्य

मिळेल. १९१९ मध्ये बादशहांनी सुधारणा–त्या सदोष आहेत हें विसरून चालावयाचें नाही–दिल्या म्हणून त्यांशीं सहकार्य करून जास्त हक्काबद्दलची चळवळ अजीबात थांबवावयाची असा त्याचा अर्थ नाही. लो. टिळकांनी सुधारणा संबंधी 'जें मिळालें तें घ्या. सुधारणांचा शक्य तितका उपयोग करून घ्या' म्हणून सांगितलें हें रिस्पान्सीव्हीस्टच्या ध्यानांत राहिलें पण त्या बरोबरच 'बाकीचे मिळवण्याकरितां झटा,' 'सुधारणांचा शक्य तितका उपयोग करून घेतां घेतां पूर्ण स्वराज्य मिळवण्याची खटपट करा' ह्याची त्यांना आठवण राहिली नाहीशीं दिसते. प्रतिसहकारवादी लोकांनी लो. टिळकांची तजस्वी चळवळ, पूर्ण स्वराज्य मिळविण्याच्या दृष्टीने, तर केली नाहीच; पण कोणतीच राजकीय चळवळ रिस्पानसीव्हीस्ट पक्षाची चळवळ म्हणून चालविली नाही" आणखी पुढे या लेखांत म्हटलें आहे "रिस्पान्सिव्हिस्ट पार्टीचे लोक-कौन्सील मध्ये गेल्यापासून पार्टीने पूर्ण स्वराज्य घेण्याकरितां काय खटपट केली व ती खटपट लो. टिळकांच्या अनुयायांनी त्यांना कितपत शोभेशी केली हें समजलें तर ठीक होईल. निव्वळ लो. टिळकांच्या नांवावर खपण्याचे दिवस गेले. ज्या प्रमाणे सुधारणांचा शक्य तेवढा उपयोग करून घ्यावयाचा हा पूर्वीचा लो. टिळकांचा उपदेश अमलांत आणण्याचें कांग्रेसने ठरविलें त्याच प्रमाणे पूर्ण स्वराज्य मिळविण्याची खटपट करण्याचेही त्यांनी सोडलें नाही. खटपट सुरूच रहावयाची आहे. याचाच अर्थ असा की कांग्रेस शेवटीं लो. टिळकांच्या वळणावरच गेली.

## अभ्यंकर पक्ष व आवारी पक्ष

देशांतील राजकीय वातावरणांत वादळ होऊन ज्या प्रमाणे फरक पडत गेला त्याच प्रमाणे प्रांतिक राजकीय वातावरणांतही फरक पडला. प्रांतिक राजकीय पक्षांत भेद उत्पन्न झाले. १९३४ च्या जुलै पासूनच अभ्यंकर पक्ष व आवारी पक्ष असे दोन पक्ष कांग्रेस कार्यकर्त्यांत उत्पन्न झालेत. जनरल आवारीच्या पक्षानं नागपूर नगर कांग्रेस कमिटीतर्फे सभा बोलावून आपले राजीनामे दिलेत. सार्वजनिक सभांतून दंगल मचूं लागली. कांग्रेसच्या दोन पक्षांची अशी ही बेदिली असतानाच कौन्सीलचा कार्यक्रम लोकांसमोर मांडण्याकरितां श्री भुलाभाई देसाई नागपूरला आले. त्यांच्याबरोबर खान अबदुल

गफार खान हेही नागपूरला आले होते. श्री. भुलाभाई ह्यांचं व्याख्यान टाऊन हालमध्ये झालं. सभेला खूप गर्दी होती. सभा नीट रीतीनं पार पडते की नाही ह्याची धास्ती होती तरी ती सरते शेवटीं विशेष गडबड न होतांच पार पडली असं म्हणायला कांही हरकत नाही.

## हिंदुसभेशीं व रा. स्व. संघाशी माझा संबंध तुटला

ह्याच महिन्यांत कांग्रेस हायकमांडनं असं ठरविलं की कोणत्याही कांग्रेस-वाल्यानं हिंदुसभेचा व मुस्लिम लीगचा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा किंवा तांझीमचा वा इतर कोणत्याही स्वयंसेवक संघाचा सभासद राहूं नये. ह्या वेळपावेतों कांग्रेसवाले वर उल्लेखिलेल्या संस्थांचे सभासद राहूं शकत होते व त्या संस्थांशीं संबंध ठेवण्याला वा त्याच्या अधिवेशनाला किंवा कोणत्याही कार्य-क्रमाला हजर राहण्याला प्रतिबंध नव्हता. ह्या वर्षापूर्वी हिंदुसभेच्या एका अधिवेशनाला पंडित जवाहरलाल नेहरू व श्री राजेंद्र बाबू हजर होते. मध्यप्रांतांतही बॅ. अभ्यंकर व डॉ. खरे १९२७ च्या सर शंकरं नायर ह्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या हिंदुसभेच्या अधिवेशनाचे वेळीं कार्यकारी मंडळावर होते. १९२७ नंतर ह्या प्रांतांत हिंदुसभेचें धडाडीचें कार्य जवळ जवळ नाहींसेंच झालें होतें. ह्या संस्थेंत बॅ. सावरकर ह्यांनी त्यांची १९३७ मधे मुंबई सरकारने सुटका केल्यानंतर, चैतन्य उत्पन्न केलं व हिंदुसभेला नवीन व स्पष्ट असं राजकीय स्वरूप दिलं. माझा संबंध १९३५ सालापासून हिंदुसभेशीं व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशीं राहिला नाही.

## गड आला पण सिंह गेला

श्री. भुलाभाई देसाई यांच्या व्याख्यानानं सुरवात केलेली कांग्रेसची कौन्सील प्रवेशाची मोहीम हळूहळू मोठं स्वरूप धारण करूं लागली. कांग्रेसनं कौन्सील प्रवेशाची मोहीम सुरू केली तशीच पंडित मदन मोहन मालवीय ह्यांनीही सुरू केली. ह्या पंडीतजींच्या पक्षाचं नांव 'राष्ट्रीय' पक्ष. नागपूरला ह्या राष्ट्रीय पक्षाची जी शाखा स्थापन झाली त्या शाखेचे अध्यक्ष डॉ. मुंजे व सेक्रेटरी डॉ. चोळकर. कांग्रेस व राष्ट्रीय पक्ष ह्या दोन पक्षांत फक्त एकाच बाबतींत मतभेद होता. कांग्रेस पक्ष कम्युनल अवार्डच्या बाबतींत तटस्थ

रहाणार होता व राष्ट्रीय पक्ष त्या अवार्डच्या विरुद्ध चळवळ करून हाणून पाडणार होता. डॉ. मुंजे आपल्या पार्टीतर्फे उभे राहिले व कांग्रेस हायकमांडनं आग्रह करून अभ्यंकरांना उभं केलं. कांग्रेसमधल्या दोन्ही पक्षांनी-अभ्यंकर व आवारी पक्षानी-निवडणुकीकरितां-कांग्रेसची इभ्रत कायम रहावी म्हणून-जुळतं घेतलं व एक दिलानं निवडणुकीचं काम केलं. अभ्यंकर निवडून आले. अभ्यंकरांनी निवडणूक जिंकली. पण त्या निवडणुकींत यश मिळावं म्हणून त्यांनी जी मेहनत घेतली त्यामुळे त्यांची आधीच खालावलेली प्रकृति जास्त विघडली व अभ्यंकर स्वर्गवासी झाले. त्या नंतर लगेच थोड्या महिन्यांत पोट निवडणूक झाली. त्या करितां डॉ. खरे उभे राहिले होते ते बिनविरोध निवडून आले.

## राष्ट्रीय सभेच्या हीरकोत्सवाच्या वेळचें प्रदर्शन

सन १९३५ सालीं राष्ट्रीय सभेला (कांग्रेसला) पन्नास वर्षे झालीं म्हणून राष्ट्रीय सभेचा हीरकमहोत्सव करण्याचें कांग्रेस हायकमांडने ठरविलें व त्या ठरावाला अनुसरून नागपूरलाही हीरकमहोत्सव झाला. ह्या वेळेस डॉ. खरे प्रांतिक कांग्रेस कमेटीचे अध्यक्ष होते. ह्या हीरकमहोत्सवाचा एक कार्यक्रम म्हणून स्वदेशी प्रदर्शन करण्याचें प्रांतिक कांग्रेस कमिटीनं ठरवलें व तें जमवून आणण्याची सर्व जबाबदारी माझ्यावर टाकण्यांत आली.

## प्रदर्शनाला गांधीजींची मदत

प्रदर्शनाचं काम नीट रीतीन व्हावं म्हणून माझ्या अध्यक्षतेखाली मी एक कमिटी नेमली. तिचे प्रमुख सभासद श्री. जानकीराव नायडू, पी. एम. नायडू ॲडव्होकेट, वाचासुंदर व दामुअण्णा माझे बंधु हे गृहस्थ होते. कांही दिवसांनी मी महात्मा गांधींची मदत ह्या प्रदर्शनाच्या कामांत मिळावी म्हणून वर्धा येथे गेलों. महात्मा गांधींना भेटून अखिल भारतीय स्वदेशी व ग्रामोद्योग संघाच्या वस्तूंच्या 'स्वदेशी प्रदर्शनाची' माझी कल्पना त्यांना मी सांगितली व त्यांनी निरनिराळ्या प्रांतांतील खादी भांडारामार्फत प्रदर्शनाला सहाय्य करावें अशीं विनंति केली. महात्माजीचं व माझं कांही वेळ भाषण झालं व त्यांची "कोणत्याही मिलचें किंवा विलायती वा जपानी सुताचें हातमागावरील कापड-सुताचें, लोकरीचें किंवा रेशमाचें-तुम्ही प्रदर्शनांत ठेवलं नाही

व ठेऊं दिलं. नाहीं तरच मी मदत करीन," ही अट मान्य केल्यावर त्यांनी मदत करण्याची व्यवस्था केली. कांग्रेसच्या हीरकोत्सवाच्या स्वदेशी प्रदर्शनांत महात्मा गांधीच्या अटीमुळे एक नावीन्य उत्पन्न झालं. तें एक गृहोद्योगी स्वदेशी धंद्याचं प्रदर्शन बनलं व तिथे लोकरीचा व कापसाचा कपडा बनविण्याच्या क्रियांचं प्रदर्शन होऊं लागलं. हेंही प्रदर्शन चिटणीस पार्कातच म्हणजे अ. भा. स्व. प्रदर्शन भरवलं होतं त्याच ठिकाणीं भरवलं. ह्या प्रदर्शनाचं उद्‌घाटन राजेंद्रबाबू यांनी केलं.

ह्या प्रदर्शनांत आंध्रच्या लोकांनी आखूड धाग्याच्या कापसापासूनच तज्ञांच्या मताप्रमाणं ८० नंबरचं सूत काढून दाखवलं. सर्वांनाच आश्चर्याचा धक्का देणारी गोष्ट होती ती. ह्या सुताचे धोतरही लोकांनी पाहिलेत. हे सूत कातण्याला लागणाऱ्या वेळाचा जर बचाव करतां आला व ह्या सुताची प्रतिकार शक्ति ( Resisting power against power looms ) जर वाढवली तर लांब धाग्याचा कापसाचा प्रश्न थोडा बहुत सुटण्यासारखा आहे. पण ह्याकरितां यंत्रज्ञांनी व रसायनशास्त्रज्ञांनी खटपट करायला पाहिजे.

## कांग्रेस वाल्यांत दोन तट पडले

कांग्रेसच्या हीरकमहोत्सवापूर्वी पासूनच नागपूरच्या नगर कांग्रेस कमिटींत व प्रांतिक कांग्रेस कमिटींत दुफळी माजलेली होती. तीच आतांही कायम होती. शेठ पुनमचंद राका यांनी शिरसपेठेवर-शहराच्या आपल्या राहत्या भागांत कांग्रेसचा हीरकोत्सव साजरा केला. हीच दुफळी हीरकोत्सवानंतर हळूहळू वाढत गेली व तिचे परिणाम फार दूरवर पसरले.

———

# मी

## वर्धा (१८८६ - १८९६)

"हट्टांत हट्ट बाळहट्ट" असं प्रधान बिरबल, बादशहा अकबरला बोलतां बोलतां त्याच्या प्रश्नाला उत्तर देतांना बोलून गेला. "मला तुझं म्हणणं कबूल नाही. मुळीच कबूल नाही" असं बादशहा म्हणाला. बिरबल म्हणाला "ह्या प्रश्नाचा निकाल आताच लांऊं. हातच्या काकणाला आरसा कशास पाहिजे ? मी बनतों एक लहान बाळ. घेतों हट्ट. तुम्ही घाला बरं माझी समजूत." बादशहा ह्या गोष्टीस राजी झाला. बिरबलानं खूप खूप जोरानं रडायला सुरवात केली. बादशहानं विचारलं "का रडतोस ? काय झालं तुला ? काय पाहिजे ?" असे एक ना दोन किती तरी प्रश्न विचारले. बिरबलानं दोन्ही हाताच्या मुठी वळून डोळे चोळत चोळत आणखी आणखी जोरानं रडायला सुरवात केली. आकांत मांडला. बादशहानं विचारलं "तुला काय पाहिजे ? काय देऊं" बिरबलानं रडण्याचा सूर चढवला व रडतच म्हटलं "मला दूध पाहिजे." बादशहाला वाटलं ह्या बाळाची ही हौस पुरविणं म्हणजे अगदीच सोपी गोष्ट व आपण बिरबलला हरवणार. बादशहानं एक गाय बोलावून त्याच्या समक्ष तिचं दूध काढून एका चांदीच्या भांड्यांत ओतून त्याच्या समोर केलं व त्याला "हे घे दूध. पी." असं म्हणाला. बाळाचं रडणं थांबेचना ! तो ओक्साबोक्सी रडूं लागला. बादशहानं विचारलं "काय झालं. दूध पी. तुला दूध पाहिजे होतं ना. दूध पी व रडणं थांबव." बाळ म्हणाला "मला दूध नकोऽ नकोऽनको." बादशहा म्हणाला "तर मग आता काय करायचं या दुधाचं ?" बाळं म्हणाला, "जिथून काढलं तिथंच ठेवा" व गायीच्या स्तनाकडे बोट दाखवूं लागला. बादशहा विचारांत पडला. बादशहा कांही करत नाही हें पाहून बाळानं आणखी गोंधळ घातला, भोंगाडा पसरला. जें होऊंच शकत नाही तें, बादशहा झाला म्हणून काय झालं, कसं होणार ! बादशहानं हार खाल्ली. झगडा मिटला. बिरबलनं बाजू जितली. बाळहट्टाला ना तर्क, ना

ताळ, ना तंत्र. तें एक स्वतंत्र शास्त्रच आहे. मी जर असं म्हटलं की लहानपणीं मी फार हट्टी होतों तर ती कांही मुलखावेगळीच गोष्ट होती असं नाही. सर्वच मुलं हट्टी असतात व ते आपल्या मातेच्या वा पित्याच्या वा पालकाच्या नाकांत दम आणतात.

### आज्ञाधारकपणाचा धडा मिळाला

एकदा असं झालं की हिवाळ्याच्या दिवसांत सकाळीं थंड पाण्यानं स्नान



तात्याजी व दादीबाई

करण्याचा हट्ट मी धरला. त्या वेळेस माझं वय ६ । ७ वर्षांचं असेल. घरांतल्या सर्व जणांनी सांगितलं 'थंड पाण्यानं स्नान करूं नकोस. बिमार पडशील.' पण त्यांचं म्हणणं ऐकण्याकडे माझी तब्यत लागेना. मी त्यांचं न ऐकतांच स्नान करण्याच्या तयारीस लागलों. तितक्यांत कोणीतरी वडीलाना-तात्याजीना बोलावून आणलं. वडिलानं बजावलं "खबरदार थंड पाण्यानं आंग धुतलं तर, मार मिळेल" व निघून गेले. माझं स्नान सुरू झालं. इतक्यांत तात्याजी आले. त्यांनी ५ । ६ बोट रुंद अशी लाकडाची एक चपटी पट्टी जवळच पडली होती ती घेऊन मला मारावयाला सुरवात केली. बजावण्याचं प्रकरण बडवण्यावर गेलं. त्या पट्टीचा पाठीवर असा मार बसला कीं त्या माराची आठवण मी अझूनहीं विसरलों नाही. पट्टीच्या मारामुळे माझं आंग खूप दुखूं लागलं. पाठीनं चढ धरला व तापहीं आला. तात्याजीनं माझी ही स्थिती पाहिल्यावर डाक्टरला बोलावलं व औषधी दिली. दोन तीन दिवसांनी मला आराम वाटला. नंतर माझा हट्ट जो पळाला तो नेहमी करतांच. म्हणताताना 'मारते के आगे, भूत भागे.' नंतर तात्याजीच्या हुकमाची अवज्ञा मी कधी केली नाहीं. पण ह्या घटनेंतून नवीनच घटना उत्पन्न झाली.

## वडिलांना चांगलाच धडा मिळाला

मला खूप मारल्याची बातमी माझ्या चुलत्याला, दादाजीला, गावीं वाढोन्यास कळली. त्यांनी तात्याजीला सांगून पाठवलं की "ज्या अर्थी पोराला तूं मरे मरे तो मारलं त्या अर्थी मी आता वर्धेस येणार नाही. तुझं माझं बोलणं चालणं बंद." दादाजीनं सत्याग्रह पुकारला. असहकारितेचं शिंग फुंकलं. दादाजी आणि तात्याजी हे सख्खे चुलत बंधु. पण त्यांचं एकमेकांवर विलक्षण प्रेम व तात्याजीला दादाजीबद्दल विलक्षण आदर. यामुळे मला तरी वयाच्या पंधराव्या सोळाव्या वर्षापर्यंत ते चुलत भाऊ आहेत हे माहित नव्हतं. दादाजीचा मी व माझे भाऊ ह्यांच्यावर विलक्षण लोभ. गोपाळ (डॉ. बंधु) तर नेहमी म्हणतो की दादाजीसारखा चुलता कोणाला मिळाला नसेल. दादाजीनं सत्याग्रह पुकारल्यानंतर व तो अमलांत आणल्यानंतर थोड्याच दिवसांनी तात्याजीनी दादाजीला निरोप पाठविला की ह्या पुढे माझ्या हातून मुलांना अशी वागणूक मिळणार नाही. दादाजीजे व तात्याजीचे संबंध पूर्ववत

सुरू झाले. पण माझ्या मनावर तात्याजीनं मारण्याचा असा परिणाम झाला-माझ्या भावांवर सुद्धा-असा वचक बसला की त्यानी अमुक कर किंवा करूं नको असं म्हटलं की त्यांच्या म्हणण्याप्रमाणेच आम्ही वागत होतों. "धाक बडी चीज है" असं म्हणतात तेंच खरं.

तात्याजीचं मला तें मारणं आक्षेप ठेवण्यासारखं आहे असं मला केव्हाही वाटलं नाही. कित्येक निरनिराळ्या जातीच्या, – अरब, काठेवाडी वगैरे – अडेल तट्टूच्या बाबतींत माझा स्वतःचा अनुभव असा आहे की त्याची समजूत घातल्यानं त्याच्याशीं बोलून त्याला चुचकारल्यानं तो क्वचितच अडेलपणा सोडतो. तट्टू केव्हा केव्हा कशाला बिचकून अडतं. कागद, सडकेवरील पाण्याचा मोठा नळ, किंवा टीन वा इतर वस्तू ह्याना बिचकून तट्टु अडतं नाही असं नाही. अशा वेळेला शांत आवाजांत तुम्ही त्याच्याशीं बोललांत, त्याला समजवलं की ह्यांत भिण्यासारखं कांही नाही. तर तें तट्टू चालूं लागतें. पण जिथे तट्टू असं कांही व्यंग नसता जाणून बुजून जमिनींत पाय रोऊन अडेलपणा करतं तिथे त्या तट्टूला चौदाव्या रत्नाचा प्रसाद मिळाल्यावाचून तें रस्त्यावर येत नाही, हेकडपणा सोडत नाही, वठणीवर येत नाही. आणि अशा रीतीनं त्या तट्टूला तुम्ही सीधा आणला की तें तट्टू त्या स्वाराला कधीही विसरत नाही. तट्टू स्वाराचा आवाज, त्याची मांड व लगामाची पकड याची चांगलीच आठवण ठेवतो. तट्टूकडून नुसत्या आवाजानं किंवा इशाऱ्यानं तुम्ही काम घेऊं शकता.

चार किंवा पांच वर्षावरील मुलानं खूप हट्ट घेतला म्हणजे त्याच्याशीं बुद्धिवाद केल्यानं, चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्यानं व गोड गोड बोलल्यानं तो आपला हट्ट सोडून समजूतदारपणानं वागेल असं क्वचितच घडण्याचा संभव. ह्या माझ्या मताहून माझ्या दोन मुलींचं, कु. मालती, बी. ए, बी. टी. कोविद व कु. शांता बी. ए., बी. टी. कोविद ह्यांचं, मत भिन्न आहे. त्याच प्रमाणे माझ्या डाक्टर बंधुचं-गोपाळचं-मत माझ्या मताशीं ह्या बाबतींत जुळत नाही. ह्या सर्वांची मदार सायकॉलाजीवर आहे. त्या शास्त्राला ते जास्त मानतात. पण असं जरी आहे तरी मी आपलं मत बदलवायला तयार नाही. दोघीही मुलींचा शिकवण्याचा अनुभव मर्यादित म्हणजे मुलींना शिक-

वण्या पुरताच. मध्यमवर्गाच्या कुटुंबांतील मुलींना वळण लावणं कठीणसं काम नाही व तें काम मुलीची आई घरीं मोठ्या काळजीपूर्वक रीतीनं करिते. त्याच प्रमाणे ह्या माझ्या मुलींचा शिकवण्याचा अनुभव मिडलस्कूल मधल्या मुलींच्या शिक्षणावर आधारलेला-मुलींच्या आयांनी काळजीपूर्वक लावलेल्या वळणावर अवलंबून असलेला. उलट माझ्या बाजूला मुलांच्या शाळांच्या हेड-मास्तराचं सुपरिंटेंडेंटचं व पालकांच मत आहे. समजुतीच्या गोष्टी सांगितल्यानं, आर्जव केल्यानं मुलगे ४ वर्षापासून १२ व्या वर्षापावेतों-आपलं वर्तन सुधरवतील, हट्ट सोडतील, समजूतदारपणानं वागतील अशी आशा करणं व्यर्थ आहे.

सन १९१९ सालाची गोष्ट. नागपूरच्या एका श्रीमंत गृहस्थाची खूप श्रीमंत घराण्यांत दिलेली मुलगी आपल्या मुलासह माहेरी आली. त्या गृहस्थाच्या घरीं एक व्यक्ति होती. त्या व्यक्तिबरोबर सोबत म्हणून घोड्यावर बसून जाण्याचा मला मधून मधून प्रसंग येई. अशाच निमित्तानं ही मुलगी आल्यानंतर मी एक दिवस त्यांच्याकडे गेलों. मी त्याच्या दिवाण-खान्यांत गेलों तों असं पाहिलं कीं सहा तास स्त्रिया व दोघे पुरुष-अर्थात नातेवाईकच एका मुलाला त्याच्या खाकेंतील मांजरीचं पांढरं पिलूं खाली जमीनीवर ठेवण्यासंबंधी हलक्या आवाजांत, मोठ्या अदबीच्या साथ वारंवार म्हणत होते. "ह, खाली ठेवा बरं का. खाकेंत नाही घेऊं." मी आंत जाऊन हा देखावा-सर्वांचं त्या मुलाला आर्जवानं सांगणं व त्यानं आपला हट्ट कायमच ठेवणं-पाहून त्या सर्वांचा त्या मुलाभोवतालचा घोळ घालणं पाहून त्या मुलाला दटाऊन मोठ्यानं म्हटलं "अरे ये, टांक खाली. खाली टाऽक." त्या बरोबर त्यानं ते पिलू खाली तर टाकलं पण मला म्हणाला 'असं म्हणूं नये.' त्या मुलानं मला असं म्हटल्याबरोबर त्याच्या भोवतालच्या माणसांना मोठी अडचण उत्पन्न झाली. त्या मुलानं तसं उलटून बोलावं हें त्याना आवडलं नाही. पण करतील काय बिचारे. मुलगा पडला बडे बापके बेटे श्रीमंतांचे चिरंजीव. ते त्याला अदबीच्या साथ म्हणूं लागले "नीट बोलावं. असं बोलूं नये." मी ह्या मंडळीची उडालेली तिरपीट पाहून त्या मुलाला म्हणालों "अरे ये. तुला मी 'अहो' म्हणायला तयार आहे पण ते केव्हा?

ह्या मंडळीच्या सांगण्याप्रमाणे वागशील तर. तें पिलूं फिरून खाकोटीस मारायचं नाही. समजलास " असं म्हणून थोडा वेळ थांबून मी आपल्या घोड्यावर बसून चालता झालों. हा मुलगा बराच मोठा झाल्यावर त्याच्या शरीराची व मनाची वाढ बरोबर झाली नाही असं दिसून आलं. श्रीमंतांच्या मुलाना मोठ्या लाडानं व अदबीच्या साथ बहुमानानं वागवायचं म्हणजे त्यांना बिघडवणं असं मला वाटतं. त्यांचा हट्टीपणा वाढतच जातो. शिस्त लागत नाही. माझ्या वडीलांनी, तात्याजींनी, म्हणावं "खाण्याच्या, कपड्या बिपड्याच्या बाबतींत लाड; इतर बाबतींत लाड कामाचा नाही."

लहान मुलांना सायकॉलाजिकली वागविण्याची एक तऱ्हा प्रचारांत आली आहे. आमच्याकडे कशी काय यशस्वी होईल तें सांगतां येत नाही. पण अनुभव तूर्त असा येत आहे की मुलांना रीतभात नाही, शिस्त नाही, मुलांचं अभ्यासाकडे लक्ष नाही. विद्यार्थी मास्तरची टिंगल करतात. मुलं आईबापाचं ऐकत नाहीत. मास्तर व आईबाप दोघंही मुलांबद्दल तक्रार करतात. मास्तर म्हणतो आई बापानं मुलांना वळण लावलं पाहिजे. मुलांचा बहुतेक वेळ घरींच जातो. शाळेंत काय मुलगा थोडासाच वेळ असतो. आईबाप म्हणतात मुलगा शाळेंत जातो तेव्हा वळण शिस्त लागायची जागा तीच. मुलाना वळण लावण्याची खरी जबाबदारी कोणाची असा प्रश्न समोर उभा राहतो.

### माझी गावठी शाळा — तिथला घोडा व खुर्ची

वर सांगितल्याप्रमाणे मला मार मिळाल्यानंतर दोन तीन महिन्यानीच वडिलानं मला एका गावठी शाळेंत पाठवलं. ही शाळा म्हणजे घरांतली एक खोली. त्या खोलीच्या आढ्याच्या लाकडाला बांधलेला एक जाडाजुडा नारळाच्या दोराचा तुकडा. खोलींत तीन चार सोंदीचे चापरे. त्यावर १०-१२ मुलांची बसण्याची जागा. मुलांचं वय ५ ते ८ वर्षांचं. मास्तर एक जाडा जुडा माणूस. मास्तरची एक मोडकी खुर्ची व तुटकं टेबल. हातांत एक छडी. ह्या शाळेंत शिक्षणाऐवजीं शिक्षाच खूप मिळे. मुलानं दांडगाई केली किंवा शिकण्यांत कांही चूक केली की त्याला घोडा देण्यांत येई किंवा खुर्ची मिळे. 'घोडा' द्यायचा म्हणजे त्या मुलाला उंच उचलून तो आढ्याला बांधलेला

लगाम (दोर) त्याला दोन्ही हातानं घट्ट धरून ठेवायला सांगायचें व नंतर मास्तरनं त्याला सोडून दूर व्हायचं. खरखरीत दोराला मुलगा कांही वेळपर्यंत लोंबकळत राहिला म्हणजे हात कापून येत. बरं हात सोडून द्यावे तर दहा बारा फूटावरून खाली पडून आंग ठेचण्याची भीति. एकीकडे आग व दुसरी कडे फुफाटा अशी स्थिती होई. केव्हा केव्हा तर त्या घोड्याच्या स्वाराला मास्तरच्या छड्यांचा प्रसादही ढुंगणावर मिळे. रडणं, ओरडणं 'नाही जी मास्तरजी आता असं नाही करणार' असं एक सारखं चाले. मास्तर केव्हा 'घोडा' न देतां 'खुर्ची' देत. दोन्ही हात गुडघ्याखालून घालून स्वत:चे कान धरायचे ही झाली खुर्ची. कंबर व मान चांगलीच लागून येऊन रडायला कोसळे. ही 'खुर्ची' ची शिक्षा आणखी जास्त कडक करण्यांत येई. ही 'खुर्ची' घेतली असतानाच मानेवर खडा ठेवण्यांत येई व खडा पडला की मग प्रसाद मिळे छड्यांचा. हा एकंदर प्रकार पाहिल्यानंतर माझ्या छातींत धडकीच भरे. पालकांनी मास्तरचे कान उपटाले असं कधीच झालं नाही. उलट त्यांनी मास्तरला म्हणावं मास्तर तुम्ही विद्यार्थ्याला मारलं तर आम्ही काही बोलणार नाही. विद्यार्थ्याचें हाड आमचें व मास तुमचं. विद्या शिकवा याला. मारतां मारतां मुलगा मेला तरी हरकत नाही. त्याचीं हाड आमच्या स्वाधीन केलींत म्हणजे झालं.' आधीच उल्हास त्यांत फाल्गुन मास असं त्या मास्तरचं झालं. मास्तरला विद्यार्थ्यांना शिक्षा करण्यांत धरबंद काहीच राहिला नाही. दोन तीन दिवसांतच ह्या असल्या शाळेंत नाही, पाहिजे तर दुसऱ्या शाळेंत जातों असं मी म्हणायला लागलों.

## सरकारी शाळा

गावठी 'बालक मंदीर' सोडून मग सरकारी मराठी शाळेंत गेलों. तिथं शिक्षा बेताची व वेताची. शिक्षणही बरं. मास्तरही टापटीपीचे. मिडलस्कूल मधे-वर्धेच्या-मुलांचं शिक्षण गणपतराव पंधे ह्या हेडमास्तरच्या देखरेखीखाली झालं. त्यांना ड्रीलचा व जीमन्याशियमचा (सिंगलबार, डबलबार, लाकडी घोडा वगैरे) भारी नाद; व म्हणून त्यांनी ड्रील व व्यायाम मुलांकरितां सक्तीचे विषय ठेवले होते. त्यामुळे मुलांना चांगली शिस्त लागली. (का. स. र. क १ ला). मास्तर इतर विषयांतही मेहनतपूर्वक काम करत. ह्या शाळेच्या मिडलस्कूल परिक्षेचे निकालही प्रांतांत पहिल्या दुसऱ्या नंबरचे

लागत, शाळेचा हा असा नंबर खूप वर यावा म्हणून मास्तर अटोकाट मेहनत करीत. ज्या विद्यार्थ्यांचे विषय कच्चे होते त्यांना घरीं बोलावून विनावेतन शिकवित. पण त्या बरोबरच अभ्यास न केलेल्या मुलाला छडीचा प्रसादही आठवण राहण्यासारखा मिळे.

शाळेंत अभ्यासाकरितां नेमून दिलेल्या पुस्तकाशिवाय मी वाचलेलीं कांही पुस्तकें: १ जवानमर्द मराठे गडी २ जवानमर्द ब्राह्मण भाई ( हीं दोन्हीं पुस्तकें मला वाटतं 'धनुर्धारी' ह्यांनी लिहिलेलीं होतीं ) ३ उषःकाल व ४ 'केवळ स्वराज्यासाठी.' पुस्तक नं ३ व ४ 'करमणूक' वर्तमानपत्रांतून वाचत होतों. ५ 'पण लक्षांत कोण घेतो' ६ रामचरित्र व ७ कृष्ण चरित्र. पुस्तकं तर वाचतच होतों पण रोज संध्याकाळीं शाळा सुटल्यांनतर कांही वेळा करितां मी व माझा भाऊ गोपाळ दोघेही रामाच्या देवळांत एका लंगड्या पुराणिकाचं 'रामायण' ऐकण्यास जात होतों. थोडक्यांत सांगायचं म्हणजे मी व माझा भाऊ गोपाळ दोघेही मारपीट वा लढाऊ वृत्ति उत्पन्न करणाऱ्या वातावरणांत वाढलों. पूर्वजांच्या खरड्याच्या लढाईंतील कर्तबगारीच्या गोष्टी ऐकून मनाला खूप आनंद होई. आपण कांही तरी धामधुमीचं काम करावं असं वाटे. शाळेच्या बाहेर आम्हा मुलांच्या मारामाऱ्या नेहमी चालत. ( का. स. र क. १ ला )

## उन्हाळ्यांतल्या पहाडांतल्या सहली

मिडलस्कूलमधे इंग्रजी तिसऱ्या व चवथ्या वर्गांत असतांना उन्हाळ्याच्या दिवसांत आम्ही सर्व—आई, वडील व चौघे भाऊ—वाढोन्यास जात असूं व उन्हाळ्याची संबंध सुट्टी सरासरी दीड महिन्याची तिथेच घालवत असूं. वाढोना हे कांही उन्हाळ्याचं थंड हवेचं ठिकाण नव्हे. पण आम्हाला हवा पालट, खाण्यापिण्याची चंगळ-उन्हाळा म्हणजे पिकलेल्या आंब्याचे माचाचे दिवस ह्या दृष्टिनी तें गाव आवडे. सुट्टींत आमच्या बरोबर आमचे गरीब स्नेहीही असत.

उन्हाळ्याचा आमचा कार्यक्रम ठरलेला असे. रोज सकाळीं उठून पयदल फिरायास निघावं. वाढोन्याहून 'थार' ह्या आमच्या खेड्याला जावं. तिथून

एका परधान जातीच्या शिकाऱ्याला बरोबर घेऊन कधी 'रावणदेव' ह्या पहाडांत, कधी पहाडांतल्या व जंगलांतल्या 'धामकुंडाला' – इथूनच आमच्या गावची 'धाम' नदी निघते– तर कधी तिथून आमच्या जंगली गावाला बेल्हाऱ्याला जावं. हें आमचं फिरणं एक सारखं पहाडांतून व दाट जंगलांतून पायरस्यानेच चाले. आमच्या बरोबर असलेला शिकारी, घरींच बाभळीच्या पाण्याने रंगवून खाकी केलेले कपडे अंगावर चढवून व एक जुनी 'केप' वाली बंदुक खांद्यावर टाकून आमची साथ करी. बंदुकी शिवाय त्याच्या जवळ दीड दोनक हात लांब व तितकीच रूंद अशी उभ्या आडव्या कमच्यानी बांधलेली एक ताटी असे. तींत तो निरनिराळ्या लहान खणांत पळसाच्या, मोहाच्या किंवा इतर झाडांच्या पानाचे हिरवे डाखळे खोचून देई. पहिले प्रथम ज्या वेळेला मी ही ताटी पाहिली त्या वेळेला मी त्याला विचारलं 'हे रे काय ? कांही सोंग बिंग घेतोस की काय ? एखाद्या सोंगाड्या सारखं तुला नाचाय बिचायचं असेल तर मग आमच्या बरोबर नको येऊं." तो म्हणाला "सोंग तर आहे. पण तें शिकाऱ्याचं. आता मी तुम्हाला एक गम्मत दाखवतों" असं म्हणून तो थोडा दूर जाऊन खाली बसला. खालीच जमिनीवर ती डाखळे खोसलेली ताटीही ठेवली व त्या ताटीच्या आडून ओरडून म्हणाला "मी दिसतों का तुम्हाला ?" मी म्हणालों 'नाही.' नंतर तो म्हणाला " ह्या ताटीमधे आता तुम्हाला कांही दिसतं ?" मी म्हणालों "हो बंदुकीच्या नळीचं तोंड." नंतर तो उठून आमच्या जवळ येऊन म्हणाला "ही ताटी जनावराला इथे कोणी मनुष्य बसला आहे याचा संशय येऊं नये म्हणून मी वापरतों. ह्या फायद्याबरोबरच दुसराही एक फायदा आहे. ह्या ताटीमुळे मी दिसत नाही, बंदुक दिसत नाही हे जसे फायदे आहेत तसाच एक मोठा फायदा म्हणज बंदुकीचा नेम मारण्याचे वेळेस बंदुकीला व हाताला आधार मिळतो. नेम चुकत नाही. मी झालों आहे म्हातारा. केव्हा केव्हा हात कापतो म्हणून ह्या ताटीचा आधार असला म्हणजे बरं." मी म्हणालों "तुझा हात म्हातारपणानं कापत नाही. हात कापतो ह्याचं कारण तूं खूप शिंदी व दारू पितोस म्हणून." आम्ही रोज सकाळीं घाट व जगंल यांतून तीन तीन चार चार तास फिरावं. फिरत असतांना शिकाऱ्यानं हरणाच्या रानडुकराच्या शिकारी

पासून तों वाघाच्या शिकारी पर्यंतच्या गोष्टी सांगाव्या. गोष्टींत मन असं रमून जाई की फिरण्याचा कंटाळा किंवा थकवा वाटत नसे. घरीं येऊन फराळ करावा, आंबे खावे व झोपा काढाव्या. दुपारच्या एक किंवा दोन वाजतां चुलत्याच्या, दादाजीच्या पंक्तीबरोबर जेवावं. चुलत्याची ही नेहमी जेवण्याची वेळ. सकाळची स्नान संध्या तर्पणासहित, मग नमस्कार, नैवेद्य वैश्वदेव, काकबलि इत्यादि व गावच्या विठोबाच्या, देवळांत कोणी एखादा पांथस्थ आला असेल तर त्या संबंधी चौकशी करुन पंक्तीला एकतरी ब्राम्हण घेऊन जेवायला बसत. थोडक्यांत सांगायचं म्हणजे गृहस्थाश्रमी माणसाला सांगितलेल पंच महायज्ञाचं कर्म यथासांग झाल्यावाचून आमच्या पंक्तीला सुरवात होत नसे. दुपारचं जेवण झालं म्हणजे फिरुन झोपा काढाव्या व नंतर नदी काठी मोहाडींत खो खो, डु डु, आट्यापाट्या खेळाव्या.

## ज़सं करावं तसं भरावं

मी वर एका परधान शिकाऱ्या संबंधी लिहिलं आहे. त्यावरुन कदाचित् असंही वाटण्याचा संभव आहे की आम्ही किंवा आमचा शिकारी हरणाची किंवा निरुपद्रवी प्राण्याची शिकार करीत होतों. असा जर समज झाला असेल तर तो अगदी चुकीचा. आमचे चुलते दादाजी "देवलबी माणूस" अत्यंत दयाळू, सात्विक व धार्मिक बुद्धिचे. त्यांना निरूपद्रवी प्राण्यांची हिंसा करणं मुळीच-आवडत नसे. निरुपद्रवी प्राण्यांची शिकार तर राहूंच द्या पण त्यांच्या समक्ष बैलाना तुतारीनं ढोसणं हें सुद्धा त्यांना खपेना. एकदा असं झालं की मी व ते एकाच रेंगींत बसून वाढोन्याहून वर्धेस जात होतों. त्या वेळेस माझं वय ९।१० वर्षाचं असेल. दादाजीना विचारुन मी धुरीवर बसून बैल हाकलायला लागलों. बैल पळतच होते. त्यांना जास्त इरायानं बैलाच्या खांद्याजवळ तुतारीचे ढोस दिले. त्या बरोबर खूप रक्त निघालं. दादाजी म्हणाले "अरे! अरे!! गोविंदा बैल तर पळतच होते मग हे ढोस कशाला? पाहयलं रक्त किती निघालं! काय केलंस तूं!! पुढच्या जन्मीं असच तुझ्या अंगांतून रक्त काढील हा बैल." नंतर मी त्या बैलाना दुखवलं नाही. दादाजीनं शांत चित्तानं म्हटलं "बैल हाकलण्याची खुषी झाली असेल तर आतां धुरकऱ्याला रेंगी हाकलूं दे." असं त्यांनी म्हणतांच मीं बाजूला झालों. धूरकरी

रेंगी हाकलूं लागलो. मी पुनर्जन्मांत मला होणाऱ्या शिक्षेचा विचार करूं लागलों. 'जसं करावं तसं भरावं' असंच जर असेल तर मग चांगलंच काम



दादाजी

केलं पाहिजे. दादाजींचं मन इतकं कोमल व नाजुक असल्यामुळे आमच्या हातून कोणतंही क्रूर कृत्य घडूं नये ह्या बद्दल—यदा कदाचित् तसं घडलंच तर त्यांना कळूं नये म्हणून—माझे वडील सुद्धा—आमचा चौघा

भावांची तर गोष्टच सोडून या—पराकाष्टेची काळजी घेत होतों. असा हा आमचा कार्यक्रम रोज पहाडांतून फिरण्याचा व संध्याकाळीं मैदानीं खेळ खेळण्याचा सबंध उन्हाळाभर चाले.

## बहिणीच्या सासरच्या मंडळींच्या दुष्ट छळामुळे तिचा अकालीं मृत्यु

माझ्या वयाच्या बाराव्या ते चौदाव्या वयाच्या दरम्यान दोन दुःखदायक घटना घडल्या. त्यांनी माझ्या मनावर केलेला परिणाम पुसून जाणं शक्य नाही. त्या घटना मी व माझा भाऊ गोपाळ स्त्रियांना मिळणाऱ्या वागणुकीसंबंधानं केव्हा केव्हा बोलूं लागलों म्हणजे दत्त म्हणून आमच्या समोर उभ्या राहतात.

दादाजीची एक तानी नावाची मुलगी होती. तिचं उमरावती येथील एका मुलाशीं लग्न झालं होतं. त्या वेळीं लग्न जुळवण्याच्या बाबतींत अनेक अडचणी असत. प्रथम शाखा व गोत्र व प्रवर. नंतर पत्रिका. ह्या गोष्टी जमल्या तर मग बाकीच्या गोष्टींबद्दल-मुलाचं शिक्षण, त्याच्या घरची सांपत्तिक स्थिती वगैरेबद्दल विचार करीत. मुलीचा बाप श्रीमंत असला तर मग शाखा, गोत्र, प्रवर व पत्रिका जमल्यानंतर मुलगा अगदी गरीब असला तरी मुलीचं लग्न उरकवून घेई. घरच्या मंडळींची वागणूक मुलीशीं कशी राहील कशी राहण्याचा संभव आहे ह्या गोष्टीचीही चौकशी होत नव्हती. कारण शाखा, गोत्र वगैरे पहातां पहातांच जुळेल असा मुलगा सांपडणं मुष्कील. बाकीच्या गोष्टींची चौकशी करायला लागलों तर मुलगा सापडणें आणखी मुष्कील. तेव्हा मुलीच्या नशिबांत असेल तसं होईल असा विचार करून लग्न करण्याची तेवढी आपली जबाबदारी असं समजून मुलीचं लग्न करून टाकत. तानीचं लग्न ज्या मुलाशीं झालं तो गौर वर्णाचा, हाडापेरानं मजबूत, उत्तम क्रिकेट खेळणारा व हिम्मतबाज. त्याच्या घरची स्थिती मात्र फारच गरिबीची. मुलाचं वय १८ असेल. शिक्षण बेताचंच. तेव्हा मुलगा मिळवतां नाही. मुलाला बाप नाही. तेव्हा घरांत मिळवतां कोणीच नाही. त्या मुलाला एक विधवा आई व एक विधवा बहीण. अशा घरांतल्या मुलाशीं तानीचं लग्न केल्यानंतर दादाजीनं त्यांचा मासिक खर्च चालावा म्हणून दर महिन्याला मनीआरडरनं ५०।७५

रुपये पाठवावेत व गहू, तांदूळ, दाळ इ. धान्य व तुपाचे पिपेही पाठवावेत. पण त्या मुलीच्या नशीबाचं जोंधळ्याची भाकर खाण्याचं कधी चुकलं नाही. तुपाचा काटा कधी तिला दिसला नाही. निजायचं पोत (gunny bag) कधी तिच्या नशीबाचं सुटलं नाही. एवढ्यानंच तिच दुर्दैव संपलं नाही! ह्या सर्वांचं कामही तिलाच करावं लगे. आणि तानीचे असे हे हाल होत असतानाच व तानी कामाखालां रगडून निघत असतांनाच तिची सासू, नणंद, नवरा दादाजीनं, तानीच्या बापानं, पाठविलेल्या गव्हाच्या पोळी, वाटीभर तूप व नरम बिछाना ह्याचें सुख उपभोगत होते. तानी ह्या घाण्यांतून पिळून निघाली व वयाच्या पंधराव्या वर्षीच स्वर्गवासी झाली. सासरच्या माणसाच्या जाचांतून सुटली बिचारी एकदाची! अगदी इतकं हृदय हालवून सोडणारी घटना जरी नाही तरी हृदयद्रावकच अशी दुसरी घटना म्हणजे माझ्या सख्या वडील बहिणीला मिळालेली वागणूक. माझ्या बाहिणिचं नांव आक्का. तिचं सासर नागपूरचं. मध्यम वर्गांतील घराणं. मंडळी खाऊन पिऊन सुखी. :आक्काला सासू व नणंदा नव्हत्या. तेव्हा त्यांचा जाच अनायासेच चुकला. घरांत थोडं बहुत काम असे पण तें करण्याबद्दल तिची केव्हाही तक्रार नसे. ती एकदा आजारी पडली. आजार वाढतच गेला. तिनं पत्र पाटवून आम्हाला कळवलं. वडीलांनी तिला वर्धेला आणण्याकरिता कारकून पाठवला. जावईबोवांनी त्याला तसाच वापस केला. आम्ही औषधपाण्याची व्यवस्था करूं शकत नाही की काय असा रोख ठोक जबाब देऊन त्याला वाटेला लावलं. तिची प्रकृति बिघडतच गेली. आम्हाला कळलं पण करायचं काय? जावईबोवाची तब्यत लागेना. वडील तात्याजी भयंकर तेज पण करतील काय? पडले मुलीचे बाप. कांही दिवसांनी आक्का व आक्काचा नवरा, रामटेक तहसीलींतील एका गावीं लग्न होतं तिथं आम्ही गेलों असतांना आम्हाला भेटले. वडीलानं आक्काला औषध देण्याकरितां आमच्याकडे पाठवा असं जांवईबुवाला सांगितलं. जांवईबुवानं साफ नाकारलं. आम्ही औषधाचा बंदोबस्त करूं शकतों हा जबाब. कांही वेळानं दादीनं जावईबुवांना 'मुलीला चार दिवस आमच्याकडे औषध पाण्याकरितां पाठवा' असं म्हटलं. जावईबुवाचा तोच नन्नाचा फाडा. आक्का आणि तिचा नवरा त्या गावाहून जाण्याच्या वेळेला दादीनं फिरून जावईबुवाची

विनवणी केली की कसंही करून मुलीला पाठवाच, तिची तब्यत अगदीच हालून गेली आहे. तरी जावईबुवांचं उत्तर तेच. मेरे मुर्गीकी एकही टांग. अखेरीस तात्याजीनं दादाला-आईला म्हटलं मुलगी मेली असं समज. फिरून मुलीला पाठवण्यासंबंधी गोष्ट काढायचा नाही. जावईबुवांना आनंद झाला होता. एवढ्या मोठ्या सासऱ्याची इतक्या मंडळीसमोर आपण कशी जिरवली. आम्ही वर्धेला गेलों. दुसऱ्याच दिवशीं आक्काला वर्धेला पोचवण्यांत आलं सासरच्या मडंळींकडून. तुम्हाला वाटेल हे जावईबुवाचं वागणं विचित्रच म्हटलं पाहिजे. खरी गोष्ट अशी होती की जावईबुवाला लग्नाच्या गावीं दाखवून द्यायचं होतं की जावई म्हणजे जावई. त्यानं कोणाच्याही म्हणण्या-प्रमाणे-मग तें कितीही योग्य असलं तरी-करूं नये. तो जर सासरच्या मडंळीशीं डीक्टेटर सारखा वागला नाही तर मग तो जावई कसला. आक्काला नागपूरला आणून वडीलानं औषध देण्याची व्यवस्था केली. पण ती सुधरली नाही. त्या दुखण्यांतच तिनं राम म्हटला व माहेरच्या मडंळीची जावई-बुवाच्या कचाट्यांतून सुटका केली.

## लग्न हा जुवा आहे म्हणतात. Marriage is a gamble

पण अनिश्चितपणा नाही कशांत ? परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निकालांत-त्यानं अभ्यास केला असला तरीही-आहे. क्रिकेट खेळणाऱ्या खेळा-डूच्या धावांत आहे. कोर्टांत कज्जे भांडणाऱ्या पक्षकारांच्या कोर्टानं द्यावयाच्या निकालांत आहे. बुद्धिमान व मेहनती शेतकऱ्याच्या शेतांत येणाऱ्या पिकांत आहे. हाच अनिश्चितपणा कसरती, चलाख व कुस्ती जाणणाऱ्यांच्या कुस्तीच्या निकालांत आहे. पण म्हणून कोणी आप आपला उद्योग व व्यवसाय निकालाला भिऊन सोडून दिला आहे काय ? नाही. त्याच प्रमाणे लग्नाच्या परिणामाच्या बाबतींत जरी अनिश्चितपणा असला, सुख मिळेल की दुःख होईल हें जरी सांगता येण्यासारखं नसलं, लग्न हें एक प्रकारचं साहसच असं जरी समज-ण्यांत आलं तरी आपल्या बुद्धिचा, कौशल्याचा, व स्वतःच्या व दुसऱ्याच्या अनुभवाचा फायदा घेऊन त्यांत यश मिळविण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे. सर्वांच्याच वाट्याला यश आलं नाही तरी सर्वांच्याच वाट्याला अपयशही येत नाही. प्रत्येकाचं नशीब त्याच्या बरोबर असतेंच पण तरीही प्रयत्न हा झालाच

पाहिजे व तो बुद्धिपूर्वक, चिकित्सा करून, कुशलतापूर्वक केलेला असावा. व त्यांत यश मिळेल ह्या श्रद्धेनं तो केलेला असावा. असा हा प्रयत्न केल्यानंतर मार्गांत अडचणी आल्या तर त्यांना धैर्यानं तोंड देण्याची तयारी असावी. ह्याही पेक्षा उत्तम मार्ग असा की मार्गांत येणाऱ्या अडचणींचा आधीच अदांज बांधून, त्या निवारण करण्याचे मार्ग शोधून धैर्यानं, उत्साहानं, हुशारीनं प्रयत्न करण्यास सुरवात करावी. अशी तयारी असल्यानंतर कामांत यश मिळणें बऱ्याच अंशीं संभवते.

## नागपूर १८९६-१९०६

नागपूरला आल्यानंतर नील सिटी हायस्कूलमधे मी आपलें नांव घातलें. आम्ही सर्वच बंधु सीटी स्कूलमधे शिकूं लागलों. राहण्याचं आमचं ठिकाण चिटणीसपुऱ्यांत डॉ. दाजीसाहेब ह्यांची चाळ. ह्या चाळीसमोरच भय्या तांबडे व थोड्या अंतरावर बाबू परांजपे हे माझ्याच वयाचे मुलगे राहत होते. तेही सीटी स्कूलमधेच शिकत. मी हायस्कूलमधे व तो मिडलस्कूलमधे. ह्या शाळेच्या आवाराबाहेर रोज पाणी पिण्याच्या सुट्टींत ह्या शाळेच्या विद्यार्थ्यांत व इतर शाळांच्या विद्यार्थ्यांत किंवा आखाडेवाल्यांत मारामाऱ्या होत.

## आम्ही तिघे व तिघांचे तीन बंधु

रोजच्या मारामारीच्या प्रसंगामुळे मी, बाबू व भय्या आम्ही तिघांनीं मिळून शाळेंत जावं, मारामारीचा प्रसंग आला की तिघांनी एकमेकांना मदत करावी. बाजारांत जायचं असलं तरी आम्ही तिघं मिळूनच जात होतों. करतां काय? ज्याला आम्ही मारलं तोच कर्मधर्मसंयोगानं कांही सोबत्यासह आमच्या पैकी एखादा एकटा असतांना चालून आला तर! म्हणून आम्ही तिघंही एकत्रच कुठंही बाहेर जाणं येणं करत होतों. बंधु (डॉ) गोपाळही आमच्या बरोबर तीनक वर्षेपर्यंत होता. तेव्हा ज्या मारामाऱ्या होत त्यांत त्याचाही हात असेच. पण नंतर तो ग्रचांट मेडीकल कॉलेजमधे (मुंबईला) शिकण्याकरितां गेला. आम्ही तिघे मात्र मी विलायतेस जाईपर्यंत नागपूरांतच होतों.

माझा भाऊ दामु, बाबु परांजपेचा लहान भाऊ बेट्या (दत्तु) व भय्या तांबडेचा लहान भाऊ बावा हे समवयस्क. तेही सीटीस्कूलमधेच शिकत होते.

तेही आम्हाला मारपिटींत केव्हा केव्हा मदत करीत. एकदा आमच्या घराजवळच्याच मारामारींत बेव्यानं व दामूनं मारपीट चालली असतांना घरीं धावत जाऊन नकाशाचे लाकडाचे रूळ व कपडे वाळू घालण्याच्या काठ्या आणून आमच्या स्वाधीन करून मारपिटीला मदत केली. अशा रीतीनं ठिकठिकाणीं मारपिटीचे प्रसंग येत म्हणून आम्ही आमच्या कुस्तीच्या कलेबरोबरच दांडपट्टा व लाठी काठीच्या शिक्षणाची मदत घेण्यास सुरवात केली व लवकरच तरबेज झालों.

## आईच्या देखरेखीखाली आमचं शिक्षण

आम्ही नागपूरला आलों तेव्हापासून आमचं शिक्षण आमच्या चतुर, बहुश्रुत व मराठी लिहितां वाचतां येणाऱ्या आईच्या सौ. दादीच्या देखरेखी-ाली होऊं लागलं. (का. स. र. क १ ला) वडील येऊन जाऊन राहत. महिन्या दोन महिन्यांनी वाढोन्याहून येत व आठ दहा दिवस राहून परत गावीं जात. केव्हा केव्हा कांग्रेसलाही जात. त्याच वेळेला जवळपासचे प्रांतही पाहून येत. त्यामुळेही त्यांचं नागपूरास नेहमी राहणं होत नसे. सबब आईलाच आमच्या शिक्षणाची काळजी वहावी लागे. आम्हा भावांपैकी कोणीही कधी आईची अवज्ञा केली नाही. तिनं सांगितलेलं कोणतंही काम करण्यांत अळं-टळंपणा केला नाही. वडीलांची आज्ञा धाकामुळे, भीतिमुळे पाळत होतों. पण आईची आज्ञा आमच्यावर असलेल्या तिच्या लोभामुळे, गोड स्वभावामुळे, तिच्या बहुश्रुतपणाबद्दल व हुशारीबद्दल असलेल्या आदरामुळे पाळत होतो. आम्ही तिची आज्ञा पाळल्यानंतर तिनंही केव्हा आमच कौतुक करून, उत्ते-जन देऊन तर केव्हा स्वःत गोड वा तिखट पदार्थ ताजे करून खाऊं घालून आमचा आज्ञाधारकपणा वाढीला लावावा, लोभाची वृद्धि करावी.

## लपविलेली गोष्ट वडिलांना कळली

आम्ही शाळेंत जात होतों हें तात्याजीना (वडिलांना) व आईला माहित होतं. पण आखाड्यांत कुस्ती करण्याकरितां जात होतों व लाठी काठी शिकण्यास जात होतों हे फक्त आईलाच माहित होतं. तिनं कधी आड काठी घेतली नाही. वडीलानं आम्ही जोंपर्यंत शाळेंतल्या परीक्षा पास करीत होतों व घरची वागणूक ठीक होती तोपर्यंत आमच्या दुसऱ्या उद्योगांत लक्ष घातलं नाही.

आम्ही आमचं आखाड्यांत जाणं, लाठी काठी शिकायला जाणं त्याच्या ध्यानांत येऊं नये म्हणून सर्व तऱ्हेन काळजी घेत होतों. आखाड्यांत जाणं व तत्सम उद्योग करणं हें गुंडांचं काम असं जो तो शिकलेला गृहस्थ, समाजांतला प्रतिष्ठित गृहस्थ समजे. त्यावेळीं समाजांत ह्याच विचाराचा फैलाव झालेला होता. तेव्हा वडिलाना आम्ही आखाड्यांत जातों हें समजूं नये म्हणून आम्ही खूप खबरदारी घेत होतों. करतां काय रागावले तर असं आम्हाला वाटे. त्यांचा स्वभाव भयंकर तापट. वयाच्या १५ व्या वर्षीं त्यांच्या हातचा मार खाण्याची भीति नव्हती. शिवाय त्यांनी मला लहानपणीं मारल्यामुळे माझ्या चुलत्याने पुकारलेल्या सत्याग्रहाने त्यांचं आम्हाला मारणं अशक्यच होतं. मार खाण्याची जरी भीति नव्हती तरी त्यांची आपल्यावर नाराजगी व्हावी असं मला किंवा गोपाळला वाटेना. आम्हाला पुष्कळशा सवलती होत्या. पैसा पाहिजे तितका खर्च करायला मिळे. मित्रांना मदत करतां येत असे. गरीब मित्रांना सुट्टींत गावीं घेऊन जात असूं. ह्या सर्व सवलती सुरून रहाव्या अशी जबरदस्त इच्छा. मग वडिलांना नाराज करून कसं चालेल ? म्हणून आमचं आखाड्यांत जाणं वडिलांजवळून लपवून ठेवण्याची आम्ही पराकाष्टा करीत होतों. पण हें सर्व भंड एक दिवस फुटलं. वडिलांना ही गोष्ट कळली. प्रसंगच तसा होता. आमच्या राहत्या चाळींत आम्ही चाळींतल्या सर्व मंडळींनी गणपतिचा सार्वजनिक उत्सव करण्याचं ठरवलं. गणेश चतुर्थीच्या दिवशीं नागपूरच्या प्रसिद्ध राजू चितान्याचे येथून मूर्ति आणण्याचं ठरलं. मूर्ति आणायची ती वाजत गाजत. मिरणूक काढून आणावयाची असते. मी, गोपाळ, बाबू, भय्या, ४-५ आखाडेवाले स्नेही व चाळींतील इतर गृहस्थ चितान्याचे येथून चितार ओळींतून गणपति रस्त्यानं वाजत गाजत आणत होतों. गणपतिसमोर पट्ट्याची फेंक आखाडेवाले स्नेही मधून मधून रस्त्याने करत होते. चितार ओळींतील एका चौरस्त्यावर आलों तेव्हा गणपतिच्या मूर्तिच्या व आमच्या भोंवती चिकार गर्दी झाली. आजू बाजूच्या घरांतून भराभर माणसं येऊं लागले. त्या वेळेस भय्या तांबडे पट्ट्याची फेंक करीत होता. त्याची फेंक संपल्याबरोबर आजूबाजूच्या गर्दीतून एका मनुष्यानं येऊन त्याच्या हातचा पट्टा घेतला, फेंक केली व नंतर आपल्या हातांतला पट्टा काढून खाली सडकीवर ठेवला व

तिथेच उभा राहिला. पट्टा खाली सडकेवर ठेवणं हें आम्हाला आव्हान. त्याची एकंदर ऐट अशी म्हणत होती कीं 'येतं कां कांही मी केलं त्याच्या पेक्षा सरस.' आम्ही तें आव्हान स्वीकारलं. तासे जोर जोराने व लवकर लवकर वाजूं लागले. तासेवाल्यांनाही इर्षा चढली. गोपाळनं, बाबूनं, भय्यानं व मी आम्ही सर्वांनी पट्टयाचे घर करावे, चौमुखा करावा व पट्टा खाली ठेवत जावा. जमलेल्या गर्दीतून कुणीना कुणीतरी आमच्या नंतर पट्टयाची फेक करी. आमच्या पैकी प्रत्येकानं दोन्ही हातांत पट्टे चढवून पट्टयाचे घरं निरनिराळ्या बेली केल्या. नंतर आमच्या मंडळीच्या फेकींना जबाब न मिळाल्यामुळे आम्ही गणपति घेऊन घरीं आलों. घरीं आल्यानंतर पहातों तों वडील तात्याजी व त्यांचे चुलत चुलते कृष्णराव उर्फ आबाजी देशमुख वकील-कारंज्याच्या देशमुखां-पैकी-घरीं सपरींत बसले आहेत. आम्ही गणपति आणायला गेलों तेव्हा घरीं नव्हते. त्याच दिवशीं ते वर्धेवरुन आलेत असं कळलं. मी सपरींतून वर माडीवर जात असतांना आबाजी देशमुखांनी मला हाक मारली. "अरे गोविंदा इकडे ये." मी गेलों व थोड्या दूर अंतरावर अदबशीर रीतीनं बसलों. मी त्यांच्या जवळ बसल्यानंतर ते मला म्हणाले "अरे गोविंदा तुला दांडपट्टा येतो ! आखाड्यांत जात असतोस वाटते ?" मीः नाही आबाजी. माझ्या बद्दल तुम्हाल कोणीतरी सांगितलं असं दिसते. तुम्ही ऐकलेली माहिती चूक आहे." वडील खरडपट्टी काढतील ह्या भीतिनं असं बोलणं भागच होतं. आबाजीः "अरे ही कोणी सांगण्याची व आम्ही ऐकण्याची गोष्ट नाही. मी व तात्यानं (माझे वडील) दोघांनीही आपल्या डोळ्यानं पाहयलं. मी म्हणतों तें ऐकीव नाही. चक्षुर्वै सत्यं ! समजलास !! आम्ही टांग्यांत बसून चितार ओळींतून येत होतों. येतां येतां पहातों तो ही गर्दी. रहदारी बंद. चौरस्त्याच्या चारी बाजून लोकांची गर्दी. टांगा जाण्यास रस्ता नाही. टांगा तिथे मग उभाच करावा लागला. गर्दी कसली आहे म्हणून टांग्यांतूनच पाहयलं तर तूं पट्टा फिरवीत होतास." मी मग चूपच बसलों. बोलण्याला जागाच राहीली नाही. आता वडील काय म्हणणार ह्याची मला काळजी पडली. वडील म्हणाले "त्यांत वाईट काय आहे ? दारूबाजी, जुव्वेबाजी, रंडीबाजी ही व्यसनें मनुष्यास नसावीं. अभ्यास करुन आखाडबाजी केली तर कांही वाईट

नाही. अभ्यासाची, आपल्या परीक्षांची मात्र काळजी घ्यायला पाहिजे; व स्वतःची वागणूक सभ्यतेची पाहिजे."

### आदबशीर वागा

माझ्या वडिलांना-तात्याजींना जुन्या चालीरीतीबद्दल-दरबारी चालीबद्दल मोठा अभिमान असे. वर सांगितलेल्या प्रसंगीं-गणपति उत्सवांत-आमच्या इथे वडीलांनी कांही जणांना जेवायला बोलावलं होतं. जेवायाची पंगत बसली होती. कृष्णराव उर्फ आबाजी देशमुखही ह्याच पंक्तींत जेवायला बसले होते. त्यांचं जेवण आटोपल्याबरोबर ते उठले. त्या वेळेस बाकीच्या मंडळीचं जेवण संपलं नव्हतं. आबाजी पंक्तींतून उठून कुठे काम होतं तिकडे गेले. कांही तासांनी ते परत आले. वडीलानं त्यांना म्हटलं "काका, तुम्ही लवकर कां उठलांत? पंक्तींतल्या बाकीच्या मंडळीचं जेवण संपण्याच्या पूर्वीच-अर्ध्या जेवणांतूनच उठून गेलांत. मंडळीचं जेवण संपायची वाट कां पाहिली नाही?" आबाजीः- "अरे मंडळीचं जेवण बरच लांबलं व मला तर निकडीचं काम होतं." वडीलः- "काम होतं तर एकटेच घरांत जेवायला कां बसला नाही? पंक्तींत बसून भर पंक्तींतून असं उठून जाणं म्हणजे जेवणाऱ्या मंडळीचा अपमान करणं आहे. हें तुम्हाला शोभत नाही. तुम्ही मानाने मोठे आहांत. माझं बोलणं लहान तोंडी मोठा घास असं तुम्हाला वाटेल पण मला जें वाजवी दिसतें तें सांगितलंच पाहिजे. काम होतं तर घरांत जेवायला बसायचं व जेवण संपल्याबरोबर कामाकरितां चालतं व्हायचं. तसं तुम्ही केलं असतं तर मी बोललों नसतों. भर पंक्तींतून उठून जाणं शिष्टाचाराला धरून नाही. ही पंगत म्हणजे काय खाणावळींतली पंगत समजलांत तुम्ही? की ज्याचं जेवण झालं त्यानं उठून चालतं व्हावं? चार सद्गृहस्थांना जेवायला बोलवायचं व पंक्तींतून उठून जायचं. त्यांना कांही भावना असतात की नाही? तुम्ही त्यांचं मन दुखेल असं केलं." वडील वयानं आबाजी पेक्षा मोठे पण मानानं लहान. पण आबाजी करतील काय? त्यांना माहीत होतं तात्या म्हणजे जमदग्निचा अवतार व त्यांच्या हातून कळत न कळत चुक झालेली. वडीलानं जिथ आपल्या चुलत्याला ह्या शिष्टाचाराच्या, रीतिभातीच्या बाबतींत सुनवून दिलं

तिथे आमची काय कथा ? आम्हाला शिष्टाचार मोठ्या काटेकोरपणाने पाळावे लागत. पुष्कळ वर्षाच्या सवयीनं तें आमच्या हाडींमासीं खिळून गेल्यासारखे झाले होते.

## देशभक्तीचे व समाजसेवेचे धडे

सिटी स्कूलमधे बौद्धिक शिक्षण घेत असतानाच हेडमास्तर केशवराव जोशी ह्यांनी आम्हाला देशभक्तीचे धडे द्यावेत व देशसेवा करण्याच्या लहान लहान संधि आल्या तर त्या करण्यास उत्तेजन देत. कांग्रेसचे स्वयंसेवक होण्यास सुद्धा त्या कालांत उत्तेजन देत. समाजसेवेचा तर ते चालता बोलता एक नमुनाच होता. ( का स र. क. १ ला ) एक दिवस मी व बाबू चाळी-जवळच्या फुलावर बसलों होतों. ह्या वेळेस माझा भाऊ गोपाळ मुंबईस शिकत होता व भय्या तांबडे बडोद्याला कलाभवनमधे शिकण्यास गेला होता. आम्ही पुलावर बसून गप्पा करीत असतांना मला कृष्णा हर्दासाच्या देवळाकडे घरं पेटलं असं वाटलं. धुराचे लोट वर आकाशांत जात होते. मी बाबूला एकदम म्हणालों, 'अरे बाबू, आग!' व आग आग असा ओरडा चालला होता तिकडे धावत गेलों. दोघंही छपरावर चढलों. छपराच्या फाट्यांनी जळतं छप्पर आंत ढोसलं व पाणी आणणाऱ्या जवळून पाणी घेऊन विझवून घरीं आलों. कृष्णा हर्दास ह्यांना व बाळ हर्दास म्हणत. ह्यांची कीर्तन करण्याबद्दल फार ख्याती. गृहस्थ ठेंगणें. लहान वयापासून कीर्तन करण्याची सवय, आवाज गोड. नकला सांगून, कोट्या करून श्रोत्यांना हासवण्याची अजब कला. वाचन व अभ्यासही तसाच दांडगा. त्यामुळे हे हर्दास-कीर्तनकार फारच लोकप्रिय झाले होते. त्यांच्या कीर्तनाला खूप भीड असे. गर्दीच गर्दी. ह्या आग विझवण्याच्या घटनेनंतर आम्ही जेव्हा जेव्हा गोकुळ अष्टमीच्या दिवशीं त्यांचं कीर्तन ऐकायला जावं व गर्दीत उभं रहावं तेव्हा तेव्हा त्यांचं लक्ष आमच्याकडे गेल्या बरोबर त्यांनी आम्हाला उद्देशून म्हणावं "या या इकडे या" व घर मालकास व आमच्या समोर गर्दी करून बसलेल्या मंडळीस त्यांनी म्हणावं "द्या. त्यांना इकडे द्या." व हातानं अगदी समोरच्या जागेकडे बोट दाखवावं. आम्ही कीर्तन ऐकावं व पोटभर प्रसादही खावा.

## आबाजींचं लग्न

माझं सीटीस्कूलमधील शेवटचं वर्ष म्हणजे मॅट्रीकला बसलों तें एका गोष्टीकरितां उल्लेखनीय आहे. त्या वर्षी माझ्या भावाचं-आबाजींचं लग्न उमरावती येथं झालं. लग्न खूप धूमधडाक्यानं झालं. त्या लग्नाचं वर्णन देणं थोडक्यांत दोन दृष्टीनं योग्य आहे असं मला वाटतं. एक मनोरंजनाची दृष्टि व दुसरी तात्याजींच्या संघटना कौशल्याची दृष्टि. मोठ मोठे प्रसंग करायचे म्हणजे किती खटखट, केवढा खटाटोप असतो ह्याचा मला प्रत्यय आला. आबाजींचं लग्न ठरल्या नंतर ज्या गावीं पोष्ट नव्हतं अशा गावीं लग्नपत्रिका-हातांनी लिहिलेल्या कुंकुम पत्रिका-माणसांबरोबर पाठविण्यांत आल्या. दूर दूरच्या



आबाजी

नातेवाईकांना आणण्याकरिता माणसं रवाना झाले. लग्न मौंज ह्या निमित्तानेच लांब लांबचे नातेवाईक येत. कारण त्या वेळेस प्रवास आतासारखा सुलभ नव्हता. लग्नाकरिता गावीं जमा झालेले दोनशें निमंत्रित लोक जाणार होते गाडी बैलानं. गावाहून-वाढोन्याहून उमरावतीस जाताना मोठ मोठे घाट लागतात व किर्र जंगलही. प्रवास अंधाऱ्या रात्रीचा दोनक दिवसाचा. दिवस उन्हाळ्याचे. दोनशें लोकांच्या (बाया व माणसांच्या) प्रवासाची दोनं दिवसाची सोय करायची म्हणजे पन्नास तरी रेंग्या, तितक्याच बैलांच्या जोड्यांची दाण्याचाऱ्याची व्यवस्था, प्रवास करणाऱ्यांच्या दोन दिवसाची फराळाची व जेवण्याची सोय, रेंगीचं आसकूड मोडलं किंवा चाक खचलं तर तें दुरूस्त करण्याची

तरतूद, रात्रीचा प्रवास तेव्हा उजेडाची व्यवस्था ह्या सर्व गोष्टी करणं भागच. मंगल कार्य प्रसंग तेव्हा घरचं कुलदैवत व इतर देवही बरोबरच असायला पाहिजेत. हे सर्व प्रश्न सोडवणं सोपं नसतं. तात्याजीनं व्यवस्था केली ती. लग्नाच्या पाहुण्यांच्या फराळाच्या व जेवणाच्या सोयीकरिता दोन मोठे गाडे भरून सामान (कोठी). त्या गाड्याबरोबरच एक कोठीवान, एक आचारी व एक गुजराथी. एक रेंगी वाजंत्र्याकरिता. एक रेंगी धोब्यांची. दोन बोडख्या रेंग्या म्हाल्याकरिता. एक रेंगी वाढ्याची. एक बोडखी रेंगी किंवा छकडा शिकाऱ्याकरिता. एक कुलदेवतेकरिता व इतर पूजेच्या देवाकरिता रेंगी. त्याच रेंगीवर जोशी व उपाध्याय. पाहुणे बाकीच्या रेंग्यांतून प्रवास करीत असतांना रात्रीच्या वेळेस म्हाली आपल्या मशाली पेटवून रस्ता दिसण्याकरितां उजेड करीत. ह्या म्हाल्यांच्या बोडख्या रेंग्या रेंग्यांच्या रांगेतून अधून मधून ठेवण्यांत येत. घाटांत रेंगींचं आसकूड मोडलं किंवा इतर कांही सुताराचं काम पडलं तर वाढी असेच. अशा ह्या मिरवणुकीच्या शेवटीं एक घोडेस्वारही असेच. जुन्या काळीं वरात निघायची ती घोड्यावरून तेव्हा घोडा असणं जरूरच असे. रात्रीं प्रवास, सकाळीं शंकरपट–रेंग्यांची एकमेकांच्या पुढे जाण्याची चढाओढ व दिवसा आंबराईत नदीच्या किंवा विहिरी शेजारीं मुक्काम. असा हा प्रवास करण्याचा शिरस्ता. ह्या लग्नास निघालेल्या मिरवणुकीबरोबर जिल्हा म्याजिस्ट्रेटकडून दोन कान्स्टेबल्स गार्डही घेण्यांत आले होते. अशी ही एकंदर व्यवस्था.

त्या वेळच्या लग्नाच्या तयारीच्या व्यापाकडे, खटाटोपाकडे पहा व आताच्या सुटसुटीत पद्धतीकडे पहा. लग्न चालायचं पांच दिवस व ते जरूर होतं. लांबलांबून येणाऱ्या पाहुण्यांना व त्यांच्या बैलांना तितके दिवस विश्रांतीची जरूरच होती नाही कां? पाहुणे इतके दिवस राहणार तेव्हा तितके दिवस त्याना मेजवान्या देण्याची आवश्यकता. ह्या पांच दिवसांत खूप धामधूम चाले. मुलीच्या व मुलाच्या आईबापाची बिमार पडण्यापर्यंत पाळी येई. आता धर्मनिर्णायक मंडळाच्या पद्धतीनं लग्न करण्यानं किंवा नोंदणी पद्धतीनं लग्न करण्यानं लग्न करणाऱ्यांच्या पाठीमागचा हा सगळा त्रास वाचला व पैसाही. सामाजिक चालींतला केवढा फरक हा!

## परिक्षेंतील यशाबद्दल मला विलक्षण देणगी

मी म्याट्रीकची परीक्षा पास झाल्यावर दोन तीन महिन्यानीच माझ्या आईचे आतेभाऊ, उमरेडचे नानासाहेब देशमुख, आईचे भेटसि आले. तिच्याशीं बोलणें संपल्यानंतर मी माडीवर होतों तिथे आलेत. ते मला म्हणाले "गोविंदा, दादी सांगत होती तूं म्याट्रीक पास झाला?" मी: "होय, मामा." मामा: "पहिल्याच वर्षी?" मी: "होय." मामा: "अरे मी चांगलं एक तप घालवलं म्याट्रीकमधे." मामा: "तूं आखाड्यांत जात असतोस असं दिसते." मामा खुंटिवरच्या लालरुमालीकडे व तिथे जवळच असलेल्या हत्त्याकडे पहात म्हणाले. "तूं परीक्षा पास झाला आहेस तेव्हा मामानं तुला कांही बक्षीस द्यायला पाहिजे. नाही? काय पाहिजे? कुस्तीचे पेच की दुसरं कांही?" मी म्हणालों "मामा, कुस्तीचे पेच शिकवाल तर बरं. तुमची नेहमीची आठवण राहील दुसरं काही बक्षीस दिलं तर फार तर वर्षभर टिकेल. तेव्हा मला पेचच सांगा." मामानं मला 'शीडी' हा पेच शिकवला. हा पेच हिंदुस्थानांत कोणत्याही कुस्तींत पहाण्यांत—अझूनपर्यंत आला नाही. मात्र इंग्लंडमधे 'राकू' जपानी हा पेच प्रतिस्पर्ध्याचा अंगाला बोट सुद्धा न लावतां एकदम बाजूनं उडी मारून करे. ह्याला इंग्रजानी ( Scissors ) कात्री हें नांव दिलेलं होतं. ह्या पेचाखेरीज मामांनी मला 'पंजा' खेळण्याची माहिती दिली. नाना मामा नागपूरांतील अमीर मीया वगैरे पहेलवानांच्या तोडीचे पहेलवान होते.

## कलावंतांचा परिचय

मी मॅट्रीक पास झाल्यानंतर मॉरिस कॉलेजमध्ये नांव टाकलं. परीक्षा पासच झालों होतों. तेव्हा माझा आखाड्यांत जाण्याचा व दांडपट्टा शिकण्यास जाण्याचा क्रम उघड उघड चालूंच होता. आखाड्यांत जाण्यानं कांही आखाडेवाल्यांचा परिचय झाला होता तसाच कांही कलावंतांचाही झाला. मी निरनिराळ्या आखाड्यांत जात असे. एकाच आखाड्यांत लढत असल्यानं हिम्मत वाढत नाहीं म्हणूनच तर फिरते पहेलवान, उत्तर हिंदुस्थानी किंवा पंजाबी, जास्त हिम्मत बाज असतात. निरनिराळ्या आखाड्यांत जाण्यानं कांही कलावंताच्या ओळखी झाल्या. अपराजित नांवाचे गृहस्थ ( आता वकील

आहेत ) सतार उत्तम वाजवीत. बळीराम पंडे तबला वाजवीत. तेही खूप प्रसिद्धिस आले. त्याच प्रमाणे शामराव बुट ( वकील ) हे पेटी वाजवण्याच्या कलेमुळे प्रसिद्धिस आले. परिचयानंतर असं दिसून आलं की हे सर्व माझ्याच शाखेचे व लांबचे नातेवाईक आहेत. ह्या बजावय्या कलावंताशिवाय एका गाणाऱ्या कलावंताचीही ओळख झाली. त्याचं नांव विठ्ठल पोफळी. ( हा ही वकील झाला )

## गाण्याकरिता मारामारी

कुस्ती पहाण्याकरिता गेलं तर मारामारी होई ही गोष्ट पुष्कळाच्या परिचयाची आहे व आम्हाला तर आम्ही सक्कर दऱ्यावर कुस्त्या पहायला गेलों-हे दंगल राजे बहादुर रघोजी भोंसले बिन टिकिटानं लोकांकरिता फुकट करत-म्हणजे मारामारी करण्याचे अनेक प्रसंग येत. पण गाणं ऐकण्याकरिता मारामारी करण्याचा प्रसंग आम्हाला आला. ही नवलाची गोष्ट १९०२ सालच्या एप्रिल महिन्यांत घडून आली.

गंगु जळगावकरीण ह्या नांवाची एक प्रसिद्ध गाणारीण नागपूरास आली. तिची संगीत म्हणण्याबद्दल लवकरच ख्याति झाली. 'शापसंभ्रम' ह्या नाटकांतील 'मजवरि तरु कुसुम रेणू वरुनि गाळीती' हें तिचं पेटंट गाणं. भावड्याची भाऊराव कोल्हटकर ह्यांची हुबेहुब नक्कल करीत असे. बाहेरगावचा एखादा उत्तम गवई किंवा गाणारीण आली तर गाणं ऐकण्याची संधि नागपूरची गाण्याची शौकीन मंडळी फुकट जाऊं देत नसत. नागपूरांत उत्तम गाणारे होते नाही असं नाही. आवाजाची गोडी अनुकूल व गायनशास्त्राचं ज्ञान ह्या दृष्टिनं बापुजी जोशी, निव्वळ शास्त्राचं ज्ञान-बापुजी जोशी ह्यांच्यापेक्षाही जास्त असं लोक म्हणत-पण आवाज अत्यंत कर्णकटु असे आकांत करणारे आकांत गवई, निव्वळ ठुंबरीच म्हणायची दुसरं कांही नाही असा ठुंबरी म्हणणेवाला नागो ठुंबरीवाला अशी प्रमुख गवई मंडळी होती. तरीही बाहेरगावचे वस्ताद व प्रसिद्ध गाणारणी आल्या म्हणजे गाणं ऐकणारी मंडळी तुटून पडत. स्तुति करण्यासारखा असला तर स्तुति नाही तर कडक टीका असं बक्षिसही ह्या मंडळीकडून त्या गवयाला मिळे. माझा स्नेही पोफळी ह्यानं गंगु जळगांवकरणीची बैठक अदितवारींत-हा एक मोहोल्ला आहे-एका गृहस्थाच्या घरीं रात्रीं १० वाजतां आहे अशी बातमी

आणली. मी, माझा भाऊ गोपाळ, बाबू परांजपे, भय्या तांबडे व नवाथे पोफळी ह्यांच्या बरोबर त्या गृहस्थाच्या घरीं गाणं ऐकण्यास निघालों. प्रत्येकानं रेशीमकाठी धोतराचा पचांग मारला होता. अंगांत स्वच्छ तलम मलमलीचं चुन्नीदार कुडतं घातलं होतं. कोणी जरीच्या टोप्या घातल्या होत्या तर कोणी जरीचे फेटे बांधले होते. एका दोघाच्या हातांत हातीं धरण्याचे बेत-काठ्या होत्या. अशा थाटानं आम्ही रस्त्याने चाललों वेळ रात्रीची नऊ साडे नऊची असेल. चांदणं स्वच्छ पांढरं पडलं होतं. रस्त्याने चालत आम्ही चांदनी चौकांत आलों. त्या वेळेस इकडे तिकडे सामसूम झालं होतं. तिथून आम्ही सिटी पोलीस कचेरीसमोर आलों व नंतर मुन्नालाल हलवायाच्या घरासमोर आलों. आमच्या समोरून कांही मंडळी येत होती. असतील ८ । १० जणं. ते आमच्या जवळून सिटी पोलीस कचेरीकडे १० । १२ कदम गेले असतील नसतील तोंच आमच्या सर्वांच्या मागून येत असलेल्या बाबू परांजपेनं त्यांना विचारलं "कांहो, गंगु जळगावकरणींच गाणं कुठ आहे." त्या मंडळीपैकी एका जणानं आवाज दिला "तुमच्या घरीं." त्या बरोबर बाबू त्या माणसाच्या अंगांवर चित्त्यासारखा धावून गेला व एक जोरानं त्याच्या तोंडांत दिली. आम्हीही मंडळी होती तिथें धावून गेलों. मारामारीला दंगलीला सुरवात झाली. त्या मंडळींत एक उचापुरा व जबरदस्त मनुष्य होता त्याला गोपाळनं मुन्नालाल हलवायाच्या घरासमोर असलेल्या कांजी हौसच्या नालींत 'पुंठी' देऊन पाडलं व मानेवर रगे व अंगावर दनके देणं सुरू केलं. ह्या गृहस्थानं पडल्याबरोबर 'मरारेबाप' असा आरडा ओरडा सुरू केला. 'चलाव



बाबू परांजपे

लकडी ' असा कुणीतरी आवाज दिला. काडीवर काडी पडूं लागली. रोखठोक करतांना खाड खाड आवाज होऊं लागला. काठ्या ह्या मारपीटीच्या कामाच्या नव्हत्या. त्या तुटल्याबरोबर आमच्या मंडळींपैकी कांहींनी लगट करून त्यांच्या काठ्या हिसकल्या व त्यांना खाली पाडलं. आम्ही सर्वजणं गर्दीकरून मारपीट करत असतांना नारायण पेंटर व त्याचे दोनतीन स्नेही तिथे येऊन पोचलों. हा चितार ओळींत राहणारा गृहस्थ. त्यानं मला व बाबूला कैकवेळा चितार ओळींत पट्टा फेकताना, गदगाफारी खेळतांना पाह्यलं होतं. त्यानं बाबूला "तूम हमारे भाई हो. आपसमे नाहक काह्यकूं झगडा होना" असं म्हणूनही कांही वेळ चालत असलेली दंगल थांबवली. गोपाळनं ज्या माणसाला पुठ्ठी देऊन पाडलं होतं तो पेंटरला म्हणाला "इनोने सबने मिलके मेरेकू मारा" तेव्हा बाबू म्हणाला "फेर तुमारे ये सब लोक उस वक्त क्या सोये थे ?" तो थोडा वेळ थांबून फिरून म्हणाला "तुम हमारेमेसे किसीसे भी यहांपर अभी कुस्ती लढ सकते. किस्से लढना चाहते हो ?" पेंटर बाबूला म्हणाला "जाने देव भाई." ती सर्व मंडळी चालती झाली. ही मंडळी गेल्यानंतर ह्याच मारपीटीसंबंधी बोलत असतांना–कोणी काय पराक्रम केला व कसा केला हें एकमेकास सांगत असतांना–विठ्ठल पोफळी आमच्या जरीच्या टोप्या व फेटे दंगलींत रस्त्यावर पडले होते ते घेऊन आला. मी त्याला म्हणालों 'कायरे कोठं होतास तूं ?' तोः 'मुन्नालाल हलवायाच्या घराच्या सफरींत.' मीः "आम्हाला सोडून तिकडे जिलबी पेढ्यावर ताव मारायला गेला होता वाटते." तोः 'मारामारी करणं सगळ्याचंच काम नव्हे. दंगलीच्या सुरवातलीच तुमचे फेटे वगैरे पडले ते संधि साधून उचलून त्या हलवायाच्या सपरींत बसलों होतों. तिथे अंधारच होता. कशाची जिलबी. कशाचे पेढे. पण आता 'सरसलामत तर मिठाई दहा शेर' पण हे आता नाही. उद्यां."

आम्ही तिथून निघालों पोफळीला घरीं पोंचवलं व आम्ही मारामारीच्या खुणा अंगावर व कपड्यावर घेऊन घरीं गेलों. जळगांवकरणीचं गाणं ऐकण्याच्या आमच्या उत्कट इच्छेचा शेवट हा असा झाला. तेव्हा गाणं ऐकण्याकरिता काय खटाटोप करावा लागे. तेंच आता घर बसल्या गाणं–ग्रामोफोन लावला किंवा रेडिओ लावला कीं गाणच गाणं. इतकं सहज झालं आहे तें. असंही जरी

आहे तरी अखेरीस असं म्हणावस वाटतं कीं गाण्याच्या बैठकीची लज्जत कांही औरच.

**ख्याल टप्पेवाल्याचं व गझल ठुंबरीवाल्याचं भांडण—**

वर नागो ठुंबरीवाल्याचं नांव आलं आहे. तो फक्त ठुंबरीच म्हणायचा. नागपूरचे बाकीचे सर्वत्र गवयी ख्याल टप्पेवाले. ध्रुपद धुमाळवाले. ठुंबरी गझल कलावंतिणींनं म्हणावा; खानदानी गवयाचं तें काम नव्हे हा गवयांचा आग्रह. त्यामुळे बापुजी जोशी ठुंबरी, गझल म्हणत नसत-संगीतही म्हणत नसत. त्यांना जर कोणी त्यांची बैठक करणाऱ्यानं गझल किंवा संगीत पद म्हणायला सांगितलं तर तो स्वतःचा अपमान समजून तंबूऱ्याला गवसणी घालून निघून जात. नागो ठुंबरीवाला ठुंबरी शिवाय दुसरं कांही म्हणत नसे. पण त्याचं गाणं ऐकायला मिळणं मुष्कील. तो एक तऱ्हेवाईक मनुष्य होता. पैशाचा लोभी नव्हता तेव्हा पैशाकरिता त्याच्या गाण्याच्या खासगी बैठकीहि होत नसत. ख्याल टप्पेवाल्याबद्दल त्याला तिरस्कार. एकदा ख्याल टप्पेवाल्याचा व व त्याचा वाद झाला. तो प्रसंग असा. नागपूरांत गंगु जळगांवकरीण येऊन गेल्यानंतर कांही महिन्यांनी गझल म्हणणारा एक उत्तर हिंदुस्थानी मुसलमान गवयी नागपूरास आला. त्याची मिठी आवाजी व गझल म्हणण्याच्या नखरेबाज तऱ्हा ह्या मुळे तो फारच लोकप्रिय झाला. मैफल असा रंगवत असे की ज्याचं नांव तें! त्याच सुमारास आमच्या वोढाणा गावीं दादाजीच्या मुलीच्या मुलाची मौंज होती. त्या काळांत लग्न मौंजींत गवयाचं गाणं करण्याचा प्रघात असे. चांगला ३।४ दिवस तरी गाण्याचा प्रोग्राम असे. पाहुणे ४।५ दिवस तरी रहात. मग इतके दिवस करमणुकीचा प्रोग्राम पाहिजेचना. होतं खर्चाचं काम. हल्ली प्रमाणे ग्रामोफोनचं निर्जीव रडगाणं-अगदी स्वस्तांत स्वस्त व म्हणूनच डोक दुखायला लावणारं-रहात नव्हतं. गवयाच्या बैठकींत हावभाव, गाणं जाणणाऱ्याचें गाणं पसंत पडल्याचें निदर्शक उद्गार किंवा चेहऱ्यावरील भाव ह्यांनी उत्पन्न झालेलें जें एक आनंददायक व उत्तेजक वातावरण पहावयास मिळतं, गाणाऱ्याची व बजवय्याची जी केव्हा केव्हा चढाओढ होते व त्यापासून गाणं ऐकणाऱ्यांना ज्या उकळ्या फुटतात त्या सर्वांचा आनंद ह्या ग्रामोफोनच्या वा रेडीयोच्या गाण्यांत कुठून सापडणार?

ह्या दादाजीच्या नातवाच्या – मुलीच्या मुलाच्या — मौंजींत गाणं करायचं आहे तर उत्तम गवयी घेऊन या, असा तात्याजीचा निरोप, मला व गोपाळाला आला. आम्ही दोघाहि भावांनी ह्या मुसलमान गझल म्हणणाऱ्या गवयाला नेण्याचं ठरवलं. बापूजी जोशी ह्यांचा मुलगा 'भय्या' नुकताच ग्वालेरवरून शिकून आला होता. त्यालाही कांही प्राप्ति व्हावी म्हणून घेऊन जा असं आमच्या कांही मित्रांनी सूचना केली व त्या गोष्टीस आम्ही कबूल झालों. मुसलमान गझल-वाला गवयी आमच्या गावीं जाणार हे नागो ठुंबरीवाल्यास कळल्याबरोबर तो आमच्याकडे आला व म्हणाला "मी तुमच्या गावीं येतों. मला तुमचे पैसे नकोत. मी गाणंही म्हणणार नाहीं. मला ह्या गझलवाल्या गवयाचं गाणं ऐकण्याची संधि दवडूं द्यावयाची नाही." ह्याला म्हणतात गाण्याचं वेड! त्या गझलवाल्यावर बिलकूल फिदा झालेला गवयी! आम्ही त्या सर्वांना घेऊन गेलों. गाणं गझलवाल्या मुसलमानाचं व ख्यालटप्पेवाल्या भय्याचं दोघाचंही दोन दिवस झालं. लोक अर्थातच गझलवाल्यावर खुष होते. मौंजेच्या मांडवांतील गाण्याच्या दुसऱ्या बैठकीच्यावेळीं नागो व भय्या ह्या दोघांत गाण्यासंबंधी वाद झाला. अखेरीस नागो ठुंबरीवाला म्हणाला 'अरे काय करतोस टोपलंभर ताना घेऊन? रंगत कशांत आहे? एखादा मोठा भकास वाडा घे व एखादी छोटीसी बंगली जिच्यावर जाईजुईचे व चमेलीचे वेल सोडले आहेत, जिथे कारंज्याचे फवारे उडताहेत अशी घे. मनाची पकड अशा बंगलीनं घेतली तर नवल नाही. तीच घेणार. गाण्याचं असंच आहे मनाची पकड घेणारं गाणं तें गाणं. बाकीच रडगाणं–बोंबलणं." माझ्या समोर विष्णुपंत छत्रे व रहिमतखां ह्यांचं चित्र उभं रहातें. विष्णुपंताला गाण्याचं ज्ञान पण आवाज कर्कश व मोठा. ते तानाही घेत. पण त्याच बैठकींत रहिमतखांचं गाणं कांही औरच. रहिमतखांचा तो नाजुक, कोमल व गोड आवाज. म्हणण्याची तऱ्हा तर इतकी शांत की त्या बैठकींत गाणं कोण म्हणतो आहे हें समजणं मुष्कील. हाताचे आडवे तिडवे हाव भाव नाहीत, तोंड वेडवाकडं व्हायचं नाही. गाणं सहज म्हटल्या जात होतं. तानही सफाईची व सहज निघे.

## गोपाळ वधुपरिक्षेच्या मोहिमेवर

सन १९०२ सालची गोष्ट. तात्याजी त्या वेळेस नागपूरास होते. एक दिवस सकाळीं त्यांनी मला व गोपाळला बोलावून गोपाळला सांगितलं "ब्रम्हावर्तांची सुभेदार मंडळी-मिनिस्टर टु धी पेशवा असं ते आपल्याला म्हणवतात-दोन तीन दिवसांपासून मजकडे येतात. त्यांची एक मुलगी लग्नाची आहे. त्यांच्या मनांतून ती तुला द्यायची आहे. तूं आपली वधू पसंत करण्याकरिता तिथे जा. आज संध्याकाळीं स्टेशनवर त्यांच्या मंडळीपैकी मुनीम भेटतील ते तुझी तिथे जाण्याची सर्व व्यवस्था करतील. गोविंदा तुला सोबत राहील." गोपाळ त्या वेळेला मुंबईच्या ग्रँट मेडीकल कालेजमधे शिकत होता व मी मॉरीस कालेजमधे.

आमच्या कुटुंबांत मुलाच्याकरिता वधु पाहण्याच्या बाबतींत हळू हळू सुधार होत गेला. माझ्या वडील भावाचं-आबाजींचं-लग्न झालं त्या वेळेला त्यांच्याकरिता मुलगी पसंत केली घराण्यांत ज्याना वडीलकीचा मान त्या आमच्या दादाजी चुलत्यानं. माझ्या करितां वधु पसंत केली माझ्या वडीलानं, आईनं व चुलत बहिणीनं. गोपाळ करितां मुलगी पहाण्याचा प्रथम प्रसंग आला मी, रामभाऊ अभ्यंकर-बॅ. अभ्यंकर यांचे वडील बंधु-व आबाजी आमचे वडील बंधु यांना. त्याच्या नंतरचा दुसरा प्रसंग गोपाळकरितां वधु पाहण्याचा तात्याजींनं गोपाळवरच टाकला. आणि अशा रीतीनं पूर्वापार चालत आलेल्या चालींत सामाजिक सुधारणा घडवून आणली. तात्याजींनं ब्रम्हावर्तास जाण्याचा हुकूम मला व गोपाळला केल्यानंतर आम्ही त्या तयारीनं घरून स्टेशनवर जाण्यास निघालों. स्टेशनवर जाताना शुक्रवार तलाव लागतो. तिथे आलों तेव्हा गोपाळ म्हणाला "आपण थोडा वेळ येथे बुरजावर बसूं. आतांच एकदम स्टेशनवर जायला पाहिजे असं नाही." आम्ही दोघंही तिथं बसलों. गोपाळ म्हणाला "मी कांहीं वेळापासून ब्रम्हावर्ताला जावं की न जावं त्याचा विचार करतों आहे." मी: "म्हणजे! असं वाटायला कारण? मला तर गोष्ट मोठी सोपी दिसते. तुला मुलगी पसंत असली तर पसंत म्हण, नसली तर नाही म्हण." गोपाळ: "तें खरं रे. त्या दृष्टिनं मुलाची बाजु मोठी मजबूद असते. पसंती नापसंतीचा अधिकार मुलालाच दिला आहे. हे सर्व एकतर्फी

काम. मुलीचा बाप मुलीला वराची परिक्षा करण्याचा हक्क यायला तयार नाही. मुलानं मुलगी पसंत केली की मुलीला मुलाच्या गळ्यांत बांधून मुलीचा बाप मोकळा होतो. त्याला वाटतं 'चला आपल्या शिरावरचं ओझं आपण उतरून ठेवलं. आतां पोरगी आहे अन् तिचं नशीब आहे. आपण काय तिच्या जन्माला पुरणार.' केव्हा केव्हा शिरावरचं हें ओझ उतरवून ठेवतांना हुंड्या-खाली रगडून निघतो बिचारा ! तरी पण हें ओझं उतरवून ठेवल्यामुळे त्याच्या मनाला जी एक शांती मिळते त्या समोर हुंड्याचं ओझ कसं बसं सहन करतो."

गोपाळ मी त्याचा वडील बंधु असताही मोकळेपणाणं बोलत होता ह्याला कारणंही तसचं होतं. मी फक्त दोन वर्षानं त्याच्या पेक्षा मोठा. एरव्ही त्या वेळच्या सामाजिक पद्धतीला अनुसरून त्यानं माझा मान ठेवायलाच पाहिजे होता. व मान ठेवावयाचा म्हणजे बोलणं बेताबाताचंच पाहिजे होतं. मन मोकळं करून अंतःकरण खुलं करून बोलणं शक्यच नव्हतं. पण आम्ही दोघं भाऊ शाळेंत एकदमच गेलों, एकमेकांशीं आखाड्यांत कुस्ती खेळत गेलों. गद्गाफरींची व लाठीकाठीची मारामारी करीत गेलों त्या मुळे आम्हा दोघांत दोन मित्रांत जो मनाचा मोकळेपणा असतो तो होता. उन्हाळ्यांतल्या सहली, नागपूरांतल्या मारामारी व त्याच त्या समवयस्क मित्रांची दोघांनाही सोबत ह्या मुळे वडील धाकटेपणाचा, मानापमानाचा प्रश्न कधी आमच्या समोर नव्हताच.

गोपाळचं बोलणं संपल्यानंतर मी त्याला म्हणालों, "मग वर पसंत की नापसंत ठरविण्याचा हक्क तिलाही असावा असं तुला वाटतं ? बाह्य स्वरूपावरून वा परिस्थितिवरून पसंती नापसंती ठरवणं धोक्याचं आहे. कोणत्याही मुलीला खरं सुख तिचा नवरा व तिच्या सासरची माणसं स्वभावानं कशी आहेत ह्यावर अवलंबून आहे. स्वभावानं चांगली असली तर सुख व खाष्ट असली नतद्रष्ट असली तर दुःख. आपल्या तानीचंच उदाहरण घेना. दादाजीनं इतक्या खस्ता खाऊन व झीज सोसूनही तानीला काय सुख मिळालं. मुलीचा सासरच्या माणसाशीं संबंध म्हणजे परक्या माणसाशीं संबंध. त्यांच्या संबंधी मुलीच्या बापाला जिथे बरोबर बातमी मिळत नाही तिथं मुलगी काय

रडणार ! अशी चौकशी करतां येणं चांगल्या प्रौढ मुलीला सुद्धा शक्य नाही."
गोपाळः "वर निवडण्याचा अधिकार मुलींना असावा ह्या मताचा मी आहे. तुझ्या बाकीच्या म्हणण्यांतही तथ्य आहे. नाही असं मी म्हणत नाही. मी विचार करतों आहे दुसऱ्याच एका गोष्टीचा. ह्या मिनिस्टर टु धी पेशव्याचा जावई होण्याचं माझ्या मनांत नाही. ज्या मोकळ्या वातावरणांत मी आता वापरतों आहे तें मला त्यांचा जावई झाल्यानंतर मिळणं शक्य नाही. मी कोठे बसावं, कोठे जावं, कोणाशीं बोलावं इत्यादि हजार तऱ्हेचे निर्बंध माझ्यावर लादून मला नजरकैदेंत ठेवल्यासारखं करणार. मी व माझा भाऊ किंवा मित्र ह्याना निरनिराळ्या तऱ्हेनं वागवण्यांत येणार. आपल्याला कांही हे जमणार नाही. आपण बेछूट माणसं आणि मग हे म्हणणार जावयानं त्यांचा अपमान केला म्हणून ! ज्याना खूप श्रीमंताचा घरजावई होण्यांत आनंद वाटतो त्यांची गोष्ट निराळी. त्यांना सुख पाहिजे, पैसा पाहिजे, मानमरातब पाहिजे व तो त्यांना मिळतो. पण त्या करिता बहुमोलाचं स्वातंत्र्य व स्वाभिमान गमावायला ते तयार असतात. त्यांचं मन दगडासारखं व कातडी गेंड्यासारखी."

गोपाळचा स्वभाव विलक्षण मानी व तारट. म्याट्रीकमधे असताना त्याचं व वझे ( सीटीस्कूलमधे गणीत शिकवणारे मास्तर ) मास्तरचं दोघाचं रोज भांडण चाले. मॉरीस कालेजमधे असतांना प्रिन्सीपाल ताम्हन एक दिवस बोलले तर त्यानं प्रिं. ताम्हन यांच्या वर्गांत जाणंच सोडून दिलं. ग्रँट मेडीकल कालेजच्या शेवटच्या परिक्षेच्या वेळीं प्रो. मसीना व प्रो. स्ट्रीट ह्यांच्याशीं भांडण केलं. चुलते दादाजी, वडील तात्याजी व आई दादी ह्यांच्या शिवाय त्यानं कोणाचा शब्द ऐकून घेतला नाही. उत्तरास प्रत्युत्तर, सवालास जबाब असं त्याचं नेहमीच ठरलेलं असे. कोणालाही त्याच्याशीं बोलताना भीतीच वाटे की हा आपली उतरून तर नाही ठेवणार. असा त्याचा स्वभाव. वर दिलेल्या त्याच्या भाषणाचा झुकलेला कल तुम्ही आता समजूं शकाल असं मला वाटतं. त्यानं ब्रम्हावर्तीला जाण्याला आपण तयार नाही असं दर्शविल्यानंतर मी म्हणालों "ठीक आहे. चला घरीं." स्टेशनवर न जातां आम्ही घरीं आलों. हें तात्याजीस कळलं तेव्हां त्यानी आमच्या आईला दादीला "ह्या

पोराईच्या फंदांत आपण आता पडणार नाही" असं म्हटल्याचं तिच्याकडूनच समजलं.

ह्याच सालीं सिस्टर निवेदिता नागपूरला आल्या व त्यानी दांडपट्ट्याचे व तरवारीचे खेळ व कुस्ती पहाण्याची इच्छा दर्शविल्यावरून बाबू परांजपेनं व मी खेळ करू दाखविले. हे खेळ खेळणाऱ्यांना सुशिक्षित लोक गुंड म्हणत सबब बाईनी एका व्याखानांत त्यांचे कान उपटले. नंतर कांही दिवसांनी बाबू परांजपे वरून बाबू जामदाराशीं अटीतटीची कुस्ती खेळण्याचा मला प्रसंग आला व कुस्ती मी जिंकली. (का. स. र. क १ ला.)

१९०५ सालीं गोपाळनं मुंबईच्या एल. एम. एसच्या वैद्यकीच्या परिक्षेंत पहिला नंबर मिळवल्यानंतर विलायतेस शिकण्यास जाण्याचा आग्रह धरला. त्याला लग्नाच्या मुलीही सांगून येऊं लागल्या. मुलींच्या बापाची ये जा सुरू झाली. आईचं दादचिं म्हणणं पडलं "विलायतेस जाण्यापूर्वी तूं लग्न केलं पाहिजे अशी माझी इच्छा आहे." गोपाळही तिला मी लग्न करत नाही असं म्हणाला नाही. आणि गोपाळच्या बाबतींत ही तिची शेवटचीच इच्छा ठरली. कारण तो विलायतेहून परत येण्यापूर्वी ती स्वर्गवासी झाली. आणि असं वाटतं बरं झालं गोपाळ तिच्या इच्छेप्रमाणेच वागला. नाहीतर त्याच्या जिवाला नेहमीची हुरहुर लागून गेली असती. त्याचं आईवर अत्यंत प्रेम. तिच्या म्हणण्याच्या विरूद्ध तो कधी गेला नाही. आईनं दादीनं सांगून आलेल्या सर्व मुलींत तिच्या आईकडून लांबच्या नात्यांत असलेल्या वणीच्या देशमुखाची मुलगी पसंत केली. तिच्याशींच गोपाळचं लग्न झालं. त्या मुलीचं सासरचं नांव अन्नपुर्णा देशमुख. तें नांव आता महाराष्ट्रांतील जनतेच्या परिचयाचं आहे. लग्नानंतर दोन तीन महिन्यानीच गोपाळ विलायतेस गेला. तिथून 'विलायतेस ये' असं मला पत्र पाठवलं व मला विलायतेस पाठवा असं तात्याजीना पत्र लिहिलं. मी १९०५ चे मार्च महिन्यांत विलायतेस गेलों. (का. स. र. क १ ला.)

### विलायतची यात्रा १९०६-१९०९

माझ्या विलायतच्या यात्रेंत स्वतंत्र व लढाऊ राष्ट्राला तिकडे किती मान आहे, ते शक्ति पूजन करणारे कसे आहेत, उत्तम नागरिक कसा असतो,

पोलीस नागरीकाचं संरक्षण किती उत्तम तऱ्हेनं करतात, नोकराला नेमून दिलेलं काम अगदी नेमल्या वेळीं तो किती प्रामाणिकपणानं करतो व म्हणूनच त्याला त्याचे हक्क गाजवून घेण्याला कसा अधिकार पोचतो, वेळ म्हणजे पैसा कसा वगैरे गोष्टी स्पष्टपणे नजरेस आणून देणारे अनेक प्रसंग आले. १९०९ चे मार्च महिन्यांत माझी विलायतची यात्रा संपवून मी हिंदुस्थानास आलों. (का. स. र. क. १ ला).

## बॅरिस्टरीच्या धंद्याचा काल. प्रॅक्टीस करीत असतांनाचे तीन नियम (१९०९-१९२०)

हिंदुस्थानांत आल्यानंतर मुंबईच्या हायकोर्टात ॲडव्होकेट नोंदून घेतलं. राष्ट्रमतावरील राजद्रोहाचा खटला बॅ. बाप्टिसा बिनवेतन चालवत होते तो इतर दिवाणी खटले ऐकण्यास हायकोर्टात जात होतों. मुंबईस सरासरी ६।७ महिने राहिल्यानंतर नागपूरला येऊन तिथल्या ज्युडीशीयल कमिश्नरच्या कोर्टात ॲडव्होकेट नोंदून घेऊन प्रॅक्टीस सुरू केली. प्रॅक्टीस सुरू करताना मी कचेरींतील कामासंबधी तीन कडक नियम पाळण्याचें ठरविलें.

नियम पहिला. खुनाचा आरोप ज्याच्यावर केला आहे अशा गरीब आरोपी जवळून मूळ केस व अपील चालवण्याकरितां फी घ्यायची नाही. धंदा करीत असतांना प्रत्येक धंद्यांत प्रत्येकाला थोडं फार पुण्य जोडतां येतें. पुण्य हा शब्द कसाच की वाटत असेल तर 'परोपकार' करण्याची संधि मिळते तीचा फायदा घ्यावा. होईल तेवढं पुण्य किंवा परोपकार जोडावा.

नियम दुसरा. राजकीय खटला-राजद्रोहाचा खटला ज्याच्यावर चालू झाला असेल अशा आरोपी जवळून मूळ कोर्टात व वरही फी घ्यायची नाही. देशाची काळजी वाहणारा देशभक्त देशहितांकरिता सरकारवर कडक टीका करून आपल्यावर संकट ओढवून घेतों तेव्हा स्वतःच्यानं इतर कांही नाही झालं तर देशभक्ताची सेवा निदान त्याच्या देशभक्तीचं कौतुक म्हणून त्याला आपली सहानुभूति म्हणून इतकं तरी करायला पाहिजे.

नियम तिसरा: बायांच्या विरुद्ध कसलाही मुकर्दमा घ्यायचा नाही. बायांनी अन्नवस्त्रा करितां आणलेल्या दाव्यांत त्यांचा हक्क बुडविण्याकरितां

दुसऱ्या बाजूनं जीं बचावाचीं गलीच्छ कारणं व पुरावे आणले जात ह्या मुळे केला. पण तो तेवढ्या पुरताच मर्यादित ठेवला नाही. ह्या नियमाचं पालन करतांना माझ्या जीवश्च कंठश्च मित्राशीं भांडण करण्याचा एकदा प्रसंग आला.

## बाया विरूद्ध अभ्यंकराचाही मुकर्दमा घेतला नाही

एक दिवस सकाळीं बॅ. अभ्यंकर (नरकेसरी) ह्यांनी 'मला जरूरीचं काम आहे तर आताच भेटायला ये' असं पत्र एका मनुष्याबरोबर पाठवलं. मी त्यांना भेटलों व विचारलं "कायरे बोवा काय असं तातडीचं काम आहे ? अगदी आताच ये असं लिहिलंस. थोडें फुरसतीनं आलों असतों तर नसतं का चाललं." अभ्यंकर: "मी चहा बोलावतों. चहा येईपर्यंत आपण गोष्टी करूं." त्यानं जी माहिती सांगितली त्यावरून असं दिसून आलं की अभ्यंकराना एका स्थावर इस्टेटी संबंधी कोर्टांत फिर्याद करावयाची होती. फिर्याद दोन स्त्रियाविरूद्ध. एकंदर हकीकत ऐकल्यानंतर मी म्हणालों "बायांच्या विरूद्ध मी मुकर्दमा घेत नाही. हा नियम मोडण्यास मी तयार नाही." अभ्यंकर: "माझ्या करितां तरी तूं हा मुकर्दमा माझ्यातर्फे घेतलाच पाहिजे." मी: "तूं माझा मित्र आहेस. अगदी जीवश्च कंठश्च. पण माझा नियमही मला कांही कमी प्रिय नाही. मी तो तोडूं इच्छित नाही. गावांत वकीलाला कांही तोटा नाही. कोणाच्या कडूनही हें काम करवून घे." अभ्यंकर: "मुकर्दमा तुलाच पेश करावा लागेल व चालवावा लागेल." मीही तितकंच ठासून म्हणालों: "मी चालवणार नाही. दुसरं कांही काम नसेल तर मी जातों." अभ्यंकर: "दुसरं कांही काम नाही. जायचं असेल तर जा. पण चहा घेऊन जा. आणि ज्या कामा करिता मी तुला बोलावलं त्या संबंधी घरीं जाऊन विचार करून मला कळव."–मी: "माझा निश्चय बदलण्याचा मुळीच संभव नाही. नियम हा नियम. चहाला माझी हरकत नाही." चहा घेऊन घरीं गेल्यावर काही वेळानं माझ्याकडे ज्या बायावर मुकर्दमा होणार होता त्या बायांच्या पैकी एका बाईचा मुलगा आला. हा त्या वेळेस कॉलेजांत फर्स्ट इएर विद्यार्थी होता व आता कांही वर्षापासून वकीली करीत आहे. तो म्हणाला "अभ्यंकरानं मला बोलावलं आहे. आईनं म्हटल की अभ्यंकराकडे जाण्यापूर्वी देशमुखांना भेट व सर्व हकीकत सांगून त्यांच्या सल्ल्याप्रमाणे वाग. मग मी

काय करावं हें सांगा." मीः "तूं अभ्यंकराकडे मुळीच जाऊं नकोस. तो तुला दटाऊन बोलेल व तूं घाबरुन कांहीतरी बरळून जाशील किंवा लिहून देशील. 'तूं कां आला नाहीस' असं जर अभ्यंकरानी तुला विचारलंच तर खुशाल माझं नांव सांग. "देशमुखांनी जाऊं नको असं सांगितलं म्हणून मी आलों नाही." तो मुलगा नंतर गेला. दुसऱ्या दिवशीं दुसऱ्या बाईचा नवरा मला भेटावयाला आला व मला त्यांच्यातर्फे मुकर्दमा घेण्यासंबधी बोलूं लागला. मी म्हणालों. अभ्यंकरातर्फे मी मुकर्दमा चालवत नाही ह्याचा अर्थ असा नाही की मी तुमच्यातर्फे मुकर्दमा चालवीन. तो माझा मित्र आहे. माझ्या व अभ्यंकरांच्या घराण्याचे दोन तीन पिढ्यापासूनचे संबंध आहेत. पैशापेक्षा स्नेहसंबंध ह्यांना मी जास्त महत्व देतों. ह्यांतच माणुसकी आहे. मला पैसे मिळवायला इतर पक्षकार आहेत. तुम्हीही इतर कोणी वकील ह्या मुकर्दम्यांत करूं शकाल. बिनपैशाची मी तुम्हाला अशी सला-तुमच्या हिताचीच-देतों की तुम्ही आपसांत समजून जा." हे गृहस्थ नंतर गेलेत. कांही दिवसानं दोन्ही पक्षांनी आप आपसांत भांडण मिटवलं. कचेरींत कोणीही गेलं नाही.

मी प्रयाक्टींस सुरू केल्यानंतर मला कोर्टातील काम बरं मिळूं लागलं. सीनीयर बॅरिस्टर्स व सीनीयर वकील हेच बहुत करून माझे प्रतिस्पर्धी असत. मला पैसे चांगले मिळूं लागले. "पावड्यानं पैसे ओढीन" असं मी म्हणत असे. त्या प्रमाणं ईश्वराच्या कृपेनं व स्वतःच्या मेहनतीनं मिळत गेले. पण मी खर्चही तसाच मोठ्या प्रमाणावर करीत गेलों. धंद्यांत पैसे मिळत त्या पैकी कांही ह्या प्रांतांत व बाहेर ज्या राजकीय व सार्वजनिक चळवळी चालत त्यांत खर्च करीत असे व बाकीचे इतर खर्चांत. प्रयाक्टीस सुरू केल्यानंतर चार पांच वर्षांनी एकदा मला गोपाळनं विचारलं, "कायरे कांही हिशोब वगैरे ठेवतोस कां?" मी म्हणालों "हिशोब कशाला पाहिजे? मी सिगार सिगारेट पीत नाही. दारू नाही; किंवा दुसरं व्यसन नाही. खर्च होतो तो योग्य कामाकरिताच. मग हिशेब ठेवण्याची खटखट कशास पाहिजे."

## अनोळखी संस्थानिकाचं नंबरवाल्या जहालाकडून स्वागत

१९०६ ते १९२१ हा जहाल लोकांच्या-लोकमान्य टिळकांच्या अनुयायांचा आत्यंतिक राजकीय चळवळीचा काल. परकीय सरकारची त्यांच्या

प्रत्येक हालचालीवर बारीक नजर असे. आणि जहालाना त्रास देण्याचे त्यांचे जे अनेक मार्ग होते त्यांत जहालाना समाजाकडून वाळत टाकणें हा एक प्रमुख मार्ग होता. ह्यांना भेटावयास कोणी आला किंवा हे कोणाच्या भेटीस गेले की काम कोणतंही कां असेना त्या माणसाच्या मागे लागे ' चलबुलाती. ' त्याला तंगी देण्यांत येई. बॅ. चक्रवर्ती यांनी दादासाहेब खापर्डे यांना दिलेल्या जेवणासंबधीचं प्रकरण याच प्रकारचं. बॅ. चक्रवर्तींच्या नाकांत दम आणला होता. (का. स. र. क. १ ला)

सरकारी किंवा सरकारशीं संबंध ठेवणारे आपल्यावर जहालाची सावली सुद्धा पडूं देत नव्हते. ब्रिटीश इंडियांत जो प्रकार तोच संस्थानांत. संस्थानिक तरी काय करतील. हिंदुस्थान सरकारच्या मर्जीप्रमाणेच त्याना वागणें भाग पडे. त्यांची स्वतःचीं लफडेंही नरीच तेव्हा रेसीडेंटच्या म र्जीप्रमाणेच त्याना वागणें भाग पडे. रेसिडेंटच्या हातचें बाहुलें व त्याला मिंधे असे हे संस्थानिक असत. अशा ह्या कालांत १९१७ सालीं दसऱ्याच्या नवरात्रांत माझ्या भावाचा गोपाळचा मुंबईहून तार आला. 'ध्रांगध्राचे महाराज उद्या कलकत्त्याहून नागपूर मार्गे येताहेत त्यांचं स्वागत कर. ' ह्या संस्थानिकाचं स्वागत करणं म्हणजे त्याच्या पाठीमागे सरकारचा ससेमिराच लावणं व म्हणून स्वागत करणं योग्य होईल कां? असा विचार मनांत आला. कारण मी पडलों नंबर असलेला जहाल व म्हणून माझं त्यांचं स्वागत करणं त्याना बाधलं असतं. बरं स्वागत न करावं तर गोपाळचा निरर्थक गैरसमज होणार हाही विचार मनांत येऊन गेला. भावाच्या म्हणण्याप्रमाणे स्वागताच्याच तयारीस लागलों. ह्या महाराजाचं, संस्थानिकाचं, स्वागत करण्यांत एक छोटीशी अडचण होती. मी त्याला कधीच फोटोंत सुद्धा पाहिलं नव्हतं. पण स्वागत करायचं हे ठरविल्यानंतर त्याच्या तयारीला लागलों.

स्टेशनवरची प्लयाटफार्मची बाजू महाराज बागेतील झाडांच्या कुंड्यांनी व पानफुलाच्या तोरणांनी सुशोभित केली. स्टेशनवरच केलनरच्या रिफ्रेशमेंट रूम्स होत्या. म्यानेजरला तिथे २५।३० शाकाहारी वकीलांच्या फराळाची व्यवस्था व १० लंचची व्यवस्था करावयाला सांगितलं. आणि हें सर्व करत असतांना एकदम डोक्यांत कल्पना आली की डीस्ट्रीक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ

पो ालाला लंचला बोलवावं. तो स्वागताच्या व लंचच्या वेळेला हजर असला म्हणजे खरी वस्तुस्थिती काय होती हे त्याला माहित राहील व C. I. D. च्या गुप्त पोलीस खात्याच्या तिखट मीठ लावलेल्या रिपोर्टांना कांही किमत राहणार नाही. डी. एस. पी. ने येण्याचें कबूल केलें. सूर्यकांत बॅरिस्टर हे आपल्या विनोदी भाषणानं हिंदी व युरोपियन लोकांत सारखेच लोकप्रिय होते त्याना बोलावलं. त्यानीही येण्याचं कबूल केलं. नंतर इतराना बोलावलं. दुसऱ्या दिवशीं डाकगाडी येण्याचे थोडा वेळ पूर्वी मी स्टेशनवर गेलों. गाडी स्टेशन-मध्ये आली. त्या वेळेस निमंत्रित केलेले सर्व वकील व बॅरिस्टर माझ्याभोवती घोळका करून उभे राहिले होते. उतारू व इतर तमासबीन हेही शृंगारलेलं स्टेशन व माझ्या भोवतालचा घोळका पाहून आज आहे तरी काय असं वाटून आमच्या जवळच थोड्या दूर अंतरावर उभे होते. स्टेशमास्तर कडून, आधीच ठरविल्यामुळे, गाडी थांबविल्या गेली ती अशी 'की राजेसाहेबाचा डबा आमच्या नजीकच. राजेसाहेबाचे डब्यांत जाऊन मी डाक्टर देशमुखाचा भाऊ अशी स्वतःची ओळख करून दिली व नंतर बरोबर असलेल्या मंडळीची ओळख करून दिली. राजेसाहेबाच्या गळ्यांत बरेच हार पडले. त्यांत एक चांगला मोठ्या गुलाबाचा हार राजेलक्ष्मणराव भोसले ह्यांच्याकडचाही होता. दरम्यान गर्दीही–तमासबिनांची–डब्याजवळ वाढूं लागली. डब्यांतून राजे-साहेब, मी व माझे स्नेही बाहेर पडलों व त्या दाट गर्दीतून रस्ता करून केलनरच्या रिफ्रेशमेंट रूम्समधे जाणार तोंच एक पोलीस सबइन्स्पेक्टर 'देशमुख कुठे आहेत' असं विचारीत विचारीत गर्दीतून रस्ता करीत माझ्या-जवळ आला. माझ्यावर पोलीस कांहीतरी किटाळ आणता आहेत असं लोकांना व माझ्या स्नेह्यांना वाटलं कारण मी पोलीसच्या निगराणी खालचा जहाल हें त्याना माहित होतं. खळबळ मचली. सबइन्स्पेक्टर माझ्या जवळ आला आणि मला म्हणाला; कप्तान साहेब आपणाला भेटूं इच्छितात.' मी त्याला म्हणलों 'मी येथेंच थांबतों. त्यांना पाठवून द्या.' हें काय गौडबंगाल आहे हें माझ्या स्नेह्यांना व तमासबिनांना कळेना. स्वागत समारंभ अटक समारंभांत रूपांतर होत आहे की काय असं वाटलं. कप्तानसाहेब आल्याबरोबर मी त्यांची व राजेसाहेबाची ओळख करून दिली. मग आम्ही म्हणजे मी, राजे-

साहेब व निमंत्रित मंडळी (डी. एस. पी. सुद्धा निमंत्रित होता) केल्नरच्या रिफ्रेशमेंट रूम्स मधे गेलों. लंचच्या टेबलाच्या एका टोकाला राजेसाहेबाला बसवलं व समोरच्या टोकाला मी बसलों. राजेसाहेबाच्या उजव्या हाताला सूर्यकांत बॅरिस्टर ह्यांना बसवलं व डाव्या हाताला डी. एस. पी. ला. बाकीची लंचवाली मंडळी टेबलाच्या दोन्हीं बाजूस बसवली. मी माझा कांही वेळ शाकाहारी पाहुण्यांचा समाचार घेण्यांत घालवला. रा. ब. जग्गाराव नायडू व (आताचे कर्नल) कंकय्या नायडू ह्यांचा परिचय करून देण्यापलीकडे–ह्या रिफ्रेशमेंट रूम्समधे हे उशीराने आले होते–मी ह्या संस्थानिकाशीं कांहीही बोललों नाही! ह्या प्रसंगीं काय घडलं ह्या गोष्टीचा पुरावा देणारे दोन विश्वसनीय साक्षीदार एक सरकारी डी. एस. पी. व एक बिन सरकारी बॅ. सूर्यकांत तयार करून ठेविले. गाडी सुटण्याची वेळ झाली तेव्हा ह्या महाराजांना गाडींत बसवून आम्ही सर्वांनी त्यांना निरोप दिला. दोन दिवसांनी डॉक्टर बंधुचं पत्र आलं, "अरे तूं केलंस तरी काय? The Maharajah is terribly impressed. असं स्वागत माझ्या संस्थानांत सुद्धा मला मिळालं नाही असं तो म्हणत होता. व सांगून गेला की तूं मुंबईस आलास म्हणजे मला लगेच तार कर." त्या संस्थानिकाला गुप्त पोलीसच्या कारवायामुळे रेसीडेंटमार्फत कांही त्रास झाल्याचं ऐकलं नाही. काट्यानं काटा काढणं ही एक मुत्सद्दीपणाची, दूरदर्शीपणाची गोष्ट आहे म्हणतात. डी. एस. पी. ला बोलावून सी. आय. डी. ची कारवाई निकालांत काढली.

## भाऊजी, या मुलीचा जीव वाचवा हो

१९१९ सालांतली गोष्ट. हिवाळा नुकताच सुरू झाला होता. सकाळची वेळ होती. सरासरी सहाचा सुमार. मी माझ्या सीव्हील स्टेशन मधील बंगल्यासमोरील बगीच्यांत मारुतिच्या देवळाजवळ उभा होतों. जवळच दोन लढाऊ तितर पक्षी झाडाजवळील माती पायांनी उकरून उधई खात होते ते पहात होतों व त्यांचे उंच स्वरांतील बोल ऐकत होतों. अशा वेळेला वणीचे आबाजी देशमुख–माझ्या डॉक्टर बंधुचे सासरे माझ्या जवळ येऊन काकुळतीच्या आवाजांत म्हणाले "भाऊजी एका मुलीचा जीव वाचवाहो." मी त्यांना ते

वर्णाहून केव्हा आलेत, कुठे उतरलेत, कोणत्या मुलीचा जीव वाचवायचा ही माहिती विचारली. माहिती ऐकल्यानंतर मी म्हणालों, "आबाजी, तुम्ही बंगल्यांत जाऊन चहा घ्या. मी तुम्ही सांगितलेल्या कामाला आताच लागतों." ज्या मुलीचा जीव वाचवायचा त्या मुलीला त्यांनीच आपल्या बरोबर कां आणलं नाही असा विचार मनांत येणं साहजिक होतं व त्याना तसं विचारणं ही साहजिकच झालं असतं. पण त्यांच्या सांगण्यांत इतकी कळकळ भरली होती की माझ्या डोक्यांत तसला विचार आला नाही. मग विचारणं तर दूरच. सईस थोड्या दूर अंतरावर उभा होता त्याला हाक मारून लवकर टांगा आणायला सांगितलं व तितर पक्षाना त्यांच्या पिंजऱ्यांत घालून पिंजरे मी व्हरांड्यांत लटकवून दिले. इतक्यात टांगा आला. तो जीव ज्या मुलीचा वाचवायचा तिच्या घराकडे मीच हाकलूं लागलों.

ज्या मुलीचा जीव वाचवायचा होता ती कायद्याच्या व्यवसायांतल्या एका गृहस्थाची दुसरी पत्नि. ह्या गृहस्थाचं वय असेल ३४-३५ वर्षांचं व ह्या दुसऱ्या पत्नीचं वय २०-२२ वर्षांचं. ह्या गृहस्थाची पहिली पत्नि एका श्रीमंत गृहस्थाची मुलगी. तिचा ह्या गृहस्थानं छळ केल्यामुळे ती झुरून झुरून मेली. दुसरंपणीच्या बापानं हे गृहस्थ शिकलेले आहेत, घराणं खानदानी आहे, घरची मालगुजारी आहे, जमीन जुमला आहे तेव्हा मुलगी देण्यास हें स्थळ योग्य आहे असं ठरवून मुलीच्या लग्नाच्या जबाबदारींतून मोकळं होण्याचं ठरवलं. व आपल्या मुलीचं ह्या गृहस्थाशीं लग्न करून टाकलं. ह्या गृहस्थांना दारू पिण्याची भयंकर सवय. रात्रंदिवस तुल्ल. दारूच्या पायीं हे गृहस्थ आपली प्रॅक्टीस गमावून बसले होते व मालगुजारी गाव व थोडी शेती खेरीजकरून स्थावर जंगम इस्टेटही. वणीचे आबाजी देशमुख ह्या गृहस्थाचे, वकीलाचे, नातेवाईक. त्या गृहस्थाकडे एक दोन दिवस राहण्याकरता आले होते. आल्याच्या दुसऱ्याच दिवशीं प्रातःकाळी ते स्नान करण्याकरितां स्नानगृहांत गेलेत. ती संधि साधून ह्या मुलीनं—त्या गृहस्थाच्या दुसरंपणच्या पत्निनं—आबाजीचे पाय घट्ट धरले, रडायला सुरवात केली व 'मला वाचवा, मला वाचवा' असं म्हणायला लागली. आबाजीनं तिला सर्व हाल विचारला तेव्हा त्याना कळून आलं हा गृहस्थ आपल्या बायकोला—तिला खूप मारतो व विहीरीजवळ नेऊन

तिला म्हणतो 'टाक उडी' 'दे जीव,' त्या मुलीनं आबाजीला आपले हात दाखवले. एकाही हातांत बांगडी नव्हती. ते विहिरीजवळ गेलेत तर जिकडे तिकडे विहीरीच्या भोंवताल बांगड्याचा चुरा पडला होता. आबाजीला त्या मुलीची कींव आली व ते माझ्याकडे आले. ह्या गृहस्थाच्या घरांत वडील माणसांपैकी कोणीच नव्हतं. आईबाप वारले होते; व ह्या दुसऱ्या बायकोला मूल बाळ नव्हतं. ह्या गृहस्थाच्या घरीं कोणाही गृहस्थाला किंवा बाईला जाणं मना होतं. मी टांगा त्या गृहस्थाच्या आवारांत घेऊन गेलों व सईसाला सांगितलं त्या गृहस्थाच्या सईसाकडून त्या बाईला सांगव कीं आब जींनं त्यांच्या करितां टांगा पाठवला आहे व बोलावलं आहे व तूं त्या बाईला बंगल्यावर पोचवून माझ्या करितां टांगा घेऊन ये. त्या प्रमाणे त्यानं केलं. दरम्यानच्या वेळांत मी ह्या गृहस्थाच्या घराच्या व्हरांड्यांत बसलों हेतु हा की हा गृहस्थ भेटला म्हणजे त्याला सविस्तर वृत्तांत सांगावा. पण नोकराकडून असं कळलं की साहेब उठलेच नाहीत. टांगा आल्याबरोबर मी आपल्या बंगल्यावर गेलों व त्या मुलीच्या माहेरा संबंधी चौकशी केली. मला कळून आलं की तिला एक मोठा भाऊ आहे व तो मुंबईकडे राहतो आहे. मी लगेच तार आफीसांत जाऊन तार करून आलों व थोडा वेळ आरामखुर्चींत स्वस्थ पडलों. पडल्या पडल्या मनांत विचार आला की ह्या गृहस्थानं जर मी ह्याची बायको त्याच्या घरून पळविल्याचा रिपोर्ट पोलीसांत केला तर ! माझ्या मनाची चलबिचल झाली. माझी नाचक्की करणारीं एका मागून एक चित्रें मला दिसूं लागलीं. तें पोलीस चौकशीचं चित्र, तें लोकांनी गर्दी केलेल्या कोर्टातील माझ्या मुकदम्याच्या सुनावणीचं चित्र, ती हुकूम सांगण्याच्या वेळची न्यायधिशाशी मुद्रा ही सर्व माझ्या नजरेसमोर एकामागून एक आली. पण हे सर्व प्रकार थांबवण्याचा विचार मनांत येण्यास उशीर लागला नाही. लगेच उठून टांग्यांत बसून डी. एस. पी. च्या बंगल्यावर गेलों, त्याला भेटलों, सबंध हकीकत सांगितली, तार केल्याची रसीद त्याला दाखवली व म्हणालों "तुम्हाला चौकशी करावयाची असेल तर खासगी रीतीने करा. एका सुशिक्षित व खानदानी घराण्याचा हा प्रश्न आहे. बेइज्जती कोणाचीच होऊं नये. ना बाईची ना बोवाची. त्या गृहस्थाकडून कोणत्याही पोलीस नाक्यावर रिपोर्ट आला तर

चौकशी दोनचार दिवस तरी होऊं नये असा आपण आपल्या सबइन्स्पेकटर्सना इतला द्यावा. तो पर्यंत या बाईचा भाऊही येईलच." डी. एस. पी. ने हें कबूल केलं. दोन दिवसांनी त्या मुलीचा भाऊ आला. तो प्रथम त्या वकील गृहस्थाच्या घरीं गेला. तो जिथे निजला होता त्या खोलींत गेला. त्याला दिसलं ते हें. खोलींतलं सर्व सामान अस्ताव्यस्त जिकडे तिकडे पडलं आहे. गृहस्थ निजला आहे पण अंगावर वस्त्र नाही व तोंडाकडे पाहिलं तर जीभ चांगलीच बाहेर आलेली. भाऊ माझेकडे आला व मला त्यानं त्या गृहस्थाचं हें वर्णन दिल्या बरोबर मी त्या गृहस्थाचे घरीं गेलों, चौकशी केली तर नोकरानं सांगितलं की दारू नव्हती म्हणून साहेब स्टोव्हच स्पिरीट प्याले. लगेच औषधाची योजना केली. दोन डाक्टर्सचं एकमेकाच्या विचारानं औषध देणं सुरू झालं. पण ते गृहस्थ वारले. दारूपायीं त्यांनी आपला जीव दिला. ती मुलगी मात्र वाचली व आपल्या भावाबरोबर माहेरीं गेली. 'जी सबसे प्यारा' म्हणतात.

## आमचा लोहचुंबक नाहीसा झाला

१९२० सालीं एक दुःखदायक कौटुम्बिक घटना घडली. वडील, तात्याजी १९२० सालच्या वसंत पंचमीचे दुसरे दिवशीं स्वर्गवासी झाले. तात्याजींना वाढोना मुक्कामीं १९१८ सालीं अर्धांगवायुची बिमारी झाली. एक हात, एक पाय व डोळा ह्यांच्यावर बराच परिणाम झाला. त्याना नागपूरला आणलं व डाक्टरचं औषध सुरू केलं. त्यांच्या शुश्रुषेकरितां, तुळजापूरकर व अच्युतराव कोल्हटकर वगैरे सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या संगतींत रंगलेले दामुअण्णा ह्याना मुंबई सोडून नागपूरला यावं लागलं. (तात्याजींना) त्याना थोडा आराम वाटला. प्रकृति किंचित सुधरली. पण त्यांची मुख्य तक्रार ही सुरू झाली की त्यांचा वेळ जातां जाईना. त्यांचं कांही धार्मिक ग्रंथाचं पठण, किंवा स्तोत्र, आरत्या, भूपाळयाचं पठणं असतं कांही अभंग येत असते तर काळ कटला असता. पण त्याना ह्या पैकी कांहीच पाठ येत नव्हतं मग दुसरा उपाय राहिला श्रवण. भागवताचा सप्ताह त्यांच्या करितां लावला होता. पण ही झाली थोड्याच दिवसाची गोष्ट. त्या वेळेला जर रेडीयो असता तर गोष्ट निराळी होती. वाटेल तितका वेळ करमणूक झाली असती. त्याना काही महिने आराम

वाटल्या नंतर त्यांच्या प्रकृतीनं फिरून उलट खाल्ली व त्याना शांतपणानं मृत्यु आला. वडील वारले त्या दिवशीं डाक्टर बंधुही नागपूरलाच होते. वडील वारले त्या दिवशीं गोपाळ म्हणाला " We were very fortunate in our parents." आपल्या आईबापाच्या बाबतींत आपण मोठे भाग्यवान. त्यांना शिक्षणाची किंमत त्या जुन्या काळांत कळत होती. हिंदुस्थानाबाहेर समुद्रापलीकडे आपणाला पाठविण्यांत त्यांनी धैर्य दाखवलं. आपण जें शिक्षण घेतों म्हणून म्हटलं तेच घेऊं दिलं. आपला शारीरिक व मानसिक विकास होण्यास हरतऱ्हेची संधि दिली.'

वडिलांच्या-तात्याजीच्या मृत्युनंतर १९२० सालापासून गोपाळचा-डॉक्टर बंधुचा-संबंध ह्या प्रांताशीं तुटला. तात्याजी जिवंत असतांना दर वर्षी अक्टोबर ते दिसेंबर हे महिने तो नागपुरला घालवित असे. पण तात्याजीच्या मृत्युनंतर तो लग्नप्रसंग खेरीज करून कधी आला नाही. आम्हा चौघा भावांना एकत्र आणणारा लोहचुंबक नाहीसा झाला.

## सार्वजनिक, राजकीय व सामाजिक कामगिरी. १९२१-१९३५

वडिलाच्या-तात्याजीच्या-मृत्युनंतर कांही महिन्यांनी म्हणजे १९२१ च्या जानेवारी महिन्यांत 'राष्ट्रीय मंडळा'च्या एका ठरावाने कांग्रेसच्या असहकारितेच्या ठरावास अनुसरून कोर्टावर बहिष्कार टाकण्याचा ठराव पास केला. मी तो पाळण्याचं ठरवलं. दोन तीन महिन्यांनी महात्मा गांधी यांच्याशीं 'महाराष्ट्र' आफीसांत माझा वादविवाद झाल्यावर त्यांच्या परवानगीने देशभक्त व स्वयंसेवक ह्यांजवर सरकारनं फौजदारी खटले भरल्यास त्यांचा बचाव करण्यास कोर्टांत जाण्यास हरकत नाही अशी त्या कोर्टाच्या बहिष्कारास मुरड घातली. स्वयंसेवकांचा व देशभक्तांचा बिनावेतन बचाव करूं लागलों. (का. स. र. क. १ ला.)

## नबाबी थाट गेला

सन १९२१ सालच्या सुरवातीनंतर दोन तीन महिन्यांनी प्रॅक्टीस सोडल्यामुळे पैसे मिळवणें बंद झाले. प्रॅक्टीसला सुरवात केल्यानंतर 'खोऱ्यानं पैसे ओढूं' म्हणून म्हणणारा जो मी त्याची अकस्मात वकीली बंद झाली व

त्यामुळे पैसे मिळवण्याचा मार्ग खुंटला. अठ्राच्या सव्वा पैसे खर्च करतांना 'एक दोन मुर्कदमे महिन्यांत कमी आले असं समजूं' म्हणणारा जो मी त्याला आता खर्चासंबंधी विचार करणं भाग पडलं. पैशाची बचत करण्याकरिता खर्चाची काट छाट करणं अवश्यक झालं. माझ्या एलिचपूरकडील मुसलमान पक्षकारानी माझ्या राहणीस नांव दिलेल्या 'ये तो नबाबी थाट है' चा खर्च कमी करण्यास मी सुरवात केली.

मनुष्यानं विचार करावा व दैवानं घडवून आणावं नेमकं त्याच्या उलट असे प्रकार केव्हा केव्हा कोणा कोणाच्या बाबतींत होतात. तसंच कांहीसं माझ्या बाबतींत होत आलं. प्रॅक्टीस करुन खूप पैसा मिळवूं असा विचार केला तर १९२१ चा कोर्ट बहिष्कार मधे आडवा आला. खर्च कमी असा विचार केला तोही फार काळ चालूं शकला नाही. खर्चांत केलेली काटकसर जेमतेम १९२३ पर्यंत सुरू राहिली. नंतर तीही बंद झाली व खर्चाचं प्रमाण पूर्वीप्रमाणे सुरू झालं. एवढच नव्हें तर वाढलं. एका मोटार ऐवजी दोन मोटारी व एक टांगा. दोन मोटारी पैकी एक फोर्ड पूर्वीची व डी. डी. यां दुसरी. ह्या डी. डी. यां मोटारचाही एक इतिहास आहे. डी. डी. यां मोटार माझ्या बंधुची-गोपाळची. ती त्यानं १९२३ सालीं मुंबईहून नागपूरला पाठवून दिली व मला एक पत्र टाकलं. "ह्या मोटारींत तात्याजी व लो. टिळक मुंबईस आलेत म्हणजे बसत. तात्याजी वारले. त्या नंतर थोडक्याच महिन्यानी लो. टिळक. डी. डी. यां मोटार त्यांचं स्मारक म्हणून ठेवायला पाहिजे. ती विकायची नाही. वापरतां वापरतां जितके दिवस चालेल तितके दिवस चालेल. बेकाम झाली तर तशीच घरीं पडून राहूं दे. विकूं नको." अशा रितीनं एक मोटार ऐवजीं दोन मोटारी वापरण्यांत येऊं लागल्या. १९२३ साल म्हणजे स्वराजिस्ट पार्टीच्या चळवळींचं व निवडणुकीचं वर्ष. दोन मोटारी वापरण्यांत येऊं लागल्या. खर्चाचं मान वर वर जाऊं लागलं.

## चौघे भाऊ चार दिशेला गेले

सन १९२१ ते १९२६ सालांत असहकारितेची चळवळ, स्वराजिष्ट या नात्यानं मध्यप्रांतांतील असेंबलींत काम, हिंदु मुसलमांच्या दंग्यांत हिंदुंच्या

संरक्षणाचं काम इत्यादि काम केल्यानंतर सन १९२७ पासून सामाजिक कार्य करीत असतानाच सामायिक कुटुंब पद्धतिमुळे उतन्न झालेल्या एका घटनेस तोंड देणं भाग पडलं. आम्ही चौघे भाऊ एकत्र होतों. पण वडील भावाला धाकट्या भावावर रूबाब खिचणं ठाऊक नव्हतं. प्रत्येकाला त्याच्या राहणींत, वागण्यांत व पैसे खर्च करण्यांत स्वातंत्र्य होतं. १९२६ सालीं माझ्या पुतण्यानं-त्रिंबकनं वडील भावाच्या वडील मुलानं वाटणीचा दावा कोर्टांत पेश केला. वाटणीचा दावा करण्यापर्यंत आमच्या पैकी कोणावर पाळी येईल असं कधीच कोणाच्याही स्वप्नांत नव्हतं. पण तो आला. दाव्याचा निकाल सरासरी ९।१० वर्षानंतर लागला. अपीलीचा निकाल सरासरी सहासात वर्षांनी. दरम्यानच्या काळांत इस्टेटीची थोडी बहुत धुळधाणही झाली. आमच्या पैकी प्रत्येक भाऊ दुसऱ्या भावापासून विभक्त झाला. तरी प्रत्येक भावानं थोड्या बहुत प्रमाणानं इतर भावाशीं आपले संबंध कायम ठेविले.

वाटणीचा दावा सुरू असतानाच निरनिराळ्या परिषदांचा-सामाजिक, शेतकी व औद्योगिक-अध्यक्ष मी होत गेलों. त्यांचा इतिहास ह्याच करण्डकांत 'इंद्रधनुष्य' ह्या मंजुषेंत आलेला आहे.

## शब्द बदलवण्याकरिता मी न्या. रानडे लागलों नाही

हिंदु संघटनाच्या कार्याचा अल्पसा आरंभ म्हणून ब्राम्हण जात एक व सुसंघटित करण्याच्या दृष्टिनं ब्राम्हणांच्या निरनिराळ्या शाखा-कण्व, ऋग्वेदी वगैरे,-व पोटशाखा-चरक, अबीर वगैरे ह्यांच्यामध्ये चालीरीति, रहाणी व खाणेंपिणें ह्यांच्यांत जर एकरूपता असेल तर ह्या शाखांत किंवा पोटशाखांत परस्पर बेटीव्यवहार सुरू करण्यास बेलाशक सुरवात करावी हा विचार अखिल भारत कण्व परिषदेचा अध्यक्ष ह्या नात्याने मी आपल्या अध्यक्षीय भाषणांत मांडला व परिषदेने त्याला ठरावाचें रूप देऊन ठराव पास केला. ही परिषद १९२७ चे मे महिन्यांत खामगाव येथे भरली होती. (पा. १६६) नंतर १९२७ चे डिसेंबर महिन्यांत आकोला येथे वे. शा. सं. ब्रम्हचारी नारायण शास्त्री मराठे ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारत ब्राम्हण परिषदेंत हाच ठराव कडाक्याची बरीच चर्चा होऊन पास झाला. ह्याही परिषदेस मी गेलों होतों. तिथे जाण्याच्या एक दोन दिवस आधी चरक पोटशाखेचे

एक दाट परिचयाचे गृहस्थ मला भेटले व त्या पोटशाखेवर रोटीबेटी व्यवहाराचे असले निर्बंध जाऊन दोन्हीही व्यवहार मुख्य शाखाशीं सुरू होतील असं करा, खामगांवच्या परिषदेंतील ठराव या बाबतींतील पास करून घ्या असे आग्रहाने म्हणाले. खामगांवच्या परिषदेंत पास झालेल्या सर्वच ठरावांना मान्यता मिळावी ह्या हेतूने मी आकोल्यास गेलों. तिथेही हा ब्राम्हण ब्राम्हणांतील बेटीव्यवहाराचा ठराव पास करून घेतला. खामगांवच्या व आकोल्याच्या परिषदेंत नागपूरचे दाजीशास्त्री चांदेकर ह्यांनीही भाग घेतला होता. आकोल्याच्या परिषदेनंतर एक दोन महिन्यांनी एक दिवस त्यांचा व माझा संवाद झाला.

शास्त्री: गोविंदराव, ब्राम्हणाच्या शाखा व पोटशाखा ह्यांच्यांत बेटीव्यवहार व्हावा म्हणून तुम्ही जबाबदार जागांवरून भाषण करतां पण अखेरीस तुमची गत न्या. रानडेसारखी न हो. पुनर्विवाहासंबंधी ते खूप बडबडले, त्यांनी खूप प्रचार केला व नंतर स्वतःवर पुनर्विवाह करण्याचा प्रसंग आला त्या वेळेस त्यांची आई विहिरींत पाय टाकून बसलेली आहे म्हणजे ती जीव देणार होती असं निमित्त सांगून त्यांनी त्या प्रसंगांतून आपली सुटका करून घेतली. तुम्हीही असंच कराल. सर्व शाखा पोटशाखांत विवाह व्हावेत असं म्हणतां पण तशी कृति करण्द्याचा प्रसंग आल्यास तुम्हीही असंच कांहीतरी भावाबंदाचं, बहिणीबायांचं निमित्त सांगून सुटका करून घ्याल. बोलण्यांत व कृतींत मेळ पाहिजे.

मी: शास्त्रीबोवा, मी आपला शब्द वापस घ्यायला कांही न्यायमूर्ति रानडे लागलों नाही ! प्रसंग आला म्हणजे दिसेल.

शास्त्री: ठीक ठीक. तुमची वडील मुलगी बकुल लग्नाची झाली आहे. पोट-शाखेंतल्या मुलाशीं कराल तीचं लग्न ?

मी: शास्त्रीबोवा मुलीचं लग्न दोन तीन वर्ष नाही केलं तरी चालेल. तिचं वय १५. शिवाय तिचं हायस्कूलचं शिक्षण पुरं व्हायचं आहे. पण ह्या सबबी सांगितल्या तर म्हणाल मी आपली सोडवणूक करून घेण्याकरितां पळवाट काढून घेतली आहे. समजा मी ह्या गोष्टी बाजूला ठेवल्या कारण तिचं साधारण

शिक्षण झालं आहे, घरच्या कामाची माहिती व सवयही झालेली आहे. व कुठे कसं वागावं हेंही कळतं. त्याच प्रमाणे तिची शरीर प्रकृतीही सुदृढ आहे. लग्न करायचं ठरवलं तरी तिच्याकरितां जो वर पहावयाचा तो मला पसंत पडेल असा पाहिजेना.

शास्त्रीः सांगा कसा पाहिजे तो. देवलाच्या शारदेंतली इंदिरा काकू म्हणते त्या प्रमाणे 'चतुर, सद्‌गुणी, सुंदरसा विद्वानांतही हिरा, घालिल मायेची शाल तिजवरी' असा?

मीः मुलगा चांगल्या वर्तनाचा, सुस्वभावी, निरोगीच नाही तर सशक्त.

शास्त्रीः मी सुचवणार आहे. त्या मुलाशीं तुम्ही कुस्ती खेळून घ्याना.

मी: शास्त्रीबोवा, मी तर राहूंच द्या पण तुमच्याशीं बरोबरीची कुस्ती खेळणारा असला तरी चालेल. मी म्हणतों हे चेष्टेवारी नेण्यांत मतलब नाही. वेळ प्रसंग आला तर त्या मुलाला आपलं आणि आपल्या बायकोचं संरक्षण करतां आलं पाहिजे. मुलगा गोरा गोमटा, चोपडा असला तरी कागदी पहेलवान असेल तर नापसंत. अच्छा आता मला अडथळा न करतां मुला संबंधीचं मी काय म्हणणार आहे तें ऐकून घ्या. मुलगा स्पोर्टसमन-खेळाडू असावा. शिक्षणानं कमीत कमी पदवीधर असावा. तो मिळवता असावा. घरची सांपत्तिक स्थिती फारच उत्तम असेल तर म्याट्रीक पास झालेला चालेल. पण त्याला चारचौघांत बोलावं कसं, वागावं कसं ह्याचं उत्तम ज्ञान पाहिजे. जगाचा व्यवहार कसा चालतो हें माहित पाहीजे. हे सर्व मुलाच्या संबंधी सांगितलं. पण त्याच बरोबर हेंही सांगू इच्छितों की मुलीचं वैवाहिक जविन सुखाचं होण्यास मुलाच्या घरची मंडळी सुस्वभावी पाहिजेत-मायाळू पाहिजेत. आता मुलगा जर एकटाच स्वतंत्र राहणारा व पैसे मिळवणारा असेल तर मग घरच्या मंडळीचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. संपलं माझं बोलणं.

शास्त्रीः मुलाच्या घरच्या मंडळीचा प्रश्न तुम्ही उत्पन्न केला! तुम्हाला पोट-शाखेशीं संबंध नको-तुम्हाला पडलेल्या पेचांतून सोडवणूक करून घ्यावयाची आहे असंच मी कां समजूं नये.

मीः शास्त्रीजी, मुलाच्या नातेवाईकांनी–विशेषतः स्त्रियांनी माझ्या बहिणींना कसं छळलं ह्याचा अनुभव मला आहे. मुलाच्या नातेवाईकांनी श्रीमतांच्या मुलीला मुलीच्या मार्फत तिचा छळ करून वा खूष टेऊन किंवा केव्हा असं केव्हा तसं करून माहेरच्या पैशाचा झरा आपल्याकडे ओढून घेण्याचे कस कसे प्रयत्न केले हे मी जाणतों. एका श्रीमंत खानदानी जमीनदारानं जेव्हा पाहयलं की मुलगा व मुलाचा बाप (हा श्रीमंत गृहस्थ होता) मुलीला छळून त्याच्याकडून पैसे उपटतात तेव्हा तो मला म्हणाला "देशमुख साहेब, काडीमोडीचा कायदा असता तर फार बरं झालं असतं. ह्या मुलीची काडीमोड करून तिला घरींच ठेवली असती. मुलीच्या नवऱ्याला व त्याच्या बापाला पैसे देतां देतां माझ्या नाकांत दम आला. मी त्या मुलीला अशा रीतीने पैसे तरी कोठपर्यंत देऊं? मला दुसऱ्या आणखी मुली आहेत, मुलगे आहेत. त्यांच्या शिक्षणाची व लग्नाची मला सोय पाहिली पाहिजेच की नाही." त्याच्या मनांत काडीमोडीची कल्पना आलेली पाहून मी चकीतच झालों. कारण तो उच्च वर्णीय गृहस्थ फार मोठ्या खानदानी घराण्यांतला माणूस. माझं व त्यांचं भाषण झाल्यानंतर एक दोन वर्षांनीच ती मुलगी क्षय होऊन बापाच्या घरींच मरण पावली. तिनं बापाची अशा रीतिने त्याला होणाऱ्या त्रासांतून नेहमीकरिता मुक्तता केली. म्हणून मुलाच्या त्याच प्रमाणे मुलाच्या घरच्या मंडळीचा प्रश्न उत्पन्न होतो – त्यांचा स्वभाव, चालरीत कशी आहे ह्याची माहिती पाहिजे असते.

शास्त्रीबोवानी गोविंदराव चावजी, हे त्यावेळेस नागपूरास तहसीलदार होते, त्यांच्या मुलाचं हरीभाऊचं नांव सुचवलं. मला त्यांच्या वडिलांपासून त्यांच्या घराण्याची माहिती होती व मुलगाही पसंत पडला; सबब मुलीचं लग्न ठरवून टाकलं. शास्त्रीबोवाना म्हटलं "का, शास्त्रीबोवा न्या. रानड्या-सारखी पळवाट नाही ना काढली." लग्न १९२८ च्या मे महिन्यांत झालं. ह्या लग्नांत नाविन्य होतं. सबब दोन्हीकडची खूप मंडळी आली होती. लग्न जुन्या रीतिप्रमाणं बरोबरीचं झालं व पांच दिवस चाललं. ह्या लग्नानंतर ह्या पोटशाखेंत व मुख्य शाखेंत दोन तीन वर्षांत बरेच विवाह झालेत.

## विवाह हे ईश्वरी नेमानेमाच्या गाठी होत

माझी मुख्य शाखा (कण्व) व चावजी यांची पोटशाखा ह्या दोन शाखांत विवाह संबंध घडून आल्यानंतर माझी मुख्य शाखा व इतर मुख्य

शाखा ह्यांत विवाह संबंध घडून आलेत. त्यापैकी एका विवाहासंबंधी सांगावसं वाटतं. कारण साधारणपणे लोकांत जो समज आहे की लग्न म्हणजे 'ईश्वरी नेमानेमाच्या गाठी' 'Marriages are made in heaven.' याचं तें उदाहरण आहे. त्याच प्रमाणे आपआपल्या सरकारच्या नजरेंत सलत असलेल्या दोन घराण्यांतील आकस्मिक विवाह संबंध ह्यांही दृष्टीनं त्या विवाहाकडे कुतुहलपूर्वक पहातां येणार आहे.

गरमागरम राजकीय वातावरणानं क्षुब्ध झालेल्या दिवसांतील तो प्रसंग. सन १९३१ मधे सरकारचा बॉयकॉट आरडीनन्स अमलांत आला होता. मी त्या आरडीनन्सशीं मुकाबला करण्याकरिता स्वदेशी लीग काढली होती. १९३२ च्या सुरवातीस कांग्रेस कमिट्या रद्द केल्या होत्या. कांग्रेसच्या युद्ध मंडळ्या स्थापन झाल्या होत्या. त्या सरकारने बेकायदा ठरविल्या होत्या. डीक्टेटर्सना जेल दाखविण्यांत येत होते. कांग्रेस कार्यकर्त्यांची धरपकड व त्यांच्या मालाच्या जप्त्या सुरू होत्या. ह्या दिवसांत स्वयंसेवकांचा बचाव व राजकारणांत पडणाऱ्याना त्यांचा बचाव किंवा अन्य तऱ्हेनं मदत करण्याकरिता मला जिल्हा कोर्टांत–माझ्या सीव्हील स्टेशनमधील बंगल्याजवळच–जावं लागत असे. अशाच एका दिवशीं दुपारी कोर्टांतून मी घरीं आलों व पत्राची पेटी उघडली. त्यांत एक पत्र मिळालं. त्यांतील महत्वाचा मजकूर असाः "श्री. न्या. केशवरावजी कोरटकर यांचे चिरंजीव रामराव हे नागपूरास आपल्याकरिता वधू पहाण्यास श्री. माधवराव पाध्ये यांचेकडे गेले आहेत. त्यांना तुमची मुलगी सरल दाखवा." मी माझ्या भावाला दामुअण्णाला बोलावलं. त्याला हें पत्र वाचायला दिलं. मी म्हणालों 'तूं मोटार घेऊन स्टेशनवर जा. हे गृहस्थ कदाचित वापस गेले असतील किंवा आज वापस जातील किंवा येथेच असतील. तूं आता स्टेशनवर जा. आज गाडीने जाणार असतील तर तूं त्याना थांबविण्याची कोशीस कर. जर आज गाडीच्या वेळेस स्टेशनवर ते दिसले नाहीत तर मग पाध्यांच्या कडे ते गेलेत की आहेत अशी चौकशी कर. गेले असल्यास निरूपाय आहे. गेले नसल्यास त्यांना आपल्याकडे सरलला पाहण्याकरिता बालावतां येईल. ह्या गोष्टी मागाहून करता येतील. पण आत्ताच्या आत्ता तूं मोटार घेऊन स्टेशनवर जाण्यास निघ. गाडी सुटण्यास फक्त वीस मिनीटें आहेत.'

दामुअण्णांनी लगेच कपडे करून मोटारींत उडी टाकली व स्टेशनकडे भरधाव मोटार सोडली. मेल ज्या प्लॅटफार्मला होती त्या प्लॅटफार्मकडे धावत गेले. गाडी जवळ जाऊन पोचतात तो गार्डने गाडी सुटण्याची शिटी दिली व हिरवा झेंडा मोकळा केला. दामुअण्णानी 'काम महत्वाचं–फारच महत्वाचं दोनच मिनीटं गाडी थांबवा' अशी गार्डाला विनंती केली. त्यानं दामुअण्णाला धावतांना पाहिलंच होतं. गार्डानं लाल झेंडा मोकळा केला व हिरवा गुंडाळला. दामुअण्णानं माधवराव पाध्येच्या पुतण्याला दुरून एका डब्याजवळ पाहिलं व कोरटकर तिथेच असले पाहिजेत असा अंदाज करून दोन तीन हमालांना आपल्या बरोबर धावतच घेऊन डब्याजवळ गेले. त्यांनी अचकन घातलेल्या व डोक्यावर फर क्याप घातलेल्या गृहस्थांना विचारलं आपण हैद्राबादचे काय? त्यांनी होय म्हणताच दामुअण्णानं त्यांना म्हणलं 'उतरा डब्याबाहेर.' कां म्हणून विचारतां त्यानं म्हटलं 'तें मी मग सांगीन प्रथम उतरा. हुज्जत घालु नका. वेळ दवडुं नका. तुमचं सामान कोणतं तें सांगा.' ते गृहस्थ सामान कोणतं आहे हे दाखवून खाली उतरले. दामुअण्णांनी हमालाकडून चालूं लागलेल्या गाडींतून सामान काढलं व मग ४।५ मिनिटानं शांतपणानं आपण कोण, कशाकरितां आलों वगैरे सांगितलं. श्री. रामराव कोरटकर व त्यांचे स्नेही श्री. पाध्याकडे गेलेत. दुसऱ्या दिवशीं दामुअण्णांनी पाध्यांच्या येथे जाऊन जेवणाचं रीतसर आमंत्रण दिलं व पाध्यांना म्हणाले, "माधवरावजी, हे गृहस्थ आमचे व्याही जतकर यांचे नातेवाईक. ह्यांना आमचा पाहुणचार घेतल्यावाचून जाऊं दिलं असतं तर आमची नाचक्की झाली असती. हे आमचे पोवाडे गातेना! आम्ही त्यांच्याकडे दिलेल्या मुलीचे चुलते. तेव्हा हर प्रयत्नानं व्याह्यांना, मुलाच्या बापाला, व कुटुंबीयांना खुष केलंच पाहिजे. नाहीतर काय परिणाम होतात हे काय तुम्हाला सांगायला पाहिजे?" माधवरावजी हासले. इतर मंडळीही हासली. माधवरावजींना जेवायचं आमंत्रण दिलं तेव्हा ते म्हणाले ते वृद्ध असल्यामुळे कुठे जेवायला जात नाहीत. पाहुणे मोकळे आहेत. त्यांचे ते मालक आहेत. ते येत असल्यास त्यांची आडकाठी नाही. पाहुणे व माधवरावजींचे पुतणे जेवावयास आलेत. रामरावना व त्यांच्या स्नेह्यांनो सरलला दाखवण्यांत आनं. नतर

पाहुण्याबरोबर माधवरावजींच्याकडे दामुअण्णा गेले. तेव्हा त्यांनी विचारलं ‘ नुसती मेजवानी दिली की मुलगीही दाखवली ’ तेव्हा दामुअण्णा हसत हसत म्हणाले ‘ मेजवानी फुकट कशी जाऊं देईन. एका दगडानं दोन पक्षी मारण्याचा प्रयत्न केला आहे. व्याह्याच्या नातेवाईकाला खुष करण्याचा व मुलगी दाखवण्याचा. असे प्रसंग कोणी फुकट जाऊ देतात काय? तुम्हालाही अशा गोष्टीचा अनुभव असेलच.’ माधवरावजी हासले व म्हणाले, ‘ तूं पक्का नागपुऱ्या आहेस.’ मुलगी सरल पसंत पडली की नाही ह्या त्यांच्या प्रश्नाचें उत्तर देताना दामु म्हणाला ते तो काय सांगेल. मंडळी मुंबईस गेल्यावर कळवणार आहेत. मुलगी पसंत पडली. लग्न एका महिन्याच्या आंतच म्हणजे १९३२ चे फेब्रुवारींत जुन्या रीतीनंच म्हणजे पांच दिवस झालं. पण ह्या पांचही दिवसांत वर पक्षाकडून कधी किटकीटी झाल्या नाहीत. त्यांनी नेहमी जुळतंच घेतलं व हा मंगल प्रसंग अत्यंत शांततेनं व आनंदानं पार पडला.

मी ज्या दिवशीं कोर्टातून घरीं येऊन तें पत्र वाचलं त्या दिवशीं एखादा तास अर्धा तास उशीरानं येतो तर काय झालं असतं याचा विचार करा. दामुला स्टेशनवर जाण्यास पांचच मिनिटें उशीर झाला असता तर काय झालं असतं ह्याचाही विचार करा जी घटना एकाकी घडून आली ती तशी घडली असती का? म्हणूनच ईश्वरी नेमानेम म्हणायचा. मी असंही म्हटलेलं आहे की ह्या विवाहानं सरकारच्या गैरमर्जीत असलेले सी. आय. डी. च्या निगराणींत असलेले दोन गृहस्थ एका ठिकाणीं आलेत. माझ्यासंबंधानं वाचकांना माहिती झालीलीच आहे. न्या. केशवरावजी ह्यांच्या पाठीमागे पोलीसचा ससेमिरा आहे हे न्या. मू. लग्नसमारंभ आटोपल्यावर गेल्याच्या दुसऱ्या दिवशीं कळलं. हैदराबादचे सी. आय. डी. वाले इथल्या सी. आय. डी. वाल्याना घेऊन घरीं आले व दामुअण्णा जवळ त्यांच्या संबंधी चौकशी करूं लागले. दामुअण्णांनी केशवरावजी काल वापस गेलेत हे सांगण्या पलिकडे माहिती देण्याचं नाकारलं व त्यांची बोळवण केली. हैदराबादच्या सी. आय. डी. वाल्याचं बैल गेला व झोपा केला अशा सारखं झालं.

## मेरूनं समुद्रांत बुडी मारली, हिमालयाला हुडहुडी भरली व समुद्र खारट झाला ह्याला कारण ?

वर १९२८ सालांत व १९३२ सालांत झालेल्या माझ्या मुलींच्या लग्नाचा उल्लेख आलेला आहे. ह्या दोन्ही प्रसंगीं माझे बंधु डॉ. गोपाळराव देशमुख हजर होते. १९२८ सालांत झालेल्या लग्नाच्या प्रसंगीं त्यांच्या हाजरीचा फायदा, डॉ. परांजपे, गोपाळराव ओगले ह्या हिंदु मुलींच्या शाळेशीं संबंध असलेल्या सार्वजनिक कार्यकर्त्यांनी व गोविंदराव चोळकर ह्या अनाथ गृहाशीं संबंध असलेल्या कार्यकर्त्यानं घेतला; व शाळाच्या इमारत फंडाकरिता याचना केली. माझ्या बंधुनी भरभक्कम मदत केली ती ह्या शर्थींवर की हिंदु मुलींच्या शाळेचं नांव "सौ. दादीबाई देशमुख हिंदु मुलींची शाळा व अनाथ मुलांच्या व इतर मुलांच्या शिक्षणाकरितां निघणाऱ्या शाळेचें नांव "विनायकराव देशमुख एग्रिकलचरल मिडल-स्कूल" असं असावं. ह्या कार्यकर्त्यांनी त्या अटी मान्य केल्या. दोन्हीही संस्थांनी सार्वजनिक सभा भरवून डॉ. गोपाळरावचा सन्मान केला. त्यांच्या सन्मान प्रसंगीं डॉ. परांजपे व इतर मंडळींनी त्यांच्या उदार देणगीची प्रशंसा केली व मनःपूर्वक आभार मानले. त्या वेळीं उत्तरादाखल डॉ. गोपाळराव ह्यानां भाषण केलं. त्याचा आशय असा: "मी देणगी दिली म्हणून आपण माझी प्रशंसा केली व आभार मानलेत. पण मला वाटते खरोखर जर कोणाची प्रशंसा करावयाची असेल व आभार मानावयाचे असतील तर ज्यानी ही



डॉ. गोपाळराव देशमुख

देणगी माझ्याकडून काढली त्यांचे. ज्याच्या जवळ धनाचा गड्डा आहे त्याच्या जवळून देणगी मिळवण्याचं काम कठीण असतं. त्याला ती देणं सहज गोष्ट आहे असं तुम्हा आम्हाला वाटेल पण घडते अगदी उलट. संस्कृत भाषेतील वाङ्मय वाचत असतांना कुठे तरी वाचलेल्या एका गोष्टीची आठवण होते तिचा दृष्टांत देतों. एकदा काय झालं की अठराविश्वे दारिद्र्यानं गांजलेला व अन्नास मोताद झालेला सत्शील व विद्वान याचक सुवर्णाचा पर्वत मेरू ह्याच्याकडे गेला. उद्देश हा की एवढा मोठा मेरू तो त्याला कांही देणगी देईल व मग त्याची विवंचना सहज दूर होईल. पण मेरूनं ह्या याचकाला पाहून समुद्रांत बुडी मारली ती मारलीच. वर कांही आला नाही! नंतर निराश झालेला हा याचक उच्च स्थानास पोचलेल्या हिमालयाकडे गेला. त्याला त्या याचकाला पाहून हुडहुडी भरली!! मग काय करील बिचारा याचक! तिथून निघाला तो रत्नाकराकडे गेला. जातांना विचार केला ह्याच्या पोटांत किती तरी रत्नं आहेत. आपल्याला दोन तीन मिळालेत तरी आपलं काम भागेल. पण झालं काय की याचकाच्या याचनेनं समुद्र एकदम खारट झाला! तेव्हा श्रीमंत माणसांजवळून पैसा काढणं कठीण असतं हे आपल्याला समजलंच असेल. जे त्यांच्या जवळून देणगी काढतात त्यांचीच तारीफ करायला पाहिजे. आताही याचक कुणा श्रीमंताकडे वर्गणीकारितां गेला की त्याला सांगण्यात येतं, मालक घरीं नाहीत, हें नाही सांगितलं तर मग मालक बिमार आहेत. समजा अवचित अशी या याचकाची व त्या श्रीमंताची भेट झाली तर मग तें तोंड आंबड खारट करून तुमची बोळवण करतील. श्रीमंत मनुष्याजवळून सार्वजनिक कामाकरिता सुद्धा देणगी काढणं कठीण आहे हें तुम्हाला दिसून आलं असेल. धनिक गृहस्थांना मी विनंति केल्यानं जर तुमचा कांही फायदा होणार असेल तर तुम्ही केलेल्या विनंतिला मी माझ्याही विनंतिची पुस्ति देतों."

## गुंडापासून स्त्रियांचं संरक्षण कोणी व कसं करायचं ?

गुंडबाजी करणारा तो गुंड—मग तो सुशिक्षित असो वा अशिक्षित. त्यांच्यापासून ज्या स्त्रियांना 'अबला' म्हणून अजूनही म्हणण्यांत येतं त्यांचं संरक्षण करायचं कोणी व कसं ? युरोपांतील ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, रशिया

वगैरे देशांतील स्त्रियांनी जागतिक दुसऱ्या लढाईचे वेळीं आपलं सामर्थ्य जगास दाखवून दिलं. त्यांनी संरक्षण खात्याच्या निरनिराळया भागांत त्याच प्रमाणे रणक्षेत्रावर पुरुषांच्या बरोबरीचीं कामं केलीं व जे त्यांना अबला म्हणतात त्यांचे दांत त्यांच्याच घशांत घातले. त्यांना म्हणजे स्त्रियांना योग्य वेळीं योग्य तें शिक्षण दिल्यास त्या राजकीय, सामाजिक व औद्योगिकच नव्हे तर युद्ध-क्षेत्रांत सुद्धा काम करूं शकतात हे कोणाही डोळस मनुष्याला दिसून येईल. स्त्रियांचं क्षेत्र फक्त 'चूल व मूल' असं सनातनी माणसानं पाहिजे तर म्हणावं. पुरुषांच्या मार्गातील 'धोंड' असं स्त्रीदाक्षिण्यशून्य माणसानं पाहिजे तर तिला नांव ठेवावं. शिक्षणानं, प्रवासानं व अनुभवानं ज्याचा दृष्टिकोन विशाल झाला आहे तो तिच्या कर्तबगारीची तारीफच करत राहील.

सुशिक्षित मध्यमवर्गीयांत परिस्थितीला अनुसरून मुलीना ज्या प्रमाणे उच्च शिक्षण, गायन, चित्रकला इत्यादि कलांचं शिक्षण व गृहशिक्षण देण्यांत येतं. व व्यायामाकरिता दोरीवरुन उड्या मारणं, ब्याडमिंटन, टेनीस इत्यादि खेळ खेळण्यास उत्तेजन देण्यांत येतं त्याचप्रमाणे स्वतःचं संरक्षण स्वतःच करण्यास त्यांना कांही मर्दानी खेळ शिकविले पाहिजेत असं मला वाटतं. स्वतःचं संरक्षण स्वतःच करायला शिकलं पाहिजे असं मी म्हणतों याचं कारण आता त्याना घराबाहेर बाजारहाट करण्याकरितां, त्याच प्रमाणे उद्योगधंद्याच्या निमित्तानं एकटचं बाहेर पडावं लागतं. दुकटा कोणी पुरुष केशवेषभुषा केलेला पोषाखी व नाजणी असा असेल तर तो ज्यांना जीव-घेऊन पळताना भुई थोडी होते अशा पैकीच असण्याचा संभव जास्त. म्हणून 'आप बल तो सब बल' ह्या न्यायानं स्वतःच बलवान व स्वसंरक्षण-क्षम असं स्त्रियांनी बनलं पाहिजे.

सन १९२७ पूर्वी मर्दानी खेळांचा पसार पुरुषांत व्हावा म्हणून मी पुष्कळ प्रचार केला व सामने भरविले. स्त्रियाकरितांही असं करणं जरूर आहे असं त्या वेळपावेतो वाटलं नाही. पण नागपूरास १९२७ सालीं झालेल्या हिंदुमुसलमानांच्या भीषण दंग्यानं माझे डोळे उघडले व स्त्रियांना स्वतःच संर-क्षण करण्याचं शिक्षण दिलं पाहिजे असं मला वाटूं लागलं. नागपूर व्यायाम शाळेचे सेक्रेटरी श्री. अण्णा खोत ह्यांच्यकडून एक हुशार मुलगा शिक्षक मागवला व मी

आपल्या देखरेखीखाली माझ्या सीव्हील स्टेशन मधील बंगल्यावर माझ्या मुलींना व पुतणीला—सर्व वयानं दहा ते तेराच्या आत–शिकवण्याला सुरवात केली. बंधाट, लेजीम, छडी, लाठी, काठी, बिचवा व माडु (हरणाच्या शिंगाचं बनवलेलं, दोन्ही नोकदार टोकांना धारदार पोलाद बसवलेलं हत्यार) ह्याचं शिक्षण दिलं. त्याचं शिक्षण संपल्यानंतर १९३२ सालीं 'वसंत गौरी' च्या हळदी कुंकवाच्या प्रसंगीं बायांच्या खूप मोठ्या समुदायासमोर त्यांचे खेळ दाखविण्यांत आले. छडीचे, लाठीकाठीचे, व बिचव्याचे हल्ल्याचे व बचावाचे प्रकार दाखविण्यांत आले. त्याच वर्षीच्या धनतोली वरील दुर्गापूजा प्रदर्शनांत मुद्दाम बायांकरिता राखून ठेवलेल्या दिवशीं रात्रीं मुलींनी लेजीम, बंधाट, व लाठीकाठीं व बिचवा ह्यांचे हात करून दाखविले. ह्या प्रदर्शनांत त्या दिवशीं सर्व मुलींत लहान अशा माझ्या एका दहा बारा वर्षाच्या मुलीनं–विमलनं (डॉ. आर. डी. देशमुख ह्यांची पत्नि) दोन्ही हातांत जळत्या बंधाटा घेऊन बंधाटीचे निरनिराळे हात चपलतेनं करून दाखविले. बंधाटी दोन्ही हातानं फिरवणारे माणसं सुद्धां क्वचितच. मला वाटते निर्भयपणानं, धीटाईनं, हुडपणानं कोणतंही काम करण्याचं शिक्षण देण्याचं वय हेंच. शिक्षण सुरवात करण्याचं वय बालवय हेंच. पलीकडे वय जसं जास्त होतं तसं तो आपल्या देहास, जीवास होणाऱ्या अपघाताचीच जास्त फिकीर करतो. त्याची धाडशी काम करण्याची हिम्मत बढत नाही. माझं स्त्रीयांत मर्दानी खेळांचा प्रचार करण्याचं कार्य दोन तीन वर्षांतच ह्या मुलींचीं लग्न झाल्यामुळे बंद पडलं.

हिंदु स्त्रियांच्या पोषाखांत ज्याचं स्वसंरक्षण करण्याकरितां शस्त्र म्हणून उपयोग करतां येईल अशी कोणतीच वस्तू नसते. त्यानी बिचवा वापरावा. शिख स्त्रियांना किरपान वापरतां येतें. पोषाखांत एखाद्या निरुपद्रवी दिसणाऱ्या वस्तुचा सुद्धा स्वसंरक्षणार्थ शस्त्रासारखा उपयोग करतां येतो हे मी विलायतेंत असतांना घडलेल्या ज्या एका प्रसंगाचा उल्लेख करणार आहे त्या वरून दिसून येईल.

१९०८ सालची गोष्ट. लंडनच्या इस्ट एँड भागांत एका रात्रीं सरासरीं १० वाजतां घडलेली. एका ब्यालेट ड्यान्सरला (तडफीचा जोराच्या हाल-

चालीचा नाच नाचणारनीला) एका गुंडानं रस्त्यांत अडवलं व तिला छेडण्याला सुरवात केली. त्या बरोबर तिनं चटकन डाव्या हातांत आपली डोक्यावरची टोपी (Hat) व उजव्या हातांत ह्याटपिन (Pin) काढून घेऊन त्वेषानं, अंगाला बंदुकीची गोळी चाटून गेलेल्या वाघीणीप्रमाणे चवताळून सर्वजोर एकवटून अचानक पण अचूक त्याच्या अंगावर उडी मारली व त्याच्या छातींत ती हातभर लांब पोलादी ह्याटपीन खुपसली व लगेच तडफीनं लांब लांब छलांगा टाकत व गिरक्या मारत तिथून नाहीशीं झाली. हे सर्व इतक्या आकस्मित रीतीनं व तडफीनं तिनं केलं की ही काय करते आहे ह्याचं भानच तिथं असलेल्याना राहिलं नाही.

अशी कांही योजना हिंदी स्त्रियांच्या पोषाखाच्या बाबतींत करतां येईल का ह्याचा विचार विचारवंत स्त्रीपुरुषांनी करावा. नाहीतर बिचवा जवळ बाळगावा.

## मध्यवर्ति असेंबलीचा काल. १९३७-१९४६

१९३७ ते १९४६ हा काळ माझा अत्यंत धामधुमीचा काल. त्यांतही शेवटलीं तीन वर्षं तर अशी की घरीं कोणत्याही महिन्यांत एक आठवड्याच्या वर कांही राहीलों नसेन. माझा भाऊ गोपाळ हा १९३५ ते १९४६ ह्या कालांत व नंतरही सेंट्रल असेंबलीचा सभासद होता. त्यानं समाजांत-विशेषतः स्त्रियांच्या वारसा हक्काच्या व विवाहाच्या बाबतींत-सुधारणा करणारे कायदे घडवून आणलेत, इतर सार्वजनिक चळवळींत भाग घेतला, त्याच प्रमाणे समाजसत्तावादी भूमिगतांना मदत केली. ह्याच कालांत त्याचे महात्मा गांधीशीं व कांग्रेस हायकमांडशीं खटके उडाले. मी ह्या कालांत दुभत्या जनावरांना जी क्रूर वागणूक मिळत असे ती थांबवण्याकरितां, हिंदु लोकांच्या जुन्या वैदिक पद्धतीनं लग्न करण्याच्या बाबतींतल्या अडचणी नाहीशा करण्याकरितां व वसाहतींतील लोकांना ठोशास ठोसा ह्या पद्धतीनं वागवण्याकरितां कायदे करण्याचे सफल प्रयत्न केलेत. अनेक महत्वाच्या स्टयांडींग कमिटीचा सभासद ह्या नात्याने काम केलें. डीफेन्स कन्सलटेटीव्ह कमीटीचा सभासद म्हणून इजिप्ट, ट्रीपोली वगैरे देशांतून प्रवास केला. ह्याच कालांत क्रिप्स मिशन, क्याबिनेट मिशन येऊन गेलं. मि. जिना नबाब लियाकत अली खान व

शौकत अली–कांही कालपर्यंत ह्याच असेंबलीचे सभासद होते. लोकनायक बापुजी अणे व श्री. भुलाभाई देसाई हेही ह्या असेंबलींतच होते. ह्या कालांत घडलेल्या अशा अनेक मनोरंजक व उद्‌बोधक घटना आहेत. त्या ह्या करण्डकांत घालणें शक्य नाही. कारण तो आधीच अत्रजड झालेला आहे. ह्या सर्व घटना निराळ्या म्हणजे तिसऱ्या करण्डकांत घालण्याचें ठरविलें आहे. तो केव्हा प्रसिद्ध होईल हें आज सांगतां येत नाही. पण ज्या अर्थी हिंदुस्थानांत कांही प्रातिनिधिक संस्थांत पार्लमेंटरी पद्धतीला अनुसरून कामकाज चालतं त्या अर्थी असेंबलींत समाजाच्या हिताचं काम करण्यास मी आपल्याला कोणत्या नियमानं बांधून घेतलं व काम करणाऱ्या मनुष्याच्या अंगीं कोणते गुण असावेत हे उघड व्हावे म्हणून कांही घटना येथे नमूद करतों.

## बापुजी, गोविंदरावांनी तुमच्यावर बहिष्कार टाकला

सरकारी अधिकाऱ्यानं सभासदाना दिलेल्या किंवा सरकारी अधिकाऱ्याना लोकानं दिलेल्या चहापार्टीला, भोजनाला, किंवा त्यांच्या सन्मान प्रसंगाला आपण रहावयाचं नाही. हा नियम मी माझे स्नेही लो. बापुजी अणे हे एक्सिक्युटिव्ह कौन्सीलर झाल्यावर सुद्धा, ह्याच प्रमाणे डॉ. खरे एक्सिक्युटिव्ह कौन्सीलर झाल्यावरही कडक रीतीने पाळला. एकदा माझे मित्र काळीकर कौन्सील आफ स्टेटचे सभासद लो. बापुजींना ( त्या वेळेचे एक्सिक्युटीव्ह कौन्सीलर.) माझ्या समक्ष म्हणाले सुद्धा की " बापुजी, गोविंदरावनं तुमच्यावर बहिष्कार टाकला आहे. " त्यावर मी म्हणालों "बिहिष्कार बिहिष्कार आपण जाणत नाही. ज्याचं खावं त्याला शिव्या द्यावं हें आपल्याला जमत नाही आणि माझं तर काम सरकारला शिव्या देण्याचं. ज्याचं खावं त्यानं जर एखाद्या वेळेला भीड खर्चली तर मग निर्भिड होणं कठीण जाईल म्हणून अधिकाऱ्यांशीं संबंध ठेऊनये हा नियम धरला आहे. " ह्या नंतर एकदा खरोखरच एका परिचित एक्सिक्युटीव्ह कौन्सीलरनं भर असेंबलींत त्याच्या खात्याशीं संबंध पोचणारी महत्वाची 'अडजर्नमेंट मोशन' मी काढून घ्यावी अशी विनंति केली. मग मला निष्ठुर होऊन भर असेंबलींत सागांव लागलं की अशा ह्या अर्ज विनंत्या माझ्यावर कांहीही परिणाम करूं शकणार नाहीत व मी अडजर्नमेंट मोशन चर्चेकरिता मांडणारच. त्या नंतर असेंबलींत विशेषेंकरून सरकार

पक्षांत बरीच खळबळ उडाली. ही गोष्ट असेंबलींतील प्रोसीडींग्सवरुन दिसून येणार आहे.

## मला मानाची जागा देणं सरकारला भाग पडलं

निर्भीडपणा बरोबरच मनुष्याला-सभासदाला-कायद्याचं ज्ञान पाहिजे. असेंबलींचे जे नियम व नियमाखाली झालेले निवाडे आहेत त्यांचं ज्ञान पाहिजे. सर्व प्रांतांतील जबाबदार व प्रमुख दैनिक वर्तमानपत्रांचं वाचन पाहिजे. त्या वाचून प्रश्न, अडजर्नमेंट मोशन, ठराव आणणं जमत नाही. मनुष्य हुशार व उद्योगी पाहिजे. सरकारकडून कशाचीही अपेक्षा न केली पाहिजे. पुरवणी प्रश्न टाकून सरकारी अधिकाऱ्याला कैचींत धरण्याची चतुराई पाहिजे. हजरजवाबीपणाचीही गरज आहे. अंगीं धमक तर असलीच पाहिजे. इतकं असल्यानंतर एखाद्या सभासदाला असेंबलींत आपला प्रभाव पाडणं अशक्य नाही. याचं एक उदाहरण देतों. मी कांही कालपर्यंत असेंबलींत श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या भाषेंत सांगायचं म्हणजे 'एकांडे बारगीर' होतों. कोणत्याच पार्टीचा मेम्बर नव्हतों. माझी असेंबलींत बसण्याची जागा एक्सिक्युटीव्ह कौन्सीलर्सच्या मागच्या अगदी शेवटच्या बाकावर होती. त्या वेळेला सर सुलतान अहमद हे 'लीडर आफ धी हाऊस' होते. एक दिवस त्यांच्यावर व त्यांच्या सहकार्य करणाऱ्यांवर प्रश्नांचा व पुरवणी प्रश्नांचा असा भडिमार केला की त्यांनी मला असेंबलींत हाऊस सुरू असतांनाच आपल्या जागेवरून म्हटलं "Who gave you that seat? We have to twist our necks. You are not a silent member." मी म्हणालों "I don't know. Ask your whip." माझं ठरावावरचं भाषण ऐकतांना, त्याच प्रमाणे प्रश्न व पुरवणी प्रश्नांना उत्तर देतांना, काम तहकुबीच्या ठरावावर चर्चा चालली असतांना त्यांना व इतर एक्सिक्युटीव्ह कौन्सीलर्सना वारंवार मागे माझ्याकडे पाहताना खूप मान वळवावी लागे. गृहस्थ घाईस आला. दुसऱ्याच दिवशीं माझी जागा असेंबली-मधल्या मध्यभागांतील नं २ च्या बेंचावर आली.

## सरकारला शिव्या दिल्या (Expose केलं) तरच काम होईल

सन १९४३ च्या डिसेंबर महिन्यांत अखेरीसच व १९४४ च्या जानेवारीच्या आठवड्यांत तिळसंक्रांतीच्या सुमारास मी पुण्यास होतों. तिथल्या 'महाराष्ट्र व्यायाम शाळेशीं' संबंध असलेले डॉ. जेजुरीकर मला भेटावयास आले व व्यायामशाळेला भेट देण्याविषयी विनंती केली. मी गेलों. त्यांनी 'सैनिकीकरण मंडळा' संबंधी माहिती दिली. त्या मंडळाचे श्री जमनादास मेथा- त्यावेळचे मध्यवर्ति असेंब्लीचे सभासद- हे अध्यक्ष होते. त्या मंडळाला व व्यायाम शाळेला सदर्न कमांडच्या सैन्यांतील आफीसर्सनी, दखनमधल्या (Chiefs) चीफ्सनी व राजांनी भेटी दिल्या होत्या. ह्या दोन्ही संस्थांची तारीफ केली होती. संस्थेतर्फे डिफेन्स डिपार्टमेंटला सैनिकी शिक्षण देण्याकरिता साहित्य मिळण्यासाठी अनेक महिन्यापासून किती तरी अर्ज करण्यांत आले होते. पण परिणामाच्या नांवानं शून्य. ह्या मोठमोठ्या माणसांच्या सन्मानाचा व त्यांच्या शिफारशींचा व प्रशंसापत्रांचा परिणाम भोपळ्या एवढा! सैनिकीकरण मंडळाला साहित्य मिळवून देण्याचं काम मी हातीं घ्यावं असं त्यांचं म्हणणं पडलं. मी म्हणालों "आपलं काम तर बोवा सरकारला शिव्या देण्याचं. तसं जर कांही ह्या कामासंबंधी करतां आलं तर तुम्हाला साहित्य मिळवून देऊं. सरकारचं आमचं विळ्याभोपळ्या सारखं सख्य. तुम्ही पहातांच आहा अधिकाऱ्यांना व राजांना दिलेल्या पार्ट्या, पानसुपाऱ्या आणि हारतुरे तुमच्या कामास आले नाहीत. तुमचा सरकारशीं झालेला पत्रव्यवहार वाचून जर मला असा गरम मसाला मिळाला की मी सरकारला शिव्या देऊं शकतों तर तुमचं काम फत्ते असं समजा." त्यांचा सरकारशीं झालेला पत्रव्यवहार कांही वेळपर्यंत वाचला, त्याचीं टिपणं घेतलीं व नंतर मी त्यांना म्हणालों "तुम्हाला साहित्य खात्रीनं मिळवून देतों." त्यांचा भरवसा बसला नाही असं त्यांच्या हासण्यावरून दिसलं कारण मी 'खात्रीनं' हा शब्द उपयोगांत आणला होता ना! थोड्याच दिवसानंतर असेंबली सेशन होतं. त्यांत मी ह्या मंडळाच्या equipment च्या प्रश्नावर बार उडवून दिला. काम फत्ते झालं. डॉ. जेजूरीकरांनी त्यांचं काम करून देण्यांत मी जी त्यांच्याच शब्दांत सांगायचं म्हणजे 'आत्मीयता

९९९५२ ५-५-६९ १५।२२।४

दाखवली ' त्याबद्दल एक पत्र पाठवून आभार मानले. श्री. जम्नादास मेथा ही घटना घडून आल्यानंतर कांही दिवसांनी दिल्लीस आले त्या वेळेस त्यांनीही भेट झाल्यानंतर माझे आभार मानले.

## मी एकीकडे व सबंध असेंबली दुसरीकडे-स्वतंत्र सभासदच लोकशाही टिकवूं शकतात

सरकारला सतत हुशारीनं, मेहनतपूर्वक व बेमूर्वत सतावण्याच्या माझ्या धोरणामुळे ते माझ्या कितीं विरुद्ध होते हें पटवून देणारं व स्वतंत्र सभासदासंबंधी मि. जिना काय वाटत होतं हें दाखवून देणारं एक उदाहरण देऊन ह्या विषयासंबंधी आटोपतं घेतों. सरकारला एकसारखं सतावण्याच्या माझ्या उद्योगामुळे असं झालं की कांही वर्तमानपत्राच्या प्रतिनिधींनी मला रेल्वे स्टयांडींग फायनान्स कमिटीच्या निवडणुकीकरितां उभं राहण्यास सांगितलं. ते म्हणाले "तुमच्यासारख्यानी ज्यांचं (Nuisance value) सरकारला उपद्रव देण्याच्या दृष्टिनं मोल खूपच आहे त्यानी रेल्वे स्टयांडींग फायनान्स कमिटावर जायला पाहिजे. त्या कमिटीवर तुम्ही गेलांत म्हणजे ह्या रेल्वे खात्यांत काय गोंधळ आहे हें तुम्हाला समजेल. सगळं काळंबेरं बाहेर येईल. ह्या खात्यांतील बिंगं बाहेर पडतील. सरकारला सतावण्याला तुम्हाला खूप मसाला मिळेल." मी त्या कमिटीवर जाण्याचं कबूल केलं. मला वाटत होतं माझ्या कामाचं कौतुक करणारे बरेच सभासद असेंबलींत आहेत तेव्हा निवडून येणं कठीण जाणार नाही. ह्या कमिटीवर असेंबलीला बारा सभासद निवडून द्यावयाचे असत. तेव्हा ह्या बारांच्या शर्यतींत 'फ्लुक'चा चान्स कां न घ्या असा मनाशीं विचार केला. ह्या निवडणुकींत मतदान गुप्तमतदान पद्धतीनं होत असे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून मी उभं राहण्याचं ठरवलं व सरकार जर आडवं न येतं किंवा एकटंच आडवं येतं तर निवडूनही आलों असतों. पण सरकार माझ्या मुळावर आलेलं. मतदानाच्या आदले दिवशीं संध्याकाळीं सरकारी व्हिपनं माझा कसंही करून पराभव करावयाचा ठरवलं. मतदानाच्या दिवशीं व वेळीं प्रत्येक सभासद मतदान ज्या खोलींत होत होतं तिकडे आपल्या हातांत एक लांबलचक कागद घेऊन जात असे व कागदाकडे पाहून मतदान करीत असे. कोणाकोणाला मत द्यायचं, कोणत्या प्रिफरन्सचं द्यायचं हे सर्व त्या कागदावर असे असं मला

कळून आलं. ह्या पत्रकांत (कागदांत) लिहिल्याप्रमाणेच युरोपीयन ग्रुपनं, न्याशन्यालीस्ट पार्टीनं, मुसलिम लीग पार्टीनं, बारा कडबोळ्याच्या तत्वांची चाड नसलेल्या पण असेंबलींत कांही तरी महत्वाचं स्थान मिळावं म्हणून बनलेल्या इंडीपेंडंट पार्टीनं, सरकारी सभासदानं व सरकारनं नेमलेल्या सभासदानं सर्वांनी माझ्या विरुद्ध मत दिलें असलें पाहिजेत. गव्हर्नमेंटनं Joint whip काढला असं कळलं-सर्व पार्थ्यांच्या व्हीपची सल्ला मसलत होऊन व सरकारनं प्रत्येक पार्टीला तिचे सभासद-विवक्षित संख्या देण्याचें कबूल करून निघालेला व्हीप हा. सर्व पार्टीच्या सभासदांची अशी तयारी व मतदानाची पद्धत पाहिल्यावर मी असेंबलीच्या लॉबींत जाऊन बसलों. आलों तरी बरं नाही तरी बरं अशी मनाची ठेवण ठेवली. निवडून आलों तर पत्र प्रतिनिधीच्या अपेक्षे प्रमाणे काम करीन नाही आलों तर तसं काम करण्याची संधि मिळणार नाही. लॉबीमधे बसलों असतांना तिथून एक्सिक्युटीव्ह कौन्सीलर्स मतदानाच्या खोलीकडे जातांना त्रासदायक चेहरा करून माझ्याकडे पहात पहात जात होते. कांही वेळानं मि. जिना लॉबींत आले. त्यांना माझ्या समक्षच मुसलीम लीग पार्टीच्या व्हिपनं मि. सेठनं फोन केला होता की कसंही करून मत द्यायला याच. मि. जिना हे निवडणूकीच्या लफड्यांत पडणाऱ्या पैकी नव्हते. पण 'याच' असा आग्रहाचा फोन गेल्यावर येणं भाग पडलं. लॉबींत आल्याबरोबर त्यानी काय भानगड आहे ह्याची चौकशी करायला सुरवात केली. कारण त्यांच्यावर हा नवीनच प्रसंग होता. त्यानी लॉबींतल्या मंडळीला 'who has created all this trouble ?' हा उपद्व्याप कोणी केला असा प्रश्न केला. लॉबींतल्या मंडळीनं माझ्याकडे बोट दाखवलं. मि. जिना माझ्याजवळ आले. "Mr. Deshmukh, I thought you were a member of a party" (मि. देशमुख, तुम्ही एका पार्टीचे सभासद होता असं मला वाटलं") मीः मी होतों. आता नाही. आता स्वतंत्र आहे. मि. जिना म्हणाले, (आपल्या उजव्या हाताची तर्जनी लॉबीच्या छताकडे करून व बाकीच्या बोटांची मूठ वळून शब्दांवर जोर देत देत आवाज चढवून म्हणाले) "Remember Mr. Deshmukh, it's the independents who keep the

democracy going-मि. देशमुख लक्ष्यांत असूं द्या की स्वतंत्र सभासदच लोकशाही टिकवूं शकतात " व मत देण्याकरितां निघून गेले.

Joint whip असूनही मला कांही मतं मिळालीं. त्यांत दोनक फर्स्ट प्रिफरन्स व सेकंड प्रिफरन्सही. पण निवडून येऊं शकलों नाही. एवढ्या कडे-कोट बंदोबस्तांतून निवडून येणं शक्यच नव्हतं. उलट एका प्रिफरन्स व्होट बद्दल-कारण एक माझं होतं व कांही सेकंड प्रिफरन्सबद्दल मी आश्चर्य करीत राहिलों.

स्वतंत्र सभासद तोच की जो एखाद्या प्रश्नासंबंधी बुद्धिच्या व अनुभवाच्या जोरावर आपलं मत बनवतो व मग पक्षाच्या आग्रहास्तव किंवा पक्षोपक्षाच्या समेटास्तव किंवा सरकार व सरकार पक्षाच्या मोहाला बळी पडत नाही. स्वतंत्र सभासद आपली बुद्धि गहाण टाकत नाही. तो आपलं इमान शाबूद राखतो. बुद्धिवान, अभ्यासू, जागरूक, हजरजबाबी व निःस्वार्थी अशा १०-१२ सभासदांनी जर एखादा पक्ष स्थापून लोकहिताचा कार्यक्रम आपल्यासमोर ठेऊन असेंबलींत काम करण्याचं ठरवलं तर ते सरकारला योग्य मार्गावरून जाण्याला भाग पाडतील अशी माझी खात्री आहे. ह्या पक्षानं आपल्याला स्वतंत्र पक्ष म्हणावं. नांवानं स्वतंत्र पण स्वार्थाकरितां सरकारच्या कच्छपी लागणारा पक्ष नको. माझ्या वेळेला-असेंबलींत असतांना-जो स्वतंत्र पक्ष अस्तित्वांत आला तो स्वार्थलोलुप लोकांचा, पुंजीवाल्यांचा, सरकारच्या जवळून कंट्राक्टस वगैर मिळवणाऱ्या लोकांचा. ते अर्थातच सरकारचे मिंधे असणार. मला पाहिजे नांवानं व वागण्यानं स्वतंत्र. आणि म्हणूनच मी १९२५ सालापासून म्हणत आलों आहे की हाऊस आफ कॉमन्समधल्या पूर्वीच्या Irish members प्रमाणे एक पक्ष असाव. त्याला अल्प संख्ये-मुळे अधिकारसूत्र आपल्या हातीं घेतां येऊं नयेत किंवा त्यांनी घेऊं नये. अस्तित्वांत असलेलं सरकार जर योग्य मार्गानं जात नसेल तर त्याला सतावून ताळ्यावर आणण्याचं किंवा विरोधी पक्षाला आपली मदत देऊन त्या सरकारला पदच्युत करण्याचं काम त्यानं नेहमी करत असावं व राज्ययंत्र आपल्या दाबांत ठेवावं. सरकारला माझ्यासारख्या स्वतंत्र सभासदाचा पराभव करण्या-करितां असेंबलींतील सर्व पक्षांशीं दोस्ती करावी लागली, त्याना आपले दोस्त

करून देवाण घेवाण करावं लागलं ही माझी एकट्याचीच काही कमी जीत नाही.

## उपसंहार

'मी ' ह्या प्रकर्णाची नाही नाही म्हणतां बरीच पानं झालीं. मूळच्या का. स. र. ह्याच्या दुसऱ्या करण्डकांत 'मी हें प्रकरण नव्हतें. पण प्रा. मनूताई नातु एम. ए. ह्यांनी नागपूर शाखेच्या आ. इं. रे. वरुन ७-८-१९५० रोजीं परिक्षण करतांना सूचना केली की लेखकाच्या 'अंतरंगाचें दर्शन ' होण्या सारख्या घटना, लेखकाचें स्वभाव विकसन किंवा विशेष दाखविण्यास मदत करतील अशा घटना दुसऱ्या भागांत याव्यात.' ती सूचना लक्षांत घेऊन 'मी ' हें नवीन प्रकरण जितक्या थोडक्या जागेंत लिहितां येईल तितक्या थोडक्यात लिहिलें आहे. वानगीदाखल ह्या घटना दिल्या आहेत. ह्या वरुन लेखकाचे अंतरंग कसे आहे, स्वभाव विकास कसा होत गेला व स्वभाव वैशिष्ठय काय आहे ह्याचा अंदाज बांधतां यावा असें वाटते.

REFBK-0007788